# गुणी शिक्षक
# गुणवंत शाळा




समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद , मुंबई.



टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स यांच्यासोबत सामंजस्य करार करताना
मा. ना. श्री. दीपक केसरकर, मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
श्री. रनजित सिंह देओल, सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
श्री. कैलास पगारे, राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा तसेच टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स
स्कूल ऑफ व्होकेशनल एज्युकेशनच्या प्रमुख, प्राचार्या मधुश्री शेखर



जागतिक बँकेकडून शाळा भेटीसाठी आलेल्या श्रीमती शबनम सिन्हा एज्युकेशन स्पेशालिस्ट,
डॉ. राहुल पचौरी, नवी दिल्ली, राज्यस्तरीय अधिकारी, जिल्हास्तरीय अधिकारी,
शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक, शिक्षक इ. जिल्हा परिषद शाळा, अमरापूर ता. वाडा, जि. पालघर

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | जिल्हा | शाळा | लेखाचे शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | ठाणे | जि. प. उच्च प्राथ. शाळा अस्नोली | गुणवत्तेच्या यशोशिखरावर आमची शाळा | १ |
| २. | रायगड | जि. प. शाळा, पेझारी | गुणवत्तेचा नंदादीप | ४ |
| ३. | पालघर | जि. प. प्राथ. व माध्य. शाळा, गिरगाव आरजपाडा | कृतीयुक्त शिक्षणातून विद्यार्थी विकास | ७ |
| ४. | मुंबई उपनगर | मनपा मराठी शाळा क्र. १, आकुर्ली कांदिवली (पूर्व) | आजचे शिक्षण, उद्याचे भविष्य | १० |
| ५. | पुणे | जि. प. प्राथ. शाळा चांडोली बुद्रुक | गुणवत्तेचा अखंड ऊर्जास्त्रोत | १३ |
| ६. | अहमदनगर | जि. प. प्राथ. शाळा, पिंपरी जलसेन | उपक्रमांची मांदियाळी | १६ |
| ७. | सोलापूर | जि. प. प्राथ. केंद्रशाळा, अरण | गुणवत्तेचे मंदिर | १९ |
| ८. | नाशिक | जि. प. प्राथ. शाळा, भोयेगाव | संस्कार व आधुनिक शिक्षणाचा समन्वय. | २२ |
| ९. | जळगाव | जि. प. प्राथमिक शाळा, होळ | दिवा लागतो ज्ञानाचा, विकास होतो गावाचा | २५ |
| १०. | धुळे | जि. प. मराठी शाळा, खलाणे | एकाग्रता यशो बिजम् | २८ |
| ११. | नंदुरबार | जि. प. प्राथ. शाळा, काल्लेखेतपाडा | सातपुड्यातील उलगुलान | ३१ |
| १२. | औरंगाबाद | जि. प. केंद्रिय उच्च प्राथमिक शाळा, सातारा | ध्येयपूर्ती | ३४ |
| १३. | बीड | जि. प. उच्च प्राथ. शाळा, जरेवाडी | उपक्रमांची खाण, शाळा आमची छान | ३७ |
| १४. | जालना | जि. प. प्रशाला, परतूर | सुख समृद्धीचा झरा, शिक्षण हाच मार्ग खरा | ४० |
| १५. | परभणी | जि. प. प्राथ. शाळा, आव्हई | गावची साथ, अडचणींवर मात | ४३ |
| १६. | हिंगोली | जि. प. प्राथ. शाळा, फुटाणा | दिशा परिवर्तनाची, एक उत्तुंग झेप आमच्या शाळेची | ४६ |
| १७. | यवतमाळ | जि. प. उच्च प्राथ. शाळा, बिटरगाव (खुर्द) | आपली प्रेरणादायी शाळा | ४९ |
| १८. | अमरावती | जि. प. प्राथ. शाळा, खेड | एकच ध्यास, गुणवत्ता विकास | ५२ |
| १९. | बुलढाणा | जि. प. मराठी उच्च प्राथ. शाळा, भिंगारा | खडतर वाटेवरचा आशादायक प्रवास | ५५ |
| २०. | अकोला | जि. प. प्राथ. शाळा, कानशिवणी | कानशिवणीमध्ये फुलला ज्ञानाचा मळा | ५८ |
| २१. | वाशिम | जि. प. उच्च प्राथ. शाळा, साखरा | प्रवास प्रगतीचा... | ६१ |
| २२. | नागपूर | जि. प. उच्च प्राथ. शाळा, थुगाव, निपाणी | भविष्यवेधी शिक्षण | ६४ |
| २३. | चंद्रपूर | जि. प. प्राथ. शाळा, पालडोह | वर्षाचे ३६५ दिवस ज्ञानदान करणारी शाळा | ६७ |

# अनुक्रमणिका



| अ. क्र. | जिल्हा | शाळा | लेखाचे शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| २४. | गडचिरोली | जि. प. उच्च प्राथ. केंद्रशाळा, आसरअल्ली | शिक्षणाचे आनंदवन | ७० |
| २५. | गोंदिया | जि. प. प्राथ. शाळा, भागी | अशी बहरली आमची शाळा | ७३ |
| २६. | वर्धा | जि. प. उच्च प्राथ. शाळा, तारासावंगा | उपक्रमातून गुणवत्तेकडे, जि.प. शाळेचे पाऊल पडते पुढे! | ७६ |
| २७. | भंडारा | जि. प. पूर्व माध्य. शाळा, महालगाव | आमची शाळा, आमचा अभिमान | ७९ |
| २८. | सातारा | जि. प. प्राथ. शाळा, माझेरी | रात्र अभ्यासिका– एक अभिनव प्रयोग | ८२ |
| २९. | कोल्हापूर | जि. प. प्राथ. विद्या मंदिर, कारभारवाडी | गुणवत्तेचं खणखणीत नाणं | ८५ |
| ३०. | रत्नागिरी | जि. प. पूर्ण प्राथ. आदर्श केंद्रिय शाळा, लोटेमाळ | गुणवत्तेचा भविष्यवेध | ८८ |
| ३१. | सांगली | जि. प. प्राथ. शाळा, नागेवाडी | स्वच्छ, सुंदर माझी शाळा | ९१ |
| ३२. | सिंधुदुर्ग | जि. प. केंद्रशाळा, बांदा नं. १ | विद्यार्थ्यांच्या कृतीशिलतेला वाव देणारी शाळा | ९४ |
| ३३. | लातूर | जि. प. केंद्रिय प्राथ. शाळा, आटोळा | आटोळा शाळा, उपक्रमांचा मळा | ९७ |
| ३४. | उस्मानाबाद | जि. प. प्राथ. शाळा, काटगाव | माझी आनंददायी शाळा | १०० |
| ३५. | नांदेड | जि. प. प्राथ. शाळा, शिबदरा | एकच ध्यास, ज्ञानमंदिराचा सर्वांगीण विकास | १०३ |



## निपुण प्रतिज्ञा

आम्ही प्रतिज्ञा करतो, की आम्ही सर्वजण महाराष्ट्रातील प्रत्येक बालकास पायाभूत शिक्षण कौशल्ये आत्मसात करण्यास उपयुक्त शैक्षणिक वातावरण निर्मिती करण्यास कटिबद्ध आहोत.

आपण सारे मिळून, आपल्या मुलांसाठी निखळ आनंददायी समृद्ध अनुभवाच्या संधी देणारी, अभिव्यक्तीचं आकाश खुलं करणारी, मुक्त छंद जोपासणारी, नेतृत्वाच्या संधी देणारी आणि आत्मसन्मान जपणारी शाळा निर्माण करूया.. आपण सारे मिळून अशी शाळा आणि घर बनवूया.. जिथे बालके अर्थपूर्ण वाचन, हेतुपूरक लेखन व गणिती व्यवहार प्रत्यक्ष जीवनात उतरवतील आणि आयुष्यभर विद्यार्थी राहतील..

अशाप्रकारे, महाराष्ट्रातील प्रत्येक बालकास आरोग्यदायी आणि आनंददायी शिक्षण देऊन 'निपुण बालक' घडविण्याची आम्ही प्रतिज्ञा करीत आहोत.

Samagra Shiksha Maharashtra

| | | |
|---|---|---|
| प्रकाशक | : | समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई<br>जवाहर बालभवन, नेताजी सुभाष मार्ग,<br>चर्नीरोड (पश्चिम), मुंबई ४०० ००४ |
| कार्यालयीन ई–मेल | : | mpspmah@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | : | ०२२–२३६३६३१४ / २३६७९२६७ |
| मार्गदर्शक | : | श्री. रनजीत सिंह देओल, (भाप्रसे)<br>सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,<br>महाराष्ट्र शासन |
| संकल्पना | : | श्री. कैलास पगारे, (भाप्रसे)<br>राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा,<br>महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई |
| संकलन | : | श्रीमती सरोज जगताप<br>सहा. संचालक (कार्यक्रम), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,<br>मुंबई |
| मुद्रक | : | श्री. कृष्ण एंटरप्रायजेस (मॅन्युफॅक्चरर)<br>फोर्ट, मुंबई ४०० ००१. |
| मुखपृष्ठ | : | दीप्तेश सुरेंद्र तेलवणे (तृतीय वर्ष विद्यार्थी, उपयोजित कला)<br>सर ज. जी. उपयोजित कला महाविद्यालय,<br>मुंबई. मो. ९२२६८ ७९५६७ |
| मुद्रित शोधन | : | श्रीमती सरोज जगताप व<br>श्री. विष्णु सरवळे |
| भाषा | : | मराठी |
| प्रती | : | ५००० |
| प्रथम आवृत्ती | : | नोव्हेंबर २०२२ |

(टीप — केवळ समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या शालांतर्गत वितरणासाठी)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**भगत सिंह कोश्यारी**
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य

सत्यमेव जयते

**राज भवन**
मलबार हिल
मुंबई ४०० ०३५
दूरध्वनी : ०२२-२३६३ २६६०
फॅक्स : ०२२-२३६८ ०५०५

# शुभेच्छा संदेश

२९ सप्टेंबर २०२२



महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या वतीने राज्यातील उत्तम शैक्षणिक गुणवत्ता असलेल्या जिल्हा परिषद व महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांच्या यशस्वी उपक्रमांचे पुस्तक स्वरुपात संकलन करण्यात येत असल्याचे समजुन आनंद वाटला.

सदर शाळांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी केलेल्या प्रयत्नांच्या यशोगाथेतून राज्यातील इतर सर्व शाळांना दिशादर्शन होईल व समग्र शाळांची गुणवत्ता अधिक विकसित होईल, असा विश्वास वाटतो.

या उपक्रमाबद्दल मी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे अभिनंदन करतो, तसेच पुस्तक प्रकाशनाला शुभेच्छा देतो.

भगत सिंह कोश्यारी
मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य

**श्री कैलास पगारे**, भा. प्र. से.
राज्य प्रकल्प संचालक
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,
मुंबई

# एकनाथ संभाजी शिंदे
मुख्यमंत्री
महाराष्ट्र


सत्यमेव जयते

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२
29 SEP 2022

## शुभेच्छा संदेश



महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्यावतीने उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता असलेल्या शाळांच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती संग्रह पुस्तिका प्रकाशित करण्यात येत असल्याचे समजून आनंद झाला.

राज्यातील जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी उत्कृष्ट शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येतात. या उपक्रमांतून एकूणच शाळांची आणि शिक्षणाची गुणवत्ता वाढत असते. या उपक्रमांपासून इतर शाळांनी प्रेरणा घेतली तर प्रत्येक शाळा ही उपक्रमशील आणि अधिक गुणवत्तापूर्ण होऊ शकेल. हे उपक्रम सर्व शाळा आणि शिक्षकांपर्यंत नेण्यासाठी ही पुस्तिका महत्वाची ठरेल, असा विश्वास वाटतो. प्राथमिक शिक्षण परिषदेचे यासाठी निश्चितच कौतुक करायला हवे.

उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता असलेल्या शाळांच्या उपक्रम माहिती संग्रह पुस्तिकेच्या प्रकाशनास मनःपूर्वक शुभेच्छा!

एकनाथ संभाजी शिंदे
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य


**दूरध्वनी :** ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, **फॅक्स :** ०२२-२२०२ ९२१४
**ई-मेल :** cm@maharashtra.gov.in, **वेब साईट :** www.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# उप मुख्यमंत्री
## महाराष्ट्र राज्य

## शुभेच्छा संदेश

दि. २७/०९/२०२२



महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या वतीने राज्यातील जिल्हा परिषद व महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमधील विविध शैक्षणिक उपक्रमांच्या अहवाल संग्रहाचे पुस्तक प्रकाशित होतेय, ही आनंदाची बाब आहे.

शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीसाठी वैयक्तिक, आर्थिक, सामाजिक व इतर सर्वच क्षेत्रातील सर्वांगीण प्रगतीचा मूलभूत पाया आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण ही पुढील काळातील महत्त्वाची गरज असल्याने भारत सरकारने नवीन शैक्षणिक धोरण २०२० सुरू केले आहे. या धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी 'निपूण भारत मिशन' कार्यक्रम देखील सुरू करण्यात आले आहे.

भारताच्या अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिनी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी 'पंचप्रण' ही संकल्पना सांगितली आहे. विकसित राष्ट्रनिर्माणासाठी शैक्षणिक दर्जा अतिशय महत्त्वाचा आहे. शिक्षकांच्या अध्यापन कार्यातून विद्यार्थ्यांची क्षमता व कौशल्य विकसित होत असते. मात्र त्यासाठी विद्यार्थ्यांना जशी अनुभवसंपन्नतेची गरज आहे. त्याचप्रमाणे शिक्षकांना नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती असणे देखील आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामीण व शहरी भागातील प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगासाठी वैविध्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. या शैक्षणिक उपक्रमात सहभागी सर्व शिक्षक, विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! हे उपक्रम म्हणजे शैक्षणिक यशकथाच आहे. त्यायोगे शैक्षणिक कार्यात स्थानिक लोकसहभाग देखील वाढत आहे. स्पर्धा परीक्षा, पर्यावरण, संगीत, कला, विविध खेळ, वाचन व लेखन, आरोग्य, वस्तू भांडार, व्यक्तिमत्त्व विकास, आधुनिक तंत्रज्ञान, विविध अभ्यास वर्ग, शिबिरे आदीवर हे उपक्रम प्रत्यक्षात साकारलेले आहेत. या गुणवत्तापूर्ण उपक्रमांचे संकलन पुस्तक राज्यातील इतर शाळांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल, तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी योगदान देईल, याची मला खात्री आहे.!

**देवेंद्र फडणवीस**
मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

जा. क्र. मंत्री/शा.शि.,म.भा./व्हीआयपी/ 129 /2022
दिनांक 04/10/2022

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
शालेय शिक्षण, मराठी भाषा
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : 04/10/2022

# शुभेच्छा संदेश



महाराष्ट्रातील प्रत्येक मुलाला 'गुणवत्तापूर्ण शिक्षण' मिळावे असे महाराष्ट्र राज्याचे ध्येय आहे. महाराष्ट्रातील अनेक शाळा, शिक्षक त्यांच्या स्वतःच्या प्रयोगशीलतेतून शाळेतील प्रत्येक मुल गुणवंत करण्यासाठी व शाळा प्रयोगशील करण्यासाठी प्रयत्न करत आहेत ही बाब खूप कौतुकास्पद आहे. जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपरिषद शाळांमध्ये प्रयोगशील शिक्षकांनी मुलांना घडविण्यासाठी अनेक गुणवत्तापूर्ण प्रयोग राबविले आहेत त्यांचे संकलन पुस्तक रुपात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई कार्यालयाच्या वतीने करण्यात येत आहे ही आनंदाची बाब आहे. या प्रयोगांचा पुस्तकरुपी संकलनामुळे ज्या शिक्षक, मुख्याध्यापक व त्यांच्या कार्यात सहभाग देणारे गांवकरी यांनी केलेल्या कार्याचा गौरव तर होणारच आहे, त्यासोबत या प्रयोगांची माहिती महाराष्ट्रातील इतर शाळांपर्यंत जावून त्यांचे अनुकरण करण्याची संधी इतर शाळा, शिक्षक यांना मिळणार आहे, याचा मला मनस्वी आनंद आहे. या उत्कृष्ट प्रयोगांचे अनुकरण महाराष्ट्रातील सर्वच शाळांनी करावे व महाराष्ट्रातील प्रत्येक मूल गुणवंत व्हावे हे महाराष्ट्राचे ध्येय यामुळे साध्य होण्यास नक्कीच मदत होईल, असा मला विश्वास आहे.

या पुस्तकाच्या संकलनासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई मधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी प्रयत्न केले त्यांचे अभिनंदन करतो व गुणवंत प्रयोगशील पुस्तिकेच्या प्रकाशनाला माझ्या शुभेच्छा.!

**दीपक केसरकर**

मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य

मनु कुमार श्रीवास्तव
मुख्य सचिव

# शुभेच्छा संदेश



महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून राज्यातील जिल्हा परिषद व महानगरपालिकांच्या शाळांमध्ये सुरु असलेल्या शैक्षणिक उपक्रमांपैकी काही महत्त्वाच्या उपक्रमांचे संकलन पुस्तक स्वरुपात प्रकाशित होत आहे, ही आनंदाची बाब आहे.

सक्षम राष्ट्रनिर्मिती मध्ये प्राथमिक शिक्षणाचा वाटा अत्यंत मोलाचा आहे. जिल्हा परिषद व महानगर पालिकांतर्फे चालविण्यात येणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगती करीता पोषक उपक्रम हाती घेतले जातात हे निश्चितच स्वागतार्ह आहे. अशा उपक्रमांची सर्वांना माहिती व्हावी व अनुकरणीय उपक्रमांचे सार्वत्रिक अनुकरण व्हावे यासाठी हे पुस्तक अत्यंत महत्त्वाचे आहे. हे पुस्तक शिक्षकांना व विद्यार्थ्यांना, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, शारीरिक व बौध्दिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल याची मला खात्री आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनाला माझ्या हार्दिक शुभेच्छा!

मनु कुमार श्रीवास्तव (भा.प्र.से.)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी : कार्यालय ०२२-२२०२ ५० ४२/२२०२ ८७ ६२, फॅक्स : २२०२ ८५ ९४, ई-मेल : cs@maharashtra.gov.in

# शुभेच्छा संदेश



शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने 'गुणी गुरु गुणवंत शाळा' ह्या मालिकेचे संपादन होत आहे. याचा मनस्वी आनंद होतोय.

आपण सर्वांनी कोरोनाकाळातील ऑनलाईन शिक्षणपध्दती अनुभवली आहे. आता शाळा पूर्ववत सुरु झाल्या आहेत. प्रतिकूल काळातही महाराष्ट्रातील अनेक शाळा विविध माध्यमाचा उपयोग करुन अविरतपणे विद्यार्थ्यांना शिकविण्याचे कार्य करित होत्या. पाटी, पुस्तक, फळा आणि खडू याच्या पलिकडे जाऊन विद्यार्थ्यांना शाळेची आणि अध्ययनाची नियमित गोडी लागावी म्हणून असंख्य गुणी गुरुंनी अध्यापनाच्या विविध पध्दती उपयोगात आणल्या. अनेक शाळा उपयोगी उपक्रम राबविणे, अशा या वैविध्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी चांगली दिशा मिळाली आहे. आपले राज्य पुरोगामी असून शिक्षणामध्ये प्रगतीपथावर आहे. याची प्रचिती या गुणवंत शाळांचे विविध नाविन्यपूर्ण प्रयोग वाचल्यावर आपल्या लक्षात येते.

विद्यार्थी केंद्रित अध्यापनासाठी शिक्षक जागृत झाले आहेत, ही अतिशय समाधानाची बाब आहे. पालक आणि शिक्षक यांच्यात उत्तम समन्वय साधला गेला की, विद्यार्थी हित घडते. गुणी शिक्षक आणि गुणवंत शाळांनी हेच कार्य व्यवस्थितरित्या केले आहे, त्यात सातत्य ठेवले आहे. त्यांचे विविध शिक्षण प्रयोग प्रेरणादायी आहेत.

शाळा, अध्यापनात नाविन्यपूर्ण बदल करताना दिसून येत आहेत. विद्यार्थ्यांना शाळेची ओढ लागावी, शिक्षण आनंददायी व्हावे यासाठी सदैव कार्यरत असणाऱ्या गुणी शिक्षक आणि गुणवंत शाळांकडून असंख्य शाळा प्रेरणा घेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास प्रेरक ठरेल असाच हा उपक्रम आहे. शिक्षकांच्या या सर्व प्रेरणादायी उपक्रमांना माझ्याकडून मन:पूर्वक शुभेच्छा!

रनजीत सिंह देओल (भा.प्र.से.)

सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

महाराष्ट्र राज्य

# मनोगत



शाळा म्हणजे बालकांच्या सर्वांगीण विकासाचे ठिकाण. शाळेच्या प्रत्येक वर्गात देशाचे भविष्य घडत असते, शाळेतच देशासाठी उपयोगी पडणारे नागरिक घडविले जातात आणि ते घडवत असतात आपले शिक्षक! ग्रामीण भागात, डोंगरदऱ्यात, अतिदुर्गम भागात जिथे काही ठिकाणी तर पुरेशी वाहन व्यवस्था देखील नाही अशा ठिकाणी विद्यार्थी घडविण्याचे सुरु असलेले गुरुजनांचे उत्कृष्ट कार्य सर्व महाराष्ट्रासमोर आणले पाहिजे असा विचार मनात आला आणि या पुस्तक निर्मिती प्रक्रियेला सुरुवात झाली. आपल्या महाराष्ट्रातील मुंबई उपनगरातील एक मनपा शाळा व उर्वरित ३४ जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये सुरु असलेल्या नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांचे एकूण ३५ लेख 'गुणी शिक्षक, गुणवंत शाळा' या पुस्तकात संकलित केले आहेत.

शाळेचे महत्त्वाचे घटक म्हणजे पालक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, गावकरी, शिक्षण विभागाची पर्यवेक्षीय यंत्रणा, ग्रामविकास विभागाची यंत्रणा आणि ज्याच्यासाठी ही सर्व धडपड सुरु आहे तो केंद्रस्थानी असलेला विद्यार्थी! पालक अत्यंत विश्वासाने आपले मूलं शिक्षकांच्या हवाली करतात. कारण त्यांना खात्री असते शाळेतूनच आपले मूल गुणवंत होऊन बाहेर पडेल. पालकांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी शिक्षकही सतत धडपड करत असतात. त्यांची धडपड म्हणजेच गुणवत्तेकडे वाटचाल करणारा त्यांचा खडतर प्रवास. हा प्रवास शिक्षकांनी आपल्याच शब्दात या लेखांमध्ये मांडला आहे. त्यामुळे मांडण्यात विविधता तर आहेच शिवाय साधेपणाही दिसून येतो. भाषा सौंदर्यापेक्षा शिक्षकांची आपल्या कामाविषयीची तळमळ लेखांमध्ये अधिक उठून दिसते.

खरं तर राज्यभरात अनेक शाळांमध्ये मोठया प्रमाणात प्रयोगशील शिक्षक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवित आहेत. परंतु प्रातिनिधिक स्वरुपात प्रत्येक जिल्हयातून फक्त एकाच शासकीय शाळेचा लेख या पुस्तकात समाविष्ट केला आहे.


भविष्यवेधी शिक्षणाचा विचार करून आपला विद्यार्थी विविध कौशल्यांनी परिपूर्ण केल्यास तो जागतीक पातळीवर नागरीक म्हणून उत्तम कामगिरी करू शकतो असा विचार करून शिक्षक नवोपक्रम राबवित आहेत. ग्रामीण, तसेच दुर्गम भागात भौतिक सुविधाची कमतरता असूनही प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर शिक्षक अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांना कला, क्रीडा, विज्ञान, तंत्रज्ञान, सुसंस्कार, शिस्त, सामाजिक दायित्व इत्यादी विषयांसाठी तयार करीत आहेत. या सर्व शिक्षकांचे मन:पूर्वक अभिनंदन!

रात्रशाळेतून प्रवाहाबाहेरील विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, ३६५ दिवस ज्ञानदानासाठी शाळा सुरु ठेवणे, लहान वयातच विद्यार्थ्यांना बचतीची सवय लावणे, IAS, IPS असे अधिकारी बनण्यासाठी स्पर्धा परीक्षांविषयी गोडी निर्माण करणे, हस्तकलेच्या वस्तु तयार करून त्यातून अर्थार्जन करणे, विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या मुलाखती आयोजित करणे, निसर्गाशी मैत्री करायला शिकविणे आणि पालकांचेही मनपरिवर्तन करून त्यांना मुलांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करण्यास प्रवृत्त उज्ज्वल करणे असा खडतर वाटेवरील शिक्षकांचा आशादायक प्रवास वाचताना मन थक्क होते.

पालक जागरुक असतील तर शाळा आणि गाव एकरुप होऊन शाळेचा चेहरामोहरा बदलवू शकतात हे या लेखांमधून आपल्या लक्षात येईल. या सर्वच शाळांनी लोकसहभाग मोठया प्रमाणात मिळवलेला दिसून येतो. शिक्षकांनी गुणवत्तेसाठी कष्ट घेतले त्यामुळेच पालकांनी शिक्षकांना आर्थिक मदत करून साथ दिली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अनुभव संपन्न करणारे अनेक उपक्रम राबविले आहेत. ज्यामुळे एकूणच शाळेत चैतन्यमय वातावरण निर्माण झालेले दिसून येते.

सुरळीत सुरु असणाऱ्या आपल्या आयुष्यात अचानक मोठं वादळ उठलं. कोव्हीड – १९ मुळे एकूणच मानवी जीवनाचा चेहरामोहरच बदलून गेला. अचानक उद्‌भवलेल्या या संकटाने हसऱ्या खेळत्या आपल्या जीवनाला दु:खाची झालर लागली. आपली प्रिय शाळा, आवडते शिक्षक, जीवाभावाचे सवंगडी मोठया कालावधीसाठी दूर गेल्यामुळे विद्यार्थ्यांच्या भावविश्वाची घुसमट वाढली. अनेकांनी आपल्या घरातील माणसांची मृत्यूशी झालेली झुंज बघितली, काहींनी आपले पालक गमावले यामुळे बालकांच्या कोवळया मनावर खूप मोठा आघात झाला. शिक्षण क्षेत्रात कधी न भरून येणारी हानी झाली. अशा भयंकर काळात आपल्या विद्यार्थ्यांना मानसिक आधार देण्याचे काम शिक्षकांनी केले. शाळा बंद असली तरी विद्यार्थ्यांच्या सहवासात राहण्याचे वेगवेगळे मार्ग शोधून काढले. 'ऑनलाईन शिक्षण' हा एक मोठा पर्याय यामुळे शोधला गेला. आधुनिक तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर करणे अनिवार्य झाल्याने शिक्षकांनीही काळानुरुप स्वत:मध्ये बदल करून घेतला. खरं तर जि.प. शाळांमधील बऱ्याच पालकांची आर्थिक स्थिती तशी बेताचीच, त्यामुळे स्मार्ट मोबाईल उपलब्ध नसणे, मोबाईल असला तरी रिचार्ज करण्यासाठी पैसे नसणे, दुर्गम भागात इंटरनेट उपलब्ध नसणे. अशा सर्व समस्या आल्या तरी शिक्षक यातून मार्ग काढत गेले पण विद्यार्थी शाळाबाह्य होणार नाहीत यासाठी प्रयत्न करत राहिले. यामुळेच शिक्षणाची गाडी पुन्हा रुळावर येण्यास मदत झाली आहे.

शैक्षणिक गुणवत्तेचा प्रचार व प्रसार करणे व या शाळांच्या अनुकरणातून इतर शाळांची गुणवत्ता वाढण्यास मदत व्हावी हा या पुस्तक प्रकाशनाचा मूळ हेतू आहे. त्यामुळे आज हा महत्त्वपूर्ण शैक्षणिक दस्तऐवज आपल्या सर्वांच्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे. सर्व शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षणतज्ज्ञ, शालेय शिक्षण विभाग व ग्राम विकास विभागाचे सर्व अधिकारी यांनी हे पुस्तक नक्की वाचावे. आपल्याही शाळेत गुणवत्तेचा मळा फुलविण्यासाठी शिक्षकांना हे लेख नक्कीच उपयुक्त व प्रेरणादायी ठरतील याची मला खात्री आहे. राज्यभरातील माझ्या सर्व शिक्षकांना उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीसाठी खूप खूप शुभेच्छा!



**कैलास पगारे (भा.प्र.से.)**
राज्य प्रकल्प संचालक,
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

# १. गुणवत्तेच्या यशोशिखरावर आमची शाळा




**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा अस्नोली, ता. शहापूर, जि. ठाणे**

गुणवत्तापूर्ण शिक्षण ही काळाची गरज आहे. या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर उत्तम, दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. कारण प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे. प्रसिद्ध शिक्षणतज्ञ जे. कृष्णमूर्ती म्हणतात 'Education is the manifestation of perfection which is already in the man' ही बाब लक्षात घेऊन आमच्या शाळेतील सर्व शिक्षक परिणामकारक अध्यापन करून, विद्यार्थ्यांच्या उपजत ज्ञानाला विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांद्वारे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत. यामुळेच येथे गुणवंत विद्यार्थी घडत आहेत व शाळेची उत्तरोत्तर प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे. शाळेचे स्थापना वर्ष १९४२ चे असून इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग आहेत. सद्यस्थितीत शिक्षण घेत असलेल्या ३०७ विद्यार्थ्यांना आम्ही 10 शिक्षक एकजुटीने ज्ञानदानाचे कार्य करीत आहोत.

यश म्हणजे केवळ चमत्कार नसून त्यासाठी सातत्याने आणि जाणीवपूर्वक केलेले परिश्रम असतात. आम्ही सर्व शिक्षक विविध अभिनव उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी विकास साधतो. 'शाळेला समाजाचा आधार हवा व समाजाला शाळेचा अभिमान हवा' असे म्हटले जाते, ते तत्त्व आम्ही अंगिकारले आहे. आमची जि. प. प्राथ. शाळा अस्नोली ही ठाणे जिल्ह्याच्या शहापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील शाळा. वेगवेगळे पाडे, वस्त्यांवरून विद्यार्थी शाळेत येत असल्याने त्यांचा अध्ययनस्तर व बौध्दिकस्तर वेगवेगळा असतो. शाळा स्तरावर राबविलेल्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. त्यातील काही निवडक उपक्रम.

### मैत्री स्पर्धा परीक्षांशी

शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय परीक्षा यांसारख्या स्पर्धा परीक्षेत जास्तीत जास्त विद्यार्थी गुणवत्ता यादीत यावेत. पात्र व्हावेत व त्यांनी यश संपादन करावे म्हणून हा उपक्रम राबवला. पूर्वी विद्यार्थ्यांना अभ्यासाची विशेष आवड नव्हती. अभ्यासात त्यांचे सातत्य नव्हते. त्यामुळे त्यांना त्यांच्या मनाविरुद्ध स्पर्धापरीक्षांमध्ये बसवावे लागे. हे शिक्षकांच्या लक्षात आल्यानंतर शिक्षकांनी सुट्टीत देखील हसत–खेळत अध्यापनाचे नियोजन केले. मुलांना खेळ खेळायला आवडतात. याचा उपयोग करून 'खेळातून शिक्षण' दिले. 'जेवढा वेळ खेळ, तेवढा वेळ अभ्यास' यातून मुले खेळ व अभ्यासात रमू लागली. मुलांची उपस्थिती वाढून ती कृतीत आवडीने सहभागी होऊ लागली. 'एक वर्ग अनेक शिक्षक' ही संकल्पना राबविल्याने अध्यापनात विविधता आली. स्पर्धा परिक्षांसाठी विविध अध्यापन साहित्यांचा वापर केला जातो. इयत्ता पहिलीपासून स्पर्धा परीक्षांचा सराव होत असल्याने अभ्यासाची बैठक निर्माण झाली. गटकार्यातून विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला गती मिळाली. अभ्यासिका कक्षात मुले एकाग्रतेने रमू लागली. शिक्षकांनी स्वतः तयार केलेले विविध प्रश्नसंच, सराव पेपर, माझी अभ्यासिका, किशोर मासिक यांच्या वापरामुळे स्पर्धापरीक्षांमध्ये विद्यार्थी दरवर्षी यश मिळवू लागले. गेल्यावर्षी शाळेतील २२ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक आणि 6 विद्यार्थी नवोदय परीक्षेसाठी पात्र झाले आहेत. आज आमची शाळा स्पर्धा परीक्षांचे केंद्रबिंदू म्हणून जिल्ह्यात ओळखली जाते.

### ई–लर्निंग शाळा

विविध विषयातील घटक, संबोध व संकल्पनांचे सुलभीकरण करणे, अध्ययन–अध्यापनात सचेतना आणणे व विद्यार्थ्यांनी विविध

तांत्रिक कौशल्ये आत्मसात करुन त्याचा अध्ययनात वापर करणे या उद्देशाने शाळेमध्ये ई–लर्निंग सुरु करण्यात आले. यासाठी आदरणीय भाऊसाहेब चव्हाण, गटशिक्षणाधिकारी शहापूर यांच्या मार्गदर्शनाने तालुक्यातील शिक्षकांनी तयार केलेले e-content चा प्रामुख्याने वापर केला जातो. विशेष म्हणजे हा अभ्यासक्रम पेन ड्राईव्ह मध्ये असल्यामुळे ऑफलाईन देखील चालतो. त्याचसोबत दिक्षा ॲप आणि इतर शैक्षणिक ॲपचा देखील वापर केला जातो.

### भाषिक प्रयोगशाळा

विद्यार्थ्यांची वाचन, लेखन आणि अभिव्यक्ती कौशल्ये विकसित होण्यासाठी तसेच शब्द संपत्तीत वाढ होण्यासाठी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील भाषिक प्रयोगशाळा शाळेत तयार केली आहे. त्यातील साहित्याच्या वापराने विद्यार्थ्यांमधील चिकित्सक विचार प्रक्रिया (critical thinking), सर्जनशीलता (creativity), सहकार्य, जिज्ञासा या एकविसाव्या शतकातील कौशल्यांचा विकास होतो. या प्रयोगशाळेत विविध शब्द कार्ड, वाक्य पट्ट्या, चित्रे, उतारे, गोष्टी, भाषिक खेळ आणि कोडी सारख्या साधनांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांनी, 'माझा शब्दकोश' नावाच्या उपक्रमाद्वारे स्वतःचे शब्दकोश तयार केलेले आहेत. त्याचबरोबर विविध विषयांचे अध्ययन कोपरे देखील शाळेमध्ये तयार केले आहेत.

### मिशन भागाकार

भागाकाराची भीती नाहीशी करून, गणितातील मूलभूत क्रियांवर कौशल्य प्राप्त करण्यासाठी आणि गणित विषयाची आवड निर्माण करण्यासाठी शहापूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी भाऊसाहेब चव्हाण यांच्या संकल्पनेतून साकारलेला मिशन भागाकार हा उपक्रम शाळेत राबवला जातो. या उपक्रमात बिन हातच्याची, हातच्याची बेरीज–वजाबाकी, गुणाकार आणि भागाकाराचे पाच प्रकार विद्यार्थी करतात. 'खेळातून गणित,' 'मैदानावर गणित' या प्रकारच्या कृती या अंतर्गत घेतल्या जातात.



### चालता बोलता

विद्यार्थ्यांमध्ये मुलाखत घेण्याचे कौशल्य विकसित करून, नवनवीन उद्योगांची ओळख, त्यांच्या कार्यजगताची ओळख व त्यांच्या कार्याबद्दल आदर निर्माण करण्यासाठी चालता–बोलता हा उपक्रम राबविला जातो. या अंतर्गत परिसरभेट, क्षेत्रभेटीद्वारे परिसरातील व्यावसायिक कुंभारकाम, बुरुडकाम, वीटभट्टी व्यवसाय, कुक्कुटपालन, शेतीकाम व वेल्डिंगकाम करणाऱ्या व्यावसायिकांच्या मुलाखती घेऊन कार्यजगताची ओळख करून दिली जाते. प्रत्यक्ष भेटीतून मिळणारे हे शिक्षण आनंददायी, कृतीयुक्त व अनुभव संपन्न असते.

### अभ्यास जत्रा

विद्यार्थ्यांमधील सभाधीटपणा वाढीस लागून वाचन, लेखन, संवाद, अभिव्यक्ती आणि सर्जनशीलतेचा विकास करण्यासाठी शाळेमध्ये हा उपक्रम राबवला जातो. यामध्ये बाजार, आनंद मेळावा, विज्ञानजत्रा यांचादेखील समावेश असतो. बोलक्या बाहुल्या, मुखवटे, पपेट्स चा वापर करून नाट्यीकरण, नृत्य, गायन, वादन, अभिनय या कलांच्या माध्यमातून आनंददायी शिक्षणात विद्यार्थी रमतात. विनोद, कोडी, मार्ग दाखवा, सांगा पाहू, करून पहा इत्यादी सदरांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. शैक्षणिक रांगोळ्या, शैक्षणिक खेळ घेतले जातात. संभाषण वाचन, लेखनासाठी विशेष झोन तयार करून विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग घेतला जातो. विद्यार्थी स्वतःचे हस्तलिखित तयार करतात व त्याद्वारे त्यांची लेखन अभिव्यक्ती विकसित होत जाते.

### पर्यावरणाशी मैत्री

निसर्गप्रेम, निरीक्षणशक्ती विकसित करून पर्यावरणाचा समतोल राखावा व त्याबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी हा उपक्रम

घेतला जातो. याअंतर्गत वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन, जलसाक्षरता, वनस्पतींचे निरीक्षण, स्वच्छता, पक्षांसाठी दाणापाणी व सिडबॉल्स तयार करणे इत्यादी प्रकारचे उपक्रम घेऊन पर्यावरण पूरक कृती केल्या जातात.

### विविध खेळ, क्रीडा स्पर्धा



अभ्यासातील सातत्या बरोबरच खेळ देखील मुलांच्या सर्वांगीण वाढीचा अविभाज्य भाग आहे हे ओळखून विविध खेळ घेतले जातात. यामुळे मुलांमध्ये स्पर्धात्मक खेळाची गोडी निर्माण होते. अभ्यासाबरोबरच खेळाच्या तासिकांचे आयोजन, आंतरशालेय क्रीडास्पर्धांचे आयोजन केले. शाळेत परिसरातील पारंपारिक खेळ देखील खेळले जातात. यासाठी समाज घटक, विविध खेळाडू यांची मदत घेतली जाते. मुलांच्या पालकांकडून होणारा सराव, डिजिटल वर्गात मुलांना आंतरराष्ट्रीय खेळ दाखवणे, शाळेतील मार्गदर्शक शिक्षकांचे योगदान यामुळे क्रीडाक्षेत्रात देखील शाळेने उत्तम यश मिळवले आहे. शाळेने लेझीम पथक, खो–खो, धावणे अशा विविध स्पर्धांमध्ये जिल्हास्तरापर्यंत मजल मारली आहे. सन २०१८-१९ आणि २०१९-२० मध्ये सतत दोन वर्ष रिले रेस मध्ये मुलींच्या आणि मुलांच्या गटाने प्रथम क्रमांकाचा मान मिळवला आहे.

### संगीतमय परिपाठातून मूल्यसंवर्धन

मुलांच्या सृजनशीलतेला आकार देणारा उपक्रम म्हणजे परिपाठ. शाळेत यासाठी वर्ग स्तरानुसार नियोजन करून देशभक्तीपर गीते, प्रार्थना, शास्त्रज्ञांची माहिती, बोधपर कथा, सामान्यज्ञान, पाढे पाठांतर, सूत्रे, इंग्रजी शब्द, पंचांग, दिनविशेष अशा अनेक सदरांनी युक्त संगीतमय परिपाठ घेतला जातो. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून संधी दिली जाते. डिजिटल वर्गाचा उपयोग करून परिपाठात नवीन विषयावर माहिती दिली जाते.

### छंद जोपासणारे कलादालन

शाळेमध्ये विद्यार्थ्यांचा कल ओळखून त्यांच्या आवडीचे शिक्षण दिले जाते व त्यातून संस्कृती संवर्धन केले जाते. रांगोळी, नृत्य, गायन, भाषण, वेशभूषा, कविता सादरीकरण स्पर्धा, नाट्य स्पर्धा, आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा यात विद्यार्थी उस्फूर्तपणे सहभागी होतात. यासाठी शाळा स्तरावर गटनिहाय नियोजन केले जाते. लहान मुले देखील यात चांगला सहभाग नोंदवतात. मोठ्या मुलांची याकामी मदत घेतली जाते. प्रत्येक मूल वेगळे असते, त्याची आवड वेगळी असते हे ओळखून त्याच्या आवडीच्या क्षेत्रांमध्ये सादरीकरणाची संधी दिली जाते. मुलांसाठी स्वतंत्र 'कलादालन' असल्याने त्यांच्या अभिव्यक्तीसाठी जास्त संधी मिळते. परिसरातील कला शिक्षकांचे बहुमोल मार्गदर्शन यासाठी मिळत आहे. विद्यार्थ्यांनी स्काऊट– गाईडच्या सांस्कृतिक उपक्रमात सहभाग घेऊन यशस्वी कामगिरी केली आहे. 'वक्ता महाराष्ट्राचा' या उपक्रमात विद्यार्थी यशस्वी होत आहेत.

शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वजण मिळून प्रयत्न करतात. शाळेत येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी एकत्रित प्रयत्न केले जातात. शाळेसाठी येणाऱ्या योजना, विविध सामाजिक उपक्रम याची अंमलबजावणी करताना पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती, अधिकारी वर्ग यांचा शाळा विकासात मोलाचा सहभाग आहे. या सर्वांचा परिपाक म्हणजे अस्नोली शाळेतील विद्यार्थ्यांनी साधलेला गुणवत्ता विकास होय.

मुख्याध्यापकः श्री. सुदाम भिवा रणदिवे, संपर्क : ९०२८४ ४३५२३

# २. गुणवत्तेचा नंदादीप




**जिल्हा परिषद शाळा, पेझारी, ता. अलिबाग, जि. रायगड**

या मुलांना, या फुलांना, रंग द्या अन गंध द्या, पाकळ्यांना, या कळ्यांना, साद द्या, प्रतिसाद द्या

विद्यार्थीरूपी मुक्या कळया उमलून त्यांच्या गुणवत्तेचा सुगंध दश दिशांना पसरावा ही आमच्या शाळेतील प्रत्येक शिक्षकाची भावना, आपले अध्यापन अधिक परिणामकारक, मनोरंजक आणि आनंददायी व्हावे ही प्रत्येकाची तळमळ. कारण 'करील मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे' या भावनेने आमची शाळा गुणवत्तेच्या अंगणात एक एक पाऊल पुढे टाकत आहे म्हणून शाळेचा पट वाढत आहे.

विद्यार्थी वर्गातील केवळ चार भिंतीत ज्ञान घेत नसून त्यांना निसर्गाची ओढ लागावी, पशु, पक्षी, झाडे, वेली यांच्याशी त्यांची मैत्री व्हावी हा मानस शाळेने जपला आहे. त्यातून उदयास आली शाळेची सुंदर बाग. आम्हा शिक्षकांचा आणि शाळा व्यवस्थापन समितीचा समाज संपर्क इतका दांडगा आहे की आम्ही २०१५ साली अकरा लाख रुपये निधी लोकसहभागातून शाळेच्या विकासासाठी जमा केला. विद्यार्थ्यांचे हित व संरक्षण लक्षात घेता शालेय परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या अधिपत्याखाली आहे.

'आनंदी शिक्षणाची, घेऊनी हाती पणती, या कोवळ्या मनी, पेटवू ज्ञानज्योती'

या विचारांनी प्रेरीत असलेल्या जिल्हा परिषद पेझारी शाळेच्या शिक्षकांनी सन १९१३ साली स्थापन झालेल्या शाळेला ISO मानांकन प्राप्त करून दिले आहे. शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, शाळा विकास समिती व शिक्षक यांनी कोणकोणते उपक्रम आपण राबवू शकतो आणि त्यांच्या माध्यमातून शाळेची पटसंख्या कशी वाढेल, गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे मिळेल यासाठी विचारमंथन केले व अनेक उपक्रम शाळेने राबविण्यास सुरुवात केली.

### शाळेची वैशिष्ट्ये

आमची शाळा रायगड जिल्ह्यातील पहिली डिजिटल शाळा आहे आणि ज्युनिअर, सिनिअर, प्ले ग्रुप सुरु करणारी रायगड जिल्ह्यातील पहिलीच प्राथमिक शाळा आहे. शाळेतील १ ते ८ चे सर्व वर्ग सेमी इंग्रजी आहेत. शाळेतील १५२ विद्यार्थ्यांना आम्ही ६ शिक्षक तंत्रज्ञानाच्या मदतीने गुणवत्तापूर्ण शिक्षण देत आहोत.

### लोकसहभाग

शाळा व्यवस्थापन समिती, शाळा विकास समिती आणि ग्रामस्थ यांच्या मदतीने सर्व वर्ग डिजिटल करण्यात आले आहेत. 'गाव करी ते राव न करी' या म्हणीनुसार ग्रामस्थांनी सहकारातून शाळेचा विकास हा विचार डोळ्यासमोर ठेऊन शाळेच्या शिक्षकवर्गाला प्रेरणादायी सहकार्य केले आहे. आजपर्यंत शाळेस वस्तुरूपाने व पैशाच्या रूपाने ११ लाख रुपये जमा झाले आहेत. 'शाळा माझी, मी मुलांसाठी' या विचाराने प्रेरीत होऊन शिक्षक वर्गाने शाळेची रंगरंगोटी, डिजिटल वर्ग, शाळेस CCTV कॅमेरे, सोलर पॅनल, संरक्षक ग्रील, संरक्षक भिंत, अद्ययावत भौतिक सुविधा निर्माण करून शाळेचा कायापालट केला.

### ज्युनिअर, सिनिअर वर्ग सुरु

आदरणीय गुरुवर्य सुभानराव राणे प्रतिष्ठान पेझारी यांच्या माध्यमातून शाळेस जोडून सेमी इंग्रजी माध्यमाचे ज्युनिअर, सिनिअर, प्ले ग्रुप वर्ग सन २०१५ पासून सुरु करण्यात आले. त्यासाठी खास दोन शिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांचे मानधन प्रतिष्ठान मार्फत देण्यात येते. या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांमुळे ग्रामस्थांबरोबरच इतर ठिकाणांवरून मुले शाळेकडे आकर्षित झाली आणि शाळेची पटसंख्या दरवर्षी वाढत आहे.

### कोरोना काळातील Online शिक्षण

मागील दोन वर्षांत कोरोनामुळे शाळा बंद होत्या. 'मुले शिकली पाहिजेत, शिक्षणाच्या प्रवाहात राहिली पाहिजेत', या सृजनशील विचाराने शिक्षकांनी पालक मिटिंग घेऊन त्यांना Android मोबाईल घेण्यास प्रवृत्त केले आणि Google Meet द्वारे ज्युनिअर वर्गापासून ते 8 वी च्या वर्गापर्यंत वेळापत्रकाप्रमाणे Online अध्यापनाचे तास सुरु केले. ९०% विध्यार्थ्यांचा सहभाग यात दिसून आला. विशेष म्हणजे Online परीक्षा घेण्यात आल्या. यामुळे विद्यार्थी शिक्षण प्रवाहात राहिले.

### Online स्पर्धा

कोरोना काळातील शिक्षणाबरोबरच Online तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले. लहान गटामध्ये प्रिया यादव हिने प्रथम क्रमांक व मोठा गट सुप्रिया यादव हिने द्वितीय क्रमांक मिळवून स्पर्धेत शाळेचे नाव गाजवले. शाळा स्तरावर वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध लेखन, रंगभरण, अगस्त्य फाउन्डेशनचे विज्ञान प्रदर्शन, हस्तकला स्पर्धा घेण्यात आल्या.

### दप्तराविना शाळा




दर शनिवारी दप्तराविना शाळा हा उपक्रम घेण्यात येतो. या प्रसंगी वक्तृत्व, निबंध, रांगोळी, प्रश्नमंजुषा स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, सृजनशीलतेला वाव दिला जातो आणि मान्यवर व्यक्तींकडून या विद्यार्थ्यांना प्रेरणादायी बक्षिस देऊन गौरविण्यात येते. यामुळे एक आपुलकीचे प्रेमळ नाते निर्माण होऊन नक्कीच व्यक्तिमत्व विकास साधला जातो.

शाळेसाठी एक दिवस, किशोरवयीन मुलींचे उद्बोधन, मनोरंजक नवीन खेळ, सर्वांगसुंदर कवायत, गंमतीशीर कोडी, आणि विद्यार्थ्यांसाठी 'जे न देखे रवि, ते देखे कवी' याप्रमाणे शिक्षकवर्ग कार्यरत राहतात आणि मुलांना प्रेरित करून अध्ययन निष्पत्तीपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करतात.

### लोकसहभागातून परसबाग

'निसर्ग आपला मित्र आहे' परिसर ग्रामीण भागातील असला तरी निसर्गावर नितांत प्रेम करणारा समाज येथे आहे. समाज सहभागातून परिसर टापटीप ठेवणे याकडे शाळेचा कटाक्ष असतो. रोटरी क्लब ऑफ शिशोअर अलिबाग यांनी शाळेसाठी विविध फुलझाडे, भाज्यांची रोपे, शेणखत, माती देऊन शाळेची परसबाग करून दिली. त्यांनी ही परसबाग दत्तक घेतली असून देखभाल दुरुस्ती क्लबमार्फत केली जाते. शाळेची शोभा सदर उपक्रमाने नक्कीच वाढली आहे. विशेष म्हणजे या उपक्रमाने विद्यार्थ्यांनी आपल्या घरीही परसबागेची निर्मिती पालकांच्या मदतीने केली आहे.

**योगाभ्यास**

शरीर आणि मन स्वस्थ ठेवण्यासाठी गरज भासते ती योगाभ्यासाची. रोटरी क्लब ऑफ शिशोअर अलिबाग या संस्थेच्या सदस्या सौ. माधुरी म्हात्रे या दर शनिवारी दोन तास योगासने शिकवितात. यातून योग अभ्यास स्पर्धा घेण्यात येतात. योगासाठी लागणारा गणवेश व बैठक व्यवस्था शाळेने केली असून या उपक्रमाची फलश्रुती म्हणजे शारीरिक व मानसिक विकासाने विद्यार्थी परिपूर्ण होत आहेत.

**वाचन – लेखन उपक्रम**

'वाचाल तर वाचाल' या उक्तीनुसार दररोज १ तास फक्त वाचन आणि लेखन या बाबींवर लक्ष केंद्रित करून सराव दिला जातो. कोरोना काळात वाचन सराव कमी झाला होता तो भरुन निघण्यास नक्कीच मदत झाली. विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापन प्रक्रियेत गती मिळाली. वाचू आनंदे या उपक्रमाचा फायदा नक्कीच झाला.

**शाळा व्यवस्थापन विकास समितीचे योगदान**

'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' शाळा व्यवस्थापन समिती आणि माजी विद्यार्थी यांच्या माध्यमातून सहकार्यशील व प्रेरणादायी अशी शाळा विकास समिती स्थापन करण्यात आली. या दोन्ही समितीच्या माध्यमातून शाळेसाठी समाजाचा सहभाग मोठ्या प्रमाणात घेतला जातो. शैक्षणिक विकास हाच आमचा ध्यास, मग तो विकास घडवण्यासाठी विडा उचलला तो समितीने आणि शिक्षकवृंदांनी. शाळेच्या पायाभूत सुविधा पूर्ण करण्यासाठी खूप मोठे योगदान शाळा व्यवस्थापन समिती व शाळा विकास समिती यांचे आहे.

**अगस्त्या फाउन्डेशनची मदत**

या संस्थेच्या माध्यामातून सन २०१९ यावर्षी आयसर पुणे येथे राष्ट्रीय स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात ११ राज्यांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या प्रदर्शनात पेझारी शाळेच्या कु. सुप्रिया यादव हिच्या मका सोलणी यंत्रास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तसेच २०१६ या वर्षी राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन हुबळी, राज्य– कर्नाटक येथे सहभाग घेऊन नाव झळकाविले. जिल्हा स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे. अगस्त्या फाउन्डेशनकडून शाळेला दर महिन्याला 1 विज्ञान किट दिला जातो. त्याचे मार्गदर्शन व प्रात्यक्षिक दिले जाते.

**शाळेला मिळालेले पुरस्कार**

रायगड जिल्हा आदर्श शाळा पुरस्कार २०१८, शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम २०१६ द्वितीय क्रमांक, गुरुवर्य सुभानराव राणे प्रतिष्ठान यांच्याकडून २०१६ चा शैक्षणिक गुणवत्तेच्या उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार, सलग 3 वर्षे अलिबाग तालुका शैक्षणिक गुणवत्ता कार्यक्रम अंतर्गत प्रथम क्रमाक पुरस्कार, 'रोटरी क्लब ऑफ शिशोअर अलिबाग' यांच्याकडून ४ सप्टेंबर २०२० रोजी कोरोना काळात उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार इ.

**जपानी भाषा शिकण्यासाठी निवड**

सन २०२-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये रायगड जिल्ह्यातून १० विद्यार्थी जपानी भाषा शिकण्यासाठी निवडले त्या मध्ये पेझारी शाळेची इ. 8 वीत शिकणारी कु.जान्हवी वासुदेव पाटील हिची निवड झाली आहे. ही शाळेसाठी अभिमानाची बाब आहे.

**गणित, इंग्रजी व विज्ञान विषयांसाठी विशेष शिक्षक**

इयत्ता १ ली ते ८ वी सेमी इंग्रजी वर्ग असल्यामुळे विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान विषयाचे कौशल्य प्राप्त होण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढविण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व शाळेतील शिक्षक यांच्या सहकार्याने गावातील एका B.Sc. B.Ed. झालेल्या शिक्षिकेची नेमणूक केली आहे. तिचे मानधन शाळा व्यवस्थापन समिती व शाळेतील शिक्षक यांच्यामार्फत दिले जाते. तसेच इंग्रजी विषयात विद्यार्थ्यांना प्राविण्य मिळावे व गुणवत्ता वाढावी म्हणून आंबेपूर ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून एका इंग्रजी माध्यमातून D.Ed झालेल्या शिक्षिकेची नेमणूक केली आहे. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढी मध्ये झाला आहे.

सन २०१३-१४ साली शाळेची पटसंख्या ८६ होती त्यानंतर शाळा व्यवस्थापन समिती, शाळा विकास समिती व शिक्षकांनी शाळेमध्ये विविध उपक्रम राबविले त्याचा परिणाम शाळेच्या गुणवत्ता वाढीमध्ये झाला. लोकांची ओढ जिल्हा परिषद शाळेकडे लागली. त्याची परिणीती शाळेचा पट वाढत गेला. आज शाळेचा पट १ ते ८ वी चा १५२ असून ज्युनिअर, सिनिअर वर्गात 70 मुले शिक्षण घेत आहेत. शाळा आज जिल्ह्यात नावारूपाला आली आहे.

'आता फक्त एकच ध्यास, गुणवत्ता विकास! गुणवत्ता विकास'

मुख्याध्यापक : श्री. नितिशकुमार सिताराम पाटील, संपर्क : ८४२१७ २४५९५

# ३. कृतीयुक्त शिक्षणातून विद्यार्थी विकास



**जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा गिरगाव आरजपाडा, ता. तलासरी, जि. पालघर**

पालघर जिल्ह्यातील गुजरात सीमेला लागून असलेला तलासरी हा तालुका आदिवासी व दुर्गम तालुका म्हणून ओळखला जातो. या सीमेवरच पश्चिमोत्तर दिशेला असलेले गिरगाव हे शेवटचे गाव. या गावातील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा गिरगाव आरजपाडा ता. तलासरी ही शाळा गुजरात सीमेवर असून गिरगाव केंद्रात मोडते. जवळच गुजरात राज्यातील संजान हे रेल्वे स्टेशन आहे. शाळेत येणारे जवळपास सर्वच विद्यार्थी आदिवासी समाजाचे आहेत. शाळेतील विद्यार्थी बहुभाषिक असून वारली, धोडिया व गुजराती भाषा बोलतात. सन १९२९ मध्ये स्थापन झालेल्या आरजपाडा शाळेत १ ली ते १० वी पर्यंतचे सध्या ५२६ विद्यार्थी शिक्षण घेत असून 10 शिक्षक कार्यरत आहेत.

येथील परिसर आदिवासी संस्कृती व लोककलेने नटलेला आहे. निसर्गाच्या सानिध्यात राहणारे हे विद्यार्थी असून त्यांना फक्त पुस्तकी ज्ञान देण्यापेक्षा अध्यापनात कृतीयुक्त शिक्षणाची जोड दिल्यास विद्यार्थ्यांचा ज्ञानात्मक, भावनात्मक, क्रियात्मक व कौशल्य विकास अधिक होतो व अनुभव कायम स्मरणात राहण्यास मदत होते, म्हणून नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणे आम्हाला उपयुक्त वाटले. निसर्गातील उपलब्ध साधनांचा वापर करून विद्यार्थ्यांना येथे प्रत्यक्ष अनुभव दिले जातात. आरजपाडा येथील विद्यार्थी वेगवेगळ्या कला, गायन, नृत्य व खेळ यामध्ये पारंगत आहेत. त्यांच्या अंगातच उपजत हे गुण रुजले आहेत. कारण यांच्या आदिवासी संस्कृतीतच विविध कला गुण लपलेले आहेत आणि याच कलागुणांचा उपयोग करून शालेय अभ्यासात यांची सांगड घालून दैनंदिन अध्यापनात त्यांच्या उपयोग करून घेतला जातो. विविध पूरक उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शालेय उपस्थिती तर वाढतेच याशिवाय त्यांची गुणवत्ता सुद्धा वाढते हा विचार करून आमच्या शाळेत दैनंदिन अभ्यासक्रमाबरोबरच विविध उपक्रम राबविले जात आहेत.

### Read a Story

हा उपक्रम इंग्रजी विषयाकरिता असून या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेतील चौथी पासूनचे विद्यार्थी देश–परदेशातील व्यक्तींशी इंग्रजी मध्ये संवाद साधत असतात. या उपक्रमामध्ये गट आणि वैयक्तिक दोन्ही प्रकारे विद्यार्थ्यांना नेमून दिलेले स्वयंसेवक फोनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधत असतात. यामुळे इंग्रजी भाषेविषयीची भीती दूर होऊन विद्यार्थी सहजपणे संभाषण करतात. स्वयंसेवक विद्यार्थ्यांचा एक गट व फक्त शिकणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांचा दुसरा गट या दोन प्रकारे विद्यार्थ्यांचा इंग्रजी विषयाकरिता संभाषणाचा हा उपक्रम शाळेच्या वेळे व्यतिरिक्त राबवला जात असतो. या उपक्रमाची सर्व जुळवाजुळव स्थानिक शिक्षणप्रेमी श्री. अमोल

जोशी करीत असतात. आम्ही सर्व त्यात सहभागी होतो.

### विनाशिक्षक अध्यापन

शाळेतील संगणक व प्रोजेक्टरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे स्वयं अध्ययन अध्यापन होते. प्रत्येक वर्गाकरिता स्वतंत्र ई–लर्निंगचा अभ्यास असून वेळोवेळी विद्यार्थ्यांना ई–लर्निंगच्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. काही वर्गात विद्यार्थी स्वतः उपकरणांची हाताळणी करून 'विनाशिक्षक अध्यापन' हा उपक्रम उत्तम प्रकारे चालवितात.

### चला वाचूया

या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांना शाळेतील वाचनालयातून दर शनिवारी पुस्तक दिले जाते. विद्यार्थी फावल्या वेळेत या पुस्तकाचं वाचन करीत असतात. दर शनिवारी पुन्हा नवीन पुस्तक घेऊन जातात. शाळा तसेच घरीसुद्धा विद्यार्थी अवांतर वाचन करीत असतात. विद्यार्थी स्वतः पुस्तकांची देखभाल करून आवश्यक त्या नोंदी ठेवत असतात.

### स्पर्धापरीक्षांची पूर्व तयारी

शाळेत अभ्यासाबरोबरच नवोदय निवड चाचणी परीक्षा तसेच शिष्यवृत्ती परीक्षेचे विशेष वर्ग घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. दरवर्षी आमच्या विद्यार्थ्यांची यात निवड होत असते. दर आठवड्याला विद्यार्थ्यांना विविध विषय दिले जातात व शनिवारी विद्यार्थ्यांना समान्य ज्ञान, भूगोल, इतिहास, गणित ,मराठी व हिंदी या विषयांवर आधारित इयत्ता चौथी पासून प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजन केले जाते. त्यानिमित्ताने विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञान वाढविण्यास तसेच संवाद कौशल्य वाढविण्यास मदत होत असते. शासकीय एलिमेंटरी व इंटरमिडिएट चित्रकला ग्रेड परीक्षांकरिता चित्रकला विषयावर आधारित वर्गाचे आयोजन करून विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले जाते.

### हस्तकलेतून नवनिर्मिती



शाळेत विद्यार्थ्यांना नवनवीन वस्तूंची निर्मिती करिता आठवड्यातून एक दिवस विशेष कार्यशाळेचे आयोजन करून विद्यार्थ्यांकडून हस्तकलेच्या वस्तू बनवून घेतल्या जातात. शाळा, केंद्र ,तालुका व जिल्हा स्तरावर या वस्तूंचे वेगवेगळ्या कार्यक्रमांप्रसंगी प्रदर्शन भरविण्यात येते. यामध्ये स्थानिक कलाकार जसे बांबू कारागीर, चटई विणणारे, चित्रकार, मातीकाम करणारे यांचे सहकार्य घेऊन कार्यशाळेचे आयोजन केले जाते. परिसरातून सहज मिळणाऱ्या गोष्टी, जुन्या वस्तू, रद्दी कागदे यांचा उपयोग करून शाळेत टाकाऊ पासून टिकाऊ वस्तूंची निर्मिती केली जाते. त्याबरोबरच 'शून्य किंमतीतून वस्तू निर्मिती' यावर सुद्धा भर दिला जातो. परिसरातून मिळणाऱ्या पाने, फुले व बिया यांचा उपयोग करून शाळेत हार, माळा व शोभेच्या वस्तू अगदी सहजपणे विद्यार्थी बनवीत असतात.

### वारली चित्रकला प्रशिक्षण

स्थानिक संस्कृतीशी निगडित असलेली पारंपरिक व जुनी कला म्हणजे वारली चित्रकला. विद्यार्थी आदिवासी जमातीतील असून जगभर पसरलेल्या आपल्या वारली चित्रकलेचे महत्त्व त्यांना पटले आहे. आपली कला रुजवणे, प्रसार करणे, आपल्या संस्कृतीचे जतन

करणे व भविष्यकाळातील नवीन कलाकार तयार करणे याकरिता शाळेत वारली चित्रकला प्रशिक्षण घेतले जात असते. विद्यार्थी आपली संस्कृती चित्राच्या माध्यमातून कागदावर उतरवतात. आमचे विद्यार्थी वारली चित्रकलेत पारंगत होत असून स्वतः वारली चित्र बनवतात. चित्रांची विक्री सुद्धा करतात .स्थानिक पातळीवर लग्नात, भिंतीवर स्वतःच्या घरी स्वतःच वारली चित्र काढतात. या माध्यमातून काही प्रमाणात अर्थार्जन सुध्दा करतात, यात आम्हाला स्थानिक कलाकारांचे मोलाचे सहकार्य मिळते.

### लोकसहभाग

शाळेतील भौतिक सुविधा, शाळेतील गुणवत्ता यासाठी लोकांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरतो. Larsen & Toubro चॅरीटेबल ट्रस्टच्या माध्यमातून शाळेची एक कोटी पेक्षा जास्त किमतीची सुसज्ज अशी इमारत उभी करून मिळालेली आहे. शाळेत अत्याधुनिक सुविधा युक्त वर्ग आहेत. यामध्ये संगणक, प्रोजेक्टर, इंटरनेट या सारख्या सुविधांचा समावेश आहे. याबरोबरच शाळेतील इंग्रजी विषयाचा रीड अ स्टोरी प्रोग्राम, चित्रकला वर्ग, कार्यानुभव कार्यशाळा यांना परिसरातील शिक्षण प्रेमींकडून आर्थिक सहकार्य मिळत असते.

### सहशालेय उपक्रम

वर्षभरात येणारे सण, उत्सव, दिनविशेषानुसार साजरे होणारे कार्यक्रम शाळेत नेहमी घेतले जात असतात. पर्यावरण पूरक खास उपक्रम घेतले जातात. या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी उत्साहाने सहभागी होतात. यावेळी विद्यार्थी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करतात . यामध्ये शाळेचे शिक्षक व पालकांचा उत्स्फूर्त सहभाग असतो. शासन, विविध संस्था, जिल्हा, तालुका या स्तरावरून राबवल्या जाणाऱ्या विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थी आनंदाने सहभागी होऊन प्रावीण्य मिळवतात.

### बाल आनंद मेळावा व सांस्कृतिक महोत्सव

विद्यार्थी बालआनंद मेळाव्याच्या माध्यमातून नृत्य, गायन, भाषण करून आपले कलागुण सादरीकरण करतात. जागतिक आदिवासी दिनानिमित्त शाळेत खूप मोठा कार्यक्रम आयोजित केला जातो, यामध्ये विद्यार्थी स्थानिक पारंपरिक गायन नृत्यामधून आपले कलागुण सादरीकरण करीत असतात. यानिमित्ताने विद्यार्थी स्थानिक संस्कृतीची ओळख करून देतात. याबरोबरच प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक महोत्सव साजरा होतो.



### ग्रीष्मकालीन वर्ग

यशराज फाउन्डेशन यांच्या सहकार्याने शाळेला दोन शिक्षक स्वयंसेवक उपलब्ध झाले आहेत. आम्ही शाळेच्या परिसरात पाड्यांनुसार प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांचे अध्ययन स्तरानुसार वेगवेगळे गट केले आहेत. या गटातील विद्यार्थांचा पाया पक्का करण्यासाठी स्वयंसेवकांच्या मदतीने नियमित अभ्यास वर्ग घेतला जातो. उन्हाळी सुट्टीत सुद्धा विद्यार्थ्यांचा अभ्यास सुरु राहण्यास यामुळे मदत होत आहे.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढी करता शाळेतील उपक्रमांना शिक्षण विभागाकडून, समाजातील विविध संस्थांकडून व शिक्षणप्रेमी लोकांकडून वेळोवेळी सहकार्य मिळत आहे. शाळा व केंद्रातील शिक्षकांच्या सहकार्याने विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शाळेने समर्थपणे पाऊल उचलले आहे.

मुख्याधापक : श्री. राजेश रत्ना वाघात, संपर्क : ९०२८८ ७९००९

# ४. आजचे शिक्षण, उद्याचे भविष्य



## मनपा मराठी शाळा क. १, आकुर्ली, कांदिवली (पूर्व), मुंबई

ज्ञानाचा सागर म्हणजे शाळा, संस्कारांचा गोड झरा म्हणजे शाळा,

व्यक्तिमत्व विकासाचे नवे वळण म्हणजे शाळा, प्रत्येक विषयाचा एक नवा अंदाज म्हणजे शाळा

कांदिवली उपनगर पूर्व येथे स्टेशन जवळची इंग्रजी 'ओ' आकार असलेली टुमदार इमारत म्हणजे १९६२ पासून सुरू असलेली आमची शाळा आकुर्ली होय. छोटी बाग आणि शाळेचे मैदान पाहून विद्यार्थी शाळेत प्रवेश करताच मैदानाकडे धावतात. कोरोना काळातही पटसंख्या वाढवणाऱ्या आमच्या शाळेत इयत्ता १ ली ते ८ वी चे ३५३ विद्यार्थी व ८ शिक्षक कार्यरत आहेत. बालवाडीचे १०० विद्यार्थी, ४ शिक्षक, ३ कर्मचारी मिळून पूर्व प्राथमिक विभाग सुरू आहे.

आमच्या शाळेत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पालकांची आर्थिक स्थिती कमालीची बेताची आहे. छोट्या–छोट्या व्यवसायात मजूरी करुन आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करताना पाल्यानेही कामात मदत करावी, अशी पालकांची अपेक्षा असते. शिक्षणाविषयी फारशी आस्था नसलेला पालकवर्ग आणि रोज उद्भवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्यांवर कुशलतेने मात करुन अधिक गती व नवनवीन वाटा शोधण्याचा मार्ग शाळेतील शिक्षकांनी अवलंबिला आहे. मनपा शिक्षण विभाग विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासासाठी सातत्याने सहकार्य करीत आहे. शाळेतील सर्व गुरुजन, शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांच्या सहकार्याने ही शाळा गुणवत्तापूर्ण बनली आहे.

### शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी आवश्यक सुविधांची उपलब्धता

विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी यासाठी मनपा शिक्षण विभागाकडून शैक्षणिक साहित्याचे विनामूल्य वाटप करण्यात येते. शिक्षण हक्क कायद्यानुसार आवश्यक शालेय भौतिक सुविधा मनपा आणि समग्र शिक्षाच्या माध्यमातून देण्यात आल्या आहेत. मनपाच्या शाळा पायाभूत सुविधा कक्षामार्फत आवश्यकतेनुसार शाळा दुरुस्ती व इतर भौतिक सुविधा पुरविण्यात येतात. पुरेशा प्रमाणात वर्गखोल्या व शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत. सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालयाची सुविधा, डिजिटल वर्ग, संगणकीय शाळा, विद्युत जोडणी, पुरेशा प्रमाणात पाण्याची सुविधा व मुलामुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध आहे.

### लोकसहभागातून शाळा विकास

महानगरपालिका, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ, माता पालक संघ, समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती आणि शिक्षणप्रेमींच्या विशेष प्रयत्नातून व कल्पकतेतून शाळेच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. शाळेमध्ये संगणकीय सुविधा, रंगीत प्रिंटर, शालेय रंगरंगोटी, विद्यार्थ्यांना ऑनलाईन अभ्यास करता यावा यासाठी इंटरनेट सेवा व मोबाईलला लागणारा रिचार्ज या सुविधा लोकसहभागातून उपलब्ध झाल्या आहेत.

### गणितात प्रावीण्य



इयत्ता–निहाय सांख्यिकीय क्रिया विद्यार्थी सहजतेने करतात. त्यासाठी सतत सराव घेतला जात आहे. गणिती कोडी, गणित पेटीचा वापर, संख्याज्ञान यावर अधिकचा भर देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचे गणितीय ज्ञान कौशल्य वाढण्यासाठी तसेच व्यावहारिक ज्ञानासाठी देखील गणितीय क्रियांचा वापर करुन घेतला जातो. स्पर्धात्मक परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा व तत्सम परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केले आहे.

### शाळा व्यवस्थापन समितीचे सहकार्य

शाळा व समाज या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शाळा आपली सर्वांची आहे. शाळेच्या प्रगतीसाठी सर्वांनी सहकार्य करणे आपले कर्तव्य आहे ही भावना शाळेत आणि समाजात रुजली तर शाळेच्या प्रगतीत मोठी वाढ होते. मुलांचा शिकण्यातील उत्साह वाढावा म्हणून शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांच्या पुढाकारातून गुणवंत विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षक सातत्याते प्रयत्न करीत आहेत. शाळा व्यवस्थापन समिती ही शाळेचे व्यवस्थापन व नियोजन करताना सहकार्य करीत असते. नियमितपणे शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठका होत असतात. त्यातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व शाळेसाठी आवश्यक भौतिक सुविधा याबाबत चर्चा होत असते. शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य वर्ग नियंत्रणासाठी देखील उपलब्ध असतात. विद्यार्थ्यांची १००% उपस्थिती ठेवण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे मोलाचे सहकार्य आम्हाला लाभते.

### वाचन सुधार प्रकल्प



हा प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे राबवला जातो. आमच्या शाळेत लहान वर्गांपासूनच यासाठी मेहनत घेतली जाते. वाचन सुधारण्यासाठी शाळा सुरू होण्यापूर्वी काही वेळ व शाळा सुटल्यानंतरचा १ तास दिला जातो. शिक्षकांनी यासाठी भरपूर वाचन साहित्य तयार केले आहे. भाषा हे अभिव्यक्त होण्याचे साधन आहे. या शाळेत येणारी बहुतांश मुले ही बहुभाषिक आहेत. भाषिक अध्यापनात सुरुवातीस खूप अडचणी निर्माण झाल्या होत्या. परंतु मेहनती शिक्षकांच्या प्रयोगशीलतेतून विद्यार्थ्यांना भाषा उत्तम येऊ लागली आहे. यासाठी सातत्याने वाचन प्रकल्प तसेच शालेय ग्रंथ समृध्दीमुळे विद्यार्थ्यांनी वाचनाचा छंद जोपासला. त्याचा परिणाम भाषिक कौशल्य विकसनासाठी झालेला आहे. त्यासोबतच भाषिक खेळ, काव्यदीप स्पर्धा, वाचन स्पर्धा इ.मुळे देखील भाषिक कौशल्य विकसनास मदत झाली आहे. शाळेतील जवळपास ८०% विद्यार्थी लेखन वाचन प्रक्रियेत निपुण आहेत. मराठी राजभाषा टिकावी, विद्यार्थ्यांमध्ये प्रेम व आपुलकी वाढावी या हेतूने मराठी राजभाषा संवर्धन दिन साजरा केला जातो. त्यात विद्यार्थ्यांच्या स्वरचित कवितांचे वाचन, गायन, संवाद वाचन व पोवाडा इ. उपक्रम घेतले जातात.

### सांस्कृतिक विकास

विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव मिळावा म्हणून नाट्य सादरीकरण, पथनाट्य, संवाद वाचन यासारखे उपक्रम वर्गा–वर्गातून राबविले जातात. आमच्या शाळेचा आनंददायी फलक चित्रांनी व रंगीबेरंगी छटांनी नटलेला असतो. सुंदर चित्रांनी सजलेली अक्षरे व शब्दांची लेणी लावलेल्या भिंती बोलक्या झालेल्या आहेत. शाळेच्या वर्गखोल्यांना चारही बाजूंनी भित्तीफलक तयार केले आहेत. या चित्रमय फलकांचा अध्यापनात प्रभावी वापर केला जातो.

टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवून त्यांचे प्रदर्शन भरवण्यात येते. प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रार्थनेने मन शांत होते, संपूर्ण दिवस प्रसन्न जातो, त्यामुळे आमच्या शाळेतील सुसज्ज गीत मंचाद्वारे संगीतमय परिपाठ होतो. प्रतिज्ञा, राष्ट्रगीत, समूहगीते, देशभक्तीपर गीते विद्यार्थी तालासुरात म्हणतात. विद्यार्थ्यांमध्ये असणारी अमर्याद जिज्ञासा, क्रियाशीलता यांना वाव देणारे शैक्षणिक उपक्रम शाळेत राबविण्यात येतात. कलादालनात जास्तीत जास्त रुची वाढविणे, संगणकावर सर्व विषय हाताळणे, स्वयं अध्ययनाची सवय लावणे आणि नवनिर्मितीचा शोध घेणे हे सर्व विद्यार्थी स्वतः करीत आहेत.

### डिजीटल वर्ग



संपूर्ण शाळा म्हणजे इयत्ता १ ली ते ८ वी चे सर्व वर्ग सेमी इंग्रजी असल्याने काही संबोध, संकल्पना विद्यार्थ्यांना व्यवस्थित समजाव्यात व अध्ययन–अध्यापनात रूची निर्माण व्हावी म्हणून प्रत्येक वर्ग डिजीटल केला आहे. या साधनांच्या मदतीने शिक्षक अध्यापन करतात व विद्यार्थी स्वयं अध्ययन करतात. विविध शैक्षणिक ॲपचा वापर विद्यार्थ्यांना सागितला जातो. विद्यार्थी मोबाईलचा वापर करून गृहपाठ करतात. लॉकडाउन च्या काळामध्ये शिक्षकांनी Video Conference द्वारे अध्यापन केले. त्यामुळे काही तांत्रिक बाबी विद्यार्थ्यांना आता चांगल्या समजू लागल्या आहेत.

### स्वच्छता पुरस्कार

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग यांच्या तर्फे 'स्वच्छ शाळा पुरस्कार' देण्यात येतो. सलग दोन वर्षे आम्ही या पुरस्काराचे मानकरी आहोत. शाळेची रंगरंगोटी CSR फंडातून करण्यात येते. विद्यार्थ्यांमधून शाळेचा 'स्वच्छतादूत' निवडला जातो. पालकांमधून स्वच्छता कमिटी सीएसआर/समिती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची वैयक्तिक स्वच्छता, नीटनेटकेपणा याकडे खास लक्ष दिले जाते. विद्यार्थ्यांना आरोग्याच्या चांगल्या सवयी लागल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची नियमित पाहणी करुन मनपा आरोग्य विभागातर्फे नोंदी ठेवल्या जातात. मनपाचे तज्ज्ञ डॉक्टर्स विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करीत असतात.

प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये एक फुलणार फूल असतं, खेळणारं मूल असतं या फुलणाऱ्या, खेळणाऱ्या मुलांच्या प्रत्येक गोष्टीवर ममतेने लक्ष ठेवणारा शिक्षकवृंद यांचे अनमोल सहकार्य आणि प्रशासकीय अधिकारी यांचे बहुमोल मार्गदर्शन या सर्वांमुळे आमची शाळा आदर्श शाळा ठरली आहे. इमारतीमध्ये हिंदी, उर्दू, तेलुगू, गुजराती या माध्यमाच्या शाळा भरतात. येथे जिव्हाळा, सहकार्य भावना, प्रसन्नता, निर्मलता, सर्वधर्मसमभाव निर्माण करण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत. प्रेमाच्या भिंती, स्नेहाच्या खिडक्या, आग्रहाचा दरवाजा, मायेचे छप्पर म्हणजेच आकुर्ली संकुल. या संकुलातून जाणारा विद्यार्थी आत्मविश्वासाचे पंख घेऊन यशाच्या गगनात भरारी घेतो.

मुख्याध्यापक : श्रीमती शोभा अरूण महाले, संपर्क : ९७३०० ७९२६७

# ५. गुणवत्तेचा अखंड ऊर्जास्त्रोत




## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चांडोली बुद्रुक, ता. आंबेगाव, जि. पुणे

'जीवन जगण्यासाठी कौशल्याधिष्ठित शिक्षण' मुलांना देणे ही काळाची काळाची गरज ओळखून ज्ञान संकलन करीत प्राप्त माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण व पृथक्करण करून शैक्षणिक संशोधनाच्या दिशेने पाऊल टाकणारे शिक्षण आमच्या शाळेत निरनिराळ्या सृजनात्मक उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना दिले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक उन्नतीसाठी अनेक पथदर्शी उपक्रम राबविल्यामुळे शाळेच्या शिक्षण व्यवस्थेवरील समाजाचा व प्रशासनाचा असणारा विश्वास दुणावला आहे. यामुळेच आजपर्यंत शाळेला अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार १९९२, वनश्री राज्य पुरस्कार १९९९, पुणे जिल्हा परिषद प्रथम अध्यक्ष चषक पुरस्कार २००२, सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता वाढ व पुरस्कार २०१६ इत्यादी पुरस्कारांनी शाळेला सन्मानित केले आहे.

बालचित्रवाणी कार्यक्रमात शाळेचा सहभाग आहे. इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षा व नवोदय परीक्षेमध्ये आमच्या शाळेला राज्यस्तरावर यश प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे यशवंतराव चव्हाण कला क्रीडामहोत्सवात जिल्हा स्तरावर यश मिळालेले आहे. सुसज्ज संगणक कक्ष, सुसज्ज प्रयोगशाळा, सुसज्ज मैदाने, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह, नर्सरी, ज्यूनियर व सीनियर वर्गाच्या शिक्षणाची सुविधा व ओपन जिम या सर्व सुविधा शाळेमध्ये आहेत. त्याचप्रमाणे लीला पूनावाला फाउंडेशन व नांदी फाउंडेशन यांच्या मदतीने दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांस लॉकर्स, ई लर्निंग, व टॅब द्वारे शिक्षण इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शाळा सिध्दीमध्ये आमच्या शाळेला 'अ' श्रेणी प्राप्त आहे. विद्यार्थी केंद्रस्थानी मानून शाळा स्तरावर राबविलेले अनेक उपक्रम सर्व स्तरावर पथदर्शी ठरले आहेत.

### ग्रामस्थांच्या मदतीने नर्सरी, ज्युनियर, सीनियर चे वर्ग

सेमी इंग्रजीच्या वर्गाचा दर्जा सुधारण्यासाठी व पटसंख्या वाढवण्यासाठी ग्रामस्थांच्या सहकार्यातून शाळेच्या आवारात नर्सरी, ज्युनियर व सीनियर वर्गाचे शिक्षण शाळेच्या आवारातच दिले जाते. त्यासाठी स्वतंत्र व्यवस्था अल्प शुल्क आकारून निर्माण केली असून त्याचे व्यवस्थापन व नियंत्रण ग्रामस्थांद्वारे केले जाते. इंग्रजी माध्यमांकडे जाणारा विद्यार्थी आता शाळेच्या आवारातच पूर्वप्राथमिक शिक्षणाचे धडे घेऊ लागला आहे. त्यामुळे पहिलीच्या पट नोंदणीस शंभर टक्के प्रतिसाद मिळत आहे, त्याचबरोबर पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा आनंददायी शिक्षणपद्धतीमुळे व कौशल्याधिष्ठित मूल्यमापनाद्वारे दर्जेदार शारीरिक विकास, मानसिक विकास व बौद्धिक विकास झालेला आहे. शाळेची गोडी लागलेली असते, त्यामुळे शाळेची पटसंख्या वाढण्यास निश्चितच मदत झालेली आहे. या उपक्रमास अनेक मान्यवरांनी व अधिकाऱ्यांनी भेटी देऊन उपक्रमाचे कौतुक केले आहे.

### स्पर्धा परीक्षा तयारी

स्पर्धा परीक्षेचे सुयोग्य नियोजन केले जाते. वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यास मूलभूत क्षमता प्राप्त झाल्यानंतर व वर्गातील प्रज्ञावान मुलांना अधिकचे ज्ञान मिळवून देण्यासाठी व स्पर्धा परीक्षांचा सराव होण्यासाठी इयत्ता दुसरीच्या वर्गापासूनच स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रम घेतला जातो, त्यामुळे प्रज्ञावान मुलांना संधी प्राप्त होते जास्त तास व प्रश्नपत्रिकेचा सराव याद्वारे मुलांची स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करून घेतली जाते, म्हणूनच आजपर्यंत जिल्हा गुणवत्ता यादीत व राज्य गुणवत्ता यादीत अनेक विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. आज पर्यंत शेकडो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. अनेक विद्यार्थी जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेशित झाले आहेत. त्याचाच परिणाम म्हणून शाळेचे अनेक माजी विद्यार्थी प्रशासन सेवेमध्ये विविध स्तरावर अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. आमचे विद्यार्थी राजकीय, वैद्यकीय, अभियांत्रिकी, विविध उद्योग, बांधकाम व्यावसायिक व सैन्यदलासारख्या अनेक क्षेत्रात कार्यरत आहे याचा शाळेला अभिमान आहे. सन १८६५ साली स्थापन झालेल्या आमच्या या ऐतिहासिक शाळेत आज इयत्ता ७ वी पर्यंतच्या २६४ विद्यार्थ्यांना आम्ही ९ शिक्षक अगदी मनापासून ज्ञानदानाचे कार्य करत आहोत.

### सुंदर माझे अक्षर

'सुंदर हस्ताक्षर हा विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आरसा असतो' अक्षरामुळे व्यक्तिमत्व कळते सुंदर अक्षरातून सकारात्मकता कळते म्हणून 'सुंदर माझे अक्षर' हा उपक्रम शाळेमध्ये राबविला जात आहे. दर शनिवारी विद्यार्थ्यांना विशिष्ट उतारा लिहिण्यासाठी दिला जातो, तो तपासून वेगवेगळ्या गटांमध्ये त्याचे मूल्यमापन केले जाते व प्रथम तीन क्रमांकांना प्रोत्साहनपर बक्षीस दिले जाते. यामुळे शुद्धलेखन व अक्षर सुधारण्यास मदत झाली आहे. मुलांमध्ये लेखनाची गोडी निर्माण झाली आहे.




### योगा तास

'एकाग्रता यशो बिजम' या संस्कृत सुभाषिताप्रमाणे कोणत्याही गोष्टींमध्ये यश मिळवण्यासाठी एकाग्र चित्त असणे आवश्यक आहे. अलीकडच्या काळात अनेक साधनांद्वारे मुलांची मने भरकटलेली दिसतात. त्यामुळे अध्ययनात अडथळे येतात. या मुलांचे मन स्थिर करण्यासाठी व मानसिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी शाळेमध्ये प्रत्येक शनिवारी योगाचा तास घेतला जातो. प्राणायाम, सूर्यनमस्कार व योगासने याद्वारे मुलांचे मानसिक स्वास्थ्य सुधारण्यास मदत होते. अध्ययन अध्यापनामध्ये सजगता निर्माण होते व शिकवलेले अध्ययन अनुभव मुलांच्या मनामध्ये रुजले जातात. त्याचबरोबर स्मरणशक्ती, श्वास क्षमता विकसित झाली आहे. मुलांना सकस आहार, आरोग्याच्या व स्वच्छतेच्या चांगल्या सवयी याविषयी मार्गदर्शन केले जाते. हेच विद्यार्थी प्रशिक्षित झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबाचे 'आरोग्य दूत' म्हणून त्यांची नेमणूक करून त्याच्या स्वत:च्या कुटुंबातील सदस्यांना अशा प्रकारच्या आसनांचा, सूर्यनमस्कार व प्राणायाम सराव करून घेण्यास प्रेरित केले जाते. यामुळे पालकांचे आणि संपूर्ण कुटूंबाचे, संपूर्ण वाडी वस्ती, संपूर्ण गावातील नागरिकांचे आरोग्य सुधारण्यास मदत झाली आहे. त्यामुळे शाळा व पालक ग्रामस्थ यांच्यात आपुलकीचे नाते तयार झालेले असून शाळेकडे, शिक्षकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला आहे. अनेक पालकांचे श्वसना संबंधीचे विकार कमी होण्यास मदत झाली आहे. मुलांना योगा करण्यासाठी आवश्यक असणारा गणवेश, योगा मॅट, ट्रॉली स्पीकर इत्यादी सुविधा पालकांनी उपलब्ध करून दिल्या आहेत .

### बाल वाचनालय

'वाचनाने मेंदूचा व्यायाम होतो व मन सुदृढ होते'. मुलांना वाचनाची गोडी लागावी, त्यांच्यावर संस्कार व्हावेत, त्यासाठी 'कानोबा वाचनालय चांडोली बुद्रुक व शासन' यांच्या मदतीने शाळेमध्ये बाल वाचनालय सुरु करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना विनाशुल्क सभासद करून घेण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या पुस्तकांची नोंद रजिस्टरमध्ये करण्यात येते. वाचलेल्या पुस्तकाचा संक्षिप्त आशय

अभिप्राय रूपाने नोंदविला जातो. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे वाचन समृद्ध झाले आहे. वाचनातील अडथळे दूर झाले आहेत. वाचनाची गोडी निर्माण झालेली आहे. विचार समृद्ध झालेले आहेत. मनाची प्रगल्भता वाढली आहे. जो विद्यार्थी जास्त पुस्तकाचे वाचन करतो त्याला 'उत्कृष्ट वाचक पुरस्कार' वाचनालयातर्फे दिला जातो .पुस्तकाची नोंद घेणे, पुस्तकाचे वाटप करणे, अभिप्राय घेणे ही कामे शिक्षकांमार्फत केली जातात.

### अध्यापनात डिजिटल साधनांचा वापर

अध्ययन अध्यापनातील गुंतागुंतीच्या संकल्पना विद्यार्थ्यांना स्पष्ट व्हाव्यात यासाठी शाळेमध्ये अध्ययन, अध्यापनात डिजिटल साधनांचा वापर केला जातो. ओव्हरहेड प्रोजेक्टर, स्मार्ट टिव्ही, टॅब, मोबाईल इत्यादि साधनांचा वापर केल्यामुळे अस्पष्ट संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते. नवनवीन व्हिडिओ, दीक्षा ॲप यांचा वापर अध्ययन अध्यापनात केल्यामुळे विद्यार्थ्यांचे अध्यापन आनंददायी व दर्जेदार होते. अनेक संकल्पनांचे दृढीकरण होते व नवीन गोष्टी सोप्या पद्धतीने समजावून सांगण्यास मदत होते. यामुळे विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीमध्ये वाढ झालेली दिसते. विद्यार्थ्यांची उपस्थिती आनंददायी अध्यापन पद्धतीमुळे वाढलेली दिसते.



### विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन

विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता विकसित व्हाव्यात तसेच अभ्यास पूरक क्षमता निर्माण व्हावी यासाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. कबड्डी, खोखो, लंगडी, लोकनृत्य लेझीम, धावणे, भालाफेक, चेंडू फेक, गोळा फेक इत्यादी स्पर्धांचे शाळा पातळीवर आयोजन करण्यात येते. यशस्वी स्पर्धकांना बक्षीस दिले जाते. यशस्वी विद्यार्थ्यांना केंद्र स्तर, बीट स्तर ,तालुका स्तर व जिल्हास्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होण्यास मदत झाली आहे.

### बालचित्रवाणी कार्यक्रमात सहभाग

बालचित्रवाणी कार्यक्रमाच्या कार्यकारी निर्माती श्रीमती ज्योती रामजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेमध्ये बालचित्रवाणी कार्यक्रमाचे छायाचित्रण करण्यात आले. 'पैकीच्या पैकी', 'शाळा प्रवेश', 'ग्रामशिक्षण समितीचे कार्य', 'चला शिकूया पुढे जाऊया' या विषयांवर आधारित लघु चित्रफित तयार करण्यात आल्या. सदर कार्यक्रमात शाळेतील शिक्षकांनी सहभाग घेतला याबरोबरच विद्यार्थ्यांची सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी इंग्रजी अध्ययन समृद्धी कार्यक्रम, बाल आनंद मेळावे, विज्ञान प्रदर्शन, पटनोंदणी सप्ताह, वृक्षारोपण सप्ताह, बालसभा, वार्षिक स्नेहसंमेलन, पालक मेळावे व विद्यार्थी आरोग्य तपासणी इत्यादी उपक्रम मुख्याध्यापक, शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती, सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ यांच्या सहकार्याने राबविले जातात. आज पर्यंत शाळेतील शिक्षकांना राज्य, जिल्हा व तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती मार्गदर्शक पुरस्कार, कानोबा वाचनालयाचा आदर्श शिक्षक पुरस्कार, ग्रामपंचायतचा शिष्यवृत्ती मार्गदर्शक पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा शिक्षक पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. वरील सर्व उपक्रमांमुळे शाळेची यशस्वी घोडदौड सुरू आहे.

मुख्याध्यापिका : सौ. दीपाली जालिंदर अजाब, संपर्क : ९७३०८ ४३७०७




## जि. प. प्राथ. शाळा, पिंपरी जलसेन, ता. पारनेर, जि. अहमदनगर

अहमदनगर जिल्ह्यातील नवोपक्रमशील शाळा जि.प.प्राथ. शाळा, पिंपरी जलसेन ता. पारनेर, जि. अहमदनगर या शाळेच्या अनुषंगाने बोलायचे तर सद्यस्थितीत शिक्षणासाठी खेड्याकडून शहराकडे होणारा प्रवास आपण पाहत आहोत, तथापि एका छोट्याशा खेडेगावातील आमच्या शाळेत मात्र अगदी विविध १५ गावांमधून १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये १२५ विद्यार्थी पटसंख्या असणारी ही शाळा शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये २०० पेक्षा जास्त पटसंख्येची झालेली आहे. शाळेची स्थापना १९२५ साली झाली असून इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंत वर्ग असणाऱ्या या शाळेत आम्ही ७ शिक्षक कार्यरत आहोत.

### शिष्यवृत्ती परीक्षेतील यशाचा चढता आलेख

स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून आमची शाळा वेळोवेळी आपली गुणवत्ता सिद्ध करत असलेली दिसून येते. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (इ. ५ वी) परीक्षेत सन २०१९-२०२० मध्ये १४ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये १६ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. त्यापैकी आमचे ३ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत तर १३ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आहेत. नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी ३ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीस्तव शाळास्तरावर वर्षभरात किमान 100 सराव चाचण्या घेतल्या जातात. यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत पुरविलेल्या मार्गदर्शक पुस्तिका, जिल्हास्तरावरुन घेतले जाणारे सराव, खाजगी प्रकाशनांचे प्रश्नपत्रिका संच यांचा वापर केला जातो. शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी मे महिन्याच्या उन्हाळी सुट्टीपासूनच सुरू केली जाते. यामध्ये पाढे पाठांतर, संख्यांवरील क्रिया, इंग्रजी शब्दसंग्रह, मराठी विषयाचे पाठांतर, समानार्थी शब्द, विरूध्दार्थी शब्द, म्हणी व वाक्प्रचार याद्वारे तयारीला सुरुवात केली जाते. वर्षभर शिष्यवृत्ती तयारीसाठी शालेय वेळे व्यतिरिक्त जास्त वेळ दिला जातो.

### इयत्ता १ ली साठी अध्यापन

इयत्ता १ ली मध्येच विद्यार्थ्यांना त्या इयत्तेच्या सर्व विषयांच्या सर्व क्षमता प्राप्त करून देण्यासाठी विशेष परिश्रम घेतले जातात. विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण होतो व शैक्षणिक पायाभरणी उत्तम झाल्याने विद्यार्थी पुढील इयत्तानुरूप क्षमता वेगाने प्राप्त करतात. इ. १ ली मध्ये सर्व प्रथम वाचन तयारी करुन घेतली जाते. त्यानंतर लेखनाला सुरुवात करताना सारख्या वळणाच्या अक्षरांचा गट तयार करुन सराव घेतला जातो. अनुलेखनातून श्रुतलेखनाकडे जाताना दोन अक्षरी शब्द, तीन अक्षरी शब्द अशाक्रमाने सराव दिला जातो. मराठी लेखन घेताना एक रेघी वहीचा दुरेघी प्रमाणे वापर केला जातो. विद्यार्थ्यांना दिलेला स्वाध्याय दररोज काळजीपूर्वक तपासून

चुकांची दुरुस्ती केली जाते. इ. १ ली तच वाचन–लेखनाची तयारी झाल्यावर व्याकरणाच्या मूलभूत संकल्पना जसे लिंग, वचन, काळ यांची ओळख करुन दिली जाते. इंग्रजी अक्षर व शब्द यांचा परिचय चित्ररुपाने करुन दिला जातो व लेखनासाठी चार रेघी वहीचा वापर केला जातो. त्यामुळे वर्षाअखेरीस किमान १०० शब्दांचे लेखन विद्यार्थी करतात.

याप्रमाणेच प्रत्येक इयत्तेतील विद्यार्थ्यांना इयत्तानुरूप क्षमता प्राप्त करून देण्यावर शाळेतील शिक्षक विशेष भर देतात.

### अहमदनगर जिल्हा परिषदेअंतर्गत इस्त्रो शैक्षणिक सहलीतील यश

इयत्ता ५ वी ते ७ वी तील विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीस वाव मिळून त्यांच्यातील बालवैज्ञानिक तयार व्हावा या उद्देशाने जिल्हा परिषद अहमदनगरद्वारे मागील चार वर्षांत निबंध व मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्था, थुंबा केरळ येथे विमानाने शैक्षणिक सहलीस नेले जाते. शाळेतील आजपर्यंत ६ विद्यार्थ्यांची या शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली आहे.

### लोकसहभाग

शाळेच्या यशस्वी कामगिरीमध्ये ग्रामस्थांनी वेळोवळी केलेली मदत मोलाची आहे. आजपर्यंत शाळेला वस्तूरूपाने व रोख स्वरुपात रुपये ८ लाखांपेक्षा अधिकचा लोकसहभाग प्राप्त झालेला असून त्यात इंटरॅक्टिव्ह क्लासरूम, इनव्हर्टर, पेव्हर्स ब्लॉक, वृक्षांना कट्टे, एलईडी संच, झांजपथक, कवायत साहित्य व वृक्षारोपण इत्यादी अनेकविध कामे झालेली आहेत.

### पालक–शिक्षक–शाळा व्यवस्थापन समिती समन्वय

शाळेमध्ये बाहेरगावातून येणाऱ्या १०० विद्यार्थ्यांच्या पालकांनी शिक्षकांच्या मदतीने 3 स्कूल बसेस ठरविल्या आहेत व विद्यार्थ्यांना जाण्या–येण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. शाळा व्यवस्थापन समिती शाळेत येणाऱ्या समस्या प्रभावीपणे सोडविण्यास मदत करते.

### नावीन्यपूर्ण विज्ञान केंद्र व व्हर्च्युअल क्लासरुमची निर्मिती




शाळेमध्ये शासकीय योजनेतून नावीन्यपूर्ण विज्ञान केंद्राची स्थापना झालेली आहे. यातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळत आहे. तसेच महाराष्ट्र शासनाद्वारे व्हर्च्युअल क्लासरूमची निर्मिती होवून विद्या परिषद, पुणे येथील तज्ज्ञ मार्गदर्शकांसोबत विद्यार्थी संवाद साधणार आहेत.

### स्वसंरक्षणासोबत जलतरण प्रशिक्षण

शाळेतील विद्यार्थीनींना स्वसंरक्षणासाठी कराटे, तायक्वाँदो व कीक बॉक्सींगचे धडे दिले जातात, तसेच पालकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना उपलब्ध साधनांद्वारे जलतरण प्रशिक्षण देखील उन्हाळी सुट्टींमध्ये शिक्षकांमार्फत दिले जाते.

## दप्तरमुक्त शाळा, बहुभाषिक परिपाठ



दर शनिवारी दप्तरमुक्त शाळा हा उपक्रम घेतला जातो. गायन, नृत्य, रांगोळी, होवूया स्मार्ट चालता–बोलता हा प्रश्नमंजूषा कार्यक्रम, खेळ, कवायत व  किशोरवयीन मुलींचे उद्‌बोधन शनिवारी घेतले जाते. सोमवार ते शनिवार तीनही भाषेतून परिपाठ घेवून मूल्यशिक्षणाचे संस्कार रुजविले जातात.

## 'मला अधिकारी व्हायचंय'

पिंपरी जलसेनची शाळा ही ग्रामीण भागातील शाळा आहे. विद्यार्थ्यांना अधिकारी होण्याची प्रेरणा मिळावी यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व शालेय प्रशासनामार्फत **'मला अधिकारी व्हायचंय'** हा नवोपक्रम शाळा राबविते. विविध क्षेत्रांतील अधिकारी वर्गास निमंत्रित करून त्यांचे मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित केले जातात. दर तिमाहीला हा उपक्रम राबविला जातो.

## अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर, कोरोना काळातील ऑनलाईन शिक्षण

शाळेतील प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अध्ययन–अध्यापनात वापर केला जातो. शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या कालावधीत कोरोनामुळे काही काळ शाळा बंद असल्याने प्रत्यक्ष अध्यापनास येणाऱ्या अडचणींवर मात करीत विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी Zoom meeting / Google meet द्वारे वेळापत्रकाप्रमाणे ऑनलाईन शिक्षण दिले गेले. त्याचबरोबर गृहभेटीद्वारे विद्यार्थ्यांशी शिक्षकांनी संवाद साधला. त्यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवण्यात यश आले.

## विविध क्रीडा प्रकारांतील उल्लेखनीय यश

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी कायम प्रयत्नशील असणाऱ्या या शाळेने क्रीडा क्षेत्रातही आपले स्थान अबाधित ठेवले आहे. महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक संचालनालयामार्फत घेतल्या जाणाऱ्या क्रीडा स्पर्धांमध्ये कराटे, तायक्वाँदो व कीक–बॉक्सिंग या क्रीडा प्रकारात जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर  खेळाडू या शाळेतील विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. याचबरोबर कबड्डी, खो– खो अशा पारंपारिक मैदानी खेळाचे प्रशिक्षणही विद्यार्थ्यांना शाळेत दिले जाते.

## विविध उपक्रमांची मांदियाळी

शाळा अनेक उपक्रम राबवत असून त्यात How to solve the Rubik's cube?, पाढे पाठांतर, योगाभ्यास, वाचन–लेखन उपक्रम, छंदवर्ग, आयोजन, Word Master, जयंती–पुण्यतिथी साजरी करणे, एम. एस. ऑफिस कोर्स व वार्षिक स्नेहसंमेलन, इत्यादींचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी शाळा नेहमी प्रयत्नशील आहे. शिक्षण आपल्या सर्वांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक आवश्यक साधन आहे. शिक्षण कोणत्याही मोठ्या कौटुंबिक, सामाजिक व राजकीय समस्या सोडविण्याची क्षमता आपल्याला प्रदान करते. विद्यार्थ्यांमध्ये देशाबद्दलचे सर्व मानवी हक्क, सामाजिक हक्क, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या समजून घेण्यास मदत करते. नियमित आणि योग्य शिक्षण आयुष्यात ध्येय निर्माण करून विद्यार्थ्यांना यशाकडे नेतात. म्हणून आमची शाळा नेहमीच गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आग्रह धरते. गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे ध्येय साध्य करण्यासाठी आम्ही सर्व शिक्षक व आमची शाळा व्यवस्थापन समिती कटिबद्ध आहे. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पिंपरी जलसेनची शाळा नेहमीच अग्रेसर राहील.

मुख्याध्यापिका : श्रीम. नरवडे रत्नमाला जिजाबा, संपर्क : ९६९९८ ७२७४०

# ७. गुणवत्तेचे मंदिर




**जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा अरण, ता. माढा, जि. सोलापूर**

'धन्य ते अरण। रत्नांची खाण। जन्मला निधान। सावता तो'।

सोलापूर–पुणे राष्ट्रीय महामार्गालगत श्रीक्षेत्र अरण हे संत सावतामाळी महाराजांचे संजीवन समाधी स्थळ असलेले एक छोटेसे गाव आहे. सुमारे हजार लोकसंख्या असलेल्या छोट्याशा गावातील जिल्हाभर गवगवा असलेली जिल्हा परिषद केंद्र शाळा अरण. वारकरी संप्रदायाचा ऐतिहासिक वारसा जपत शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय आणि सामाजिक अशा प्रत्येक क्षेत्रात आपल्या नावाचा ठसा उमटवणारे येथील विद्यार्थी सतत चर्चेचा विषय ठरतात, याचे प्रमुख कारण म्हणजे येथील आमची प्राथमिक शाळा. आमच्याकडे पहिली ते सातवीचे ४४२ विद्यार्थी शाळेत प्रवेशित असून एकूण १४ शिक्षक शाळेत कार्यरत आहेत.

### शतक महोत्सवी वर्ष

सन १९२३ हे शाळेचे स्थापना वर्ष येत्या २०२३ ला शाळेला शतक महोत्सव साजरा होतो आहे. यानिमित्त 100 उपक्रम घेऊन शतक महोत्सव साजरा करण्याचा ग्रामस्थ, आजी–माजी विद्यार्थी व शिक्षक यांचा मानस आहे.

### सुसज्ज इमारत

इंग्रजी 'यु' आकाराची शाळेची देखणी इमारत. रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्यांच्या नजरेतून शाळा सुटत नाही. शाळेचे भव्य प्रवेशद्वार, रस्त्याच्या दुतर्फा केलेले वृक्षारोपण, छोट्या–छोट्या फुलझाडांनी सजलेला मार्ग व इमारतीसमोर आठ हजार स्क्वेअर फूट पेव्हर ब्लॉकयुक्त प्रार्थना आणि कवायतीचे मैदान आपले लक्ष वेधून घेतात. अतिशय सुंदर आणि भव्य असे सांस्कृतिक सभागृह स्थानिक ग्रामपंचायत आणि सर्व शिक्षकांच्या सहकार्याने कोरोना कालावधीत तयार केला आहे. हे सभागृह शाळेचा एक दागिनाच आहे.

### संगणक कक्ष

विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात संगणक शिक्षण काळाची गरज आहे. यासाठी दुसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण दिले जाते. यामध्ये १५ संगणक, ३ प्रोजेक्टर, एक इंटरॅक्टिव बोर्ड व २ प्रिंटर आहेत. संगणक कक्षा मध्ये जाऊन नियोजनाप्रमाणे आठवड्यातून दोन तासिका पेंटिंग, एम.एस. वर्ड फाइल्स बनवणे, फोल्डर तयार करणे, मराठी–इंग्रजी टायपिंग व प्रश्नपत्रिका बनवणे हे शिक्षण विद्यार्थी आवडीने व आनंदाने घेतात. याचा पुढील शिक्षणात विद्यार्थ्यांना फायदा झालेला दिसतो.

### नावीन्यपूर्ण विज्ञान केंद्र–प्रयोगशाळा

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेकडून ३०० प्रयोग साधने असलेली प्रयोगशाळा मिळाली आहे. यामध्ये संपूर्ण

केंद्रातील विद्यार्थी येऊन प्रयोग करतात. इयत्ता पाचवी ते आठवीच्या अभ्यासक्रमावर आधारित १०० प्रयोगांचे प्रात्यक्षिक साहित्य कार्डशीट आणि मॉडेल स्वरूपात दिले आहेत. याचा फायदा केवळ शाळेतीलच नाही तर संपूर्ण केंद्रातील विद्यार्थी आणि शिक्षक घेतात.

**वाचनालय**



'वाचन संस्कृती जपूया ज्ञानसंपन्न होऊया', हे ब्रीद सत्यात उतरवण्यासाठी वाचनालयाची निर्मिती केली. या उपक्रमामुळे मुलांना अवांतर वाचनाची गोडी लागली. विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या वाढदिवसानिमित्त पुस्तक भेट घेऊन २००० पुस्तकांनी युक्त असे शिक्षक व विद्यार्थी वाचनालय शाळेमध्ये आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आणि वाचनासाठी झाडाखाली वाचन कट्टे आहेत. प्रयेक शनिवारी 'दफ्तरविना शाळा' या उपक्रमात एक तास वाचनाचा घेतला जातो.

**ॲम्पी थिएटर**

कथाकथन, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा, निबंध लेखन, चित्रकला, पाढे पाठांतर, यासारखे उपक्रम येथे घेतले जातात. शालेय तसेच सहशालेय उपक्रम घेताना चार भिंतींच्या बाहेर जाऊन विद्यार्थ्यांना ॲम्पी थिएटरचा उपयोग करून हे उपक्रम घेतले जातात.

**सांस्कृतिक सभागृह**

कोणत्याही जिल्हा परिषद शाळेला नसेल असो ग्रामपंचायत व शैक्षणिक उपक्रमांमधून बांधलेला सांस्कृतिक सभागृह आहे. यात 'स्मार्ट टीव्ही आणि प्रोजेक्टर' द्वारा मुले ई–शिक्षण घेतात. विविध उपक्रम, स्नेहसंमेलन, मेळावे, बालसभा घेण्यात येतात. केंद्रातील शिक्षकांची प्रशिक्षणे, शिक्षण परिषदा व मेळावे देखील या सभागृहात घेतले जातात.

**वर्गखोल्या**

प्रत्येक खोलीत एल. इ. डी. टीव्ही, बेंचसह बैठक व्यवस्था आहे. भाषा, गणित व विज्ञान अध्ययन कॉर्नर, भरपूर अध्ययन साहित्यासह सुसज्ज अशा आमच्या वर्गखोल्या आहेत. विषयवार ज्ञान रचनावादावर आधारीत स्वनिर्मित साहित्य आहे. ग्रंथालय, मुख्याध्यापक कार्यालय, संगणक कक्ष, प्रोजेक्ट रूमसह एकूण १८ वर्ग खोल्या आहेत.

**वृक्षारोपण**

उन्हाळ्याची सुट्टी संपून शाळा सुरू झाली की, आम्ही शाळेत वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेतो. शाळेत झाडे लावतो पण त्याचबरोबर घरीही विद्यार्थ्यांना झाडे लावायला सांगून त्यांचे संवर्धन करण्यास सांगतो. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये **'झाडे लावा झाडे जगवा'** ही संकल्पना रूजवली जाते. वृक्षसंवर्धन काळाची गरज आहे. याची जाणिव निर्माण होते. विद्यार्थ्यांनी लावलेली झाडे अधून–मधून आम्ही भेट देऊन पाहतो. विद्यार्थी–पालक, शिक्षक यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेत वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन केले जाते. हिरवाईने नटलेला शाळेचा कॅम्पस सर्वांचेच मन मोहून टाकतो.

**व्यक्तिमत्व विकास**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, उपजत क्षमतांचा विकास करणे, शाळेची गोडी निर्माण व्हावी अभ्यासामध्ये प्राविण्य निर्माण व्हावे, यासाठी शाळेमध्ये नृत्य–नाट्य, गायन–कला, वादन, वक्तृत्व, कथाकथन, चित्रकला, निबंधलेखन, लोकनृत्य व बालनाट्य स्पर्धांमध्ये आमच्या शाळेतील विद्यार्थी सहभागी होऊन केंद्र, तालुका, जिल्हा स्तरापर्यंत यश प्राप्त करतात. शाळेतील दोन विद्यार्थ्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत.

**कला – कार्यानुभव साहित्य निर्मिती**

प्रत्येक विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग वाढविण्यासाठी हा उपक्रम शाळेत घेतला जातो. स्थानिक परिसरात साजरा होणाऱ्या सणांनुसार विविध कला कार्यानुभव साहित्याची निर्मिती प्रात्यक्षिक दाखवून विद्यार्थ्यांकडून करून घेतली जाते. यामध्ये मातीकाम, कागदकाम, दोराकाम, प्रसंगोत्पात उपक्रम व टाकाऊतून टिकाऊ वस्तू निर्मिती इत्यादी उपक्रम घेतले जाते.

टॅलेंट हंट स्पर्धा



सोलापूर जिल्हा परिषदेमार्फत प्रत्येक वर्षी 'टॅलेंट हंट' स्पर्धा आयोजित केली जाते या स्पर्धेमध्ये शाळेने जिल्हा स्तरावर सहभाग नोंदवून वाद–विवाद, प्रश्नमंजुषा, नृत्य, चित्रकला व वक्तृत्व यामध्ये प्रथम द्वितीय क्रमांक मिळवले आहेत.

**क्रीडा स्पर्धा**

जिल्हा परिषदेमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या क्रीडा स्पर्धेत शाळेने सहभाग नोंदवुन तालुका व जिल्हा स्तरावरील कबड्डी, खो–खो या प्रकारांमध्ये क्रमांक मिळवले आहेत. धनुर्विद्या आणि बुद्धिबळ या क्रीडा प्रकारात राज्य पातळीवर या शाळेचे विद्यार्थी चमकलेले आहेत.

**स्पर्धा परीक्षा तयारी**

शालेय अभ्यासाबरोबरच बौद्धिक क्षमतेचे मोजमाप करणारे साधन म्हणजे स्पर्धा परीक्षा. येथे ज्ञान बुद्धी व कौशल्य यांचा समन्वय साधावा लागतो म्हणून शाळेमध्ये विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली जाते. यामध्ये प्रामुख्याने इयत्ता पाचवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, इयत्ता सातवी साठी सोलापूर जिल्हा प्रज्ञाशोध परीक्षा नवोदय परीक्षा विविध प्रज्ञाशोध परीक्षा मंथन परीक्षा याबाबतचे नियोजन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. २००१ पासून विविध स्पर्धेमध्ये प्रत्येकवर्षी विद्यार्थ्यांनी जिल्हा, राज्य गुणवत्ता यादीमध्ये स्थान पटकावले आहे. याच बरोबर यूपीएससी व एमपीएससी साठी अभ्यास केंद्र अरणमध्ये आहेत. त्यात १० वी नंतरच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन केले जाते.

**विद्यार्थी कल्याण निधी**

शाळेचे माजी विद्यार्थी नागरीक ग्रामस्थ शिक्षणप्रेमी युवक वर्ग यांच्या सहकार्यातून शाळेत विद्यार्थी कल्याण निधी हा उपक्रम राबवला आहे. या विद्यार्थी विकास योजनेअंतर्गत अडीच लाख रुपये बँकेत कायम ठेवले असून या रकमेच्या व्याजातून विद्यार्थ्यांना दरवर्षी बक्षीस दिले जाते. हा इथला नाविन्यपूर्ण उपक्रम शिक्षणाच्या वारीमध्ये राज्यासाठी आदर्श ठरला होता.

**विद्यार्थी वस्तू भांडार**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अनेकदा शालेय साहित्य उपलब्ध होत नाही. सर्व शैक्षणिक साहित्य शाळेतच मिळावे या उद्देशाने 'ना नफा, ना तोटा' या तत्वावर आधारित विद्यार्थी वस्तूभांडार चालवले जाते. प्रत्येक वर्षी इयत्ता सहावीच्या वर्गाकडे दिले जाते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वस्तूंच्या खरेदी–विक्रीचे ज्ञान प्राप्त होते त्याचबरोबर नफा व तोटा या संकल्पनांचे आकलन होते.

**क्षेत्रभेटी–परिसर भेटी**

या उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना पोस्ट ऑफिस, बँक, दूध शीतकरण केंद्र, बंधारा भेट, आदर्श शेतकरी व शेतीस भेट यासारख्या क्षेत्रभेटीचे आयोजन केले जाते.

**'मज आवडते ही मनापासुनी शाळा, लाविते लळा ही जशी माऊली बाळा!'**

मुख्याध्यापिका : श्रीमती शांता भागवत वाघमोडे, संपर्क : ९७६६८ ८२६८६

## ८. संस्कार व आधुनिक शिक्षणाचा समन्वय



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोयेगाव, ता. चांदवड, जि. नाशिक**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत राबणारी महाराष्ट्रभर नावलौकिक असणारी आमची जिल्हा परिषदेची शाळा म्हणजे भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा भोयेगाव. सह्याद्रीच्या डोंगररांगांच्या कुशीत वसलेल्या चांदवड नगरी पासून १२ किलोमीटर दक्षिणेकडे असलेले छोटेसे गाव 'भोयेगाव'. गत ४ वर्षातील पटसंख्या २२३ वरून ३८८ पर्यंत पोहोचतांना इंग्रजी माध्यम व खाजगी शाळेतून तब्बल १६८ विद्यार्थी आमच्या शाळेत दाखल झाले आहेत. शैक्षणिक गुणवत्ता विकास उपक्रमात शाळेने 'अ' श्रेणी प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकावला आहे. या शाळेत शिक्षण घेण्यासाठी तब्बल ३० किलोमीटरच्या परीघ क्षेत्रातून विद्यार्थी येऊ लागले. आजपर्यंत विविध शाळा व अभ्यागतांनी शाळा भेटीच्या माध्यमातून अभ्यास दौरा केला आणि शालेय प्रगती व नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती घेतली हीच आमच्या कार्याची मोठी पावती आहे.

**लोकसहभागातून शाळेचा कायापालट**



अतिशय कमी क्षेत्रफळ असलेल्या व संपूर्ण शेतीप्रधान असलेल्या या गावात एम्पथी फाउन्डेशन व दानशूर गावकऱ्यांच्या सहकार्याने तब्बल दीड कोटीची सर्व अद्ययावत सुखसोयींनी परिपूर्ण असलेली अतिशय देखणी इमारत २०१८ साली उभी राहिली. २०१४ ला 'क' श्रेणीत असलेल्या शाळेत आज दहा वर्ग खोल्या, स्वतंत्र कार्यालय, रोबोटिक Lab, संगणक शाळा, नावीन्यपूर्ण विज्ञान केंद्र, वाचनालय, डिजिटल वर्गखोल्या, प्रशस्त आखीव रेखीव मैदान, सुंदर बगिचा व पारंपरिक खेळाचे साहित्य उपलब्ध आहे.

दानशूर ग्रामस्थांच्या सहभागाने नवीन इमारती पुढे १५० ट्रॅक्टर मुरूम टाकून प्रशस्त असे आखीव रेखीव मैदान तयार करण्यात आले आहे. मैदानाच्या सर्व बाजूने भरपूर झाडे आहेत. विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी बोअरवेल करून ॲक्वागार्ड बसविण्यात आले. डिजिटल शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. सोलर विद्युत, इंटरकॉम साऊंड सिस्टिम, कॉम्प्युटर लॅब,

विज्ञान प्रयोगशाळा उपलब्ध करून देण्यात आली. इमारतीची रंगरंगोटी करून आकर्षक व रंगीत अंतरंग व बाह्यांग चित्रित केले. माजी विद्यार्थ्यांनी सात संगणक शाळेला देऊन प्रत्येक वर्ग डिजिटल केला. 'शाळेचा गावाला मान, गावाला शाळेचा अभिमान' हेच ब्रीद सगळ्यांच्या ध्यानीमनी आहे आणि यातूनच विकासाची गंगा वाहत आहे.

### उपक्रमांची खाण

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणासाठी गणित जत्रा, विज्ञान जत्रा, व्याख्याने, शाळेचा बोलका परिसर, वाचन कट्टा, चर्चासत्र, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा हस्ताक्षर स्पर्धा, क्रीडा स्पर्धा राबविल्या जातात दर शनिवारी दप्तराविना शाळा भरविली जाते. भाषाप्रभुत्व मिळविण्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजी या तीनही भाषेतील पाच शब्दांचे लेखन करून चर्चा केली जाते. संगीतमय परिपाठ तिन्ही भाषा मराठी, हिंदी व इंग्रजी मध्ये घेतला जातो. त्यासाठीचे वादक हे देखील सर्व विद्यार्थी असतात. आरोग्य ध्वज, उपस्थिती ध्वज, विद्यार्थी वाढदिवस साजरे केले जातात. कुतूहल कोपऱ्यामध्ये दररोज एक वस्तू ठेवली जाते. पूर्ण दिवसभर प्रत्येक विद्यार्थी ते हाताळण्यास मोकळा असतो. त्याची माहिती त्या ठिकाणी दिली जाते त्यांची जिज्ञासा शांत केली जाते. भेटीस आलेल्या अधिकारी, पदाधिकाऱ्यांची तीनही भाषेत मुलाखत घेणे. यासारखे नानाविध उपक्रम राबविले जातात.

### आयुष्याला पुरवणारी संस्कारांची शिदोरी

या शाळेत विद्यार्थ्यांना संस्कारक्षम बनविण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. 'School Norms' या अंतर्गत विद्यार्थ्यांकडूनच चर्चा करून शाळेविषयीचे नियम ठरविले जातात. जसे की, शाळा माझी आहे, माझ्या शाळेतील सर्व मालमत्तेची मी काळजी घेईन, हे ज्ञान केंद्र आहे, या केंद्रात येताना मी नतमस्तक होऊनच येईन. शाळेचे नैसर्गिक सौंदर्य वाढविण्यात मदत करेन. शाळेतील कचऱ्याची व्यवस्थित विगतवारी करून कचऱ्याची विल्हेवाट लावीन. माझ्या तोंडात अपशब्दांना थारा नसेल. इ. नियम विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले असल्यामुळे ते काटेकोरपणे त्याचे पालन करतात आणि आपोआपच शाळेमध्ये शिस्तीचे वातावरण बनते. 'स्कूल नॉर्मस' प्रमाणे 'क्लासरूम नॉर्मस' ही बनवून पालन केले जाते. यामुळे सर्व १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या अंगी स्वयंशिस्त बाणते.

### वृक्षवल्ली आम्हा सोयरे

वृक्षांच्या सावलीत पक्षांच्या किलबिलाटात भरणारी येथील 'माझी अभ्यासिका' गुरुवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या निसर्ग शाळेची आठवण करून देते 'बोटॅनिकल गार्डन' मध्ये विविध दुर्मिळ व औषधी वनस्पती लावलेली आहेत. या वनस्पतींना एका बाजूला शास्त्रीय नाव व दुसऱ्या बाजूला मुलाच्या नावाची पाटी असे प्रत्येक झाडाजवळ दिसते. जल व्यवस्थापन अंतर्गत छोटेसे 'शेततळे' बनवलेले आहे. 'Roof Water Harvesting' मध्ये संपूर्ण छतावरील पाणी ७ इंच पाईप द्वारे १४ फुट खोल शोषखड्ड्यात सोडल्यामुळे शाळा व परिसरातील दरवर्षी डिसेंबर महिन्यात आटणारे बोअर वेल वर्षभर सुरु होऊन पाणी टंचाई दूर झाली आहे . 'एक मूल एक झाड' उपक्रमा अंतर्गत परिसरात आज पर्यंत 388 नवीन झाडे लावून त्याचे संवर्धन करण्यात आलेले आहे. यामुळे परिसरात पक्षांची संख्याही खूप वाढली आहे. परिसरामध्ये विद्यार्थ्यांनी 'चिऊ काऊ स्टॅन्ड' उभारले असून त्यात दाणापाणी ठेवतात व पक्षांचे निरीक्षण करून नोंदी ठेवतात.

अंध–अपंगांच्या दुःखाची जाणीव व्हावी म्हणून 'समानुभूती' सारखा उपक्रम राबविला जातो. यात डोळ्याला पट्टी बांधून किंवा पायाला रुमाल बांधून आपल्या मित्रांच्या मदतीने परिसराची भेट घडवितात व अनुभूती घेतात असे कायमचे मनावर कोरले जाणारे संस्कार घडविले जातात. प्रत्येक तासिकेनंतर दोन मिनिटांचा 'Quite Time' दिला जातो. यामध्ये विद्यार्थी त्या तासिकेला आपण काय शिकलो हे आठवतात, उजळणी करतात आणि पुढच्या तासिकेसाठी प्रफुल्लीत होतात. दररोज शाळा सुटल्यानंतर सायंकाळी वीस मिनिटे सर्व शिक्षकांचे 'रिफ्लेक्शन' घेतले जाते. यात दिवसभराचे अध्यापन त्यावर आलेल्या अडचणी, काढलेले उपाय यावर चर्चा केली जाते.

### धरता तंत्रज्ञानाची कास, गुणवत्ता हमखास



लोकसहभागातून प्रत्येक वर्ग डिजिटल झाला आहे. प्रोजेक्टर सोबत मीरा कास्ट हे Device जोडून शिक्षकांचा मोबाईलच त्याला जोडला गेला. त्यामुळे विज्ञान, समाजशास्त्र भूगोल यांसारख्या विषयातील अमूर्त संकल्पना जसे हृदयाचे कार्य, मेंदू कार्य, विविध इंद्रियसंस्थेचे कार्य, भूरूपे, समुद्र, भौगोलिक प्रदेश वनस्पतीतील विविधता, जगाची सफर, आभासी परिसर भेट या गोष्टी विद्यार्थ्यांना समजू लागल्या. यासाठी इंटरनेटचा लागणारा खर्च शिक्षक स्वतः करतात. आभासी परिसर भेटी घडू लागल्यामुळे स्पर्धा परीक्षामध्ये ही उपयोग झाला. नवोदय, शिष्यवृत्ती, ITSE यासारख्या परीक्षांमध्ये तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर दैदीप्यमान यश संपादन केले आहे. 'QR Code' चा वापर करून प्रश्नमंजुषा घेतली जाते व त्याचे ॲनालिसेस देखील केले जाते. 'थ्रीडी एनिमल्स', 'एक्स रे' ॲप इत्यादींचा वापर केला जातो. महिन्याला एक दिवसासाठी तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाते. त्याचा वापर करून प्रत्येक शिक्षकाने स्वतःची युट्युब लिंक तयार करून खूप सारे व्हिडिओ स्वतः बनविले आहेत. तसेच इंटरॅक्टिव्ह पीपीटी च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा अध्यापनात सक्रिय सहभाग घेतला जातो. तंत्रज्ञान वापरासाठी दिवसभरातून जास्तीत जास्त दीड तास दिला जातो, व प्रत्येक शुक्रवार हा Without Screen Day असतो.

### पारंपरिक खेळ, शारीरिक विकासाचा मेळ

शाळेमध्ये गुणवत्ते बरोबरच शारीरिक विकासासाठी देखील खूप मेहनत घेतली जाते. लेझीम, डंबेल्स, डबलबार, सिंगलबार, मल्लखांब, रिंग, बॅडमिंटन, कबड्डी, खो–खो, हॉलीबॉल इ. खेळ खेळले जातात. यात विद्यार्थी जिल्हा स्तरावर नैपुण्य मिळवतात. काही विद्यार्थ्यांची तर राज्यस्तरावर देखील निवड झालेली आहे. काळाच्या पडद्याआड गेलेले विटी दांडू, सूरपारंब्या, लगोरी, गलोल, खडे–खडे, गोट्या, दोर धरून झाडावर चढणे, अम्पल चंपल व आट्यापाट्या या खेळांचे देखील पुनरुज्जीवन केलेले आहे. याचाही विद्यार्थी मनसोक्त आनंद घेतात.

### बचतीचे महत्त्व

'ना नफा, ना तोटा' या तत्वावर सर्व शालेय उपयोगी वस्तूंचे शालेय 'विद्यार्थी ग्राहक भांडार' आहे. शाळेमध्ये 'मनी बँक' सुरू करण्यात आलेली असून विद्यार्थ्यांना पासबुक दिलेले आहे. तसेच मनी बँकेतून विद्यार्थी 'टोकन' घेऊन 'शालेय विद्यार्थी ग्राहक भांडारातून' विविध वस्तू खरेदी करतात. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे पोस्टामध्ये बचत खाते उघडले असून दर शनिवारी पोस्टमन शाळेत येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना वरील उपक्रमांतून बँकिंग क्षेत्राची प्रत्यक्ष अनुभूती मिळते. किल्ले बनविणे, सोलर सिस्टिमची प्रतिकृती तयार करणे, यासारखा सामूहिक प्रकल्प, यामध्ये प्रत्येक वर्गातील दोन विद्यार्थी निवडून त्यांचे पंधरा गट तयार केले आहेत. पहिलीपासून ते सातवीचे विद्यार्थी यात एकत्रित काम करत असतात. त्यामुळे सहकार्य, संग्रहवृत्ती, खिलाडूवृत्ती, समजूतदारपणा यासारखे अनेक गुण जोपासण्यास मदत होते. प्रत्येक जण आपल्याला जमेल–झेपेल ते काम करून हिरीरीने भाग घेत असतो.

### वार्षिक स्नेहसंमेलन

हा तर एक आनंदोत्सवच असतो. विविध प्रकारचे कलागुण गावातल्या सर्व गावकऱ्यांसमोर सादर केले जातात. भरपूर बक्षिसांची लयलूट केली जाते व शाळेच्या गरजांची पूर्तता करून विकास साधला जातो. 'मानवी देखाव्यातून प्रतिकृती' सादर केली जाते. उदा. रेल्वे स्टेशन वरील दृश्य, हॉस्पिटल चे दृश्य, मंदिरातील दृश्य.



### Paperless Office

जिल्हा परिषदेची शाळा म्हटले की मुख्याध्यापकांना अनेक लिखाणाची कामे असतात. परंतु आम्ही पूर्णपणे पेपरलेस ऑफिस बनवले आहे. सर्व कामे शाळेत न करता घरी संगणकावर केली जातात. शालेय विद्यार्थी परीक्षांचे रेकॉर्ड, विविध स्पर्धेचे रेकॉर्ड सातत्यपूर्ण मूल्यमापन, शालेय दप्तर ही सर्व कामे विविध लिंक तयार करून संकलन केले जाते. मुख्याध्यापक स्वतः सर्व कामे करून सहकारी नऊ शिक्षकांचा संपूर्ण वेळ फक्त आणि फक्त विद्यार्थ्यांसाठीच राखून ठेवतात.

स्पर्धेच्या युगात पालकांच्या वाढलेल्या अपेक्षांप्रमाणे भोयेगाव येथील उपक्रमशील व सर्वांगाने परिपूर्ण असलेली आमची शाळा हायटेक झाली आहे. गुणवत्ता विकास अभियान, डिजिटल शाळा, आयएसओ मानांकन शाळेने हे सर्व साध्य केले आहे. विभागातील या एकमेव आंतरराष्ट्रीय शाळेचा उद्देश म्हणजे गाव खेड्यातील लेकरांना दर्जेदार शिक्षण देणे हाच आहे. विद्यार्थ्यांसाठी धडपड करणाऱ्या शिक्षकांच्या जिद्दीने शाळेचा चेहरामोहरा आज पूर्णपणे बदलला आहे.

मुख्याध्यापक : श्री निवृत्ती आहेर, संपर्क : ९४२२३ २२७९८

## ९. दिवा लागतो ज्ञानाचा, विकास होतो गावाचा




**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा होळ, ता. पाचोरा, जि. जळगाव**

शाळा, विद्यार्थी आणि शिक्षण ही ज्ञानाची त्रिवेणी आहे. ज्ञानमंदिराचा पाया म्हणजेच शालेय शिक्षण, शाळेलाच मुलांची दुसरी माता म्हणतात.

ही आवडते मज मनापासुनी शाळा, लाविते लळा जसा माऊली बाळा।

होळ, ता. पाचोरा, जि. जळगाव येथील जिल्हा परिषदेची इयत्ता १ली ते ५वी पर्यंतची शाळा. गावाची लोकसंख्या ७०० च्या जवळपास. धनगर व भिल्ल हे प्रमुख समाज गावातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती, शेतमजुरी. गावाच्या पूर्वेस २० कि.मी. अंतरावर पाचोरा तालुका व पश्चिमेस २५ कि.मी. अंतरावर चाळीसगाव तालुका आहे. गावाच्या दक्षिणेस ५ कि.मी. अंतरावर ३० हजार लोकसंख्या असलेले बाजारपेठेचे गाव नगरदेवळा आहे. गावाच्या उत्तरेस तितूर व पूर्वेस गडद अशा दोन नद्यांच्या बेटावर होळ गाव वसलेले आहे.

गावातील मोजक्याच लोकांची परिस्थिती चांगली आहे. त्यांची मुले ही इंग्रजी माध्यमांच्या शाळेत जात होती व उर्वरित पालकांची मुले आमच्याकडे प्रवेशीत व्हायची तीही बोटावर मोजण्याइतपत. त्याला कारणेही तशीच. शहरातील शाळा सर्व बाबतीत भौतिक सुविधांनी सुसज्ज होत्या आणि शाळेतील शिक्षकांबाबतही त्यांच्या मनात ज्ञानदानाबाबत शंका होत्या. परंतु अशा प्रतिकूल परिस्थितीतही आम्ही संकल्प केला. इतर शाळांना भेटी देऊन काय काय करता येईल की त्यामुळे आमची शाळा आदर्श शाळा म्हणून ओळखली जाईल.




### गावातील १०० टक्के मुले गावातील शाळेतच शिकली पाहिजेत

आम्ही शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक संघ यांची सभा आयोजित केली. त्यात शाळेला रंगकाम, गळक्या खोल्यांची दुरुस्ती इतर भौतिक सुविधांबाबत चर्चा केली. चर्चेनंतर सर्व गावातील सधन लोकांना भेटण्याचे ठरले आणि त्यातून मार्ग सापडला. आम्हास सर्वच गावकऱ्यांनी

मदत देऊन सर्व खोल्यांची, शौचालयाची दुरुस्ती करण्यात आली व शेवटी वर्गखोल्यांना रंगकाम करून सर्व भिंती बोलक्या करण्यात आल्या. आमची शाळा सुंदर शाळा दिसू लागली. पण मुलांचे काय हा खरा प्रश्नच होता. बऱ्याच पालकांची जि. प. शाळांविषयी ज्ञानदानाच्या बाबतीत शंकाच होती. परंतु आम्ही पालकांना गुणवत्तेची हमी दिली. १५ ते २० टक्के पालकांनी आमच्यावर विश्वास ठेवून त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रवास आमच्यावर सोपविला आणि आम्हा शिक्षकांसाठी तोच प्रवास वरदान ठरला.

आज आमच्या शाळेत परिसरातील घुसर्डी–पासर्डी, सांगवी, वडगाव, नगरदेवळा, भडगाव व जामनेर येथून विद्यार्थी प्रवेशासाठी येतात. आमच्या शाळेचे आवार भरलेले पाहून आम्हा शिक्षकांना मनस्वी आनंद होतो. आमची शाळा परिसरातीलच नव्हे तर जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थी घडवणारी शाळा म्हणून ओळखली जाते. शिक्षक, पालक व विद्यार्थी यांचा सुरेख त्रिवेणी संगम पाहावयास मिळतो. बघता बघता आज रोजी शाळेचा पटसंख्येचा आलेखही चढता होत गेला. सन २०१८ या वर्षी ५० पटसंख्या होती तर आज ती १२५ पर्यंत वाढत गेली व भविष्यातही हा आलेख वाढता ठेवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आज रोजी तीन शिक्षक कार्यरत आहेत.

**शाळेत राबविले जाणारे उपक्रम – आदर्श परिपाठ**



आदर्श व सुंदर परिपाठ हा आमच्या शाळेचा आरसा आहे. परिपाठात प्रत्येक वर्गाचा सहभाग घेऊन त्यात नवनवीन प्रार्थना, समूहगीते, बोधकथा अशा अनेक घटकांचा समावेश असलेला मूल्याशिक्षणाधारीत संगीतमय परिपाठ सादर करण्यात येतो. विद्यार्थी परिपाठ व कवायतीचे सूत्रसंचालन करतात.

**सहशालेय उपक्रमातून व्यक्तिमत्त्व विकास**

गाव हाच विश्वाचा नकाशा! गावावरून देशाची परीक्षा या उक्तीतून गाव व गावातील कार्यक्रम, शालेय कार्यक्रम, थोर पुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथी साजरी करणे, मुलांचे वाढदिवस साजरे करणे, बालआनंद मेळावा आयोजित करणे व २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या प्रसंगाने सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. त्याबरोबरच आपला सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा जपण्याचा प्रयत्न केला जातो. नाट्य, नृत्य, गायन, अभिनय अशा विविध कौशल्यांचे सादरीकरण केले जाते. अनेक उपक्रमांत पालकही उत्साहाने मुलांची तयारी करून घेतात. तसेच कार्यक्रमांसाठी आवश्यक ते सहकार्यही करतात.

**सहली, क्षेत्रभेटी व वनभोजन**

आमच्या शाळेत दरवर्षी क्षेत्रभेटींचे आयोजन केले जाते. भौगोलिक, ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे जसे – प्राचीन लेण्या, किल्ले, हेमाडपंथी मंदिरे इ. ना भेटी दिल्या जातात. तसेच परिसरातील निसर्गरम्य ठिकाणे, टेकडी, शेत इ. ठिकाणी वनभोजनाचे आयोजन केले जाते. त्यातून आनंददायी वातावरणात विविध बाबींचे ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जाते व शाळेविषयी आवड निर्माण केली जाते.

**कृतियुक्त शिक्षणावर भर**

विद्यार्थी हा शिक्षणप्रक्रियेचा केंद्रबिंदू मानून या प्रक्रियेत त्यांच्या कृतियुक्त सहभागाला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. त्यासाठी आम्ही अध्यापनात गणित पेटी व भाषा पेटी तसेच स्वनिर्मित शैक्षणिक साहित्याचा विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर उंचावण्यासाठी वापर करतो.

### डिजिटल लर्निंग

आमच्या शाळेतील इ. १ ली ते ५ वी च्या ग्रामीण भागातील मुलांना इंग्रजी माध्यमाच्या बरोबरीने शिक्षण मिळावे म्हणून शाळेतील उपलब्ध शैक्षणिक साधने कॉम्प्युटर, प्रोजेक्टर इ. मोबाईलच्या साहाय्याने जोडून नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून शाळेतच डिजिटल लर्निंग सुरू केले. विविध शैक्षणिक ॲप्सचा वापर करून ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहोत.

तसेच व्हर्च्युअल क्लासरूम द्वारे विद्यार्थ्यांना वर्गातच अनुभव दिला जातो. जंगल सफर, तारांगण, सूर्यमाला आदींची सफर घडविली. यातून विद्यार्थ्यांना खूप आनंद झाला.

### स्पर्धा परीक्षेतील घवघवीत यश




शिक्षण ही एक काळाची गरज आहे. या स्पर्धेच्या युगात टिकून राहायचे असेल तर उलम, दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण बालपणापासूनच मिळणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना दररोज नवीन काहीतरी देणे गरजेचे आहे व त्यासाठी शिक्षकालाही अपडेट राहणे गरजेचे आहे. त्यासाठी शाळेच्या विकासात भर घालणारी शिक्षक मंडळी श्री. साहेबराव चौधरी सरांच्या मार्गदर्शनाने शाळेचा नावलौकिक वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. सन २०२०-२१ या वर्षापासून शाळेतील विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालय भुसावळ येथे निवड होत आहे.

तसेच राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा, एम्.टी.एस्. अशा स्पर्धापरीक्षांमधून अनेक विद्यार्थ्यांनी जिल्ह्याच्या व राज्याच्या गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांकांना येऊन शाळेचा बहुमान वाढविला आहे. दरवर्षी विद्यार्थी असा सन्मान शाळेस मिळवून देतात. ही आमच्या शाळेसाठी अतिशय अभिमानाची बाब आहे. शाळेस '३६५ दिवस चालणारी शाळा' हा बहुमान मिळवून देण्यात शाळेतील श्री. साहेबराव चौधरी सरांचे योगदान फारच मोलाचे आहे. इ. ५ वी साठी शाळेत सरांकडून स्कॉलरशीप व नवोदयसाठी विशेष तासिका घेण्यात येतात. या सर्व कठोर मेहनतीचे फळ म्हणजेच शालेय गुणवत्तेचा वाढता आलेख होय. अशा रितीने गुणवंत विद्यार्थी घडत आहेत व शाळेची उत्तरोत्तर प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे. त्यासाठी आम्ही सर्व शिक्षक वेळोवेळी वरिष्ठांचे मार्गदर्शन घेत असतो.

### माजी विद्यार्थी मार्गदर्शन व प्रेरणा

या शाळेतील अनेक विद्यार्थी शिकून उच्चपदावर विराजमान आहेत. ते गावी आल्यावर शाळेत येऊन आम्हास व विद्यार्थ्यांना प्रेरणा देतात. मार्गदर्शन करतात. त्यामुळे आमच्यात नवचैतन्य प्राप्त होते. मरगळ दूर होते. आमची मराठी माध्यमाची शाळा असूनही परिसरातील नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांशी स्पर्धा करीत आहे. अनेक विद्यार्थी इंग्रजी माध्यमातील आमच्या शाळेत येत आहेत. आज म्हणावेसे वाटते,

'इवलेसे रोप लावियले द्वारी, तयाचा वेलू गेला गगनावरी.'

मुख्याध्यापक : श्री. भिकन श्रावण अहिरे, संपर्क : ९४२१६ ३५६१३

# १०. एकाग्रता यशो बिजम्



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खलाणे, ता. शिंदखेडा, जि. धुळे**

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य शाळा म्हणून नावारुपास आलेली जिल्हा परिषद मराठी शाळा खलाणे केन्द्र कलमाडी ता. शिंदखेडा जि. धुळे. या शाळेची स्थापना स्वातंत्र्यपूर्व सन १९०६ साली झालेली आहे .परंतु अलीकडे खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढल्याने गावातून दाखल पात्र अनेक मुले गावाशेजारील मोठ्या शहरांकडे इंग्रजी माध्यमात दाखल करण्याचा पालकांचा ओढा अलीकडे वाढलेला होता.

**पालकांना दिली गुणवत्तेची हमी**

सन २०१८ मध्ये फेब्रुवारी महिन्यापासूनच जेव्हा दाखल पात्र विद्यार्थ्यांचा शोध घेत आम्ही गावामध्ये फिरलो. पालकांशी संवाद साधला. इंग्रजी माध्यमाच्या शाळांसारखी जाहिरातबाजी केली. पत्रके छापून घरोघरी वाटले. आमच्या शाळेची वैशिष्ट्ये व आमच्या शाळेची गुणवत्ता याविषयीचे हमी देणारे मोठे 'बॅनर' गावाच्या दर्शनी भागात प्रदर्शित करण्यात आले. जेणेकरून बाहेरगावी शिकायला जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा ओढा मराठी शाळेकडे वाढेल व गावातील प्रत्येक मूल आपल्या गावातील शाळेतच शिकेल, असा उद्देश होता. सन २०१८ पासून १५ मार्च रोजी इयत्ता पहिलीचा वर्ग आता दरवर्षी नियमितपणे मुलांना दाखल करून सुरू होतो. पालकांना आम्ही हमी दिली की, जर दि. १५ मार्च ते दि. १ मे दरम्यान आपले मूल आमच्या शाळेमध्ये रमले, त्याची गुणवत्ता किंवा त्याच्या वर्तनात इष्ट बदल झालेले आढळून आले तरच आमच्या शाळेत पाठवा अन्यथा तुम्ही तुमच्या मुलाला इतरत्र पाठवू शकता, अशा प्रकारे पालकांशी संवाद साधत १५ मार्च रोजी पहिलीचा वर्ग सुरू झाला. वृत्तपत्रातून व सोशल मीडियातून प्रसिद्धी दिली त्यातून जिल्हाभरात १५ मार्च रोजी इयत्ता पहिलीचा वर्ग नियमितपणे सुरू करणारी शाळा म्हणून आमच्या शाळेकडे पाहिले जाऊ लागले.

पालकांच्या मागणीनुसार वरिष्ठांकडे पाठपुरावा करून अशा प्रकारे जून २०१८ पासून सेमी इंग्रजीचे वर्ग सुरू केले. आज आमच्या शाळेतील प्रत्येक तुकडी सेमी इंग्रजी वर्गाची आहे. आम्ही पालकांना अभिमानाने सांगितले की तुमच्या मुलांना आपल्या शाळेतच सेमी इंग्रजी माध्यमातून उत्तम प्रकारचे शिक्षण आम्ही देत आहोत. २०१८ मध्ये दोंडाईचा, चिमठाणे, सोनगीर, नरडाणे इत्यादी ठिकाणांहून येणाऱ्या स्कूल बसेस व गावातून जाणारे विद्यार्थी यांची आज रोजी संख्या शून्य झाली आहे. २०१८ मध्ये २८ विद्यार्थी एकाच वर्षी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून आमच्या शाळेत दाखल झाले. दरवर्षी हा ओढा वाढतो आहे .आज गावातील एकही दाखल पात्र

विद्यार्थी बाहेरगावी शिकण्यास जात नाही. नवीन प्रवेशित पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वर्गखोली व उपक्रमशील शिक्षकांची निवड केली आहे. मार्च ते एप्रिल अखेरपर्यंत शिक्षकांसोबत ते मजा करतात.

**श्यामची आई संस्कार कथामाला**

आम्ही २४ डिसेंबर २०१८ पासून साने गुरुजी जयंती निमित्त 'श्यामची आई कथामाला' सुरू केली आहे. यात परिपाठात प्रत्येक शिक्षकाने 'श्यामची आई' या पुस्तकातील एक कथा रोज सांगायची असते. कथा सांगताना अनेक संवेदनशील प्रसंग निर्माण झाले कधी विद्यार्थ्यांना रडू कोसळते तर कधी शिक्षकांना गहिवरून येते. या श्यामची आई कथामालिकेतून आम्हा शिक्षकांना व विद्यार्थ्यांना संस्कारांची जणू शिदोरीच मिळाली.

**ग्रेट भेट**

या सदराखाली आमच्या शाळेत प्रत्येक महिन्याचा एक शनिवार याप्रमाणे वर्षभर समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती त्यात व्यवसायिक, समाजसेवक, उद्योगपती व नावाजलेले अधिकारी, डॉक्टर, इंजिनियर, वकील पीएसआय, इत्यादी आदर्श व्यक्ती यांना आमंत्रित केले जाते. विद्यार्थी त्यांना प्रश्न विचारतात व ग्रेटभेट उपक्रमांतर्गत आलेल्या व्यक्ती विद्यार्थ्यांच्या मुक्त प्रश्नांना दिलखुलासपणे उत्तरे देतात. यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात विविध अंगांनी भर पडत असते. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागतो.

**बालतरंग गॅदरिंग**

आमच्या शाळेत दरवर्षी उत्साहात सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. यात प्रत्येक वर्गशिक्षक आपल्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग होईल असा प्रयत्न करतात. महाराष्ट्राची लोकधारा, संस्कृती इत्यादी विषयांवर आधारित गीते, नाट्य, अभिनय या कला सादर केल्या जातात. या बालतरंग महोत्सवात रात्रीच्या वेळी सुमारे पाच ते सहा हजार ग्रामस्थ कार्यक्रमास उपस्थित असतात म्हणून गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी गावातील होतकरू युवकांची स्वयंसेवक म्हणून मदत घेतली जाते. यावेळी मुले सर्वांची मने जिंकून घेतात. त्यामुळे आनंदी झालेल्या ग्रामस्थांकडून मुलांना रोख बक्षिसे मिळतात.

**गुणगौरव समारंभ**

शैक्षणिक वर्षात वर्षभर विद्यार्थी विविध उपक्रमात सहभागी होतात. विद्यार्थ्यांना मिळालेल्या बक्षीस रकमेतून मानचिन्हे, प्रशस्ती पत्रक व शालेय उपयोगी साहित्य खरेदी करून मान्यवरांच्या हस्ते पालकांच्या उपस्थितीत देण्यात येते. यामुळे विद्यार्थ्यांचा विविध कार्यक्रमात सहभागी होण्याचा उत्साह वाढतो. गावातील सुखदु:खाच्या प्रसंगी आम्ही शिक्षकसुद्धा सामाजिक बांधिलकी जपत ग्रामस्थांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असतो.



**सहली क्षेत्रभेटी वनभोजन**

आमच्या शाळेत दरवर्षी डिसेंबर महिन्यात क्षेत्रभेटीचे आयोजन केले जाते. भौगोलिक ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांना भेटी दिल्या जातात. तसेच सूतगिरणी, विमानतळ व जलशुद्धीकरण केंद्र बाबळे, एमआयडीसी, वाघोदे क्रांतिस्मारक, पेडकाई देवी इत्यादी ठिकाणी क्षेत्रभेटींचे आयोजन करून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाशी निगडित घटकांचे अप्रत्यक्षपणे ज्ञान देण्यात येते.

**ब्लॉग, फेसबुक पेज, युट्युब चॅनेल**

'माझी सुंदर शाळा : खलाणे' या नावाने आम्ही 'ब्लॉग' निर्मिती केली आहे. तसेच याच नावाने फेसबुक पेज व युट्युब चॅनेल सुद्धा सुरू केले आहे. या सर्व मिडियाच्या माध्यमातून आमची शाळा आज आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचली आहे. या मिडियाच्या माध्यमातून आम्ही आमच्या शाळेचे उपक्रम सर्वत्र पोहोचवतो. आजवर या चॅनेलला अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या आहेत व सकारात्मक प्रतिक्रिया आम्हाला मिळाल्या आहेत.

**रेफ्रिजरेटर सुविधा असलेली जिल्ह्यातील पहिली शाळा**

आमच्या खलाणे गावातील शाळा व्यवस्थापन समिती व आम्ही सर्व शिक्षकांनी मिळून लोकसहभागातून शाळेच्या माध्यान्ह भोजन योजनेतील हिरवा भाजीपाला, फळे इत्यादी ठेवण्यासाठी १७५०० रुपये किंमतीचे रेफ्रिजरेटर खरेदी केले आहे.

**आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्वच्छतागृह**

शाळेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्वच्छतागृह मुलामुलींसाठी स्वतंत्र व्यवस्था व सुसज्ज वॉश बेसिन टॉयलेट फ्रेश रूम इत्यादी

सुविधांसह स्वच्छतागृह नाशिक येथील 'इ अँड जी' फाउंडेशन या संस्थेमार्फत व जिल्हा परिषद धुळे यांच्या सहभागाने बांधून देण्यात आले आहे. स्वच्छतेच्या सवयी अंगी बाणाव्यात म्हणून परिपाठाच्या वेळी स्वच्छ नीटनेटकेपणाने आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. यामुळे स्वच्छतेच्या सवयी मुलांच्या अंगवळणी पडल्या आहेत.

आबासाहेब जाधव प्रतिष्ठान, नगाव या संस्थेमार्फत शाळेला देणगी स्वरूपात डायस मिळाला आहे. त्याचा वापर शाळेच्या सर्वच कार्यक्रमात व्यासपीठावर करता येतो. विद्यार्थ्यांना दररोजच्या परिपाठात देखील व्यासपीठावर बोलण्याचे धाडस यानिमित्ताने प्राप्त होते. रोटरी क्लब ऑफ इंडिया शिंदखेडा शाखेमार्फत विद्यार्थ्यांना शुद्ध व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय करून देण्यात आली आहे. त्याकरिता ॲक्वागार्डचा प्लॅन व एक टाकी बसवून दिली आहे. आज विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पाणी प्यायला मिळते. गावातील सूज्ञ पालकांनी मिळून सर्व विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतीचे ओळखपत्र तयार करून दिले आहेत.

रूहानी मानव केंद्र दोंडाईचा यांच्यामार्फत स्कूल बॅग व प्रती विद्यार्थी पाचशे रुपयांचे लेखन साहित्य असे शाळेतील एकूण २७४ विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. शाळेची प्रगती व विविध उपक्रमांची माहिती आम्ही प्रसिद्धी माध्यमांतून सर्वापर्यंत पोहोचवतो. यामुळे शाळेला विविध संस्थांद्वारा भेटवस्तू मिळू लागल्या आहेत. खलाणे गावातीलच एका फॅक्टरीचे मालक नितीनजी देसले यांनी कोरोनाच्या काळात विद्यार्थी व शिक्षकांच्या काळजीपोटी 'ऑटोमॅटिक सॅनिटायझर मशीन' दिले आहे. त्याचा वापर आम्ही आता सध्या नियमितपणे करतो आहोत.

**आकाशवाणी सादरीकरण**



शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन आकाशवाणी केंद्र, धुळे याठिकाणी सण समारंभाचे औचित्य साधून सादरीकरण होत असते. त्यासाठी आमचे शिक्षक नेहमी तत्पर असतात उदा. महिला मेळावा, रक्षाबंधन इ.

**संगीतमय परिपाठ व कवायत**

नेमून दिलेले विद्यार्थी दररोज वर्गवार संगीतमय परिपाठ स्वयंस्फूर्तीने सादर करतात. यात नवनवीन प्रार्थना, कृतिगीते, समूह गीते असतात. तसेच सामान्यज्ञानाची माहिती म्हणजे विद्यार्थ्यांसाठी खजिनाच असतो. विद्यार्थी परिपाठाचे व कवायतीचे सूत्रसंचालन करतात त्यामुळे शाळेचा संगीतमय परिपाठ व शनिवारची कवायत हा उल्लेखनीय उपक्रम ठरतो.

**सोलर शाळा दूरदर्शन वाहिनीवर**

यावर्षी आमच्या शाळेला रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, मुंबई कडून सोलर किट प्रदान करण्यात आले आहे. शाळेची वैशिष्ट्ये व उपक्रम पाहून दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीने दखल घेत शाळेचे वृत्त राज्यभर प्रसारित केले. स्थानिक चॅनेल्सने देखील शाळेच्या कामकाजाचे इतिवृत्त मीडियाच्या माध्यमातून धुळे, नंदुरबार व जळगाव या तीन जिल्ह्यांमध्ये प्रसारित केले.

**कला दालन**

या कलादालनात माइक, लाऊड स्पीकर, साऊंड सिस्टीम, हार्मोनियम, तबला, बासरी, तुतारी, नाल, ढोल, तडतडे, खुळे, झांज खंजिरी व इतर संगीत वाद्य उपलब्ध करून दिले आहे. विद्यार्थी आपल्या आवडीप्रमाणे या साहित्याचा नियमित वापर करतात. विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात पुरेशी संधी मिळावी हा कलादालनाचा उद्देश आहे. आमचे शिक्षक देखील कला विषय शिकवताना वेळोवेळी या साहित्याचा वापर करतात. जीवनात आत्मविश्वासाने वावरता यावे असे बळ विद्यार्थ्यांच्या पंखांना मिळावे म्हणून विविध उपक्रम आम्ही आनंदाने राबवत असतो.

**निरोप समारंभ**

आमच्या शाळेतील अखेरचा वर्ग असल्याने चौथीच्या वर्गाचा निरोप समारंभ हा अतिशय संवेदनशील कार्यक्रम आमच्या शाळेत होतो. आम्ही वार्षिक परीक्षेनंतर लगेचच निरोप समारंभाचे आयोजन करतो. पालक, शाळाव्यवस्थापन समिती, विद्यार्थी आम्ही सर्वजण यात सहभागी होतो. विद्यार्थी मनोगत व्यक्त करतात व शिक्षकही जीवन जगण्याची कला या विषयावर मार्गदर्शन करतात. विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन दिले जाते. विद्यार्थीही शाळेसाठी भेटवस्तू देतात. शिक्षक व पालकांसाठी अभ्यासदौरे आयोजित केले जातात. परिपाठात सामान्यज्ञानावर आधारित प्रश्न विद्यार्थ्यांना विचारले जातात. यात अग्रेसर ठरणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान केला जातो.

मुख्याध्यापक : श्री. चंद्रकांत पुंडलिक डिगराळे, संपर्क : ९४०३७ २५९१६

# ११. सातपुड्यातील उलगुलान




**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काल्लेखेतपाडा, ता. धडगाव, जि. नंदूरबार**

काल्लेखेतपाडा हा पाडा गुगलवर शोधणे तसे कठीणच! प्रगल्भ समाज, सुशिक्षित जीवनशैली, उच्च राहणीमानापासून दूर सातपुडा डोंगररांगेत धडगाव तालुक्यातील दुर्गम असा एक आदिवासी पाडा ! जेमतेम ५० - ६० घरांच्या या पाड्यावर ३२८ च्या आसपास लोकवस्ती आहे. विरळ लोकवस्ती, उंच उंच टेकड्या, नदी नाले, या सर्वांवर मात करत आपली संस्कृती, सण– उत्सव साजरे करणारा निसर्गपूजक असा हा आदिवासी समाज! कोणत्याही प्रकारचा शैक्षणिक वारसा नसलेल्या या पाड्यावर आज २२८ मुले शिक्षण घेत आहेत.

सन २००१ मध्ये काल्लेखेतपाडा या वस्तीशाळेची स्थापना झाली. २००८ मध्ये या शाळेचे वस्तीशाळेतून जिल्हा परिषद शाळेत रुपांतर करण्यात आले. २००८-०९ मध्ये शाळेची पटसंख्या जेमतेम १४ होती. दुर्गम आदिवासी पाड्यावर जिथे मुलांना टिकवून ठेवणे कठीण तिथे मुलांना घरात, पाड्यावर गावात अभ्यासासाठी सकारात्मक दिशा देण्याचे ठरले. अठरा विश्व दारिद्र्य, शिक्षणाचे महत्व न पटलेल्या समाजासोबत काम करणे हेच खरे काम होय. हे जाणून 'भविष्य उद्याचे इथेच किलबिलते' या शाळेने दिलेल्या ब्रीदवाक्याच्या ध्येयाने आम्ही कामास सुरवात झाली.

पालक संपर्क, समाज संपर्क, स्थानिक कार्यक्रमात सहभाग नोंदवणे, सुख दुखात सहभागी होऊन पालक जनजागृती करण्याचे काम केले. अनेक उपक्रम राबवत गुणवत्तेच्या दिशेने एकेक पाऊल टाकायला सुरुवात केली आणि बघता बघता उपक्रमशील शाळा म्हणून नावलौकिक वाढायला सुरुवात झाली.

**अभ्यास कोपरा**

दरवर्षी प्रत्येक मुलाचा अध्ययन स्तर निश्चित करून पालक मेळावा आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत पालकासमोर मांडला जातो. अध्ययन स्तर वाढविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे उपक्रम म्हणजे शाळेने सुरु केलेले अभ्यास कोपरा हा उपक्रम होय. काल्लेखेतपाडा या शाळेत शिकणाऱ्या २२८ मुलांच्या घरी अभ्यास कोपरे तयार करण्यात आले. दोन तीन महिने अथक मेहनत करून दुर्गम, अतिदुर्गम, विरळ लोकवस्तीच्या या पाड्यावर प्रत्येक मुलाच्या घरी जाऊन शाळा सुटल्यानंतर, सुट्टीच्या दिवशी दिवसभर शाळेच्या सर्व शिक्षकांनी घरोघरी फिरून कुडाच्या घरात शिक्षणाचे ज्ञानमंदिर सजवण्यास सुरुवात केली.

पुढच्या आठवड्यात जे घटक शिकवले जाणार आहेत ते अभ्यास कोपऱ्यात चिटकवून पालकांचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला. पालकांमध्ये शिक्षकांच्या शाळेच्या वेळेनंतर दिलेल्या वेळेची व धडपडीची चर्चा होऊ लागली.

### अभ्यास गट

काही मुले अजूनही अध्ययन स्तरात का मागे आहेत याचा विचार केल्यानंतर घरी विजेची गैरसोय, बसण्यासाठी जागा नाही, घरी अभ्यास घेणारे कोणी नाही या समस्या समोर आल्या. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी शाळेने इयत्ता पहिली ते आठवीच्या मुलांचे पाडानिहाय अभ्यास गट निर्माण केले. २२८ मुलांचे १६ गट तयार करण्यात आले. सुरुवातीला पावसाळ्यात अडचणी खूप येत होत्या. गटामुळे मुलांची होणारी प्रगती लक्षात घेता पालक स्वतःहून रात्री ६ ते ९ वाजेपर्यंत अभ्यास गटात आपल्या पाल्याला सोडण्यासाठी धडपड करू लागले. या प्रत्येक गटामध्ये वर्गमित्र व विषय मित्र संकल्पना राबविण्यात आली. आधी अर्धा तास आपल्या वर्ग मित्राबरोबर अभ्यास नंतर जो गटातला गणित, इंग्रजी, भाषा विषयात हुशार असेल त्याच्यासोबत बसून घटक समजून घेणे. यात वर्गाचे बंधन ठेवण्यात आले नव्हते. प्रत्येक गटामध्ये प्रश्ननिर्मिती कौशल्य वाढविण्यासाठी स्पर्धा लावण्यात आली. गटात सामाजिक, शैक्षणिक, मानसिक गप्पा, चर्चा होऊ लागल्या. प्रत्येक गटामध्ये दर शनिवार–रविवार व्यसनमुक्ती, आरोग्य, स्वच्छता, साक्षरता, समाजातले प्रश्न या सारख्या विषयांवर गटागटामध्ये पथनाट्य बसवण्याची चुरस, उत्साह व स्पर्धा निर्माण झाली. स्वतः मुले पथनाट्य विषय निवडून व्यासपीठावर सादर करू लागली. मुलांचा समाजाकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोन तयार झाला. नवनिर्मितीस चालना मिळाली.

### उलगुलान ओटलु (बारीपाड्याची अभ्यास कुटी)

जि. प. शाळा काल्लेखेतपाडा येथे बारीपाडा या पाड्यावरून रोज तीन ते चार किमी ३३ मुले पायी येत आणि पुन्हा परत जाऊन अभ्यास करण्यासाठी त्यांना अनेक अडचणी यायच्या. बाकीच्या गटांप्रमाणे आपल्याही पाड्यावर मुलांना अभ्यासाचे गट असावे असा विचार करून बारीपाड्याच्या पालकांनी आपल्या मुलांच्या अभ्यासासाठी अभ्यास कुटी बांधली. एका दुर्गम भागातल्या पालकाने शिक्षणासाठी केलेली धडपड केवळ शब्दांत वर्णन करणे कठीणच! लांब घरे, विरळ लोकवस्तीच्या या पाड्याने आपल्या कल्पकतेने ही अभ्यास झोपडी नुसती बांधलीच नाही तर अनेक पिढ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात राहून आपण शिकलो नाही, पण आपल्या पुढच्या पिढीने शिकलंच पाहिजे हा हेतू म्हणजे आदिवासी पालकांनी केलेले उलगुलान होते. उलगुलान म्हणजे क्रांती. म्हणूनच उलगुलान ओटलु म्हणजे शिक्षणाच्या क्रांतीचा कट्टा होय.

### रस्ता नको वर्गखोली हवी

शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता नसल्याने मुलांना वेड्यावाकड्या पायवाटेने शाळेत पोहचावे लागते. पाड्यासाठी रस्ता मंजूर झाला होता परंतु पाड्यातल्या लोकांनी आम्हाला रस्ता नको पण शाळेला वर्गखोली हवी अशी मागणी ग्रामपंचायतकडे केली. रस्त्यासाठी प्राप्त झालेला निधी पालक, ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती, विद्यार्थी यांच्या शिक्षणाप्रती असलेल्या सजगतेमुळे रस्त्याच्या ऐवजी शाळेला वर्गखोली बांधण्यासाठी वापरण्यात आला. एका आदिवासी पाड्यावरील लोकांनी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी उचलेले हे पाऊल हे सधन समाजाला सुद्धा मार्गदर्शक ठरावे असेच आहे. आम्ही असेच चालत राहू, पण आमच्या भावी पिढ्यांच्या शिक्षणासाठी राजमार्ग आम्ही स्वतःच तयार करू. हे पालकांचे विचार आमच्यासाठी निश्चितच प्रेरणादायी आहेत. ही ज्ञानकुटी अनेक पिढ्यांना दिशादर्शक ठरेल यात शंका नाही.

### टेकडी शाळा





कोरोनाच्या महामारीत संपूर्ण जग स्तब्ध असताना काल्लेखेतपाडा यातून नक्कीच वाचणार नव्हतं. संपूर्ण जगात ऑनलाईन शिक्षणाचा पाया रुजत होता, परंतु आमच्या २२८ पैकी वरच्या २० लोकांकडेही मोबाईल नव्हते. दुर्गम, विरळ लोकवस्ती असल्याने पहाडात रेंज समस्या आजही आहेच. डिजिटलायझेशन जगापासून अलिप्त असणाऱ्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी शाळेने शिक्षक आपल्या दारी उपक्रम हाती घेतला, परंतु मुले घरी सापडत नव्हती. म्हणून शाळेने जिथे मुले तिथे शाळा या संकल्पनेने टेकडी, नदी, डोंगर कपाऱ्यात शाळा सुरु केली. गटागटाने मुले जिथे असतील तिथे गुंडाळी फळा, खडू आणि खाण्याचा डबा घेऊन सातपुड्याच्या दऱ्या–खोऱ्यात शिक्षणाचा गंध दरवळत ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. यासाठी अनोखी टेकडी शाळा सुरु करण्यात आली. याची IBN लोकमत, All India Radio, लोकमत, सकाळ, पुण्यनगरी, लोकसत्ता, Times of India यासारख्या माध्यम समूहाने दखल घेतलेली आहे.

### World Education Week - 2020

सन २०२० कोरोनाच्या महामारीने ग्रासले असताना शाळेला एक अभूतपूर्व अनुभव मिळाला. ऑक्टोबर २०२० मध्ये जागतिक स्तरावरील शिक्षणासाठी काम करणाऱ्या T4 Education या संस्थेच्या दर्जेदार शिक्षण देणाऱ्या जगातल्या १०० शाळांच्या एका 'वर्ल्ड एज्युकेशन विक' या जागतिक शिक्षण परिषदेमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. डिजिटल युगापासून कोसो दूर असलेल्या एका आदिवासी पाड्याच्या शाळेला हा सन्मान मिळाला. हा सन्मान आमचा नसून संपूर्ण सातपुड्याचा होता. इथल्या रानपाखरांचा होता, इथल्या दऱ्या–खोऱ्यातून वाहणाऱ्या नद्या नाल्यांचा आणि दुर्गम भागातल्या मुलांच्या शिक्षणासाठी धडपडणाऱ्या असंख्य गुरुजनांचा होता.

**मेहनतीचे गोड फळ – पटसंख्या वाढ**

| वर्ष | एकूण विद्यार्थी |
|---|---|
| २०१६-२०१७ | ४० |
| २०१७-२०१८ | ७१ |
| २०१८-२०१९ | १०२ |
| २०१९-२०२० | १४० |
| २०२०-२०२१ | १७८ |
| २०२१-२०२२ | २२८ |



मागील ६ वर्षांपासून शाळेची पटसंख्या वेगाने वाढत आहे. आम्ही सर्व शिक्षकांनी केलेल्या कष्टाला विद्यार्थी संख्यावाढीचे गोड फळ लाभले आहे. हाच आम्हा सर्वांसाठी सर्वात मोठा पुरस्कार आहे, यामुळे चांगले काम केल्याचे समाधान लाभते आणि न थकता पुन्हा जोमाने काम करण्याची ओढ लागते.

काल्लेखेतपाडा या शाळेची पटसंख्या वर्षागणिक वाढतच आहे. केवळ संख्यात्मक वाढ अपेक्षित नसून गुणात्मक वाढ, दर्जेदार शिक्षण, उत्कृष्ट अध्ययन अनुभव देणे अत्यंत गरजेचे असते. शाळेच्या एकंदरीत प्रवासात पदाधिकारी, ग्रामस्थ, पालक व सर्व प्रशासकीय यंत्रणेचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले आहे.

मुख्याध्यापक : श्री. रूपेशकुमार दिगंबर नागलगावे, संपर्क : ९४२३८ ९३७०९




**जिल्हा परिषद केंद्रिय उच्च प्राथमिक शाळा सातारा, ता. औरंगाबाद, जि. औरंगाबाद**

मराठवाडा विभागाची राजधानी असलेल्या महाराष्ट्र राज्याच्या औरंगाबाद जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या सातारा गावातील जिल्हा परीषद केंद्रिय उच्च प्राथमिक शाळा सातारा (खं) पंचायत समिती, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद शाळेची ज्ञानाची भरारी काय वर्णावी...

**डोंगराच्या कुशीत जि.प. शाळा सातारा, तेथे पाझरतो ज्ञानाचा अखंड झरा**

सातारा हे गाव औरंगाबाद तालुक्यातील डोंगरपायथ्याशी वसलेले असून शहरापासून ४ कि.मी. अंतरावर आहे. पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांनी जीर्णोद्धार केलेल्या श्रीक्षेत्र खंडोबा मंदिराचा धार्मिक वारसा लाभलेल्या परिसरात शाळा आहे. डोंगराच्या कुशीत निसर्गरम्य वातावरणात शाळेचा भव्य परिसर मनाला सुखावून जातो.

**ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते, त्या ज्ञानाचे मंदिर हे, सत्य शिवाहून सुंदर हे**

जिल्हा परिषद केंद्रिय उच्च प्राथमिक शाळा सातारा ही शाळा भारतातील पहिली जिल्हा परिषदेची आय.एस.ओ. मानांकन प्राप्त शाळा आहे. शाळेची स्थापना १९५० ची असून १५ शिक्षक कार्यरत आहेत. इयत्ता १ ली ते ८ वी मध्ये ६३२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्था समिती, प्रतिष्ठित नागरिक व पालक वर्ग यांनी अपार मेहनत घेतली आहे. गावकऱ्यांच्या मदतीने पालक सहभागातून शाळेमध्ये भरपूर सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. शाळेत गुणवत्तापूर्ण उपक्रम विद्यार्थ्यांसाठी घेतले जातात. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले जाते. ही शाळा औरंगाबाद जिल्ह्यामध्ये एक उपक्रमशील शाळा म्हणून ओळखली जाते.

शाळेतील शिक्षणाचा केंद्रबिंदू असलेल्या विद्यार्थ्यांना अविरत मार्गदर्शन करून त्यांच्या जीवनाला आकार देऊन त्यांना यशाची उत्तुंग भरारी घेण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. 'गुरूने दिला ज्ञानरूपी वसा' या उक्तीला सार्थ करून दाखवण्याचे कार्य येथील उपक्रमशील मुख्याध्यापक व शिक्षक हे करत आहेत. मुख्याध्यापिकांनी सन २००७ साली शाळेच्या विकासाची धुरा खांद्यावर घेत शाळेचा गुणवत्ता आलेख सातत्याने आजपर्यंत उंचावत नेला आहे. विद्यार्थी गुणवत्ता विकास ह्या एकाच ध्येयाने प्रेरीत झालेल्या मॅडमनी पालक, गावकरी व शिक्षक यांच्या मदतीने शाळेचा चेहरा–मोहरा बदलून शाळेचा कायापालटच केला.

२००७ साली असलेला शाळेचा १७६ चा पट ६३२ वर पोहोचलेला आहे. आदर्श शाळा,वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्वांगीण विकास व नितीमूल्यांची रूजवणूक करणारे शिक्षण देण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक व गावकरी यांनी विडा उचलत नियोजन बद्ध कार्यक्रम आखला. 'गाव करी ते राव काय करी' या म्हणीला सार्थ करीत शाळा व्यवस्थापन समिती व दानशूर नागरिक यांनी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून 'शाळा जुनीच पण ओळख नवी' या प्रमाणे शाळेची सर्व अद्ययावत सुविधांयुक्त इमारत तयार

केली आहे. डोंगराच्या कुशीत निसर्गरम्य वातावरणात शाळेची इमारत व शाळा परिसर भूषणच ठरत आहे.

शाळेतील अद्ययावत व्हर्च्युअल क्लास रूम, नावीन्यपूर्ण प्रयोग शाळा, मुलामुलींसाठी स्वतंत्र सच्छतागृह, रूम टू रीड, बालवाचनालय, वाईल्ड लाईफ कक्ष, खगोलशास्त्र कक्ष, नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ व परमवीर चक्र विजेते माहिती कक्ष, डेन्स फॉरेस्ट, शुद्ध पेय जल योजना, हॅण्डवॉश स्टेशन, पाण्याचा हौद, परसबाग, क्रीडांगण, खेळणी इ. भौतिक सुविधांनी शाळा परिपूर्ण झाली.

शाळेत राबविण्यात येणाऱ्या दर्जेदार व नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे गावात व पंचक्रोशीत शाळेचे नाव चर्चेत येत आहे. हल्ली इंग्रजी माध्यमांचे पेव फुटले असताना देखील पालकांना या शाळेत मुलांना प्रवेश घेण्यासंबंधी विश्वासार्हता निर्माण झाली आहे आणि पाहता पाहता शाळेच्या पटसंख्येचा आलेख उंचावत चालला आहे. तिमीरातूनी तेजाकडे जाण्यासाठी विद्यार्थी गुणवंत, ज्ञानवंत, नितीवंत घडविणे खऱ्या अर्थाने शाळेत सुरू झालेल्या विविध उपक्रमांतून निदर्शनास येऊ लागले शाळेची शिस्त, नियम पाळून छोटी मुले फुलांसारखी बहरत व ज्ञानाचे धडे घेत आहेत.

**बिन भिंतीची उघडी शाळा लाखो इथले गुरू। झाडे, वेली, पशु–पाखरे यांसी दोस्ती करू।।**

शालेय परिसरात पर्यावरणाची ओळख, महत्व आणि उपयोग करून देणारा (डेन्स फॉरेस्ट) प्रकल्प उभारण्यात आला असून ५२ प्रजातींच्या ७०० वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. तसेच शालेय परिसरात अनेक प्रकारची झाडे लावलेली असून त्यांच्या भोवती बांधलेल्या पारांवर पर्यावरण विषयक घोषवाक्य विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालतात अशा या निसर्गरम्य परिसरात विद्यार्थी दिवसभर आनंदवनासारखे मुक्त शिक्षण घेतात.

**झाडे हलवा, शब्द पाडा...... होय हे खरे आहे..!!**

विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी व स्वयंअध्ययन रूजवणुक करण्यासाठी शब्दांची चक्क झाडेच बनवली आहेत. विद्यार्थी गटात बसून शब्द ओळखतात, लिहीतात व वाचतात त्याचप्रमाणे भाषिक विकासासाठी 'शब्दकुंभ' विद्यार्थ्यांसाठी रोज तासिका निहाय खुला होतो. मराठी व इंग्रजी भाषा विकास होण्यासाठी हजारो शब्दपट्ट्या कुंभात विद्यार्थी स्वतः बनवून टाकतात 'विषयमित्र' संकल्पनेनुसार मिळून शिकतात यामधून त्यांचे भाषिक कौशल्य लेखन, व्याकरण वृद्धिंगत होते.

**'मी सुद्धा स्पर्शू शकतो आकाश, फक्त संधी मिळण्याचा अवकाश.....'**



विद्यार्थ्यांना अवकाशीय खगोलीय घटना माहित होण्यासाठी सदरील कक्षाची स्थापना शाळेत करण्यात आलेली आहे. या कक्षात आकाशगंगा, अवकाश यात्री, अवकाशयान, ग्रह, उपग्रह, तारे, सुर्यग्रहण, चंद्रग्रहण, पृथ्वीची आंतररचना, उल्कापात, चंद्राच्या कला, इत्यादींची माहिती व पोस्टर्स लावण्यात आलेले आहेत. विद्यार्थी सदरील कक्षामध्ये भौगोलिक अभ्यास करण्यासाठी जातात.

**जीवन में कोई काम अच्छा करें। वनों और वन्यजीवों की रक्षा करें।।**

शाळेमध्ये पर्यावरण संवर्धन व वन्यजीव संरक्षण माहिती व कायदा विषयक जनजागृतीसाठी वाईल्ड लाईफ क्लबची स्थापना करण्यात आलेली आहे. यामध्ये वन्यजीव संरक्षण कायदा, वन्यजीवांचे अधिवास, परिसंस्था व जैविक विविधता या संदर्भिय माहिती चित्र स्वरूपात दर्शविली आहे. विद्यार्थी सदरील कक्षामध्ये तासिका निहाय जाऊन माहिती मिळवितात.

'भारत हमको जान से प्यारा है

भारतीय सेनेचे जवान नेहमी कर्तव्याची जाण ठेवत दिवसरात्र आपल्या देशाची, देशाच्या नागरिकांची रक्षा करत असतात. देशावर कुठलेही संकट आले की जवान त्यांच्या समोर एक मजबूत भिंतीप्रमाणे उभे राहतात. ज्यांच्या शौर्याची कहाणी आपल्याला भारताच्या प्रत्येक घरात ऐकायला मिळते असे आपल्या भारतीय सेनेतील जवान खरेच खूप शूर आहेत. हे देशभक्तीचे मूल्य बालवयात रूजवण्यासाठी व जवानांच्या शौर्यकथांची माहिती मिळवण्यासाठी 'परमवीर चक्र विजेते माहिती कक्ष' शाळेत स्थापन केलेला आहे. विद्यार्थी नियमित शौर्य गाथांचे वाचन करतात.

विज्ञानाचा नवा ध्यास, विज्ञानाने देशाचा विकास

वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणामध्येच थोर शास्त्रज्ञ, संशोधक व त्यांची शोध विषयक माहिती साठी नावीन्यपूर्ण विज्ञान प्रयोगशाळा अद्ययावत साधनांसह उपलब्ध आहेत. या कक्षामध्ये जाऊन विद्यार्थी त्यांच्या आवडीप्रमाणे सातत्याने नवनवीन प्रयोग करत असतात.

मिशन IAS : मंजिल उन्हींको मिलती है, जिनके सपनों में जान होती है, पंख से कुछ नहीं होता, हौसलों से उड़ान होती है।




आजच्या स्पर्धेच्या युगात गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच स्पर्धापरीक्षेचीही तयारी होण्यासाठी विविध गुणवत्ता विषयक स्पर्धा घेतल्या जातात. शाळेव्यतिरिक्त वेळात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. जसे की शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय परीक्षा, एन.एम.एम.एस परीक्षा इ.

निरोगी मन, निरोगी शरीर

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबतच शारीरिक, मानसिक व भावनिक विकास साधण्यासाठी शाळेमध्ये क्रीडा साहित्यासह क्रीडांगण उपलब्ध आहे. विविध स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या क्रीडास्पर्धेत विद्यार्थी बीटस्तर, तालुका व जिल्हा स्तरावर चमकले आहेत.

माझी कला माझी कृती–कलादर्शन

विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी, अल्फाबेट रांगोळी, वैज्ञानिक रांगोळी, भौगोलिक रांगोळी, उपस्थिती ध्वज, मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा, गणित जत्रा, आनंदनगरी, पाककला स्पर्धा, स्नेहसंमेलन, चित्रकला स्पर्धा, नृत्य, गायन, भाषण, नाट्य, कविता सादरीकरण व निबंध स्पर्धा इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थी उत्स्फूर्तपणे आपल्या आवडीनुसार स्पर्धांमध्ये सहभागी होऊन यशस्वी होतात. उपक्रमशील, गुणवत्तापूर्ण निसर्गरम्य परिसरातील अशा या डिजीटल शाळेमध्ये शिक्षक, पालक, विद्यार्थी रमतात. चिमुकले आनंददायी शिक्षण घेतात. जिल्ह्यामध्ये नावारूपास आलेल्या या शाळेची यशोगाथा गेल्या दीड दशकापासून सर्वांच्या परिचयाची आहे. शैक्षणिक प्रगतीचा वाढता आलेख पाहता स्थानिक पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी, विविध संस्था, मा. मंत्री महोदय यांनी विशेष भेटी दिलेल्या आहेत. या सर्वांच्या प्रेरणेने शाळा विकासास प्रोत्साहन मिळाले आहे.

मुख्याध्यापिका : श्रीमती मंजुश्री दिगंबरराव राजगुरू, संपर्क: ९४२३३ ९७४४४

## १३. उपक्रमांची खाण, शाळा आमची छान




**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, जरेवाडी, ता. पाटोदा, जि. बीड**

देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहाळे। मांगल्याने गंधलेले सुंदराचे सोहळे।।

कवी बा.भ. बोरकरांच्या कवितेतील या सुप्रसिध्द ओळीचे यथार्थ वर्णन जर कुठे पहायला मिळत असेल तर त्याचे समर्पक जिवंत उदाहरण म्हणजे बीड जिल्ह्यातील जि.प. प्राथ. शाळा जरेवाडी. या शाळेतील हर एक कृती ही नावीन्याने, कल्पकतेने बहरलेली आहे. म्हणून शिक्षण क्षेत्रात काम करत असो वा नसो साऱ्यांसाठीच जरेवाडी शाळा पाहणे म्हणजे मांगल्याने सुगंधित झालेला सुंदर सोहळा अनुभवण्याचे एक स्थान आहे. २४ पटसंख्या, एक शिक्षक, पहिली ते चौथीपर्यंत एकच वर्ग खोली असणाऱ्या शाळेचे रुपांतर ८०६ विद्यार्थी, १८ शिक्षक व पहिली ते आठवीपर्यंत १८ वर्गखोल्यात भरणारी, उपक्रमांची खाण जरेवाडी शाळा.

बालाघाटाच्या कुशीत वसलेल्या जरेवाडीची लोकसंख्या अवघी ४०० आणि त्याच वाडीत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेची विद्यार्थीसंख्या आहे ८०६. त्यापैकी केवळ ५० विद्यार्थी जरेवाडी या गावातील आहेत. गावच्या लोकसंख्येपेक्षा शाळेची पटसंख्या जवळपास दुप्पट. लोकसंख्येपेक्षा शाळेची  पटसंख्या जास्त असणे हे कदाचित एकमेव उदाहरण असू शकेल. या शाळेत शिक्षणाचे धडे गिरवण्यासाठी सुमारे ५२ ते ५५ गावांतून विद्यार्थी येतात. खरं तर पट टिकवणे हे अनेक शाळांसमोरील आव्हान आहे परंतु जरेवाडी शाळेवर पालकांनी जो विश्वास दाखवला आहे, तो साऱ्या राज्यभरातील शाळांसाठी दिशादर्शक ठरेल. आज शाळेमध्ये इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या प्रत्येक वर्गाच्या दोन दोन तुकड्या आहेत. जून २०१० पासून सेमी माध्यम स्वीकारून, सन २०१५ पासून सर्वच वर्ग हे द्विभाषा (सेमी) माध्यमाचे करण्यात आले आहेत. याच शैक्षणिक दर्जामुळे जरेवाडी शाळेला कधी विद्यार्थी संख्येचा प्रश्न भेडसावला नाही.

**लोकसहभागातून शाळा**

डोंगरी भाग असल्याने सुरुवातीपासून शाळेसाठी जागेचा प्रश्न. पण गावकऱ्यांच्या अखंड साथीमुळे शाळेत आज एकूण १८ वर्गखोल्या, खेळाचे मैदान, भव्य डिजिटल हॉल आणि सुसज्ज अशी प्रयोगशाळा उपलब्ध आहे. दानशूर समाजाच्या सहभागाचे आदर्श उदाहरण म्हणजे जरेवाडी. शाळेने आजपर्यंत सुमारे ३० लक्षपेक्षा अधिक निधी समाज सहभागातून उभारला आहे. या समाज सहभागाच्या माध्यमातूनच शाळेमध्ये भरीव अशी कामे केली आहेत. पटसंख्येच्या तुलनेने कमी पडणाऱ्या वर्ग खोल्या, रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण, शाळेतील मुलांना शुध्द पिण्याचे पाणी मिळावे यासाठी वॉटर फिल्टर, परिपाठाच्या मैदानासह इतर भागात ब्लॉक्स, डिजिटल शैक्षणिक साहित्य, प्रत्येक वर्गात ॲन्ड्रॉईड, स्मार्ट टी.व्ही., एल.सी.डी प्रोजेक्टर आणि ८ कॉम्प्युटरने सुसज्ज अशी कॉम्प्युटर लॅब, विज्ञान साहित्याने भरलेली विज्ञान प्रयोगशाळा, साहित्य, सोलार विद्युत, शाळेतील प्रत्येक वर्गामध्ये साऊंड सिस्टीम आणि CCTV कॅमेरा, आकर्षक रंगकामासह बोलक्या भिंती अशी अनेक कामे शाळेने लोकसहभागातून केलेली आहेत. शासनाच्या मिळणाऱ्या निधीमध्ये स्वतःचा निधी टाकून कामाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्याचे काम येथील समाज सहभागाने केले आहे. या शाळेतील माजी विद्यार्थ्यांनी शाळेशी

जुळलेली नाळ कधीच तोडली नाही. शाळेतून शिक्षण घेऊन गेल्यानंतर सुध्दा शाळेचे माजी विद्यार्थी आणि शिक्षक सतत एकमेकांच्या संपर्कात असतात. अशा एकसंघ विचारातून माजी विद्यार्थ्यांनी शाळेला तब्बल दीड लक्ष रुपयांचा निधी स्मार्ट टि.व्ही. घेण्यासाठी उभा केला. यातून प्रत्येक वर्गात स्मार्ट टी.व्ही. बसविण्यात आलेले आहेत. अध्ययन अनुभव देताना दृक–श्राव्य साधनांची आवश्यकता असते ही गरज शाळेने माजी विद्यार्थ्यांच्या मदतीने पूर्ण केली आहे. अशा जरेवाडी प्रशालेने भौतिक सुविधांमध्ये पुरेशा प्रमाणात संपन्नता मिळवली आहे.

### परीक्षांमधील यश

जरेवाडी शाळेचे बाह्यांग जेवढे सुंदर आहे, तेवढेच तिचे अंतरंगही सुंदर आहे. शाळेत घेण्यात येणारे विविध उपक्रम, विविध स्पर्धेत शाळेने मिळवलेले यश, शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता या सर्व कारणांसाठी जरेवाडी शाळा संबंध महाराष्ट्राला ज्ञात आहे. आजपर्यंत ३५२ पेक्षा अधिक विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक बनलेले आहेत तर नवोदयसाठी २६ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. NMMS व स्कॉलरशिप अशा स्पर्धात्मक परीक्षाच्या निकालामध्ये नेहमीच जरेवाडी शाळेचा जिल्ह्यात प्रथम क्रमांक असतो. पुस्तकी ज्ञानासोबतच येथील विद्यार्थ्यांची राज्य क्रीडा स्पर्धा, राज्य विज्ञान प्रदर्शन, विभागीय नाट्य, विभागीय निबंध स्पर्धा तसेच जिल्हास्तरीय विविध स्पर्धांत कायम नावाजण्याजोगी व प्रभावी कामगिरी असते. स्काऊट–गाईड जिल्हा मेळाव्यात तर जरेवाडी शाळा कायम अव्वल स्थानावर असते. शाळेतील विद्यार्थ्यांसोबत गावातील नागरीकांच्या आरोग्य सुरक्षेबाबत शाळा नेहमीच सजग असते. शौचालय बांधकाम, शौचालयाचा वापर, मद्यपान, धुम्रपान त्यासोबत गावातील व्यसनमुक्ती करण्यासाठी शाळेला यश मिळालेले आहे. यासाठी शाळा नेहमीच कटिबद्ध असते.

### अनोखे वार्षिक स्नेहसंमेलन

शाळेचे सर्वात खास आकर्षण म्हणजे वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम. पालकांच्या सहभागातून उभारलेल्या भव्य रंगमंचावर होणाऱ्या या कार्यक्रमास जवळपास ७ ते ८ हजाराचा जनसमुदाय उपस्थित असतो. याच कार्यक्रमाच्या माध्यमातून शाळेला दोन लक्ष रुपयांपर्यंत बक्षीस रुपाने समाज सहभाग प्राप्त झाला आहे. शाळेत राबविला जाणारा आणखी एक सुंदर कार्यक्रम म्हणजे शिक्षणोत्सव. हा उपक्रम शाळेला शिक्षण जत्रेचे रुप देतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कला– गुणांना वाव मिळतो. विद्यार्थी शिक्षक यांच्या कल्पकतेतून एकूण ४० पेक्षा अधिक स्टॉल या शिक्षणोत्सवात असतात. विविध शालेय विषय, खाद्य पदार्थांपासून ते वैज्ञानिक संकल्पनांचे प्रयोग व प्रात्यक्षिक अशा विषयांवर आधारीत स्टॉल शिक्षणोत्सवात असतात. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती आणि विज्ञान जिज्ञासा जागृत होण्यास मदत होते.

### ज्ञानवर्धिनी

शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरामध्ये 'ज्ञानवर्धिनी' हे स्वलिखित हस्तलिखित गेल्या १५ वर्षांपासून प्रकाशित केले जाते. त्या सोबतच शाळेतील विद्यार्थ्यांच्या २५० स्वरचित कवितांचा काव्यसंग्रह शाळेने प्रकाशीत केला आहे. 'Each one, teach one', साप्ताहिक गुणवत्ता विकास परीक्षा, सामान्यज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धा, Maths Talent Search Exam, राष्ट्रीय सणानिमित्ताने घेण्यात येणारी 'कोण होईल ज्ञानवंत?' प्रज्ञाशोध परीक्षा, गणित समृध्दी उपक्रम, ज्ञानवाहक, गोष्ट विज्ञानाची, गणित–भाषा प्रयोगशाळा, गणितपेटी, वाचनपेटी, शैक्षणिक सहल, बचत बँक, दैनिक लेखन, उपस्थिती ध्वज, हस्ताक्षर सुधार प्रकल्प, भित्तीपत्रके, निबंध लेखन व वक्तृत्व स्पर्धा यांच्यामदतीने आनंददायी शिक्षण, अधिकच्या मार्गदर्शन तासिका, वाचन तासिका, कृतीयुक्त अध्ययन अध्यापन गट पध्दती अशा सर्व उपक्रमांमुळे जरेवाडी शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता एक पाऊल पुढे जात आहे.

### अभिनव उपक्रम

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेमध्ये आणखी काही उपक्रम हाती घेतलेले पहायला मिळतात. उदाहरणार्थ– हस्तकला विकासासाठी कलादालन, गायनाचा सराव करण्यासाठी म्युझिक स्टुडिओ, नावीण्यपूर्ण विज्ञान केंद्र यातून सुमारे २५० वैज्ञानिक संकल्पनांचे साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे. विज्ञान ग्रंथालय, तसेच वर्ग ग्रंथालय, मासिके, इंग्रजी वर्तमानपत्रे, राजू मीना मंच, योगाभ्यास, कन्यासुरक्षा, ग्रेट भेट, जरेवाडी कट्टा यातून अनेक मान्यवरांच्या मुलाखती विद्यार्थी घेतात. विद्यार्थ्यांना मुक्त व्यक्त होण्यासाठी कथा–कथन, चित्र रेखाटन, रंगभरण, वार्षिक हस्तकला प्रदर्शन अशा शाळास्तरावरील उपक्रमासोबत शासनाच्या वेगवेगळ्या उपक्रमामध्ये शाळेचा सक्रिय सहभाग नेहमीच प्रामाणिकपणे असतो. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र, शाळा सिध्दी, स्वच्छ विद्यालय पुरस्कार स्पर्धा, स्वच्छ गाव सुंदर गाव, हगणदारी मुक्त गाव, शिक्षणाची वारी अशा सर्वच शासकिय उपक्रमामध्ये शाळा अग्रेसर असते.

### स्थलांतर बंदी

ऊसतोड कामगारांचा जिल्हा बीड अशी ओळख असलेल्या जिल्ह्यात अनेक वर्षांपासून कारखान्यावर पालक स्थलांतर करताना अनेक विद्यार्थी बरोबर घेऊन जातात. जरेवाडी गावातील जवळपास ९०% लोक ऊस तोडणीसाठी स्थलांतर करतात. परंतू शाळेच्या उत्कृष्ट नियोजनामुळे गेल्या २२ वर्षांत एकाही विद्यार्थ्यांचे स्थलांतर होऊ दिले नाही. हे स्थलांतर रोखण्यासाठी सुरुवात प्रथम गावकऱ्यांच्या मदतीने केली. मुलांच्या जेवणाची सोय गावकऱ्यांनी केली. त्यानंतर मात्र गेली काही वर्षे शासनाच्या मदतीने हंगामी

वसतिगृह चालवून स्थलांतर रोखले. आता तर गेल्या दोन वर्षापासून वसतीगृह न चालवता स्थलांतर रोखण्यात शाळा व्यवस्थापन समितीला यश आले आहे.

### संगीतमय परीपाठ

जरेवाडी शाळेचा एक सर्वोत्कृष्ट उपक्रम म्हणजे संगीतमय परीपाठ. हा परिपाठ म्हणजे ज्ञानाचा खजिना होय. तासभर चालणाऱ्या या परिपाठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वाढीबरोबरच सर्वांगीण गुणवत्ता विकासाचे उद्दिष्ट साध्य होत असल्याचे आपणास पाहावयास मिळते. म्हणून शाळा पाहण्यासाठी येणारे पाहूणे परिपाठ पाहण्याचा हट्ट धरतात. 'परिपाठ पाहायचाय तर मग जरेवाडी चला' अशा शीर्षकाखाली वर्तमानपत्राने परिपाठासंबंधीचे लेख प्रकाशित केले आहे. यावरुन शाळेच्या परिपाठाची नाविण्यता समजते. नेतृत्वगुण, संकल्पवृत्ती, वक्तृत्व कौशल्य, समायोजन, प्रसंगावधान अशा अनेक कौशल्यांची रुजवणूक या परिपाठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांत होते. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे कार्य भरीव आणि कौतुकास्पद असेच आहे. शाळेसाठी दान देणे, शाळेमध्ये वेगवेगळ्या कामासाठी श्रमदान करणे, शाळेच्या भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी वस्तूरुपाने दान देणे, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सदैव तत्परता दाखवणे इत्यादी बाबी शाळा व्यवस्थापन समिती आणि गावकऱ्यांमार्फत पूर्ण केल्या आहेत. म्हणूनच लोकसंख्या कमी असून सुमारे तीस लक्ष रुपयांचा लोक सहभाग शाळा व्यवस्थापन समितीच्या क्रियाशीलतेमुळे मिळाला आहे.

### तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर




शाळेमध्ये शिक्षक आणि विद्यार्थी नवनवीन शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करतात. शाळेतील तुकडीनिहाय whatsapp Group, स्थापन केलेले असून त्यामाध्यमातून दैनंदिन दिलेला अभ्यास विद्यार्थी सोडवतात. तसेच online साप्ताहिक परीक्षाही देतात. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना skype च्या माध्यमातून विविध शिक्षणतज्ञ आणि प्रेरणादायी व्यक्तीशी संवाद घडवून आणला जातो. ज्या ठिकाणी आपणास प्रत्यक्ष भेट देणे शक्य होत नाही अशा ठिकाणींची माहिती व्हर्च्युअल ट्रीप च्या माध्यमातून दिली जाते. कोरोनाच्या कालावधीत देखील ऑनलाईन तासिका आणि गृहभेटींच्या माध्यमातून शिक्षण प्रक्रियेत शिक्षकांनी भरीव काम केले आहे. आज या शाळेत मुख्याध्यापकांच्या नेतृत्वाखाली सर्व शिक्षक टिम विद्यार्थ्यांच्या विविध पैलूंना आकार देण्याचे अविरतपणे कार्य करत आहे. शिक्षक आणि पालकांच्या अथक परिश्रमातून नावारुपास आलेली जरेवाडी शाळा ऊस तोडणी कामगारांच्या परिसरातील एक नावीन्यपूर्ण शाळा म्हणून उदयास आली आहे. सन १९६३ मध्ये स्थापन झालेल्या या शाळेत विविध उपक्रमांच्या माध्यमातून आणि लोकसहभागातून शासनाच्या सर्व योजना आणि उपक्रम यशस्वीपणे राबवून आम्ही गुणवत्ता आणि पटसंख्या वाढीमध्ये गेल्या दोन दशकांपासून चढता आलेख ठेवला आहे. शासकीय स्पर्धा परीक्षेतील शाळेची कामगिरी उत्कृष्ट आहे. बीड जिल्ह्यातील पहिली आयएसओ मानांकन प्राप्त आणि शाळा सिद्धी मध्ये अ दर्जा मानांकन प्राप्त झालेल्या या शाळेस राज्यातील अनेक अधिकारी, पदाधिकारी आणि शिक्षणप्रेमी नागरिकांनी, शिक्षकांनी भेट देऊन प्रेरणा घेतली आहे.

मुख्याध्यापक : श्री. गोविंद पांडूरंग कदम, संपर्क : ९४२१३ ४८४३१

# १४. सुख समृद्धीचा झरा, शिक्षण हाच मार्ग खरा




**जिल्हा परिषद प्रशाला परतूर ता. परतूर, जि. जालना**

मानवाच्या प्रगतीत सर्वात मोठी क्रांती कोणती झाली असेल तर ती शिक्षणाची व भाषेची, शिक्षणामुळे माणूस सुसंस्कारक्षम व संघटीत झाला. तसेच आपल्या न्याय हक्कासाठी लढू लागला, हे शक्य झाले ते केवळ शिक्षणामुळेच. शिक्षणामुळे प्रज्ञावंतांनी अनेक वैज्ञानिक व वैचारिक शोध लावून समाज एकसंघ केला. एकीचा मंत्र समाजाला देऊन प्रवाह खळखळत ठेवला.

शिक्षणामुळे प्रगतीचा मार्ग सुकर होतो हे आम्हाला शाहू, फुले, आंबेडकर यांनी सांगितले एवढेच नव्हे तर हा मार्ग सुकर व्हावा म्हणून शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली व ज्ञानाची गंगा खळखळत पार करत ग्रामीण जनतेच्या दारापर्यंत आणून ठेवली. ज्ञानाची ही जीवनदायिनी सतत वाहत आहे ती आजपर्यंत. या प्रवाहात असंख्य चिमणीपाखरं मनसोक्त डुंबली आहेत आणि आपली ज्ञानाची तहान शांत करून समाजाचे ऋण फेडण्यासाठी उंच आकाशात भरारी घेत आहेत. प्रज्ञावंताची ज्ञानाची खाण असलेली अशी आमची शाळा म्हणजे जि.प. प्रशाला परतूर विद्यालय होय. आमच्या शाळेची स्थापना सन १९४५ पासूनची असून इयत्ता १ ली ते १० वी चे ९८२ विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. शाळेत २७ शिक्षक अध्यापनाचे काम करत आहेत.

### उन्हाळी व दिवाळीच्या सुट्टीतील ज्यादा तासिकांमुळे विद्यार्थ्यांची उंच भरारी

या शाळेच्या माध्यमातून विविध क्षेत्रात मान्यवर मंडळी कार्यरत आहेत. शहराच्या राजकीय, सामाजिक क्रीडा क्षेत्रात शाळेचा मोठा नावलौकिक आहे. शाळेत आज सुद्धा ग्रामीण भागातून किमान १५ ते २० गावाहून मुले, मुली दररोज ये–जा करतात. एन.टी.एस., एन. एम.एम.एस. सारख्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी उन्हाळी व दिवाळी सुट्टीत अभ्यासाचे नियोजन करण्यात येते व त्याप्रमाणे सकाळी 8 ते सायं. ५ वाजेपर्यंत वर्ग चालतात व त्यामधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. वरील परीक्षेत आजपर्यंत किमान 300 पेक्षा जास्त विद्यार्थी पात्र व शिष्यवृत्ती धारक झालेले आहेत. आजपर्यंत त्यांच्या बँक खात्यावर एकूण १ कोटी रु. पर्यंतची रक्कम जमा झाली आहे. शाळेच्या दृष्टीने ही एक गौरवाची बाब आहे.

### मान्यवरांचे मार्गदर्शन

भारतीय प्रशासकीय सेवेतील उच्च पदस्थ प्रशासकीय अधिकारी मा. श्री. विजय राठोड जिल्हाधिकारी जालना, मा. तेजस्वी सातपुते (IPS) पोलीस अधिक्षक सांगली, मा. मनुजजी जिंदल (IAS) मुख्याधिकारी जिल्हा परिषद जालना, मा. फडणीस मॅडम न्यायाधीश परतूर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन केले. इ. 10 वी बोर्डाच्या निकालात दर वर्षी ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेणारे विद्यार्थी किमान दहा पेक्षा जास्त असतात. या गुणवंतांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्तीचा लाभ मिळतो. स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याचा सराव झाल्यामुळे विद्यार्थी (NEET, JEE, MPSC) अशा स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेले आहेत. आज शाळेचे माजी

विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर, उच्चपदस्थ अधिकारी व काही राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत.

**अभ्यासासोबतच सहशालेय उपक्रम**



शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून राजस्थान, जयपूर, हैद्राबाद, मुंबई, दिल्ली, वाघा बॉर्डर, आग्रा, मथुरा या ठिकाणी भेटी देऊन विद्यार्थ्यांना त्या बाबतीत असलेली शैक्षणिक, ऐतिहासिक घटनांची माहिती करून दिली जाते.

**क्षेत्रभेट**

आमच्या शाळेत विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी क्षेत्रभेटीसाठी घेऊन जातो. यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात, अनुभवात भर पडते. खाऱ्या पाण्यासाठी प्रसिद्ध असलेले लोणार सरोवरास भेट दिल्यानंतर विद्यार्थ्यांना सरोवर निर्मिती बाबत माहिती मिळाली. परतूर न्यायालय, रेल्वे स्टेशन, पोलीस स्टेशन, बागेश्वरी सहकारी साखर कारखाना व सामाजिक वनीकरण यासारख्या विविध क्षेत्रांना भेटी देऊन त्या ठिकाणी चालणाऱ्या कामकाजाची माहिती विद्यार्थ्यांनी समजून घेतली.

परतूर येथील न्यायालयात मुलांचे गट करून न्यायालयीन कामकाजाची समक्ष सुनावणी होत असताना प्रत्यक्ष कामकाज कसे चालते, साक्षीदाराचे जबाब कसे घेतात, सुनावणी कशी होते, न्यायनिवाडा कसा होतो याबाबतची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली.

रेल्वे स्टेशन परतूर येथे विद्यार्थीगटाने सामूहिकपणे भेट घेतली. परतूर रेल्वे स्टेशनचे स्टेशनमास्तर यांनी रेल्वेची आवागमन प्रक्रिया कशी चालते, सिग्नल कसे पडतात, मॉनिटरवर असलेले रंगीत दिव्याबद्दलची माहिती मुलांनी समजून घेतली. सिग्नलचे दिवे लाल, हिरव्या, पिवळया रंगाचेच का असतात, त्याची वैशिष्ट्ये काय आहेत याची माहिती मिळवली. उल्लेखनीय बाब म्हणजे परतूर शहरालगत असलेल्या साखर कारखान्यांना विद्यार्थ्यांनी भेट दिली.

सामाजिक वनीकरणाची रोपवाटिका पाहून वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन कसे करायचे याची प्रत्यक्ष माहिती विद्यार्थ्यांनी मिळवली. याचा परिणाम म्हणजे मागील चार वर्षांपूर्वी लावलेले वृक्ष जसे की लिंब, वड, पिंपळ, करंज यासारखे वृक्ष फार मोठे झालेले आहेत. त्याच झाडाच्या सावलीखाली आज सर्व वर्गांमधील मुले झाडाखाली बसून ज्ञानार्जनाचे काम करतात. सकाळचा परिपाठच निसर्गरम्य वातावरणात पार पडतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होते.

इ. आठवीच्या वर्गातील मुलांनी एक सुंदर रोपवाटिका तयार करून त्यामध्ये 'शेवगा' या झाडांची रोपे तयार केली. जवळपास चारशे रोपे तयार करून गट शिक्षणाधिकारी परतूर यांच्या मार्फत तालुक्यातील एकशे पंचेचाळीस शाळांना प्रत्येकी दोन रोपांचे वाटप केले व शाळेत सुद्धा झाडे लावली आहेत. आज रोजी मध्यान्ह भोजनमध्ये झाडाच्या शेंगांचा उपयोग घेत आहोत ही शाळेसाठी अभिमानाची व आनंदाची बाब आहे. या झाडांना शाळेतील एका मतिमंद मुलाने स्वतः पाणी देऊन झाडे वाढवली आहेत.

**व्यावसायिक शिक्षण**

शाळेत रिटेल व ऑटोमोबाईल सर्व्हिस टेक्निशियन अभ्यासक्रम सुसज्ज वर्कशॉपमध्ये शिकवले जातात.

### पोलीस कॅडेट प्रोग्राम

या कार्यक्रमा अंतर्गत ६० विद्यार्थ्यांचा संच यांनी पोलीस परेड ग्राउंड जालना येथे जाऊन परेडमध्ये सहभाग नोंदवला.



### आदर्श शाळा

महाराष्ट्र शासनाचा सन २०२१-२०२२ चा आदर्श शाळा म्हणून पुरस्कार मिळालेला आहे व त्याप्रमाणे वर्ग १ लीचे अध्ययन व अध्यापनाचे कार्य चालत आहे. कोवीड काळात मुलांच्या ऑनलाईन तासिका घेण्यात आल्या व त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.

वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन यासाठी वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात येते. प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन व इतर कार्यक्रमात लेझीम पथकाचा सहभाग असतो.

### गुणवंतांचा सत्कार व पालक मेळावा



विविध स्पर्धा परीक्षेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. गुणवंत विद्यार्थ्यांच्या गावात घरी जाऊन पालकांसह सत्कार करण्यात येतो. गावातून त्यांची सवाद्य मिरवणूक काढली जाते यामुळे विद्यार्थी प्रवेश वाढवण्यात मदत होते व उपस्थिती वाढते.

### शालेय परिपाठ

शाळेत दररोज ठरलेल्या वेळेत मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू या भाषांमधून उत्कृष्ट पद्धतीने विद्यार्थी परिपाठाचे सादरीकरण करतात. परिपाठा नंतर विद्यार्थी व शिक्षकांचे वाढदिवस साजरे केले जातात. क्रीडा स्पर्धेमध्ये शाळेचे विद्यार्थी सहभागी होतात. शाळेचा संघ दोन वेळा राज्यस्तरावर खेळलेला आहे. तसेच नाट्यस्पर्धेमध्ये SCERT पुणे येथे शाळेने सहभाग घेऊन सादरीकरण केलेले आहे.

शालेय व्यवस्थापन समिती व वरिष्ठांचे मार्गदर्शन यामुळे हे सर्व शक्य झालेले आहे. लोकसहभागातून एक आर ओ प्लांट (किंमत १.५० लाख) रु. चा मिळाला आहे. (शुद्ध पेयजल सयंत्र) निताशी कंपनीचा ४२ इंची स्मार्ट टी.व्ही., प्रिंटर, इन्व्हर्टर, थंड पाण्याचे (जार) थर्मास, संरक्षण भिंत, फर्निचर, ग्रंथालय इ. लोकसहभागातून मिळालेले आहे.

शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व शिक्षक, कर्मचारी मिळून शाळेत येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी एकत्रित प्रयत्न केले जातात. शाळेसाठी येणाऱ्या योजना, विविध सामाजिक उपक्रम याची अंमलबजावणी करताना माननीय पदाधिकारी शाळा व्यवस्थापन समिती, अधिकारीवर्ग, सर्व शिक्षक यांचा शाळा विकासात मोलाचा सहभाग आहे. या सर्वांचा परिपाक म्हणजे आमची जिल्हा परिषद प्रशाला, परतूर, ता. परतूर, जि. जालना या शाळेतील विद्यार्थ्यांनी साधलेली आदर्श गुणवत्ता होय...!

मुख्याध्यापक : श्री. विष्णू रावसाहेब कदम, संपर्क : ९५१८७४९७०७

# १५. गावची साथ, अडचणींवर मात




**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आव्हई, ता. पूर्णा, जि. परभणी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आव्हई या शाळेचे आजचे वैभव पाहिले तर संपूर्ण गावाला शाळेचा सार्थ अभिमान वाटतो. तीन वर्षापूर्वी काम सुरू केले. अगदी रखरखीत वाटणारी इमारत, उजाड माळरानासारखा परिसर आणि वरच्या वर्गातील रोडावलेली संख्या. गावकऱ्यांची उदासीनता यातून पुढे काम सुरू झाले अन् आजची स्थिती नटलेली वनराई, सुंदर इमारत, खेळाचे मोठे मैदान. २३७ वरून ३१३ पर्यंत वाढलेली विद्यार्थी संख्या आम्हा ११ शिक्षकांना प्रत्येक कृती, नवोपक्रम, पुढील कार्यास प्रेरणा देते. शाळेची स्थापना १९५३ ची असून इयत्ता १ ली ते ७ वी चे वर्ग भरतात. शाळेत ११ शिक्षक कार्यरत असून ३१३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

आव्हई गाव जिल्ह्यातील शेवटचे टोक. २५०० लोकवस्तीचे समृद्ध गाव. गावात फक्त ८ नोकरदार, त्यामुळे शिक्षणाबाबत उदासीनता. शाळा म्हणजे हक्काचे सरकारी शौचालय, मुतारी, तंबाखू, सिगारेट व गुटखा चघळण्याचे स्थळ आहे की काय असे काहींना वाटायचे. मोबाईल रेंजसाठी सायंकाळी समूहाने 'ल्युडो गेम' खेळत काहीजण पत्रावर बसायचे. यात बदल करण्यासाठी प्रथम ओळखीच्या ज्येष्ठ नागरिक, तरुण, पदाधिकारी यांना भेटून येणाऱ्या अडचणी समजावून सांगितल्या. सन १९५३ साली स्थापन झालेल्या आपल्या शाळेला गावाची कशी गरज आहे हे पटवून दिले. त्यानंतर ही सर्व मंडळी तयार झाली आणि शाळा स्वच्छतेपासून कामाला सुरुवात केली. यामध्ये अनेक अडचणी आल्या. अनेकदा गावातील वाईट प्रवृत्तीच्या मंडळींकडून आडकाठी आली पण 'असाध्य ते साध्य करीता सायास' या उक्ती प्रमाणे जिद्द न सोडता प्रयत्न केले त्याचे फळ आज सर्व एका शब्दावर कोणतीही मदत करत आहेत. शाळा स्वच्छतेपासून सुरू झालेला प्रवास गाव स्वच्छतेकडे व पुढे मानसिक स्वच्छतेकडे गेला. यातून व्यसनाधीनता कमी झाली. एका वर्षात गावचा प्रत्येक नागरिक यात सहभागी झाला. हा प्रवास आमच्या दृष्टीने आश्चर्यकारक होता व पुढील कार्यास प्रेरणा देणारा होता.

लोकसहभाग कसा मिळवावा याचे शिक्षणाधिकारी श्री. विठ्ठल भुसारे यांनी मार्गदर्शन केले व केंद्रप्रमुख प्रभाकर भोसले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. मागील अनुभवावरून पुरुष मंडळींना न बोलवता प्रथम महिला मेळावा घेऊन मुलांच्या गरजा अन् पालकांची भूमिका समजावून सांगितली. गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम राबवून गावाच्या नजरेत भरेल असा बदल घडवण्याचे प्रथम प्रयत्न केले. यातून पालक, गावकरी यांच्यात सकारात्मकता निर्माण झाली. गावाला शाळेची गोडी निर्माण झाली. यानंतर विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने गावकरी व पालक यांचे प्रबोधन झाले. शाळेविषयीचा दृष्टिकोन बदलला, शाळेसाठी न मागता मदतीचा ओघ सुरू झाला. लोकसहभाग वाढत गेला. गावकऱ्यांनी २० गुंठे स्मशान भूमीची जागा शाळेसाठी दान दिली आणि खेळाच्या मैदानाची समस्या सोडवली. गावकऱ्यांनी तीन लाख ब्याऐंशी हजार रुपयांची मदत केली. गत वर्षी भव्य प्रवेशद्वार उभे केले. ६०० फूट जाळीदार कुंपण केले जेष्ठ, तरुण मंडळींनी स्वत: ते बसवण्याचे काम केले. आज १०० टक्के भौतिक सुविधा असलेली शाळा म्हणून नावलौकिक मिळवला आहे. सर्व

वर्गखोल्या ऑईल पेंटने कलर केल्या आहेत. ११ वर्गखोल्या डिजिटल आहेत आणि पंखे, विजेची सुविधा आहे. ३ प्रोजेक्टर, ८ टीव्ही आहेत. सौरऊर्जेवर सर्व उपकरणे चालतात. स्वच्छ पाण्यासाठी ताशी ३०० लिटर क्षमतेचे फिल्टर आहे. भव्य स्टेज २७ बाय २५ आहे. सुसज्ज प्रयोगशाळा आहे. मुलांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून ग्रीनशेड केले आहे. विशेष म्हणजे १००० झाडे आज शाळेच्या परिसरात जीवंत आहेत. कोविड काळात अभ्यास चालू रहावा म्हणून गावात ३२ ब्लॅकबोर्ड बनवण्यात आले. ३५ अभ्यास गट पालकांच्या मदतीने चालतात. लेझिमवर गीत बसवले आहे. सर्वसोयी युक्त प्रयोगशाळा उपलब्ध आहे. शाळेचे हे काम गावात गेले अन् गावच्या स्मशानभूमीतील ५० जुन्या समाधी काढून गावकऱ्यांनी २०० झाडे लावली. शाळा गावासाठी पर्यटन स्थळ झाले आहे.

भौतिक सुविधांबरोबरच गुणवत्ता वाढीसाठी अनेक उपक्रम राबवण्यात आले. त्यात दिनांकनिहाय पाढे बनवणे, पाठ करणे व लिहिणे. दर शनिवारी पाठांतर व लिखाण स्पर्धा घेऊन दर सोमवारी वर्गातील ३ स्पर्धकांना बक्षीस दिले जाते. त्यामुळे पहिलीची काही मुले २५ पर्यंत पाढे म्हणतात. या सर्वाचा परिणाम मुले आज शाब्दिक उदाहरणे व चार गणितीय क्रिया अगदी सहज पणे करतात.

मराठी व इंग्रजी **हस्ताक्षर सुधारणा उपक्रम** आमच्यासाठी व विद्यार्थ्यांसाठी अत्यंत अभिमानास्पद उपक्रम आहे. याचा पालक अभिमानाने दुसऱ्या गावात गेल्यानंतर आवर्जून उल्लेख करतात. या उपक्रमाची सुरुवात ही मुळाक्षरे सुधारणे पासून केली जाते. दर सोमवारी स्पर्धा घेतली जाते. त्यात ३ क्रमांक काढून बक्षीस दिले जाते. परिपाठात चुका कशा टाळता येऊ शकतात याचे मार्गदर्शन केले जाते. आज वर्ग ४ पासून विद्यार्थी कर्सिव्ह मध्ये लिहितात.

### शिक्षकाविना परिपाठ




शाळा भरण्याच्या अगोदर ४५ मिनिटे परिपाठ सुरू होतो हा परिपाठ वर्गवार घेतला जातो. इयत्ता ७ वी मुले यावर देखरेख ठेवतात. परिपाठ तिन्ही भाषेत होतो. प्रत्येकी २ दिवस मराठी, हिंदी, इंग्रजी तिन्ही भाषेत सूत्रसंचालन मुले करतात. यानंतर हस्ताक्षर, वाचन, गणितीय क्रिया चुका दुरुस्त केल्या जातात. आठ दिवसांतून उत्कृष्ट परिपाठ निवड करून बक्षिस दिले जाते.

### वाचन उपक्रम

'वाचन उपक्रम' हा नियमित पणे चालतो. वाचन मुळाक्षरे, शब्द, वाक्य, परिच्छेद, पान व पाठ या क्रमाने घेतले जाते. यात अध्ययन गती कमी असलेल्या मुलांकडे विशेष लक्ष दिले जाते. उत्कृष्ट वाचन करणाऱ्या मुलांना बक्षीस दिले जाते याचा परिणाम कोरोना काळात शाळा बंद असूनही ९५ टक्के मुले वाचन करतात.

### वाढदिवस शाळेसाठी

वाढदिवस शाळेसाठी या उपक्रमाच्या माध्यमातून सर्व मुलांचे वाढदिवस साजरे केले जातात. शाळेच्या व मुलांच्या गरजा देखील पूर्ण केल्या जातात. शिक्षक व विद्यार्थ्यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त शाळेसाठी भेट वस्तू देण्याचा नवीन प्रथा सुरू केल्या यातून मुले शिक्षणोपयोगी वस्तू देतात यातून साहित्यपेढी तयार झाली. ज्यास अचानक गरज पडेल त्यास दिली जाते. शिक्षक मुलांना शैक्षणिक साहित्य देतात. यामुळे मुलांना आनंद मिळतो. कोणताही मुलगा वस्तू नाही म्हणून घरी जात नाही. याचा परिणाम उपस्थिती वाढण्यात झाला. काही वर्गाची उपस्थिती १०० टक्के आहे.

### वर्गवार पालक सभा

हा सर्वात यशस्वी उपक्रम आहे. यात वर्षभरात दोन वेळेस पालक सभा घेण्यात येते. प्रथम सत्र व द्वितीय सत्र यात वर्गवार पालक सभा घेण्यात येते. यात वर्ग शिक्षक, विषय शिक्षक, पालक, विद्यार्थी एकत्र बसून त्याची प्रगती, अभ्यासातील अडथळे, मुलांची समस्या,



पालकांची अपेक्षा, मुलांच्या वाईट सवयी, आरोग्य त्यावर उपाय यावर चर्चा केली जाते. पुढील दिशा ठरवली जाते. यामुळे मुले अभ्यासास घरी बसण्याचे प्रमाण वाढले. उपस्थितीचे प्रमाण वाढले. शिक्षकासंबंधीचे गैरसमज दूर झाले. शिक्षकांनाही अधिक काम करण्याची गरज वाटू लागली. या सर्वाचा परिणाम गुणवत्ता वाढ आणि लोकसहभाग सहज वाढीस लागला.

### भोंगा शाळा

भोंगा शाळा हा नावीन्यपूर्ण उपक्रम गावातील मंदिरावरील स्पिकरवरून राबवला गेला. यात पाढे, कविता याचा समावेश केला जातो. यात मंदिर, पुजारी व महाराज यांचा सहभाग मोठा आहे. यामुळे शाळा गावात गेली आणि उपक्रम घरा–घरात गेले.

### नावीन्यपूर्ण विज्ञान केंद्र

नावीन्यपूर्ण विज्ञान केंद्र हे आमच्या शाळेसाठी एक वरदान ठरत आहे. यामुळे आमच्या शाळेतील मुले आणि केंद्रातील १० शाळांना याचा फायदा होत आहे. मुले दिलेल्या तारखेनुसार शाळेला भेटी देऊन. प्रत्यक्ष प्रयोग करतात. यामुळे विज्ञान विषय मुले आनंदाने शिकू लागली.

### वृक्षमित्र संकल्पना

शाळेच्या आवारात १००० झाडे जिवंत आहेत व बांधावर ५०० वृक्ष लागवड व संगोपन यासाठी 'वृक्षमित्र' म्हणून प्रत्येक वर्गातून ५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. जून, जुलै व ऑगस्ट या तीन महिन्यांत विद्यार्थी आपल्या परिसरात झाडे लावून फोटो पाठवतात. जो वृक्षमित्र जास्तीत जास्त झाडांची लागवड करेल त्याचा १५ ऑगस्ट रोजी बक्षीस देऊन सत्कार करण्यात येतो. वर्षभर जो झाडाचे संगोपन करील त्याचाही सत्कार करण्यात येतो.

जनसेवक म्हणून स्वयंप्रेरणेने श्री. शिवाजी खंदारे हे दोन वर्षांपासून शाळेकडून कसलेही मानधन न घेता काम करत आहेत त्यांच्या मदतीने वृक्षारोपण, संगोपन, पाणीफिल्टर चालवणे, विद्युत उपकरणे फिटिंग, दुरुस्ती करणे ही सर्व कामे होतात. चांगल्या कामासाठी एक पाऊल पुढे केले तर १० पावले सोबत येतात ही प्रचिती आम्हाला आली.

या सर्वाचा परिणाम गावकरी, ग्रामपंचायत यांचा शाळेविषयीचा दृष्टिकोन बदलला, पालकांमध्ये सकारात्मकता निर्माण झाली. सरकारची शाळा म्हणत होते तेच लोक आज आमची शाळा म्हणत आहेत. ही भावना आम्हा सर्व शिक्षकांना राज्य पुरस्काराचा आनंद देणारी आहे. शाळा व्यवस्थापन, सर्वशिक्षक व मुख्याध्यापक सर्वांच्या सहकार्यातून एक सुंदर अशी उपक्रमशील व गुणवंत शाळा निर्माण झाली आहे. आमच्या शाळेला अनेक गावातील शिक्षणप्रेमी व जिल्हास्तरावरील सर्व अधिकारी भेट देऊन मार्गदर्शन करतात. सलग दोन वर्षे आदर्श शाळा म्हणून आम्ही पुरस्कार पटकावला आहे. या सर्वाचा आम्हाला मनस्वी आनंद वाटतो या सर्व यशाचे मानकरी गावकरी, शाळा व्यवस्थापन समिती व आमची सर्व शिक्षक टीम आहे.

गावची साथ, अडचणीवर मात। शिक्षक परिश्रमातून शाळेने टाकली कात।।

मुख्याध्यापक : श्री. प्रल्हाद गणपतराव कराळे, संपर्क : ९८५०८ ५६०४१

# १६. दिशा परिवर्तनाची, एक उत्तुंग झेप आमच्या शाळेची




**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फुटाणा, ता. कळमनुरी, जि. हिंगोली**

शिक्षण म्हणजे केवळ पोपटपंची ज्ञान नव्हे, तर बालकांचा सर्वांगीण विकास करणे होय. त्याच्या सर्व क्षमतांचा, गुणांचा विकास करणे हाच शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फुटाणा येथे विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

अध्ययन अध्यापन कार्य प्रभावी करणे, बालकांना शाळेविषयी रुची निर्माण करणे, प्रत्यक्ष अध्ययन अनुभव देणे, माहिती तंत्रज्ञानाविषयी माहिती देणे, राष्ट्रीय मूल्य, गाभाघटक, संस्कार रुजवणे, गुणवत्ता वाढीबरोबरच बालकांच्या सुप्त गुणांना संधी निर्माण करून देणे, कृतीतून आनंददायी शिक्षणावर भर देणे, ज्ञानरचनावादी पद्धतीचा अवलंब करणे, बालकांच्या मूलभूत क्षमतांचा विकास करणे इ. उद्देशाने आमचे शाळेत विविध उपक्रम राबविले जातात.

मनी विचार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा, ठाव घेईल विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांचा. हिंगोली शहरापासून साधारण ५५ कि. मी. दूर असणारी कळमनुरी तालुक्यातील फुटाणा ही आमची १ ली ते ७ वी पर्यंतची शाळा. अतिशय दुरावस्थेतील शाळा इमारत, वर्गखोल्या, फरशी, दारे, खिडक्या दुरुस्त करण्याचे व भिंती बोलक्या करण्याचे शिवधनुष्य आम्ही उचलले पण ते पेलण्याची खरी ताकद दिली ती शाळा व्यवस्थापन समितीने, पालकांनी, ग्रामस्थांनी आणि गावातील तरुण मंडळांनी.

आपणास कोणी जर विचारले, की शाळा व्यवस्थापन समिती कोण–कोणती कामे करते, तर नक्की आपण शासकीय परिपत्रके चाळून सांगू, की बैठका घेणे, विकास आराखडा करणे, १००% पट नोंदणी करणे, आर्थिक निधी योग्य कारणासाठी खर्च करणे, रजा मंजूर करणे, निर्लेखन करणे इत्यादी अनेक कामांची आपण यादी करु, पण जर मी असे म्हटले, की 'झाड़लोट करणे, खड्डे करणे, झाडांना पाणी पुरवठा करणे, बांधकामावर पाणी मारणे, साफसफाई करणे, कारागिरांच्या कामात मदत करणे, वेळ पडल्यास रात्री १० वाजेपर्यंतही शाळेसाठी श्रमदान करणे' इत्यादी. अशी चाकोरी बाहेरील कामे करते आमची शाळा व्यवस्थापन समिती. कदाचित ही शासनाच्या मार्गदर्शिकेत नाहीत, कदाचित बहुतेक ठिकाणी पहावयास मिळत नसतीलही, पण गेले काही दिवस आम्ही पाहतो, आम्ही अनुभवतो आणि म्हणूनच गर्वाने आज सांगतो.

**'लोकसहभाग' हीच ग्रामीण शिक्षणाची खरी शक्ती**

आपली गरज, आपली समस्या, आपल्या भावना केवळ मेंदूशी नाही तर पालकांच्या हृदयाशी भिडल्या तर शाळा व समाज एक संयुक्त परिवार होण्यास एक ऊर्जा, एक कार्यशक्ति निर्माण होण्यास विलंब लागत नाही आणि म्हणूनच आज महाराष्ट्रात कित्येक शाळांना सोनेरी दिवस येत आहेत. शाळा परिवर्तनासाठी ग्रामस्थ वर्ग सर्वशक्तिनीशी आमच्या सोबत आहे. आमचे ग्रामस्थ व पालकांनी वस्तुरूपाने २ लाख पेक्षाही अधिक निधी आतापर्यंत दिला आहे. ग्रामपंचायतनेही वित्त आयोगातील तब्बल ४ लाख निधी शैक्षणिक बाबीसाठी वळवला. शाळा दुरुस्ती निधी ५ लाख रुपये प्राप्त झाले आहेत. आमच्या या परिवर्तनाच्या कार्यात गावातील लहान थोर सर्व मंडळींचा आम्हास मोलाचा हातभार लाभला इतकेच काय गावातील स्थानिक शिक्षकांनीही शाळेच्या वेळेनंतर अनेक वेळा शालेय कामात हातभार लावला.

सरतेशेवटी सांगण्याचे एकच आपण जिल्हा परिषद शाळेत काम करत असताना शासनाचे अनुदान आपणास आपले उद्दिष्ट, आपले स्वप्न साध्य करण्यास पुरेसे होणार नाही. लोकांच्या मनात निर्माण होणारा विश्वास, अनुबंध, आणि ऋणानुबंध हीच खरी आपली शक्ती आहे!

### शैक्षणिक सहल

विद्यार्थ्यांना काही गोष्टी आपण प्रत्यक्ष दाखवल्या पाहिजेत, कारण यामुळे मिळणारं ज्ञान चिरकाल स्मरणात राहते. म्हणून शाळेच्या वतीने प्रत्येक वर्षी शालेय परिसरातील ऐतिहासिक, सांस्कृतिक स्थळांना भेटी देत प्रत्यक्ष माहिती दिली जाते. कोरोना पूर्वी शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून काही ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या. देवगिरी किल्ला, अजिंठा–वेरूळ लेण्या, घृष्णेश्वर, बीबी का मकबरा, देवगड, जायकवाडी धरण, सिद्धार्थ गार्डन, आदर्श गाव पाटोदा, औरंगाबाद व नगर जिल्ह्यातील किल्ले अशा ठिकाणी भेटी देत यांची प्रत्यक्ष माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' या ओळीप्रमाणे पर्यावरणाचे रक्षण व्हावे यासाठी शाळा व शालेय परिसरात विविध फळझाडांची, फुलझाडांची लागवड करण्यात आली आहे. त्यांना पाणी देणे, पाण्यासाठी आळे घालणे, ट्रीगार्ड लावणे, झाडांचे संगोपन करणे, इ. कामे विद्यार्थी नियमितपणे करतात. प्रत्येक विद्यार्थ्याला झाड दत्तक देण्यात आले आहे. यातून श्रमप्रतिष्ठा या गुणाची रुजवणूक होते.

### शालेय मंत्रिमंडळ

लोकशाही या मूल्याची रुजवणूक करण्यासाठी लोकशाही म्हणजे काय, लोकशाहीची रचना, कार्यपद्धती, यावर मार्गदर्शन शाळेत वोटिंग मशीन या ॲपद्वारे दर दोन वर्षांनी आपल्या सार्वत्रिक निवडणूकांप्रमाणे विद्यार्थ्यांच्या निवडणुका घेतल्या जातात. यातून मुख्यमंत्री,



उपमुख्यमंत्री, सांस्कृतिक मंत्री अशा 3 महत्त्वाच्या मंत्र्यांची निवड केली जाते व मंत्रीमंडळ स्थापन केले जाते. या मंत्रिमंडळावर शालेय कामकाज जबाबदारी सोपविण्यात येते. यातून विद्यार्थ्यांना आपल्या जबाबदाऱ्या, हक्क व कर्तव्य यांची जाणीव होते.

### विज्ञान प्रदर्शन

प्रत्येक वर्षी दिनांक २८ फेब्रुवारीला आमच्या शाळेत सहज सोपे प्रयोग सादरीकरण केले जाते. विविध वैज्ञानिक रांगोळ्या व पोस्टर तयार करून विज्ञान प्रदर्शन भरवले जाते. यासाठी गावातील व परिसरातील लोकांना निमंत्रण दिले जाते. यातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रूजतांना दिसून येते. दर शनिवारी एका प्रयोगाचे सादरीकरण केले जाते. 'प्रयोगाचा वार शनिवार' हा उपक्रम या ठिकाणी राबवला जातो.

### सांस्कृतिक महोत्सव

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून प्रत्येक वर्षी २६ जानेवारीला कोरोना काळात सुद्धा ऑनलाइन पद्धतीने नृत्य, गीतगायन, नाटिका, मुकाभिनय, आदी कार्यक्रमांचे आयोजन या ठिकाणी केले गेल. यातून राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रभक्ती, धर्मनिरपेक्षता, बंधुता, आदी गुणांची रुजवणूक होतांना दिसून येते.

### स्वच्छता अभियान

विद्यार्थ्यांना श्रमप्रतिष्ठा या गुणांची रुजवणूक करण्यासाठी विविध जयंतीचे औचित्य साधत शाळा व शालेय परिसर तसेच गावातील काही भाग साफ करण्यासाठी स्वच्छता अभियान मोहीम राबवली जाते. त्याचबरोबर चित्रकला स्पर्धा, पोस्टर निर्मिती स्पर्धा,

प्लास्टिक बंदी संबंधी पथनाट्य, हात धुवा अभियान, वैयक्तिक स्वच्छता, सामाजिक स्वच्छता तसेच पोषण आहारा संबंधी रांगोळ्या, पाककृती इत्यादी स्पर्धांचे आयोजन करून मोठ्या प्रमाणात जाणीव जागृती करण्याचे काम शाळेत केले जाते.

### ई–लर्निंग

विद्यार्थ्यांना काही बाबी आपण प्रत्यक्ष दाखवू शकत नाही. अशा वेळी शाळेतील LED TV, संगणकांचा वापर करून तसेच काही मोबाईलच्या ॲपचा वापर शिक्षक करतात. यातून सृजनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार आदी मूल्यांची रुजवणूक होताना दिसून येते.

### देशभक्तीचे धडे

भारतीय सैनिकांच्या कार्याची जाणीव व्हावी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये देशप्रेम जागृत व्हावे व त्यांच्या मनात सैनिक होण्याची इच्छा निर्माण व्हावी यासाठी दर शनिवारी परमवीर चक्र विजेता, महावीर चक्र विजेता व वैज्ञानिकांची माहिती, परिचय व कार्य सांगितले जाते. त्यांची जयंती–पुण्यतिथी साजरी केली जाते. परिसरातील आजी–माजी सैनिकांना बोलावून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची व विद्यार्थ्यांना ऐकण्याची संधी निर्माण करून दिली जाते.

### माझी भोंग्यावरची शाळा

कोरोना काळात विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकून ठेवण्यासाठी अनेक प्रयोग करण्यात आले. त्यापैकी सर्वात यशस्वी झाला तो 'माझी भोंग्यावरची शाळा' हा प्रयोग. ग्रामीण भागामध्ये मोबाईलचे प्रमाण फार कमी असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी उपयुक्त ठरला. 'ना वर्ग ना फळा, घरोघरी भरते माझी भोंग्यावरची शाळा' हा आमचा उत्कृष्ट उपक्रम पूर्ण कोरोना काळामध्ये चालला. सुरुवातीला काही दिवस ऑनलाईन नंतर ऑफलाईन आणि त्यानंतर MSEB ची लाईन म्हणजे आमची भोंगा शाळा हीच आमची लाईफ लाईन ठरली.

या भोंग्यावरून नियमित सकाळी नऊ वाजता सर्व विद्यार्थ्यांना आजचा अभ्यास भवानी मातेचे मंदिर किंवा बौद्ध विहारातील माईक, साऊंड सिस्टीम चा वापर करून वर्गवार वाटप केला जाई. विद्यार्थी प्रत्यक्ष आपल्या अंगणात, अंगणातील ओट्यावर , घराच्या गच्चीवर, बसून रोजचा अभ्यास लेखन करत. तो अभ्यास १० नंतर तपासणीचे कार्य आम्ही शिक्षक करायचो. 'मंदिरावर या, आपली अडचण दूर करा' अशी एक योजना आम्ही राबवली. बारा ते दोन वाजेपर्यंत मंदिराजवळ यायचे आणि आपली अडचण दूर करायची हा उपक्रम हाती घेतला. यासाठी आजी–माजी विद्यार्थी, काही शिक्षणप्रेमी यांची आम्हाला मदत मिळाली.

### बाल वाचनालय, आजचा गुरुजी

शाळेत वाचनालय आहे या वाचनालयातील जी पुस्तके आहेत. ती दर शनिवारी दिली जातात व त्यावर पाच ओळी लेखन करा किंवा आपण वाचलेल्या पुस्तकावर दोन मिनिटे बोला असे व्यक्त होण्याची संधी विद्यार्थ्यांना दिली जाते. तसेच गावातील वाचनालयातील पुस्तकाचं वाचन इयत्ता पाच ते सात चे विद्यार्थी नियमितपणे करतात. शाळेमध्ये ७ वर्ग असून ५ शिक्षक आहेत. एखादे शिक्षक रजेवर असल्यास अशा वेळी मोठ्या वर्गातील मुलांकडून लहान वर्गाच्या मुलांना अध्यापनाचे कार्य केले जाते तसेच मूलभूत ज्या गोष्टी आहेत त्या गोष्टींचा सराव विद्यार्थी करून घेतात व आपुलकीने हसत खेळत अध्ययन–अध्यापन कार्य घडते.

### इतर उपक्रम

इंग्रजी विषयासाठी ऑनलाईन चाचणी, प्रश्नमंजूषा, शब्दकोडे, गणित जत्रा, चित्रकला, कागदापासून वस्तू, हळदीकुंकू, क्रीडास्पर्धा, राखी तयार करणे, भेटकार्ड तयार करणे, निबंध स्पर्धा, दिनांक तो पाढा, कविता गायन, तीन शब्दांपासून गोष्ट तयार करणे, गायन, आदी उपक्रमांचे आयोजन गुणवत्ता वाढीसाठी केले जातात.

### फलनिष्पत्ती

विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनास चालना मिळाली, अवांतर वाचनाची आवड निर्माण झाली, पालकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला व पटसंख्या वाढ झाली, कृतीयुक्त शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना कार्य करण्याची रुची निर्माण झाली, देशप्रेम, विविध मूल्य, जीवन कौशल्य यांची रुजवणूक झाली, वैज्ञानिक प्रयोग व उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची सृजनशीलता, चिकित्सक वृत्ती वाढली, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख निर्माण झाली, भारतीय लोकशाही गाभा घटकाची ओळख निर्माण झाली, संघभावना, बंधुत्व आदी मूल्यांची रुजवणूक झाली. शाळा व शाळेचा परिसर प्रफुल्लित व आनंदी होण्यासाठी, बालकांचा सर्वांगीण गुणवत्तापूर्ण विकास साधण्यासाठी विविध उपक्रमांचे प्रयोगांचे सादरीकरण आमच्या शाळेत करण्यात येते.

मुख्याध्यापक : श्री. विलास साटवा परघणे, संपर्क : ९७६५० ४३१९० / ८७८८९ ७५६४३

# १७. आपली प्रेरणादायी शाळा

विदर्भाच्या टोकावर पैनगंगेच्या तीरावरील निसर्गरम्य व दुर्गम भागात वसलेली बिटरगाव (खुर्द) ही छोटीशी वस्ती आहे. फक्त पाठ्यपुस्तकाचे अध्यापन न करता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र झटणारी शाळा म्हणजे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा बिटरगाव (खुर्द) होय. शाळेची स्थापना १९५६ झाली असून शाळेत १ ली ते ८ वी पर्यंतचे वर्ग आहेत. सद्यस्थितीत शाळेत १८७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळांमधील भौतिक सुविधांमध्ये डिजिटल कक्ष, बाल वाचनालय, भाषिक प्रयोगशाळा, संगणक दालन, प्ले हाऊस व इंटरनेट यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत.

'एकच ध्यास मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी घेऊया उपक्रमांची साथ' या ब्रीदवाक्याला अनुसरून गुणवत्तापूर्ण, आनंददायी शिक्षणासाठी शाळास्तरावर विविध वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम सुरू आहेत. अध्ययन–अध्यापन करत असताना उद्‌भवलेल्या विविध समस्यांना अनुसरून, त्यांची सोडवणूक करण्यासाठी अफलातून बचत बँक, रात्रशाळा, ग्राहक भांडार, मी वर्गनायक होणार, सांकेतिक भाषा, सूचनापेटी, अभिरूप न्यायालय, शालेय पोलीस पथक, पाठ्यपुस्तक देखभाल समिती, दप्तराचे ओझे कमी करणे, 'हेल्थकेअर', हॉबी क्लास, उपस्थिती ध्वज, हरवले–सापडले, आम्ही किशोरी, नवोदय व शिष्यवृत्ती मंडळ, अभिनव हजेरी पद्धत, सुंदर माझे हस्ताक्षर, सी. आय.डी व ए.टी एस. पथक, महिला मेळावा, आनंद मेळावा इत्यादी उपक्रम शाळेत सुरु आहेत.

**रात्रशाळा**



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बिटरगाव (खुर्द), ता. उमरखेड, जि. यवतमाळ



अप्रगत मुलांना स्वयंअध्ययन सवयीद्वारे प्रगत करणे व अभ्यासासाठी वातावरण निर्मिती करणे या उद्देशाने आम्ही रात्रशाळा सुरू केली. ग्रामीण भागात जागेचा अभाव, पालकांचे दुर्लक्ष, अध्ययन करण्यासाठी पोषक वातावरणाचा अभाव, गृहपाठ पूर्ण न करणे इ. समस्यांची सोडवणूक करण्यासाठी रात्रशाळा उपयुक्त ठरली. त्यासाठी शाळेतील प्रगत विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने रात्रशाळा वर्ग चालवितात. आजूबाजूच्या घरातील दहा ते पंधरा विद्यार्थी एकत्र बसून अभ्यास करतात. वर्गासाठी शाळेद्वारे खडू, फळा व आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरविले जाते. शाळा व्यवस्थापन समिती व पालकांच्या वतीने जागा उपलब्ध करून दिलेली आहे. रात्रशाळा वर्गामध्ये प्रगत विद्यार्थी

मार्गदर्शन करतात तसेच काही अडचण आल्यास व्हिडिओ–कॉलद्वारे शिक्षकांचे मार्गदर्शन त्यांना मिळते. वेळोवेळी शिक्षकांच्या भेटीद्वारे वर्गाच्या अडचणी सोडविल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी निर्माण होण्यास व त्यांच्या अध्ययन स्तरांमध्ये सुधारणा होण्यास मदत झालेली आहे.

### अफलातून बचत बँक



विद्यार्थ्यांना बचतीची सवय लावणे, बँकेच्या व्यवहाराची व चलनाची ओळख करून देणे या हेतूने बचत बँक सुरू केली. गावातील विद्यार्थ्यांना बचतीचे महत्व माहीत नसल्यामुळे त्यांच्यामध्ये अनावश्यक पैशाच्या खर्चाचे प्रमाण जास्त होते. ही समस्या सोडवण्यासाठी अफलातून बचत बँक हा उपक्रम शाळा स्तरावर उपयुक्त ठरतोय. पालकांनी खाऊसाठी दिलेल्या पैशाची बचत करण्याचे आव्हान मुलांना शाळेद्वारे केल्यामुळे बचतीची सवय लागली आहे. बचतीच्या पैशाद्वारे शाळेतील ग्राहक भांडारमधून आवश्यक लेखन साहित्य विद्यार्थी स्वतः खरेदी करतात. यामुळे पालकांचा आर्थिक बोजा कमी होण्यास खूप मदत झालेली आहे. उपक्रमास पालकवर्गातून चांगला प्रतिसाद मिळतोय. दर गुरुवारी मुले बचत बँकेत पैसे टाकतात. बँकेचे व्यवस्थापन विद्यार्थ्यांद्वारे केले जाते व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षकांची नेमणूक केलेली आहे. बँकेत सद्यस्थितीत १ लाख ९ हजार रुपये जमा असून जमा रकमेवरील व्याजातून आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य पुरविले जाते. यामुळे या उपक्रमाची उपयुक्तता दिसून येते.

### ग्राहक भांडार

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य माफक दरात वेळेवर मिळणे या हेतूने ग्राहक भांडार सुरू झाले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे वेळेचा अपव्यय होऊन अध्ययन–अध्यापन कार्यात अडचण निर्माण झाली होती. यासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य उदा. वही, पेन, पेन्सिल, खोडरबर, बेल्ट, टाय इत्यादी साहित्य 'ना नफा ना तोटा' या तत्वावर शालेय स्तरावर उपलब्ध करून दिल्यामुळे वेळ व पैशाची बचत होण्याची मदत झाली आहे. अफलातून बचत बँकेत जमा पैशातून आवश्यक शैक्षणिक साहित्य विद्यार्थी खरेदी करतात.याविषयी आवश्यक नोंदी व खर्चाचे विवरण ग्राहक भांडार समितीद्वारे ठेवले जाते.

### दप्तराचे ओझे कमी करणे

निकषानुसार दप्तराच्या ओझ्यावर नियंत्रण ठेवणे व विद्यार्थ्यांमध्ये पाठ्यपुस्तकांची देखभाल ठेवण्याची जबाबदारी निर्माण करणे हा या उपक्रमाचा हेतू आहे. विद्यार्थ्यांच्या पाठीवर आवश्यकतेपेक्षा जास्त दप्तराच्या ओझ्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे शाळेत विद्यार्थी समिती निर्माण करण्यात आलेली आहे. ही समिती वजनकाट्याने दफ्तराचे वजन मोजते व आवश्यक सूचना देण्याचे काम करते. यामुळे मुलांना मोजमाप करण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो तसेच पाठ्यपुस्तक संचाची हाताळणी व्यवस्थित केली जाते. पाठ्यपुस्तक समिती ही वर्षभर पाठ्यपुस्तक सुरक्षित ठेवण्यासाठी देखरेख करते. सत्राच्या शेवटी विद्यार्थ्यांकडून पाठ्यपुस्तके जमा करून ती पुढील वर्गांना वितरीत करण्यात येतात. यामुळे जुने सुरक्षित पाठ्यपुस्तक संच व नवीन पाठ्यपुस्तक संच यांची सांगड घातली जाते. दोन्ही संचापैकी एक संच घरी व एक संच शाळेतच ठेवल्यामुळे दप्तराचे ओझे कमी होते.

### मी वर्गनायक होणार

अभ्यासाची आवड निर्माण करणे व निकोप स्पर्धा वाढीस लागावी यासाठी 'मी वर्ग नायक होणार' हा उपक्रम शाळेमध्ये नियमितपणे सुरु आहे. महिन्याच्या १ तारखेला अध्यापन केलेल्या घटकावर आधारित स्वाध्यायाचे लेखन आयोजन करण्यात येते. उत्कृष्ट स्वाध्याय सोडविणाऱ्या विद्यार्थ्यास वर्गाचा वर्गनायक म्हणून नेमणूक केली जाते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण होऊन अभ्यासाची गोडी निर्माण झालेली आहे.

### विद्यार्थी दिनचर्या वेळापत्रक

विद्यार्थ्यांमध्ये दैनंदिन जीवनात शिस्त व चांगल्या सवयीची जोपासणे करणे यासाठी शाळेमार्फत विद्यार्थी दिनचर्या वेळापत्रकाचे वाटप करण्यात येते. वेळापत्रकात विद्यार्थ्यांसाठी सकाळी लवकर उठणे, व्यायाम, नाश्ता, अभ्यास, खेळ इत्यादी कामासाठी दिवसाच्या वेळेची विभागणी केलेली आहे. वेळापत्रक हे घरात दर्शनी भागात लावण्याच्या सूचना शाळेच्या माध्यमातून दिल्या जातात. यानुसार विद्यार्थी दिनचर्येचे पालन करतो की नाही हे पाहण्याची जबाबदारी पालकांची आहे. यामुळे पालकांचे लक्ष त्यांच्या पाल्याकडे जाते व विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व चांगल्या सवयी निर्माण होण्यास मदत मिळालेली आहे. अडचण निर्माण झाल्यास पालक शिक्षकासोबत संपर्क करतात.

### माझे हस्ताक्षर

विद्यार्थ्यांमध्ये वळणदार हस्ताक्षर काढण्याची गोडी निर्माण व्हावी यासाठी 'माझे हस्ताक्षर' हा उपक्रम राबविला जातो. आठवड्याच्या सोमवारी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांपैकी निवडक ७ विद्यार्थ्यांची (मराठी व इंग्रजी हस्ताक्षरापैंकी) उत्कृष्ट हस्ताक्षराची निवड करून फलकावर संपूर्ण आठवडाभर हस्ताक्षर लिहिलेली कात्रणे लावली जातात. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सुंदर हस्ताक्षर काढण्याची सवय निर्माण झालेली आहे. हस्ताक्षर सुधारण्यासाठी निकोप स्पर्धा निर्माण झाली.

### सांकेतिक लिपी

मनोरंजक, आनंददायी पध्दतीने मुळाक्षर व शब्दांची ओळख करून देणे हा या उपक्रमाचा हेतू आहे. लहान मुले प्रत्यक्ष खेळातून लक्षपूर्वक, आनंदाने चांगल्याप्रकारे अध्ययन करतात. यासाठी मराठी व इंग्रजी मुळाक्षरे संकेतांचा अवलंब करून मुळाक्षरे व शब्द ओळखतात. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शब्दसंग्रहात वाढ झालेली आहे.

विदर्भाच्या शेवटच्या टोकावरील उमरखेड तालुक्यामध्ये शालेय स्तरावर 'अभिनव उपक्रम' राबविणारी जिल्हा परिषद शाळा म्हणून बिटरगाव (खुर्द) चा उल्लेख होतो. आम्हाला अभिमानाने सांगावेसे वाटते की यासाठी शालेय व्यवस्थापन समिती, पालकवर्ग, शिक्षक आणि सर्व प्रशासकीय अधिकारी या सर्वांचा प्रत्यक्ष सहभाग व सहकार्य अनमोल ठरते. 'शिक्षित करूया समाज' या उक्ती प्रमाणे गावामध्ये शैक्षणिक दीप अखंडितपणे प्रज्वलित ठेवण्याचा प्रयत्न आमचा सात शिक्षकांचा संघ मनापासून करतो आहे.

मुख्याध्यापकः श्री. अरविंद नागोराव जाधव, संपर्क : ९४०३६ ०७५२६



# १८. एकच ध्यास, गुणवत्ता विकास



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खेड, ता. मोर्शी, जि. अमरावती**

'शाळा आणि समाज यांचे दृढ नाते शाळेच्या गुणवत्ता विकासाचा सर्वोत्तम मार्ग आहे' या विधानाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खेड होय. अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील खेड या छोट्याशा गावातील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा ही एक प्रयोगशील, डिजिटल व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास असलेली शाळा आहे. वर्षभर विविध उपक्रमांची रेलचेल या ठिकाणी पहावयास मिळते.उपक्रमांच्या आयोजनात समाज व शाळा तितक्याच तन्मयतेने सहभागी होतात हे विशेष. एकीकडे इंग्रजी शाळांकडे पालकांचा वाढता लोंढा व जिल्हा परिषदेच्या शाळेतील घटती विद्यार्थी संख्या हा चिंतेचा विषय बनत असताना आम्ही मात्र लोकसहभागातून अनेकविध आव्हानांवर मात करून विद्यार्थी संख्येत भरघोस वाढ करता येते ही किमया साधली आहे. 'ही आवडते मज मनापासूनी शाळा लाविते लळा ही जसा माऊली बाळा' हा विचार आमचे विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांच्या मनात निर्माण झाला आहे. उपक्रमशील मुख्याध्यापक, सर्जनशील शिक्षक, मदतीला तत्पर असणारे ग्रामस्थ व होतकरू विद्यार्थी या चतु:सुत्रीने या शाळेचा चेहरामोहराच बदलून गेला आहे.

**लोकसहभागातून भौतिक सुविधा**

शाळेत मागील चार वर्षाआधी सार्वत्रिक बदलीने आम्ही सात उपक्रमशील शिक्षक आणि सृजनशील मुख्याध्यापक नव्याने रुजू झालो. सन १८९७ साली स्थापन झालेल्या या ऐतिहासिक शाळेची भौतिक स्थिती पाहून आम्ही अस्वस्थ झालो. अस्वस्थतेला सर्जनशील वाट मिळवून देत आम्ही निश्चय केला की समाजाचा विश्वास संपादन करायचा आणि समाज सहभागातून शाळा सर्वांग सुंदर करायची. छोट्या छोट्या बाबीं पासून सुरुवात केली आणि काही दिवसातच शाळेने जणू कातच टाकली. शाळेतील अध्ययन पूरक वातावरणाचा परिणाम सहाजिकच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होऊन त्यात कमालीची सुधारणा झाली. मुख्याध्यापक व शिक्षकांनी पुढाकार घेऊन स्वतः प्रिंटर, झेरॉक्स मशीन व इतर साहित्य असे ४० हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य खरेदी केले. हा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समस्त गावकरी, शाळा व्यवस्थापन समिती आणि वनव्यवस्थापन समितीने संपूर्ण शाळेची रंगरंगोटी व सजावट करण्यासाठी एक लक्ष रुपयांची भरघोस मदत केली. या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना बसण्यासाठी २००० स्क्वेअर फुटांची ९००० रुपये किमतीची ग्रीनमॅट, १५००० रुपये किमतीचा लाऊडस्पीकर संच, १२००० रूपये किमतीचे शालेय बँड साहित्य देण्यात आले. मुख्याध्यापक कक्षाचे नूतनीकरण व सौंदर्यीकरण करण्यासाठी २५ हजार रुपयांची मदत केली. ग्रामपंचायतीच्या वतीने शाळा परिसरात पेव्हर ब्लॉक बसवण्यात आले. शाळा १००% डिजिटल करण्यात आली. शाळेच्या दर्शनी भागाचे सौंदर्यीकरण करणे, जलशुद्धीकरण यंत्र व सौरऊर्जा संच यासाठी एकंदरीत ५ लक्ष ५० हजार रुपयांची कामे करण्यात आली. महिला स्वयं सहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून

४८००० हजार रुपयांची आर्थिक मदत झाली.सोबतच गावकऱ्यांच्या सहभागातून १ लक्ष ४८००० रुपयांची लोकवर्गणी जमा करण्यात आली.

स्थानिक विधानसभा मतदार संघाच्या आमदारांनी या शाळेबद्दल ऐकून शाळेला भेट दिली. कोरोना काळात सुरू असलेल्या उत्तम कामकाजाबाबत व शाळेच्या सार्वत्रिक उत्कर्षाबाबत शाळेचा गौरव केला व शाळेला डिजिटल क्लासरूम तयार करून दिली. विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाकरिता ग्रामपंचायतीच्या सहकार्याने तब्बल १७००० स्क्वेअर फुटाचे मैदान उपलब्ध करून देण्यात आले. तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या माध्यमातून 3 लक्ष रुपयांचे क्रीडा साहित्य प्राप्त झाले.

**शैक्षणिक गुणवत्ता**

शाळा भौतिक साहित्याने समृद्ध झाली. आता शाळा पूर्ण क्षमतेने शैक्षणिक गुणवत्ता साध्यतेसाठी सज्ज झाली होती. लोकांना इंग्रजी शाळेविषयी असलेले आकर्षण लक्षात घेऊन सर्वप्रथम शाळेमध्ये इंग्रजी स्पीकिंग क्लास सुरू करण्यात आला. ज्यामध्ये दैनंदिन जीवनातील आवश्यक सूचना व शिष्टाचार संबंधीची कार्यशाळा चालवण्यात आली. तद्नंतर सोपी सोपी इंग्रजी वाक्ये बनवून त्याचा आपल्या कुटुंबात उपयोग करण्यासाठी मुलांना प्रोत्साहित करण्यात आले. याचा परिणाम मुलांमधील इंग्रजी विषयाची भीती दूर होण्यासाठी झाला.

वर्तमान युगातील स्पर्धेची चाहूल घेत शाळेमध्ये सामान्यज्ञान व स्पर्धा परीक्षा वर्ग सुरू करण्यात आले. यामध्ये शाळेतील शिक्षकांच्या क्षमतांचा सुयोग्य वापर करून घेत आपल्या उच्चतम योगदानाकरीता प्रोत्साहित केले. परिणाम स्वरूप येथील विद्यार्थी तालुकास्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा, पालकमंत्री चषक सामान्यज्ञान स्पर्धेत प्रथम क्रमांकासह चमकू लागले. सोबतच जवाहर नवोदय प्रवेश परीक्षेसाठी पात्र ठरले.

**तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर**



माहिती तंत्रज्ञानाचा विचार करुन शाळेतील सर्व वर्गखोल्या डिजिटल करण्यात आल्या. विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानाचा उचित उपयोग करण्यात येऊ लागला. तंत्रज्ञानामध्ये दिक्षा ॲप, बोलो ॲप, पी स्कूल ॲप, युट्युब, गुगल इत्यादी शैक्षणिक ॲप्स व साधनांचा प्रयोग करीत विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आवड व ज्ञानलालसा निर्माण करण्यात शाळा यशस्वी ठरली. विशेषत: जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा खेड ही पूर्णता 'डस्ट फ्री स्कूल' आहे. येथे मुलांसाठी मॅग्नेटिक बोर्डचा वापर केला जातो. एकंदरीत उपक्रमांचा परिणाम मुलांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढवण्यासाठी झाला. दैनंदिन अध्यापनात कृतीयुक्त, विद्यार्थी केंद्रित, रचनावादी अध्यापन तंत्राचा उपयोग केल्यामुळे मुलांच्या शैक्षणिक संपादणूक पातळीत आश्चर्यकारक वाढ झाली. इयत्ता पहिलीचे विद्यार्थी जुलै महिन्यात परिच्छेदाचे वाचन करू लागले. हा प्रयोग यशस्वी झाल्यामुळे केंद्रातील इतर शाळांसाठी कार्यशाळा घेतली. या मूलभूत वाचन क्षमता कार्यशाळेचा उपयोग इतर शाळांना सुध्दा झाला. गणित विषयाची आवड निर्माण होण्यासाठी कृतीयुक्त व वास्तवदर्शी पद्धतीने उपलब्ध गणित पेटीचा प्रभावी उपयोग करण्यात येऊ लागला.

## बचतीचे संस्कार

मिळवलेल्या ज्ञानाचे उपयोजन करण्यासाठी शाळेमध्ये 'विद्यार्थी बचत बँक व साहित्य भांडार' हा उपक्रम सुरू करण्यात आला. गणित दैनंदिन जीवनात उतरविण्यात शाळा यशस्वी ठरली. या संस्थेचे व्यवहार विद्यार्थी स्वतः हाताळू लागले. परिणामतः विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची आवड निर्माण झाली. बचतीची सवय लागली. यातून विद्यार्थ्यांनी जवळपास ६०००० रू.ची बचत जमवली.

## वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणूक

विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची आवड निर्माण होण्यासाठी 'दैनंदिन जीवनातील विज्ञान' सदराखाली मित्रपरिवारातील विज्ञान शिक्षकांच्या मार्गदर्शन कार्यशाळा, प्रयोग वर्ग, शालेय विज्ञान प्रदर्शन इत्यादी उपक्रम राबविण्यात येऊ लागले. परिणामी रोजच्या जीवनातील विज्ञान समजणे मुलांना सोपे झाले. परिसराचे जाणीवपूर्वक निरीक्षण करण्याची दृष्टी मुलांमध्ये निर्माण करण्यासाठी क्षेत्रभेटी व सहलीचे आयोजन केले. त्यातून निरीक्षण क्षमतेचा विकास करण्यात मदत झाली. भेटीनंतर वृत्तांत लेखनाकरीता विद्यार्थ्यांना प्रेरीत करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या लेखन साहित्याच्या अडचणींवर मार्ग काढत मोठ्या प्रमाणात कृतीपत्रिका, गृहपाठ चित्रमय व प्रिंटेड स्वरूपात पुरवण्यास सुरुवात केली. त्यामुळे मुलांमधील गृहपाठ करण्याची निरसता दूर होऊन मुले आनंदाने गृहपाठ करु लागली. कोरोना काळात तर अशा कृती पत्रिकांचा खूपच उपयोग झाला. सर्व विषयांच्या एकत्रित कृतीपत्रिका बनवून नियमितपणे विद्यार्थ्यांकडून सोडवून घेण्यात येऊन त्रुटींबाबत मार्गदर्शन करण्यात येऊ लागले. परिणामतः विद्यार्थी सातत्याने शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यास मदत झाली. शिक्षकांच्या रजा काळात तथा प्रशिक्षण काळात गावातील सुशिक्षित तरुण मंडळी आपली शैक्षणिक सेवा शाळेसाठी देऊ लागले. पर्यायाने समाज व शाळेची जवळीकता वाढण्यास मदत झाली.

## विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

शालेय शिक्षणासोबतच शारीरिक शिक्षणाकडे दुर्लक्ष होता कामा नये म्हणून एरोबिक्स, योगा व कवायतींचा कल्पकपणे वापर करण्यात येतो. त्यामुळे मुलांमध्ये शारीरिक शिक्षणाविषयी आवड निर्माण झाली. मुले शारीरिक शिक्षणाच्या तासाची वाट पाहू लागली. शालेय शिक्षणासोबतच मानवी मूल्ये, मुलांचा भावनिक व सामाजिक विकास, वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे तथा संस्कृती संवर्धन सुद्धा गरजेचे आहे. यासाठी शाळेमध्ये अनेकविध सहशालेय उपक्रमांचे आयोजन सतत करण्यात येत असते. जसे स्नेहसंमेलन, उन्हाळी छंद शिबिरे, दहीहंडी स्पर्धा, ख्रिसमस, केक मेकिंग कार्यशाळा, आनंद बाजार, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा यासारखे उपक्रम राबवले जातात. त्यातून मुलांना आपल्या अभिव्यक्तीसाठी मुक्त वाव मिळतो व शाळेविषयीची भीती दूर होण्यास मदत होते. वैयक्तिक विकासासोबतच सामाजिक उपयुक्ततेच्या दृष्टिकोनातून शाळा 'स्वच्छता अभियान', 'तंबाखू मुक्त शाळा', 'पर्यावरण सप्ताह', 'वन्यजीव सप्ताह' सारखे समाजोपयोगी उपक्रम शाळा राबवित असते. त्यातून सामाजिक आरोग्य व पर्यावरण विषयक जागरूकता होण्यास मदत झाली.

शाळेतील नावीन्यपूर्ण उपक्रम, विद्यार्थ्यांची वाढलेली संपादणूक पातळी, शालेय शिस्त इत्यादी बाबत समाजात चर्चा होऊ लागली. याचा परिणाम शाळेची पटसंख्या वाढण्यास झाला. आता शाळेची पटसंख्या २०१ वर पोहोचली आहे. ज्यामध्ये स्वयं अर्थसहाय्यित शाळेतून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या उल्लेखनिय आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'सन्मान गुणवत्तेचा– सन्मान प्रेरणेचा' या अभिनव उपक्रमांतर्गत खेड शाळा मोर्शी तालुक्यातून अग्रमानांकित ठरली. शाळेला २१००० रूपयांचे रोख बक्षीस प्राप्त झाले. याबाबींचा परिणाम लोकमनावर होऊन, अनेक अडचणींवर मात करीत पालकांनी स्वतः पुढाकार घेवून इयत्ता ५ वीचा वर्ग शाळेला जोडला.

शाळेतर्फे दरवर्षी 'आदर्श विद्यार्थी पुरस्कार' दिला जातो. ज्यामध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक, मूल्ये, सहकाऱ्यांशी वर्तन इत्यादी बाबींचा विचार केला जातो. हा पुरस्कार देत असतांना 'आई वडील व विद्यार्थी' यांना मानपत्र, शाल, श्रीफळ व २१०० रूपये रोख देऊन सन्मानित करण्यात येते. शिवाय गावातील इयत्ता १० वी व १२ वी मध्ये उत्कृष्ट यश प्राप्त करणाऱ्या गावातील विद्यार्थ्यांना त्यांच्या आई–वडिलांसह जि.प. प्राथ. शाळा खेडकडून गौरविण्यात येते. अशाप्रकारे शाळा आपले सामाजिक उत्तरदायित्व सुद्धा पूर्ण करत आहे. शाळेने आदर्श शाळा प्रस्ताव पाठविला आहे. शाळेची 'भविष्यवेधी योजना' तयार असून त्यामध्ये संगणक प्रयोगशाळा, संपूर्ण संगणीकृत दप्तर व ISO मानांकन इत्यादी बाबींसाठीची नवीन योजना तयार आहे.

वरील सर्व बदल एका व्यक्तीमुळे झालेले नसून यामागे शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक, समस्त होतकरू शिक्षक, कार्यक्षम शाळा व्यवस्थापन समिती व संवेदनशील समाज यांची प्रचंड मेहनत, कर्तव्याप्रत निष्ठा आणि सातत्य आहे. त्यामुळेच आमच्या शाळेसाठी 'पालकांची शाळा' हे नामाभिधान सार्थ ठरू पाहत आहे.

मुख्याध्यापक : श्री. निळकंठ किसनराव यावले, संपर्क : ९४२०१ ९१०७४

# १९. खडतर वाटेवरचा आशादायक प्रवास



**जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा भिंगारा, ता. जळगाव जामोद, जि. बुलढाणा**

मध्यप्रदेशाच्या सिमेलगत सातपुडा पर्वतरांगांमध्ये वसलेले बुलढाणा जिल्ह्यातील एक अवघड क्षेत्रातील आदिवासी गाव आणि थंड हवेचं ठिकाण म्हणजे भिंगारा. समुद्रसपाटीपासून सुमारे २२०० फूट उंचीवर असलेल्या या गावात आदिवासीतील भिलाला या समाजातील लोकबाहुल्य आहे. येथे जिल्हा परिषदेची सन १९७४ मध्ये स्थापन झालेली आमची उच्च प्राथमिक शाळा आहे. इयत्ता १ ली ते ८ वीच्या वर्गांमध्ये २८१ विद्यार्थी शिक्षण घेतात. अंबाबरवा अभयारण्याचे पूरक वनक्षेत्र असलेले १७८० लोकसंख्येचे हे गाव रस्ता, दळवळणाची साधने, सार्वजनीक वाहतूक, वीज या मूलभूत सुविधांपासून आजही वंचित आहेत.

शालेय अभ्यासक्रमाची प्रमाणभाषा आणि स्थानिक रहिवाशांची बोलीभाषा यामुळे येथील शिक्षकांना अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत भाषेची सर्वात मोठी अडचण नेहमीच जाणवते. विद्यार्थ्यांची भाषा जेमतेम आत्मसात करून मोडक्या–तोडक्या भाषेत शिकविणे या पारंपरिक मार्गाचा अवलंबच यापूर्वीच्या अनेक शिक्षकांनी केला होता. वर्गात शिकवायला गेल्यानंतर समोर बसलेल्या विद्यार्थ्यांचे निरागस चेहरे आणि अध्ययन–अध्यापन प्रक्रियेनंतर त्यांची कायम असलेली निर्विकारता आम्हा शिक्षकांच्या मनाला सतत सलत होती. विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित संपादणूक पातळी गाठण्याचे लक्ष्य त्यांच्यासाठी कायम जिकरीचेच ठरलेले. आज या शाळेत ८ शिक्षक कार्यरत आहेत. त्यापैकी दोघे वगळता उर्वरीत ६ शिक्षकांना येथे येऊन साडे तीन–चार वर्षे झालेली आहेत. शाळेत रूजू झाल्यानंतर सुरुवातीचा काळ हा काळ्यापाण्याची शिक्षा मिळाल्यासारखाच वाटत होता ही शिक्षकांची प्रतिक्रिया येथील परिस्थितीचे वास्तव सांगणारी आहे.

कोविड महामारीमुळे मागील दोन वर्षात झालेली शिक्षणाची परवड आमच्यासाठी फार मोठे आव्हान उभी करणारी ठरली. जवळपास दोन वर्ष नियमित व सातत्यपूर्ण शिक्षणात पडलेला खंड विद्यार्थ्यांबरोबरच आमच्यासाठी सुध्दा कसोटीचाच ठरला. मूलभूत सुविधांच्या अभावामुळे शाळा बंद पण शिक्षण सुरू हा उपक्रम सुध्दा येथे व्यवहार्य ठरू शकला नाही. २८१ पैकी केवळ २७ विद्यार्थ्यांच्या पालकांकडे असलेले दुय्यम दर्जाचे स्मार्ट फोन,सभोवताली वनक्षेत्र असल्याने संवाद छायेचा प्रदेश, गावालगतच्या उंचीवरच्या विशिष्ट ठिकाणीच गेल्यानंतर मिळणाऱ्या संवाद लहरी अशी सर्व परिस्थिती शिक्षकांसह विद्यार्थ्यांची कसोटी बघणारीच होती.

मधल्या काळात कोविड निर्बंधात आलेल्या शिथिलतेमध्ये विद्यार्थी जरी शाळेत उपस्थित राहू शकत नसले तरी शिक्षकांना मात्र उपस्थितीची मिळालेली मुभा येथील शिक्षकांना दिलासा देणारी ठरली. शिक्षणाच्या मर्यादित वाटा उपलब्ध असलेल्या या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील एक मोठा कालखंड हा महामारीच्या आव्हानामुळे अतोनात नुकसानदायक ठरणार, ही दरम्यानच्या काळात झालेली जाणीव, अस्वस्थ करणारी होती. या अस्वस्थेतून शाळेमध्ये दररोज उपस्थित राहणाऱ्या आम्हा शिक्षकांमध्ये कण्हत कण्हत जगायचं की, गाणं म्हणत.. हे एक सकारात्मक वैचारिक मंथन सुरू झाले. या मंथनातून आम्ही निवडला भाषा समृध्दीचा मार्ग. प्रमाण भाषा आणि बोली भाषा यातील भिन्नता या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीतील कायम अडसर ठरू शकतो. हा अडसर जर प्रयत्नपूर्वक दूर केला तर भाषेसोबतच इतर विषयांच्या अध्ययनात या विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर होतील या विचारांवर सर्वांचे



एकमत झाले. त्यामुळे श्रवण, भाषण, वाचन, लेखन आणि संवाद हा शिक्षणशास्त्रातील भाषा विषयाचा विकास क्रम कसा साध्य करता येईल यादृष्टीने नियोजन व कृतीप्रवणता विचारात घोळू लागली. कुटूंबात बोलली जाणारी हिंदी, गुजराती आणि पारंपरिक शब्दांची भेसळ असलेली बोलीभाषा आणि अभ्यासक्रमाची प्रमाणभाषा ही दरी जर भरून काढली तर कोविड निर्बंधमुक्तीनंतर शाळा सुरु झाल्यानंतर विद्यार्थी अत्यल्प काळात शैक्षणिक प्रवाहात कसे आणता येतील यादृष्टीने प्रयत्न करण्याचे ठरले. त्यावेळी एकीकडे प्रमाणभाषा बोलू शकणारे ८ शिक्षक आणि दृकश्राव्य माध्यमांची उणीपुरी उपलब्धता श्रवण कौशल्य विकसित करण्यास पुरेशी नाही हे जाणवले होते.

त्यामुळे भाषण कौशल्य विकसनाचा दुसरा टप्पा सुध्दा आव्हानात्मकच ठरणार होता.सोबतच अपुरे साधनस्त्रोत, शाळेला आवश्यक खर्चासाठी उपलब्ध होणारे अल्प अनुदान ही समस्या देखील होती. मात्र पुढचा मार्ग सरळ करायचा असेल तर या प्रथमदर्शनी समस्यांना जखडून चालणार नाही हे आम्ही ओळखले. मग निर्धार केला शाळेच्या भिंती, वर्गखोल्या, परिसर आणि हळू हळू आपले गावच प्रमाण भाषेत बोलके करायचा!

विद्यार्थी जरी शाळेत नसले तरी अंशतः कोविड निर्बंध मुक्तीमुळे शिक्षकांची शाळेतील उपस्थिती व गृहभेटी सुरू झाल्या होत्या. सर्वांनी भाषा विकास या उपक्रमाच्या दृष्टीने जुळवा जुळव सुरू केली. इयत्ता १ ते ८ च्या सर्व विद्यार्थ्यांचा विचार करून आणि त्यातही शाळेची ओळखच नसलेल्या इयत्ता १ ली व २ री च्या विद्यार्थ्यांच्या संभाव्य अडचणी लक्षात घेऊन अभ्यासक्रमातील पायाभूत घटकांची निश्चिती केली. शब्द, चित्र, संकल्पना असा सगळा विचार करून रंगसंगती ठरवली. आम्ही सर्व शिक्षकांनी मिळून स्वतःच शाळेची रंगरंगोटी सुरू केली. काही बाबतीत नजीकच्या शहरातील व्यावसायिक चित्रकारांची मदत घेतली आणि संपूर्ण शाळाच बोलकी केली. आता पुढचा प्रवास सुरू झालाय, शाळेचा परिसर आणि गावातील घरांच्या भिंती बोलक्या करण्याचा.

आमच्या शाळेतील मुलं सर्वच बाबतीत शहरी भागातील इतर मुलांसारखी आहेत. तथापि भाषाविषयक दरी हीच यांच्या शैक्षणिक विकासातील अडसर ठरत असल्याचा अनुभव आम्हाला आला. मागील काळात शिक्षकांची आणि विद्यार्थ्यांची जी परस्पर संवादप्रक्रिया स्थापित झाली होती त्यामध्ये कोविडमुळे शाळा बंद झाल्याने मोठा खंड निर्माण झाला होता. ऑनलाईन शिक्षणाची सुविधा ही आमच्यासाठी अशक्यप्रायच ठरली. त्यामुळे शाळा सुरू झाल्यानंतर सर्व विद्यार्थी पुन्हा कोरी पाटी म्हणून समोर येतील ही भिती वाटायची. या पार्श्वभूमीवर कोविड नंतर विद्यार्थी–शिक्षक–शाळा ही आंतरक्रिया कमी कालावधीत घडून यावी, विद्यार्थ्यांना येणाऱ्या भाषेच्या अडचणी अत्यल्प वेळेत सुरळीत व्हाव्यात, पुन्हा शाळेची गोडी वाढावी आणि यापूर्वी शैक्षणिक प्रवाहात असलेल्या विद्यार्थ्यांच्या स्मृतीपटलावरील शैक्षणिक संकल्पना जागृत व्हाव्यात यासाठी आमचा भाषा विकासाचा उपक्रम फलदायी ठरला आहे.

सर्व सोपे शब्द, वाक्य, संकल्पना येता जाता डोळ्यासमोरून गेल्यानंतर मुले स्वयंप्रेरणेनेच सर्व विषयांची पाठ्यपुस्तके हाताळत आहेत. उपलब्ध शैक्षणिक साहित्य हाताळून रचनात्मकतेकडे त्यांचा कल दिसून येत आहे. ज्ञानरचनावाद या पायाभूत संकल्पनेतीलच हा भाग आहे. मात्र स्थानिक विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन भाषिक दरी भरून काढल्यास भाषा समृध्दी बरोबरच अभ्यासक्रमातील इतर अध्ययन क्षमतांच्या संपादणूकीसाठी तो आपोआप पूरक ठरणार असून मुलांना अत्यल्प वेळेत नियमित शैक्षणिक प्रवाहात जलद गतीने रूळण्यासाठी तो उपयुक्त ठरू शकतो अशी या प्रयोगामागची धारणा आहे.

कोविड खंडानंतरचा शैक्षणिक प्रवास जलद व सुलभ होण्याबरोबरच पुढील दीर्घ सुट्टी कालावधीत सुद्धा या गावातील व

परिसरातील सर्व विद्यार्थ्यांसाठी हे आंतरक्रियेचे माध्यम राहणार आहे. त्यासाठी गावातील विशिष्ट ठिकाणांची निश्चिती करून गाव देखील बोलकं करण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे. त्याचप्रमाणे येणाऱ्या नवीन शिक्षकांना सुध्दा येथील शैक्षणिक वातावरणात समरस होण्यासाठी सुलभ जावे असा आमचा प्रयत्न आहे.



**क्रीडा क्षेत्रात गगन भरारी**

भिंगारा हे आदिवासी क्षेत्र असल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व किंवा स्पर्धे विषयीची पालकांना जाणीव नव्हती त्याबाबतीत विचारल्यास ते नेहमीच म्हणायचे, 'पढाय लीखाय काय करी रे, पछाय खेतम हल जोतना छे'. आमच्यापुढे पालकांची मानसिकता बदलणे हा सर्वात मोठा प्रश्न होता त्यासाठी प्रत्येक खेळाडूच्या पालकांची वारंवार भेट घेऊन त्यांना खेळाच्या महत्त्वाची जाणीव करून दिली तत्पूर्वी हे पालक आपल्या मुलींना स्पर्धेच्या सरावासाठी पाठवत नव्हते. पालकांची जनजागृती झाल्यानंतर पालक मुलींना स्वखुशीने सरावासाठी पाठवू लागले मात्र २०१८-१९ मध्ये शाळेने चांगली कामगिरी करत सुरुवात केली व २०१९-२० मध्ये मात्र इतिहासात कधीही न घडलेली कामगिरी करत जिल्ह्याचे सर्वसाधारण विजेतेपद खेचून आणून तालुक्याचे नाव रोषण केले.

**मित्र उपक्रम**

मानसिक स्वास्थ्यावर शारीरिक स्वास्थ्य अवलंबून असते, म्हणून शारीरिक स्वास्थ्याबरोबर मानसिक स्वास्थ्य विद्यार्थ्यांना लाभावे यासाठी आमच्या शाळेत विपश्यना विद्येतील आनापान साधना १० मिनिटे नियमित घेतली जाते. यामुळे विद्यार्थ्यांचे मन शांत होऊन त्याचे मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. मन श्वासाच्या आधारावर एकाग्र करण्याच्या या सरावामुळे अभ्यासात एकाग्रता आपोआप साधली जाते त्याचप्रमाणे प्रामाणिकपणा एकाग्रता सचोटी हे गुण त्यामुळे त्यांना आत्मसात होतात.

**सेंद्रिय शेती, परसबाग**

मैदानातील कुंपणालगतची जास्त उपयोगात नसलेली जागा निवडून त्यावर आम्ही परसबाग लावण्याचे ठरवले त्यासाठी सर्व शिक्षक व पालकांनी स्वतः शारीरिक श्रम करून असलेली जागा स्वच्छ करून त्यावर परसबाग लावली. त्यासाठी लागणारे पाण्याचे नियोजन पाण्याचा पुनर्वापर करून केले गेले. जेव्हा परसबाग फुलायला लागली तेव्हा विद्यार्थी परसबाग व शाळेकडे आकर्षित होऊ लागले.

**विद्यार्थी विकास बँक**

विद्यार्थी हे रोज बाहेरचा दूषित व उघड्यावरचा खाऊ खातात त्यामुळे त्यांचे स्वास्थ्य बिघडते परिणामी त्यांचे शैक्षणिक तसेच आरोग्यविषयक नुकसान होते व पैशाचा पण अपव्यय होतो. हे टाळण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांची सभा घेऊन त्यांना बचतीचे महत्त्व समजून सांगितले गेले, तेव्हा सर्व मुले ही बचत करण्यासाठी तयार झाली. शिक्षकांच्या कल्पकतेतून मग ही बचत बँक उदयाला आली. या बँकेचे नाव विद्यार्थी विकास बँक असे ठेवण्यात आले.

या बँकेचे सर्व व्यवहार हे विद्यार्थीच पाहतील व त्यामध्ये शिक्षकांच्या मार्गदर्शनाशिवाय कोणताही हस्तक्षेप राहणार नाही असे ठरवण्यात आले. खूप छान पद्धतीने ही बँक विद्यार्थ्यांनी चालवली.

**महिला सक्षमीकरण**

आदिवासी समाजामध्ये महिलांना विशेष महत्त्व असते त्याचप्रमाणे आमच्या शाळेतही विद्यार्थीनींना विशेष महत्त्व देऊन त्यांचा विकास केला जातो केवळ शालेय बाब म्हणूनच नव्हे तर भविष्यातील शिक्षणासाठी मार्गदर्शन केले जाते. दरवर्षी महिला सक्षमीकरण सप्ताह हा मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. मुलींची बैलगाडीमधून पूर्ण गावात मिरवणूक काढली जाते व समाजातील जे लोक मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवतात अशा लोकांचे प्रबोधन केले. त्याचप्रमाणे विशेष कार्य किंवा विशेष पदावर असलेल्या महिलांचा शाळेमार्फत गौरव करण्यात येतो. याच गोष्टीमुळे गावातील महिला भगिनी व शाळेतील विद्यार्थीनी यांचे शाळेशी भावनिक नाते जोडले जाते.

'हमरी स्कूल बेस्का वारलू छे'! ही आमच्या विद्यार्थ्यांची व पालकांची प्रतिक्रिया आम्हांला खूप आनंद देते आणि काम करण्यास प्रोत्साहित करते. एकंदरीत कोविडच्या दीर्घ शालेय खंडानंतर जलद शैक्षणिक आंतरक्रिया घडवून आणण्यासाठी भाषा समृद्धीचा येथील शिक्षकांचा हा बोलका प्रयोग काळाच्या कसोटीवर यशस्वी ठरावा अशी आशा करू या!

मुख्याध्यापक : श्री. हनुमान इंगळे, संपर्क : ८२७५२ ९२२९१

# २०. कानशिवणीमध्ये फुलला ज्ञानाचा मळा



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कानशिवणी, ता. अकोला, जि. अकोला**

आमची शाळा सर्वच शाळांप्रमाणे जिल्हा परिषदेची शाळा. लोकांचा व समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन तोच. ही काय तर जिल्हा परिषदेची शाळा. यात कसल्या सुविधा, कसले शिक्षण. या दृष्टिकोनामूळे गावात एकूण तीन इंग्रजी माध्यमांच्या शाळा भरभराटीस आल्या. शाळेतील पटसंख्येला गळती लागली. खरेतर ग्रामीण भागातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे याकरीता गाव तिथे शाळा.परंतु पालकांची इंग्रजी शिक्षणाकडे असलेली ओढ यामुळे येणाऱ्या भावी काळात शाळेचे अस्तित्व कसे असेल याविषयी अनेक तर्क वितर्क व्यक्त होऊ लागले. इथे प्रश्न निर्माण झाला तो गोर–गरीब मुलांच्या शिक्षणाचा व आपल्या अस्तित्वाचा. या परिस्थितीतून बाहेर पडावयाचे असेल तर आपल्याला 'आपली शाळाही दर्जेदार शिक्षण देऊ शकते' ही गोष्ट समाजाला पटवून द्यावीच लागेल याचे विचार मंथन सुरू झाले. शालेय प्रगतीचा आलेख, शाळेचे अंतरंग व बाह्यरंग यामध्ये काही आमुलाग्र बदल करणे आवश्यक होते. ही बाब हेरून आम्ही सर्वांनी शाळा विकास करण्याचे ठरविले. समाज सहभाग घेऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. याकामी तालुका व जिल्हास्तर सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणा यांचे मोलाचे सहकार्य आम्हाला मिळाले.

सर्वसामान्य इतर शाळांप्रमाणे आम्हालाही या संघर्षमय परिस्थितीचा सामना करावाच लागला. आपली शाळा विद्यार्थ्यांना व लोकांना आवडावी यासाठी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी कोविड काळातील वेळेचा सदुपयोग केला.

**शाळेत पूर्व प्राथमिक शिक्षणास सुरुवात**

प्रशासकिय बदलीनंतर शाळेत रुजू झाल्यावर वरील परिस्थितीवर मात करण्यासाठी व शाळेचा शैक्षणिक दर्जा वाढवण्यासाठी नर्सरी ते केजी–२ पर्यंतचे अद्ययावत डिजिटल पूर्व प्राथमिक इंग्रजी माध्यमातून शिक्षकांनी स्वखर्चातून सुरू केले. गावातील दोन तज्ज्ञ शिक्षिकांची नेमणूक करून मुलांना मोफत इंग्रजी शिक्षण उपलब्ध करून दिले.

**बाला उपक्रम (Building as a learning aid)**

शालेय इमारत व परिसर, आजूबाजूचे वातावरण यातून बरेच काही शिकता येते.शाळेत आल्यानंतर विद्यार्थ्यांचे मनोरंजन होऊन त्यांचे मन रमावे, त्यांच्या ज्ञानामध्ये भर पडावी, त्यांना आनंददायी शिक्षण मिळावे, तसेच अनुकूल शैक्षणिक वातावरण निर्मिती व्हावी या उद्देशाने अकोला जि.प..चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संकल्पनेतून 'बोलक्या शाळा' (MASQUE) हा नवीन उपक्रम शाळेत राबविण्यात आला. या उपक्रमा अंतर्गत DPDC, समग्र शिक्षा, शाळा दुरुस्ती या योजनेतून तसेच लोक सहभागातून बोलक्या, आकर्षक, चित्तवेधक व मैत्रीपूर्ण शाळा इमारती, वर्गखोल्या, शालेय परिसर कसे तयार करता येईल यावर भर देण्यात आला आहे.

'बाला' प्रकल्प अंतर्गत टाकाऊ पासून टिकाऊ उपक्रम–या अंतर्गत टाकाऊ टायर व इतर साहित्यापासून मुलांचे कौशल्य वाढविण्यासाठी आवश्यक असणारे क्रीडा साहित्य तयार करण्यात आले आहे. शैक्षणिक खेळातून मूल्यशिक्षण/सापसिडी सारखे शैक्षणिक खेळ तयार करण्यात आले आहे. रद्दीतून ग्रंथालय व विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य निर्माण करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना मैत्रीपूर्ण वातावरणात अगदी सहजतेने शिकण्यास या संकल्पनेचा मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे. बोलक्या शाळा या संकल्पनेमुळे अत्यंत कठीण वाटणाऱ्या बाबी अगदी सहज, सोप्या व परिणामकारक पद्धतीने स्वतः शिकण्यास मदत होत आहे. बोलक्या शाळा ही एक वैज्ञानिक दृष्टिकोन असलेली संकल्पना आहे. त्यामुळे शिक्षण हे आनंददायी व रंजक होण्यास निश्चित मदत होते.

### डिजिटल शाळा (Digital School)

'धरूया तंत्रज्ञानाची कास, करूया गुणवत्ता विकास' या उक्तीप्रमाणे लोकसहभागातून व ग्रामपंचायतीमार्फत एकूण तीन स्मार्ट टी. व्ही. तसेच प्रोजेक्टर उपलब्ध करून घेतले. सर्वच वर्ग डिजीटल करण्यात आले. शिक्षकवर्ग स्व–निर्मित ई–साहित्य वापरू लागले. परिणामी मुलांचे शिकणे अधिकाधिक आनंददायी व रंजक होण्यास मदत झाली. मुले नियमित शाळेत येऊन रमू लागली.साहित्य हाताळू लागली.स्व–अध्ययन करू लागली. मुलांना शिक्षणाची आवड निर्माण करण्याकरीता तंत्रज्ञानाचा वापर ही विशेष बाब ठरली.

### आकर्षक परिसर निर्मिती– (रंगकाम)

शाळेचा परिसर व शाळेची मांडणी बऱ्यापैकी व्यवस्थित होतीच पण यामध्ये आकर्षकता आवश्यकता होती. कोरोनामुळे सतत शाळा बंद पण शिक्षण सुरू या परिस्थितीचा उपयोग शाळेचा परिसर मजेदार, रंगतदार व आकर्षक मांडणी करण्यासाठी आम्ही केला. याचेच फलस्वरूप म्हणजे आजचे शाळेचे सुंदर व आकर्षक रुप. शाळेचे प्रवेशद्वार व दुतर्फा आकर्षक फुलझाडे, वर्गांसमोर दुतर्फा प्रसन्न वातावरण निर्माण करणारी फुलझाडे. शाळेच्या आतील पूर्ण परिसरात मुलांना आवडतील अशी सुंदर चित्रे काढण्यात येऊन आकर्षक परिसर निर्माण केला.

### समाज उद्‌बोधन

शाळाबाह्य परिसर आकर्षक व उद्‌बोधनपर व्हावा या हेतूने समाजातील दानशूर व्यक्तींच्या आर्थिक सौजन्याने आकर्षक चित्रांची निवड व मांडणी करून सजावट करण्यात आली आहे.

### क्रीडा व मनोरंजक साहित्य

क्रीडा विभागामार्फत मिळालेल्या अनुदानातून व लोकवर्गणीतून शाळेकरीता सर्व प्रकारचे क्रीडा साहित्य व मनोरंजनात्मक साहित्य घेऊन आकर्षक व नियोजित मांडणी करून खेळासाठी 'किलबिल बाग' तयार करण्यात आली आहे.

### कोविड लॉकडाऊनमध्ये शाळा बंद पण शिक्षण सुरू



लॉकडाऊनच्या काळात मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून मुलांना ऑनलाईन, ऑफलाईन शिक्षणात झूम व गुगल मिट, स्वाध्याय कार्ड, वर्कशिट, स्वाध्याय पुस्तिका, गृहभेटीद्वारे मार्गदर्शन, मोबाईल स्वाध्याय व स्वयंसेवकाच्या माध्यमातून सतत मुलांचे अध्यापन सुरु ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### माझे बालवाचनालय

मुलांना लहानपणापासूनच वाचनाची आवड निर्माण व्हावी, शब्द भांडार व सामान्य ज्ञान वाढावे, मुलांना सुट्टीच्या वेळेचा सदुपयोग व्हावा या हेतूने शाळेत उपलब्ध असलेल्या अतिरिक्त खोलीत ४०० पुस्तकांचे सुसज्ज असे बालवाचनालय सुरू करण्यात आले. पाहता पाहता मुलांचे वाचनालयातील नवनवीन पुस्तके, पुस्तकातील चित्रे, गोष्टी, कुतूहल, कार्टून वाचण्यासाठी व पाहण्यासाठी

गर्दी होऊ लागली. आठवड्यातील दिवसानुसार वर्गवार नियोजन करण्यात आले. संपूर्ण जबाबदारी जसे पुस्तक देणे घेणे, नोंद करणे, क्रमवार लावणे ही सर्व कामे इयत्ता 4 थी चे विद्यार्थी पाहतात. वाचनालयात मुलांना बसण्यासाठी टेबलखुर्च्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

### माझी शाळा माझी जबाबदारी

या उपक्रमात शाळेची वर्गाची व परिसराची संपूर्ण जबाबदारी शिक्षकांसोबतच शाळेतील सर्व मुलामुलींना दिलेली आहे. वर्ग व परिसर स्वच्छता, बागेची व खेळाच्या साहित्याची निगा राखणे, शाळेचे सुशोभीकरण, दैनिक परिपाठ, बालवाचनालय, मुलांचे वाढदिवस, गटकार्य, जयंती, पुण्यतिथी व उत्सवाचे आयोजन, शालेय पोषण आहार बैठक, गृहपाठ तपासणी, आरोग्य तपासणी इत्यादी सर्व कामात मुलामुलींचा सारखा व सक्रिय सहभाग असतो. यामुळे सर्वच विद्यार्थी माझी शाळा माझी जबाबदारी या उपक्रमात आवडीने व जबाबदारीने कार्य करतात.

### बचत बँक

आमच्या शाळेत एक छोटीशी बचत बँक तयार केलेली आहे. मुलांना मिळणारा खाऊचा पैसा व इतर पैसा व्यर्थ खर्च न करता आपल्या छोट्या शालेय साहित्याच्या गरजा पूर्ण होण्यासाठी व लहानपणापासून बचतीचे महत्त्व व सवय लागावी हा उपक्रमाचा हेतू आहे. मुले आपल्याकडे बचतीचे पैसे शाळेतील बचत बँकेत एक दोन पाच दहा रुपये या प्रमाणात जमा करतात व यातूनच शालेय साहित्याच्या गरजा बऱ्याच प्रमाणात पूर्ण करतात. याचा संपूर्ण हिशोब वर्गशिक्षक विद्यार्थ्यांकरिता तयार केलेल्या बचत कार्डवर नोंदी घेऊन ठेवतात.

### स्नेह संमेलन

मुलांच्या उपजत गुणांना वाव मिळावा, मनोरंजन व मनोरंजनातून शिक्षण व्हावे, स्टेज डेअरिंग निर्माण व्हावे, आपल्या शाळेचे विद्यार्थी कोणत्याही ठिकाणी मागे राहू नयेत म्हणून वर्षातून एकदा भव्य प्रमाणात वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात येते. हे आयोजन तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात सुद्धा आकर्षणाचा व चर्चेचा विषय असतो. पूर्ण तयारीनिशी साजरे होणारे संमेलन, उत्तम कलाकृती, बहारदार संचालन व गावकऱ्यांकडून होणारी बक्षिसांची लयलूट हे कानशिवणी शाळेच्या उपक्रमातील प्रमुख उपक्रम बनले आहेत. सर्व पालक, गावकरी व परिसरातील शाळा या उपक्रमाची आतुरतेने वाट पाहात असतात.




### शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्या लोकवर्गणीतून शाळेचा विकास

शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक, केंद्रप्रमुख, समाजातील दानशूर लोक व व्यापारी या सर्वांच्या योगदानातून जवळपास १ लक्ष ७५ हजार रुपये वर्गणीतून शाळविकास साधला आहे. शाळेचे सुंदर रूप सर्वांना मोहून घेत आहे. पूर्वीचे शाळेच रूप व आता झालेला आमुलाग्र बदल नजरेस पडल्याशिवाय राहत नाही सन १९०७ मध्ये स्थापन झालेल्या या शाळेत इयत्ता पहिली ते चौथीचे २०० विद्यार्थी आजमितीस शिक्षण घेत आहेत.

आजमितीला आमची शाळा सर्वांगसुंदर व आकर्षक झाली आहे. बदलत्या काळानुसार व २१ व्या शतकातील जीवन कौशल्ये विद्यार्थ्यांना देण्यासाठी आम्ही सातही शिक्षक सदैव सज्ज आहोत. शाळेच्या विकास कामात ज्या ज्या व्यक्तिमत्वांचे योगदान लाभले त्या सर्वांचे मनपूर्वक धन्यवाद!

मुख्याध्यापक : श्री. प्रल्हाद तुळशिराम गिर्हे, संपर्क : ९३७०० ५३०४९

## २१. प्रवास प्रगतीचा...



**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा साखरा, ता. जि. वाशिम**

अशी एक शाळा जीचा पट ५२ विद्यार्थ्यांपासून सुरू होऊन आज ५५२ विद्यार्थ्यांपर्यंत पोहचला आहे. दोन वर्ग खोल्यांपासून सुरुवात, आज 30 वर्गखोल्या झाल्या आहेत. शालेय परिसर ८ गुंठे होता, तो आज ३७ एकर. दोन शिक्षक असलेली शाळा आज १६ शिक्षक कार्यरत आहेत. शाळेच्या सभोवती गावची गोदरी असल्यामुळे तालुक्यात गोदरीतील शाळा म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच शाळेला अनेक पुरस्कारांसह 'साने गुरूजी स्वच्छ शाळा' पुरस्कार मिळाला आहे. गावातील मुले बाहेरगावी शिकायला जात होती. आज शहरातील मुलांसह २२ गावातील मुले दर्जेदार शिक्षण घेत आहेत. अशी आमची यशाचा चढता आलेख असणारी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, साखरा आहे.

मागील अनेक वर्षांपासून जिल्हा परिषदेच्या शाळांचा पटसंख्येचा घटता आलेख पाहता, लोकांनी सरकारी शाळेकडे पाठ फिरवल्याचे चित्र दिसत आहे. अशाही परिस्थितीत महाराष्ट्र राज्यातील काही शाळांनी विपरीत परिस्थिती असताना सुद्धा आपला पटसंख्येचा आलेख वाढता ठेवला. त्या शाळांपैकी एक साखऱ्याची जिल्हा परिषदेची शाळा. या शाळेची स्थापना सन १९६० ची आहे. या शाळेने आणि गावाने सोबतच प्रशासनाने एकत्रितपणे केलेल्या प्रवासाची ही यशोगाथा.

सन २००८ ते २०२२ हा १४ वर्षांचा सातत्यपूर्ण प्रगतीचा प्रवास. २००८ मध्ये शाळेत फक्त एक लाकडी खुर्ची, एक शालेय रेकॉर्ड ठेवण्यासाठी आलमारी आणि दोन वर्गखोल्या, दोन शिक्षक कार्यरत होते. नवीनच बदली करून आलेल्या शिक्षकांनी शिकविण्यामध्ये अनेक नावीन्यपूर्ण प्रयोग करण्यास सुरुवात केली. शालेय अभ्यासक्रमाबरोबरच मुलांचा 'हेल्थ ॲण्ड ब्रेन' कसा वाढेल यासाठी लक्ष केंद्रीत करण्यात आले. सर्वप्रथम मुलांच्या हृदयाचा विकास (मूल्यशिक्षण) करण्यासाठी शिक्षक मुलांसोबत प्रत्येक कामात भाग घेऊ लागले. शाळेची स्वच्छता, स्वच्छतागृहाची स्वच्छता स्वतः मुले व शिक्षकांनी केल्यामुळे ती कशी वापरावी हे शिकविण्याचे कामच पडले नाही.

दिवसभर आरशासारखी स्वच्छ शौचालये राहू लागली. दुपारी मध्यान्ह भोजनाच्या वेळी मुलांना अन्नाचे महत्त्व पटवून देण्यात आले. अन्न हे पूर्णब्रह्म समजल्यामुळे मुले अन्नाचा एकही कण वाया जाऊ देत नव्हती. त्यामुळे आपोआपच शालेय परिसर स्वच्छ राहू लागला.

इयत्ता पहिली व दुसरीतील लहान मुलांचे जेवताना सांडलेले अन्नाचे कण ती स्वतः उचलून ओला कचरा असे लिहिलेल्या कचरापेटीत टाकू लागली. शाळेची सफाई करताना झाडांचा पडलेला पालापाचोळा ओल्या कचरापेटीत जमा होऊ लागला. नंतर त्या कचऱ्यापासून स्वतः तयार करण्यात येणाऱ्या युनिटमध्ये तो जमा होऊ लागला. मुले झाडांना पाणी देणे, त्यांची निगा राखणे ही कामे स्वतः आनंदाने करू लागली. अशा व इतर अनेक चांगल्या लागलेल्या सवयींमुळे रांगेत खिचडी घेणे, स्वतः केलेल्या कचऱ्याची स्वतः स्वच्छता करणे, आपला टेबल, वर्ग, स्कूल बॅग नियमितपणे स्वच्छ आणि नीटनेटके ठेवणे, अशी कामे सातत्यपूर्ण केल्यामुळे मुलांमध्ये स्वयंशिस्त निर्माण झाली. त्यामुळे वर्गातील भांडणे, चोरी करणे, द्वेष करणे ह्या गोष्टी अत्यंत कमी झाल्या. प्रत्येक गोष्ट वेळच्या वेळी शिक्षक करू लागले. शाळेचा परिपाठ दररोज १०:३० वाजताच सुरू होऊ लागला. त्यात १ मिनिटाचाही खंड पडला नाही. त्यामुळे कृतीतूनच विद्यार्थ्यांना वेळेचे महत्त्व पटू लागले.

'शक्ती हेच जीवन' मुले बलवान असली पाहिजेत, त्यासाठी नियमित खेळ घेणे, शनिवारी सकाळी सूर्योदयापूर्वी शाळेची पी.टी. सुरू होऊ लागली. सूर्यनमस्कार, मुलांसाठीची विविध योगासने, ध्यानधारणा विद्यार्थी करू लागले. शालेय स्पर्धा, धावण्याच्या शर्यती, कबड्डी यांचा सराव करण्यात आला. पौष्टिक आहार व दररोज खेळून दमून मुलांच्या अंगातून घाम निघाला पाहिजे याकडे लक्ष देण्यात आले.



शालेय अभ्यासक्रम वेळेपूर्वीच मुले पूर्ण करू लागली. विविध स्पर्धा परीक्षांची मुलांची तयारी घेण्यात येऊ लागली. शिष्यवृत्ती परिक्षा, नवोदय, एनएमएमएस परिक्षा सोबतच स्थानिक पातळीवर होणाऱ्या स्पर्धा परीक्षांमधून मुले अनेक पारितोषिके मिळवू लागली. नवोदयमध्ये २०१६-२, २०१७-४, २०१८-२, २०१९- ६, २०२०-८, २०२१-१२ विद्यार्थ्यांची निवड झाली. एनएमएमएस २०२१ परीक्षेमध्ये जिल्ह्यातील प्रथम व द्वितीय क्रमांक शाळेच्या विद्यार्थ्यांनीच मिळविला आहे. वाचनालयाचा उपयोग मुले स्वतःच करतात. संगणक कक्षाचा लाभही विद्यार्थी घेतात. शाळेत अद्ययावत प्रयोगशाळा सुद्धा आहे. संगीत साहित्याचा वापरही विद्यार्थी करतात.

शाळेने सातत्याने तीन बाबींवर भर दिला आहे.

1) मुलांच्या हृदयाचा विकास करणे, (नैतिक मूल्य) शिक्षकांच्या वर्तनातून मुलांसमोर आदर्श ठेवणे.

2) मुलांच्या मेंदूचा विकास करणे, आनंददायी शिक्षणाबरोबर सातत्यपूर्ण अभ्यास करण्याची सवय लावणे.

3) मुले बलवान करण्यासाठी खेळ, व्यायाम, सकस आहाराकडे नियमित लक्ष देणे.

या सर्व गोष्टी करण्यासाठी शिक्षक दररोज वेळेच्या आधी येणे आणि वेळ संपल्यानंतर जाऊ लागले. याचा परिणाम असा झाला

की, विद्यार्थ्यांचा विविधांगी गुणांचा विकास झाला. मुलांना वागण्याच्या, अभ्यासाच्या चांगल्या सवयी लागल्या. हे पालकांच्या निरीक्षणातून लक्षात आले. हळूहळू शाळेची पटसंख्या वाढू लागली, तशी शिक्षकसंख्याही वाढू लागली.

भौतिक सुविधेसाठी शाळेचा विकास पाहून पालकांनी स्वतः लोकवर्गणी देण्यास सुरूवात केली. 2010 साली 30,000 रु. वर्गणी करून शाळेला खुर्च्या, कपाट व इतर साहित्य आणण्यात आले. २०११ ते २०१३ मध्ये शाळेला जागा कमी असल्यामुळे लगतचे ७ गुंठे शेत लोकवर्गणीतून विकत घेण्यात आले. २०१४ ते २०१७ मध्ये ३ लाख रु. लोकवर्गणीतून १३ गुंठे शेत विकत घेण्यात आले. वर्गखोल्या कमी असल्यामुळे २०१८ साली ११ लाख रु.च्या वर्गखोल्यांचे बांधकाम लोकवर्गणीतून करण्यात आले.



विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्व क्रीडांगणे, वृक्ष लागवड, वर्गखोल्या यासाठी गावालगतची ३६ एकर गायरान जमीन शाळेला देण्यात आली. त्याला तार कंपाऊंड, कमान, रस्ता करण्यासाठी जिल्हा परिषदने ५० लाख रु. दिले. वर्गखोल्या, बांधकामासाठी निती आयोगाने २ कोटी ५० लाख रु. शाळेला दिले. त्या पैशातून सुसज्ज इमारत साकारली आहे. ज्या शाळेत एक लाकडी खुर्ची आणि एक कपाट होते ती शाळा आज सर्व भौतिक सुविधांनी परिपूर्ण आहे. आम्ही १६ शिक्षक, ५५२ विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देत आहेत.

शाळा गावासाठी किती महत्त्वाची आहे हे आम्हाला आमच्या कामातील यशामुळे दिसून आले. विद्यार्थी विकास कोणत्या गोष्टींमध्ये दडला आहे या अनुभूतीचे दर्शन शिक्षक, गावकरी यांना झाले. शाळेत प्रत्येकाने प्रामाणिकपणे काम केले तर विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे सोने झाल्याशिवाय रहात नाही. हे आम्ही राबवलेल्या उपक्रमांवरून आम्हाला दिसून आले. फक्त तुम्ही मनावर घ्या – मनात स्वप्न रंगवा. त्याला आकार देण्यासाठी सातत्य ठेवा. इच्छा तेथे मार्ग नक्की निर्माण होतो.



साखरा गावाची लोकसंख्या ९५० आहे. या सर्वांनी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी आम्ही सर्वांनी मिळून प्रयत्न केले. शाळेतून देशासाठी गुणवत्तापूर्ण विद्यार्थी घडवायचे आहेत याची जाण प्रत्येक शिक्षकाला असेल तर शाळेत नवनवीन उपक्रमांना सुरुवात होते आणि शासनाच्या पालकांच्या अपेक्षा पूर्ण होतात.

सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास हे सर्वांना सुद्धा शक्य आहे. आमच्या शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शाळेतील व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, ग्रामस्थ, आसपासच्या शाळेतील शिक्षक या सर्वांचा गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी खडतर असा हा प्रवास आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या कार्यक्रमाने शिक्षकांना दिलेले बळ, जिल्हा, तालुक्यातील विविध अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेली प्रेरणा, आमच्या पाठीमागे असलेला त्यांचा खंबीर आधार, सामाजिक संस्थांनी दिलेले आर्थिक पाठबळ या सर्वांचे मनःपूर्वक आभार !

मुख्याध्यापक : श्री भाऊराव नामदेव भालेराव, संपर्क : ९६८९१ ४९२३९

# २२. भविष्यवेधी शिक्षण




**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा थुगाव निपाणी, ता. नरखेड, जि. नागपूर**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा थुगाव निपाणी ही इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतची शाळा जेथे शैक्षणिक सत्र २०१८-१९ मध्ये ४६ विद्यार्थी होते. आज शैक्षणिक सत्र २०२१-२२ मध्ये विद्यार्थी संख्या १०० पर्यंत पोहोचली आहेत. ज्यातील दोन विद्यार्थिनी नवोदय विद्यालयात प्रवेशित झाल्या आहेत. या विद्यार्थी वाढीमागे असलेली कारणे विचारात घेतल्यास पुढे येतात ते शाळेत राबविले जाणारे निरनिराळे उपक्रम. शाळेत येणारा प्रत्येक विद्यार्थी केवळ FLN लेव्हल वर न स्थिरावता त्याचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी भविष्याचा वेध घेत अध्ययनाच्या पध्दती बदलण्याच्या हेतूने पुढे टाकलेल्या पावलाचे शाश्वत रूप आहे. निरनिराळ्या बाबींचा वापर करून शाळेचा चेहरा मोहरा बदलण्याचा प्रयत्न शाळेकडून सुरु आहे.

'To give challenge is a bigger challenge' and 'Silent sea cannot create a skillful mariner' या विचारांना अनुसरून विद्यार्थ्यांमध्ये Creative Thinking, Critical Thinking, Collaboration, Communication, Compassion and Community या अध्ययन कौशल्यावर आधारित शिक्षण व्यवस्था शाळेतर्फे राबविण्याचा हेतू पुढे ठेऊन खाली नमूद केलेले निरनिराळे उपक्रम शाळेत राबविण्यात येत आहेत.

**ग्रेट भेट– एक मुलाखत**

समाजातील यशस्वी व्यक्तींचा जीवनपट त्यांच्याच शब्दात उकल करून त्यांच्या आयुष्यातील आलेल्या अनुभवांवरून विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचा एक प्रयत्न म्हणून 'ग्रेट भेट – एक मुलाखत' हा उपक्रम शाळेत राबविला जात आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तथा प्रशासकीय क्षेत्रातील अशा बहुआयामी व्यक्तिमत्वांची उकल विद्यार्थी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून करतात. ग्रामीण भागातील सरपंचापासून ते जिल्हा परिषद नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. योगेश कुंभेजकर सर यांची घेतलेली मुलाखत विद्यार्थ्यांना एक वेगळीच अनुभूती देवून गेली.

शैक्षणिक प्रवासापासून सुरु झालेल्या मुलाखतीत सातवीत असताना जिल्हाधिकारी होण्याची घेतलेली भीष्म प्रतिज्ञा, जिल्हा परिषदेतील सर्वात आवडता विभाग, जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांकडे पाहण्याची समाजाची उदासीनता दूर करण्याचे उपाय, वाचनातील आवडता साहित्य प्रकार, अभ्यास आणि खेळाचे नियोजन, यासारखे निरनिराळे प्रश्न विचारणारे अगदी इयत्ता तिसरी ते आठवीचे विद्यार्थी हे त्या मुलाखतीचे विशेष होते. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना दिलखुलासपणे उत्तरे देणारे अधिकारी पाहताना आपणही सहज या शिखरावर पोहचू शकतो ही मुलांची भावना उद्याचे भविष्य उज्ज्वल करणारी आहे. 'शिक्षकांनी ठरवले तर शाळेप्रती समाजाचा दृष्टीकोन बदलू शकतो याची जाणीव या मुलाखतीतून झाली' असा अभिप्राय मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. योगेश कुंभेजकर यांनी दिला. हा अभिप्राय विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरणार यात शंका नाही. केवळ आपल्याच परिसरातील नाही तर अगदी अमेरिकेतील मूळ भारतीय पर्यावरण तज्ज्ञ डॉ. संगीता तोडमल यांची सुद्धा मुलाखत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने घेतली. या माध्यमातून व्यासपीठावर मत मांडण्याची शालेय जीवनापासूनची तयारी सहजपणे साधली जात आहे.

अमेरिकेत स्थायिक झालेल्या मूळ महाराष्ट्रीय डॉ. संगीता तोडमल यांच्याशी साधलेला संवाद हा विद्यार्थ्यांच्या माहिती विश्वाला



विस्तारणारा होता. भारतीय पर्यावरण आणि अमेरिकन पर्यावरण यातील फरक, अमेरिकेत घेतली जाणारी पिके, तेथील हवामान, वाहतुकीचे नियम, शिक्षण पद्धती या सर्व विषयांवर केलेली चर्चा अप्रतिम होती. 'विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सृजनशीलतेचा अविष्कार' अशा शब्दात सन्माननीय तोडमल परिवाराने विद्यार्थ्यांचा गौरव केला. हा अनुभव नवचेतना देणारा ठरला.

'व्यासपिठावर मत मांडण्याची शालेय जीवनापासूनची तयारी, मुलांचे इंग्रजीवर असलेले प्रभुत्व, जपानी भाषेतील त्यांचा संवाद, तिसरीतील मुलीचाही प्रश्न विचारतानाचा आत्मविश्वास, विद्यार्थ्यांची ही प्रतिभा बघून ग्रेट भेटमध्ये मुलाखतीस आलेल्या सर्व पाहुण्यांना आनंद झाला.

### विद्यार्थी बचत बँक निर्मिती

विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबत व्यवहार ज्ञान प्रात्यक्षिक स्वरुपात देण्याच्या हेतूने 'पणती विक्री उपक्रम' राबविला गेला.. दिवाळी सणाच्या सुट्ट्यांमध्ये विद्यार्थ्यांना नवीन ज्ञान देण्याच्या अनुषंगाने कच्चा माल खरेदी करून त्यावर सजावट करून शालेय परिसरात पणती विक्री करण्यात आली आणि पहिल्याच उपक्रमात विद्यार्थ्यांनी ६४०० रुपयांचा नफा अवघ्या २ दिवसात मिळविला. तो नफा विद्यार्थ्यांना वितरीत कसा करावा या प्रश्नाच्या उत्तरातून 'उन्नती विद्यार्थी बचत बँके'चा जन्म ११ ऑगस्ट २०१९ रोजी झाला. ज्यात ३ री ते ८ वीचे विद्यार्थी संचालक असून एकूण ९२ खातेदार आहेत. सर्वांचे मिळून बँकेत ४१५२० रुपये जमा असून हा सर्व व्यवहार विद्यार्थीच सांभाळतात. बँकेतील सर्व प्रकारच्या व्यवहारांचा अनुभव विद्यार्थ्यांना या उपक्रमाच्या माध्यमातून दिला जात आहे. अगदी जमा रकमेवर त्रैमासिक व्याज आकारणी सुद्धा बँकेचा सचिव असलेला विद्यार्थी करतो.

उन्नती विद्यार्थी बचत बँकेची निर्मिती करतानाच विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान सहजपणे उपलब्ध व्हावे, त्यांच्यात नेतृत्व गुण विकसित होणे हा हेतू असल्याने विद्यार्थ्यांचे संचालक मंडळ निर्माण करण्यात आले. संचालक मंडळाची निवड करताना गुप्त मतदान पद्धतीचा वापर करून लोकशाही पद्धतीने संचालक निवडण्यात आले. इयत्ता ३ री ते ८ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना वर्गवार प्रतिनिधीत्त्व देण्यात आले. ज्यात महिला प्रतिनिधीत्व देखील कसे जोपासता येईल याचा विचार विद्यार्थ्यांच्या गटातून मांडला गेला. 8 सदस्यांचे संचालक मंडळातून अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिवाची निवड करून नियमित बैठकीचे आयोजन, बैठकीचे इतिवृत्त लेखन, कॅश बुक, लेजर बुक लेखन अद्ययावत करणे. इ. कामांची जबाबदारी विद्यार्थ्यांवर देण्यात आली. या बैठकीच्या अनुषंगाने केवळ बँकेच्याच विषयावर नाही तर विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापन शंकांचे निरसन देखील विद्यार्थी करताना दिसतात हे बँकेच्या निर्मितीचे फलित आहे.

उन्नती विद्यार्थी बचत बँकेच्या माध्यमातून बाल आनंद मेळावा, सांज दीपावली यासारखे सांस्कृतिक कार्यक्रम तर कच्चा माल खरेदी करून त्यावर योग्य पद्धतीने सजावट करणे, आकाशकंदील निर्माण करणे आणि त्याची विक्री करणे यासारखे उपक्रम राबविले जात आहेत. कोरोना काळात देखील मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करून विद्यार्थ्यांनी आकर्षक पणत्या आणि आकाशकंदील यांची निर्मिती करून विक्रीचे दालन गावकऱ्यांसाठी उपलब्ध करून त्यांच्या सृजनशीलतेची चुणूक दाखवून दिली. आमचे गटविकास अधिकारी व पंचायत समिती सभापती या दोघांनी कार्यक्रमाचे कौतुक विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पणत्या व आकाश कंदिल खरेदी करून केले. शिवाय पुढील वर्षात पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात हा उपक्रम राबविण्यासाठी आश्वासित केले.

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव दिल्यास विद्यार्थी कसे स्वतःला सिद्ध करतात याचे हे उत्तम उदाहरण म्हणजे विद्यार्थी बचत बँक आहे. 'The sky is the limit' हाच मंत्र उराशी बाळगून विद्यार्थी बँकेचे कार्य पुढे नेत आहेत.

**आंतरराष्ट्रीय भाषा अवगत करणे**

कोरोना काळात सर्व जग थांबलेले होते आणि शिक्षणाची दारे प्रत्यक्ष बंद असताना विद्यार्थ्यांना श्री. नंदकुमार साहेब (प्रधान सचिव, भा.प्र.से.) यांच्या कल्पनेतील भविष्यवेधी शिक्षण पद्धतीची माहिती दिली गेली. युट्यूबच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय भाषा शिकता येते हा विश्वास विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाला आणि आंतरराष्ट्रीय भाषा अवगत करण्याची वाटचाल जपानी भाषेपासून सुरु झाली. आज पहिल्या वर्गातील विद्यार्थीसुद्धा जपानी भाषेतील संख्यावाचन आणि शिष्टाचार सहजपणे बोलतो. ५ वी पासून पुढचे विद्यार्थी अस्खलितपणे एकमेकांशी जपानी भाषेतून संभाषण करतात. आठवड्यातील एक दिवस परिपाठातील संपूर्ण आदेश हे जपानी भाषेतून दिले जातात. यासोबतच सध्यस्थितीत भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील काही शाळा डॉ. सुयश चव्हाण (भा.प्र.से.) जे जर्मनीतील Munich शहरात भारतीय दुतावासात कार्यरत आहेत. त्यांच्या पुढाकाराने जर्मन संस्कृतीची देवाण घेवाण करत आहेत. त्यात आमची शाळा सहभागी आहे. येत्या काही दिवसात हे विद्यार्थी जर्मन भाषा देखील बोलतील अशी आशा आहे.

**बालसंस्कार शिबिराचे आयोजन**

सहशालेय उपक्रमाच्या अनुषंगाने शाळेच्या वतीने २०१८-१९ पासून प्रत्येक शैक्षणिक सत्राच्या शेवटी निःशुल्क उन्हाळी बालसंस्कार शिबीराचे आयोजन केले जाते. ज्यात दिवसभरात शारीरिक तथा बौद्धिक सत्राच्या माध्यमातून मार्शल आर्ट आणि योग प्राणायाम पासून ते कॅलीग्राफी, क्राफ्ट, नृत्य, नाट्य, रांगोळी, मातीकाम व चित्रकला यासारखे अनुभव त्या त्या क्षेत्रातील निपुण असलेल्या अध्यापकांच्या मार्गदर्शनात दिले जातात. ज्यातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देऊन शाळेच्या पट संख्येतील प्रत्येक व्यक्तिमत्त्व हेरणे शक्य होते. शाळेच्या या उपक्रमाचा फायदा असा झाला की इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून विद्यार्थी आमच्या मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेशित झाले.

**विषयमित्र पद्धतीचा अवलंब**




शाळेत १ ली ते ८ वी चे वर्ग असताना कार्यरत तीन शिक्षकांच्या उपस्थितीत देखील शाळा स्वतःची वेगळी छाप निर्माण करत आहे ती केवळ विद्यार्थ्यांच्या मदतीने. शाळेतील वरच्या वर्गातील विद्यार्थी त्यांच्या खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांना आणि कमी गती असलेल्या वर्गमित्रांना सहजपणे अध्यापन करतात. त्यामुळे हसतखेळत शिक्षण पूर्ण होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. यासोबतच हे विषय मित्र स्वतःचा त्या त्या इयत्तेचा अभ्यास पूर्ण करून पुढील इयत्तेचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची तयारी दाखवत आहेत.

या सर्व उपक्रमाला लोकसहभागाची जोड सहज लाभलेली आहे. 'गावाला शाळेचा अभिमान असावा व शाळेला गावाचा आधार असावा' या उक्तीनुसार स्वप्नातील एक सुंदर शाळा घडविण्याकडे आमची वाटचाल सुरु आहे.

मुख्याध्यापक : श्री. धनंजय नारायणराव पकडे, संपर्क : ९९७०४ १९८१० / ९५१८५ ०९५८२

# २३. वर्षाचे ३६५ दिवस ज्ञानदान करणारी शाळा




**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पालडोह, ता. जिवती, जि. चंद्रपूर**

महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावर चंद्रपूर जिल्ह्याच्या माणिकगड पहाडावर वसलेल्या तेलंगणालगत जिवती या नक्षलग्रस्त, दुर्गम तालुक्यात आदिवासी वस्त्या, पाडे आणि इवली इवली गावे आहेत. महाराष्ट्र आणि तेलंगणा या दोन्ही राज्यांच्या सीमेलगत वसलेलं गाव म्हणजे पालडोह. रस्ते, आरोग्यदायी सुविधा, पाणी टंचाई, बेरोजगारी, शैक्षणिक सुविधांचा अभाव असलेला तालुका म्हणजे जिवती. महाराष्ट्र शासनाने घोषीत केलेल्या नक्षल भागांपैकी एक तालुका म्हणजे जिवती. ज्याची स्वतंत्र तालुका म्हणून २००५ ला निर्मिती झाली. येथे आदिवासी जमाती सोबत मराठवाड्यातून स्थलांतरित झालेल्या आणि आता माणिकगड पहाडावर कायम स्थायिक झालेल्या हटकर, गोलेवर व बंजारा या जमातीही वास्तव्यास आहेत. या अशा भागातील आमच्या शाळेची स्थापना १९९१ आहे. १ ली ते ८ वी पर्यंतच्या १८१ विद्यार्थ्यांना घडविण्याचे पवित्र कार्य आम्ही ४ शिक्षक मनापासून करतोय.

'If you are not part of solution, then you are the part of problem'

चंद्रपूर जिल्हा परिषद शाळांमध्ये दरवर्षी विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा व्हायच्या. त्यात आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना आम्ही सहभागी करून घ्यायचो पण यश मात्र मिळत नव्हते. ३ री ते ४ थी च्या मुलांना मिळून एखादा संघ झाली तरी त्यांचा निभाव लागायचा नाही. कारण एकच मैदानाचा अभाव. इतर शाळांना पारिषोतिक घेताना बघून मनात वाटायचे की एक दिवस तरी आम्ही या शाळेला पारितोषिक नक्की मिळवून देवू. मुळात म्हणजे आम्हाला स्वतः खेळात खूप आवड होती. आम्ही बऱ्याच मैदानी व वैयक्तिक स्पर्धेत शालेय स्तरावर बक्षिसे जिंकली होती. आता गरज होती ती मनातील बीज अंकुरण्यासाठी प्रयत्नांचे खतपाणी घालण्याची.

**मैदानावरील यश**

'मनात इच्छा असेल तर असाध्य गोष्ट देखील साध्य करता येते.' आम्ही उन्हाळ्यात अतिरिक्त वर्ग सुरू केले आणि तिथूनच ३६५ दिवस चालणाऱ्या शाळेचा प्रवास सुरु झाला. नुसता प्रवासच नाहीतर पहाटे ४:३० ला उठून मुलांना ३ किलोमीटर अंतरावर योगा, व्यायाम व मैदानी खेळांचा सराव डांबरी रस्त्यावर सुरू केला. मुले यात आनंदाने सहभागी होऊ लागली, पालक सुद्धा त्यांना उठवू लागले. त्यातच नव्याने एका महिला शिक्षिका सौ. बारेकर मॅडम रुजू झाल्या, त्यांची सुद्धा मदत आता रविवारी मिळत होती. शाळेपासून त्यांच्या गावाचे अंतर १२५ किलोमीटर होते त्यामुळे त्या १५ दिवसातून एकदा गावी जायच्या. कामाने आता वेग घेतला होता. एक एक करून बाहेर गावची मुले या शाळेत दाखला व्हायला लागली. आता नवीन संकल्प हाती घेतला होता तो म्हणजे शाळेतील मुलांकरिता खेळण्यासाठी मैदान तयार करण्याचा. मग मुलांना सोबत घेऊन ४ ते ५ च्या दरम्यान गावातून मुलांच्या मदतीने कुदळ, फावडे घेऊन यायचो आणि तो डोंगर खोदायचो मुले ती माती घेऊन उतार भागावर टाकायची असा दिनक्रम सुरू झाला. सोबतच मुले वेगवेगळ्या स्पर्धेत सहभागी व्हायला लागली. आता मुले बक्षिसे पण जिंकू लागली. यामुळे गावातील पालकांचा शाळेविषयी दृष्टिकोन बदलू लागला होता, त्याचसोबत ३६५ दिवस चालणारी शाळा म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण होत होती. त्यातच शासनाचे एक परिपत्रक आले की इयता ४ थी ला इयत्ता ५ वी चा वर्ग जोडण्याचा. नंतर आम्ही गावाच्या मदतीने शाळेला ५ वी चा वर्ग जोडल्यामुळे शाळेतील पट वाढण्यास मदत झाली. पटसंख्येनुसार आता 3 शिक्षकी शाळा झाली. सायंकाळी ४ ते ५ मैदान तयार करणे व सकाळी ४:३० ते

७:०० पर्यंत योगा, व्यायाम, खेळाची तयारी असा जोरदार प्रवासाला सुरुवात झाली आणि त्याच वर्षी आमची शाळा पहिल्यांदा बीटस्तरीय स्पर्धेत १५ शाळांच्या स्पर्धेत मैदानी व सांस्कृतिक स्पर्धेत 'बीट चॅम्पियन' झाली. शाळेतील मुलांचे व शिक्षकांचे स्वागत करण्यासाठी गावातील ग्रामस्थ, पालक ढोल ताशा घेऊन शिवेवर आले. हे बघून पहिल्यांदा मनाला वाटले, की आपण एवढी वर्ष जी मेहनत घेतली होती त्याचे फळ आता मिळाले. जिंकलेली सर्व पारितोषिके मंदिरात ठेवली. गावातील सर्व लोकांना आवाहन केले, जर आपण सर्वांनी मिळून असेच सहकार्य केले तर नक्कीच आपले गाव शिक्षणाकरिता आदर्श ठरेल अन् आज घडीला तसेच होत आहे. आज या पालडोह गावाला शाळा समजून घेण्यासाठी अनेकांच्या वाऱ्या सुरू झाल्या आहेत.

गावातील लोकांनी सढळ हातांनी मदत करण्यासाठी आपले हात पुढे केले. आज ही शाळा जिल्ह्यातील दर्जेदार व गुणवत्ता पूर्ण शाळा म्हणून उदयास आली. ज्या गावात बालविवाह प्रथा होती ती आज पूर्णपणे संपली, आज मुली शिक्षण घेण्यासाठी चंद्रपूर सारख्या शहराकडे वळल्या आहेत. आज त्यांचे पालक त्यांना सहकार्य करतात. हा खूप मोठा बदल येथे पहावयास मिळतोय. आज येथील विद्यार्थी क्रीडा स्पर्धेतून राज्यस्तरापर्यंत झेप घेत आहेत. शाळेचा पट आता झपाट्याने वाढू लागला होता. त्यासोबतच मुलांची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी विषय मित्र व शिक्षणप्रेमी यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू झाली. संध्याकाळी ६:३० ते ७:३० पर्यंत गटात बसून काम सुरू केले. यात शालेय व्यवस्थापन समिती सदस्य यांनी ही भरीव असे योगदान दिले. गावातील स्ट्रीट लाईट खाली बसून मुलांचा अभ्यास सुरू झाला.शाळा सर्व प्रकारच्या स्पर्धेत सहभागी होत होती व बक्षिसे शाळेत घेऊन येत होती. त्यामुळे मुलांचा आत्मविश्वास उंच शिखर गाठत होता.

आता शाळा वर्गांची नैसर्गिक वाढ करत इयत्ता १ ली ते इयता ८ वी पर्यंत झाली होती. सोबतच शाळेचा पट वाढतच होता. सन २०१६-१७ चा ७६ पट आज १८१ पर्यंत गेला आहे. मात्र या शाळेत वर्गखोल्या फक्त दोनच. मुलांना शाळेतील आवारात झाडाखाली, गावातील लोकसहभागातून लाकूड, बांबू यांचे मांडव तयार करून त्यात मुलांना बसवून अध्ययन अध्यापन कार्य सुरू होते, जशी भिंतीबाहेरची शाळा जणू! पण आम्ही शिक्षणाचे काम करत असताना एकाही शिक्षकाने इमारतीची कधी तमा बाळगली नाही. गुरुकुलाप्रमाणे इतर वर्गासाठी विद्यार्थी व गावकरी यांच्या मदतीने बांबू, तुराट्या व ग्रीन नेटचा मांडव टाकून अध्ययन अध्यापन कार्य ३६५ दिवस सुरू ठेवले.

'शिक्षक कभी साधारण नहीं होता प्रलय और निर्माण उसकी गोदमे पलते है।' असे चाणक्य वचन आहे. गावकऱ्यांच्या सहकार्याने शाळा बांधण्याचे काम सुरू झाले, परंतु आर्थिक अडचण उभी राहिली. ही अडचण दूर करण्यासाठी गावकऱ्यांनी सर्वानुमते एक निर्णय घेतला. गावातील मंदिरात असणाऱ्या दानपेटीत आजवर साठवून ठेवलेली ४० हजार रूपयांची देणगी गावाने विद्यामंदिरासाठी दिली आणि गावची सुंदर शाळा उभी राहिली. 'फळफुलांचा मळा पाहिजे, आनंदाचा सोहळा पाहिजे, गावात एकवेळ मंदिर नसेल तर चालेल, पण एक आदर्श शाळा पाहिजे'. पण इथे मंदिराची देणगी शाळाबांधकामासाठी उपयोगी ठरली. गावकऱ्यांची शाळेविषयी अधिकच आत्मीयता वाढली. ३५० लोकवस्तीचे गाव पालडोह हे इवलेसे गाव आणि फक्त २२ विद्यार्थी असणारी प्राथमिक शाळा आज उच्च प्राथमिक शाळा बनली आहे आणि शाळेची पटसंख्या आज १८२ वर गेली आहे. शाळा प्रवेशासाठी येणाऱ्या लोकांसाठी 'प्रवेश फुल' चा फलक दिसू लागला. सर, आपल्या शाळेत आमच्या पाल्यांना प्रवेश द्या, असे पालक विनवणी करताना दिसू लागले. फुल असा फलक वर्ग खोली व अपुरे शिक्षक या कारणांनी लागू लागला होता. आज वर्ग खोलीची समस्या संपली पण शिक्षक समस्या कायम आहे. अलीकडे जिल्हा परिषद प्रशासनही या शाळेकडे विशेष लक्ष देत आहे. आता तर सुसज्ज इमारतीचे बांधकाम इतरही सोयीसुविधा शाळेला मिळू लागल्या आहेत. या शाळेत चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती घेण्यासाठी व आपल्याही शाळेत काही सकारात्मक बदल





घडविण्यासाठी शिक्षक, अधिकारी, पालक व शालेय व्यवस्थापन समिती अशा अनेकांनी या शाळेला भेटी दिल्या आहेत.

ॲरिस्टॉटलने लिहिल्याप्रमाणे, 'आयुष्याचे अंतिम उदिष्ट आहे चारित्र्याचा विकास'. मुळातच याच उद्दीष्टावर लक्ष केंद्रित करून आम्ही ७ वर्षांपासून विद्यार्थीमित्र संकल्पना राबवण्यास सुरुवात केली होती. आम्ही आता पहाटे ४:३० ते सायंकाळी ७:३० पर्यंत शालेय कामकाज सुरू असते. शाळा भरण्याची वेळ सकाळी ९:०० असून त्यात मुलंच मुलांचं पूरक मार्गदर्शन घेत असतात. परिपाठात तिन्ही भाषांचा उपयोग केला जातो. या परिपाठात एकंदरीत १६ मुद्द्यांचा समावेश केला आहे. सायंकाळी ४:३० ते ५:१५ परत पूरक मार्गदर्शन वर्ग भरतात. ज्यात मराठी, गणित व इंग्रजी यांसारखे विषय स्वतःच विद्यार्थी विद्यार्थ्यांना शिकवतात. मुलेच मुलांना पायाभूत मार्गदर्शन करतात. त्यावर आठवड्यातून एकदा स्वतः मुलेच शिकवलेल्या भागावर चाचणी घेतात व तपासणी करून फाईल मध्ये जतन करून ठेवतात. शाळेतील विद्यार्थ्यांचे विविध साहित्य शाळेत जतन करून ठेवले जाते. मुलांच्या कलागुणांना हेरून त्या कलागुणांना जोपासून त्यांना संधी दिली जाते. आज या शाळेतील विद्यार्थी मोठमोठ्या स्टेजवर मॉडेलिंग करीता बाहेर जातात. जिल्हा परिषदेचे विद्यार्थी आणि मॉडेलिंग कसे काय! पण हे खरे आहे. कारण पूर्व तयारीसाठी व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी 'मिस अँड मास्टर पालडोह' हा उपक्रम शाळेत घेतला जातो.

३६५ दिवस येणारे सण, उत्सव शाळेत साजरे केले जातात. हा ३६५ दिवसांचा उपक्रम गेल्या ९ वर्षांपासून सुरू आहे. जो मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता सुरू झाला आणि शिक्षकांच्या अभावामुळे आजतागायत सुरू आहे. आज ही ३६५ दिवस शाळा सुरू आहे ती शाळेतील शिक्षणप्रेमी व विद्यार्थी मित्र यांच्या मदतीनेच. आज संपूर्ण महाराष्ट्रात याची दखल वर्तमान पत्रे व वृत्तवाहिन्या व विविध संस्था यांनी घेतली आहे. आज शाळेचे स्वतःचे युट्यूब चॅनल आहे. ज्यात उपजिल्हाधिकारी ते महानगरपालिका आयुक्त यांच्या मुलाखती शाळेतील विद्यार्थी घेताना दिसतात.

शाळेतील विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त लावण्याकरीता शाळेत विविध पारितोषिकेही दिले जातात. ज्यात Student of the Year Award, Class of the Year Award & Star of the Year Award इ. ॲवॉर्ड आहेत. रविवारी मुलांची सामान्यज्ञान स्पर्धा आयोजित केली जाते, त्यात त्यांना आठवडाभरात १०० ते १५० प्रश्न दिले जातात. त्यावर रविवारी इयता ५ वी ते इयता ८ वी च्या विद्यार्थ्यांचा गट तयार करून त्यांच्यात स्पर्धा घेतली जाते. नवी दिल्ली येथील 'निपा' या संस्थेने पालडोह या शाळेची निवड उत्कृष्ट शाळा म्हणून केली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील एकमेव जिल्हा परिषद शाळेतून पालडोह ३६५ दिवस चालणाऱ्या शाळेची निवड झाली. दोन वर्षांपासून आपला नियमित अभ्यासक्रम स्वाध्यायसह सप्टेंबर ते ऑक्टोबर महिन्यातच इयत्ता ५ वी ते ८ वी चे विद्यार्थी पूर्ण करतात. 'बुलंदिया खुदही तलाश लेंगी तुम्हे, बस मौका न छोडना मुश्कीलों में मुस्कुराने का'. शालेय व्यवस्थापन समितीची साप्ताहिक सभा वर्षभर भरते. त्यात वर्ग पाहणी, शाळेतील इतर समस्या निवारण व पुढील नियोजन हे संपूर्ण आठवड्याला होते. आज संपूर्ण गाव ताकदीनिशी एकजूट झाले आहे

सरते शेवटी आम्ही एवढेच म्हणू, की जर मनाची इच्छा दांडगी असेल तर तुम्हाला यश मिळवण्यापासून कोणीच थांबवू शकत नाही.

मुख्याध्यापक : श्री. राजेंद्र उदेभान परतेकी, संपर्क : ९८८१६ ७४९९४

# २४. शिक्षणाचे आनंदवन



**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा आसरअल्ली, ता. सिरोंचा, जि. गडचिरोली**

'शिक्षण म्हणजे बालकांची शारीरिक, मानसिक व नैतिक वाढ. एखादा उपयुक्त असा हस्तोद्योग शिकवून बालकाच्या शिक्षणाची सुरुवात करावयास हवी आणि शिक्षणाच्या सुरुवातीपासून काहीतरी उपयुक्त असे निर्माण करावयास शिकवले पाहिजे. त्यामुळे प्रत्येक शाळा स्वावलंबी होऊ शकेल' या महात्मा गांधी यांच्या विचाराने प्रेरित होऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारी आमची गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रशाळा आसरअल्ली होय. नव्या तंत्रज्ञानाचा बाल विकासासाठी योग्य वापर करणारी गुणवत्तापूर्ण शाळा अशी या शाळेची ओळख आहे.

गडचिरोली जिल्हा मुख्यालयापासून २६० कि.मी. अंतरावर असलेली तसेच तेलंगणा व छत्तीसगडच्या सीमेलगत सिरोंचा तालुक्यातील अतिशय दुर्गम भागात असलेली ही शाळा. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध आव्हानांना स्विकारत नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या मदतीने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी आम्ही सर्व झटत असतो. सन १९१४ साली स्थापन झालेली आमची शाळा ऐतिहासिक आहे. या ठिकाणी इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग असून शाळेची पटसंख्या २६५ आहे. या शाळेत एकूण ६ उपक्रमशील शिक्षक कार्यरत असून शाळेचे मुख्याध्यापक खुर्शिद शेख यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी भारत सरकारने शिक्षण मंत्रालयाकडून राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२१ देऊन सन्मानित केले आहे. या दुर्गम नक्षलग्रस्त, आदिवासी गडचिरोली जिल्ह्याचा हा खरा सन्मान आहे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी शाळेने विविध उल्लेखनीय प्रयोग केले व त्यांची उत्तम फलनिष्पत्तीही अनुभवायला मिळाली आहे.

**शाळा झाली शैक्षणिक उपक्रम संशोधन केंद्र**

अतिशय दुर्गम भागात शाळा असल्याने अनेक शैक्षणिक व सामाजिक समस्या आम्हाला येत होत्या. यातून निराश न होता त्या शैक्षणिक समस्यांवरील उपाय शोधण्यासाठी आमची शाळा एक शैक्षणिक उपक्रम संशोधन केंद्रच झाले. यामुळे शिक्षकांतील संशोधनवृत्तीस चालना मिळाली. संशोधनातून नवनवीन उपक्रम निर्माण होऊ लागले. त्याचा लाभ शाळेच्या गुणवत्ता वाढीस झाला. 'Teacher is a good researcher' असे शाळेच्या शैक्षणिक उपक्रम संशोधन केंद्राचे ब्रीद आहे.

**समाज सहभाग**

जिवंत शाळाच आपल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊ शकते या हेतूने शाळेचा सहभाग सामाजिक उपक्रमात वाढविला व समाजाचा सहभाग शाळेसाठी वाढविला. शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीचे सक्षमीकरण करण्यात आले. यामुळे शाळा व्यवस्थापन

समितीने आमच्यासोबत कामास उत्साहाने सुरूवात केली. शाळेला भौतिक सुविधा उपलब्ध झाल्या. स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, डिजिटल साहित्य, ग्रंथालय समृध्दीकरण, बोलकी शाळा व खुला निसर्ग वर्ग तयार करून शाळेला शिक्षणाचे आनंदवन करण्यात आले. दरवर्षी शाळेच्या गुणवत्ता वाढीस सहयोग करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा 'शिक्षण मित्र' हा पुरस्कार देवून शाळेकडून गौरव करण्यात येतो. यामुळे शाळा आणि समाज एकसूत्रतेने बांधले गेले असून याचा उपयोग गुणवत्ता वाढीस होत आहे.

### विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासासाठी नवनवीन प्रयोग




आमची शाळा तेलंगाणा राज्याच्या सीमेला लागून असल्यामुळे या क्षेत्रातील शंभर टक्के पालक दैनंदिन जीवनात तेलुगूचाच वापर करतात व तेलुगू संस्कृतीचाच अभिमान बाळगतात. त्यामुळे मराठी व इतर दोन्ही भाषांकडे विद्यार्थ्यांचे दुर्लक्ष होऊन त्याचा परिणाम त्यांच्या अभ्यासावर दिसत होता. त्यांना मराठी वाचन, लेखन, भाषण आणि संभाषण अजिबात आवडत नव्हते. पाठ्यपुस्तक त्यांच्या नावडीचे झाले होते. यासाठी 'माय मराठी' हा प्रकल्प तंत्रज्ञानाच्या सहाय्याने राबवला. यामुळे भाषा विषयाची अभिरूची वाढली.

### मी रिपोर्टर

या अनोख्या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोज छोटे संवाद बोलण्याची संधी देऊन त्यांचे व्हिडीओ शुट करून त्यांनाच दाखविण्यात आले. त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी बोलणारे न्युज चॅनलच्या रिपोर्टरचे व्हिडीओ दाखवून प्रेरीत करण्यात आले. तेलुगुकडून मराठीकडे हा प्रवास विद्यार्थ्यांना आवडला आणि शाळेत मराठी बोलण्याचे, लिहीण्याचे व वाचण्याचे वातावरण तयार झाले. शाळेच्याच ZP TV Asaralli च्या माध्यमातून ते युट्यूब, व्हॉट्सॲप, फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर, लिंक्‌डइन वर प्रसारित करण्यात आले. यामुळे गावातही हे व्हिडीओ बघून मराठी बोलण्याविषयी जनजागृती होऊ लागली. समाजाचा शाळेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. यातून सहकार्य वृत्तीही वाढीस लागली.

### Jollywood - Joyful learning in childhood

शिक्षण हे आनंददायी पद्धतीने मिळाल्यास अधिक प्रभावी होते. विद्यार्थी सहज अभ्यासाकडे आकर्षित होतात. बालकांना चित्रपट बघणे खूप आवडते. म्हणूनच विद्यार्थ्यांना त्यांच्याच अभिनय कौशल्यांचा वापर करून अनेक शैक्षणिक लघुपट शाळेने जॉलीवुडच्या माध्यमातून तयार केले. ह्या उपक्रमाने विद्यार्थ्यांचा कलात्मक व सृजनात्मक विकास झालाच, शिवाय अभिव्यक्ती कौशल्यातही झपाट्याने वाढ झाली. शाळेच्या या Edu entertainment method ला अभिनव उपक्रमात राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करण्यात आले आहे.

### जागतिक शैक्षणिक मूल्यांची शिकवण (Project Tribal to Global)

शाळेची गुणवत्ता ही वर्गखोलीच्या चार भिंतीच्या आत किंवा एका चाकोरीत राहून घडू शकत नाही. तंत्रज्ञानाने जगाला जवळ आणले आहे. या नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून Bridges of friendship, Global flag project, Global citizenship, Unesco Associated school network, Eco school, Pen pal school, Unima India, Girls leadership program, Healthy school, Students talk show इत्यादी जागतिक उपक्रमांमध्ये आमचे विद्यार्थी सहभागी होतात, यातून विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात आमुलाग्र बदल झाला आहे.

### ग्रंथालय व किशोर वाचक मंच

विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी यासाठी शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय ३००० पुस्तकांनी समृध्द करण्यात

आले आहे. फिरते वाचनालय तयार करून विद्यार्थ्यांपर्यंत रोज त्यांच्या आवडीचे पुस्तक पोहचविले जाते. विद्यार्थ्यांचा किशोर वाचक मंच स्थापन केला आहे, यातून किशोर अंकाचे वाचन नियमित केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित झाले व शब्द संग्रहात वाढ झाली आहे

**फुलोरा मूलभूत विकसन कार्यक्रम**




पायाभूत क्षमता समृध्द होण्यासाठी जिल्हा परिषद गडचिरोली तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था गडचिरोली यांच्या वतीने 'फुलोरा मुलभूत विकसन कार्यक्रम' यशस्वीरित्या राबविण्यात आला. बालभवनच्या माध्यमातून राबविलेल्या या उपक्रमामुळे भाषा व गणिताच्या विविध स्वंय अध्ययन कृतींच्या सहाय्याने कोविड काळात झालेल्या विस्मरणाला विद्यार्थ्यांनी कमी वेळात भरुन काढले व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ झाली आहे.

**विज्ञान जत्रा**

विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी आपल्या नविन वैज्ञानिक संकल्पनेतून शोधलेल्या प्रतिकृतींचे प्रदर्शन या विज्ञान जत्रेमधून केले जाते. यातुन विद्यार्थ्यांना खूप आनंद मिळतो व वैज्ञानिक दृष्टिकोनही वाढीस लागतो.

**Young Science Eyes Reporter (YSER)**

आपल्या गावातील व परिसरातील विविध घटनांची माहिती वैज्ञानिक दृष्टीकोनातून समाजापुढे मांडून अंधश्रध्दा दूर करण्याच्या हेतूने Young Science Eyes Reporter (YSER) ही संकल्पना पुढे आली. शाळेत अनेक Young Science Reporter तयार झालेले आहेत. जे समाजात विज्ञान जनजागृतीचे कार्य करतात. **'विज्ञानाचे डोळे'** (Science eyes) ह्या प्रकल्पाच्या माध्यमातून दुर्गम भागात असलेल्या शाळेतही आज विद्यार्थी विज्ञानाकडे एक विकासात्मक शक्ती म्हणून बघतात याचा मनाला आनंद होतो. आज शाळेतील विद्यार्थी प्रत्येक बाब ही विज्ञानाच्या डोळ्यांनी बघतात हे आमच्यासाठी विशेष आहे.

**शाळेची उपक्रमशीलता व गुणवत्ता विकासाचे फलित**



- शाळेची पटसंख्या ४५ वरून २१५ पर्यंत पोहोचली.
- गळती शून्य % व उपस्थिती १००%.
- शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेत विद्यार्थ्यांची निवड झाली.
- विज्ञान नाट्य महोत्सवात विज्ञान चमुची विभागीय स्तरावर निवड झाली.
- समाजातून शाळेला उत्तम सहकार्य व मदतीचा ओघ वाढला.
- विद्यार्थ्यांनी इतर देशातील विद्यार्थ्यांसोबत आत्मविश्वासाने संवाद साधला.
- तंत्रज्ञानाच्या वापरामुळे समाज माध्यमात शाळेची ओळख निर्माण झाली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासात वाढ झाली.
- शाळेची पटसंख्या वाढल्यामुळे शाळेला व्हर्च्युअल क्लासरूम व नावीन्यपूर्ण विज्ञान केंद्र शासनाकडून मिळाले.
- अधिकारी वर्गाचे विशेष मार्गदर्शन व सततची प्रेरणा लाभली.
- जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्रशाळा आसरअल्ली ही दुर्गम भागात शाळा असून देखील ही एक शिक्षणाचे आनंदवन म्हणून ओळखली जाते.

मुख्याध्यापक : श्री. खुर्शिद कुतबुद्दीन शेख, संपर्क : ९४२१६ ५३९१०

# २५. अशी बहरली आमची शाळा



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भागी, ता. देवरी, जि. गोंदिया**

हे मंदिर आमुचे ज्ञानाचे, मानाचे अभिमानाचे,
इथेच घडते सुंदर जीवन, माझ्या तुमच्या भाग्याचे

महाराष्ट्र राज्याच्या अतिपूर्वेकडील आदिवासीबहुल, दुर्गम जंगलव्याप्त व नक्षलग्रस्त म्हणून ओळख असलेल्या देवरी या सीमावर्ती तालुक्यात आमची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भागी/देवरी, केंद्र – देवरी, पंचायत समिती देवरी, जिल्हा गोंदिया ही इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंतचे वर्ग असलेली शाळा असून शाळेची स्थापना १९७२ सालची आहे, शाळेत १८३ विद्यार्थी शिकत असून २ शिक्षक कार्यरत आहेत. महाराष्ट्र व छत्तीसगड राज्यांच्या सीमेवरून वाहणाऱ्या वाघ नदीच्या खोऱ्यात निसर्गरम्य वनराईने नटलेल्या परिसरात महाराष्ट्राचे नंदनवन म्हणता येईल अशा रम्य वातावरणात भागी हे अवघ्या १२०० एवढ्या लोकवस्तीचे छोटेसे खेडेगाव.

या गावातील जिल्हा परिषद शाळेत आम्ही दोघेही सहकारी एकाच दिवशी ५ जून २०१८ ला रूजू झालो. शाळा पहिली ते चौथी वर्ग असलेली, पटसंख्या होती ३३. गावाला शाळेबद्दल आस्था असल्याची शाळेच्या बाह्यरूपावरून व आतील वर्गखोल्यांची अवस्था बघून वाटत नव्हते. शाळेमध्ये चांगल्या स्थितीत दोन वर्गखोल्या व मधोमध एक मोडकळीस आलेली वर्गखोली होती. या भांडवलाचा उपयोग करून व व्यावसायिक दृष्टिकोन स्वीकारून कसल्याही प्रकारचा बाऊ न करता शाळेची प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याचा आम्ही दोघांनी मनाशी निर्धार केला.

आयुष्याच्या वाटचालीत शैक्षणिक प्रवाहात कार्यरत असताना आदर्श शाळा व शिक्षण या विषयी मनात निर्माण केलेल्या विविध विचारवंतांच्या वाचनातून तयार झालेला हा शैक्षणिक दृष्टिकोन व आदर्श शाळेचे आपण पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात साकारण्याच्या ध्येयवादी वृत्तीने प्रेरित होऊन समर्पित भावनेने व निष्ठापूर्वक नियोजनातून कार्यास प्रारंभ केला.यात सर्वप्रथम सहकार्य मिळाले ते माझे समव्यावसायिक, समविचारी तितकेच धैर्यशील सहकारी व मित्र आदरणीय श्री सुमित चौधरी सर या सहकाऱ्याचे.

**परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल**

**अज्ञानाचा तिमिर सारूया, ज्ञान प्रकाश हृदयी धरूया**

या भावनेने प्रेरित होऊन आम्ही दोघांनी मिळून शाळेच्या विकासाकरीता १) शालेय शिस्तीचे कटाक्षाने पालन करणे २) भौतिक

सुविधा व पटसंख्या वाढविणे ३) विद्यार्थ्यांची गुणवत्ता व व्यक्तिमत्व विकास या भावनेने प्रेरित होऊन आम्ही दोघांनी मिळून शाळेच्या



विकासाकरीता एक त्रिसुत्री आखली. या त्रिसुत्रीस अनुसरून प्रत्येक विद्यार्थी एक अलौकिक एकक म्हणून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास हा आपल्या नियोजन व कार्याचा केंद्रबिंदू म्हणून अध्ययन–अध्यापन प्रक्रियेचे नियोजन केले.

यशपाल यांच्या अहवालात म्हटल्याप्रमाणे 'मूल ही ज्ञान ठेवण्याची थैली आहे आणि पुस्तके हाच शिक्षणाचा पाया आहे' या पारंपारिक समजाच्या पलीकडे शाळेत शिकणे हा आनंददायी अनुभव कसा होईल, मुलांमध्ये प्रश्न निर्मिती कौशल्य, स्वानुभव कथन, स्वलेखन व सर्जनशील विचार क्षमता निर्माण करून रचना वादावर आधारित शिक्षण प्रक्रियेचा पाया रचण्याचा व त्यातून विविध विषयांच्या अध्ययन–अध्यापन यातून मुलांचा शारीरिक, सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक व मानसिक विकास साधण्यासाठी आवश्यक शैक्षणिक प्रकल्प व उपक्रम शाळेत राबविण्यात आले.

**शाळा व विद्यार्थी विकास मालिका**

**या कोवळ्या कळ्यांमाजी, लपले रवींद्र शिवाजी।**

**उमलता प्रगटतील समाजी, शेकडो महापुरुष।।**

या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अभंगाला अनुसरून विद्यार्थीरुपी कळयांमधून कौशल्याने नटलेल्या व सर्वांगाने विकसित पुष्प उमलण्यासाठी शाळेत खालील प्रमाणे शाळा व विद्यार्थी विकास मालिकेला प्रारंभ केला.

यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थी दत्तक योजना, बालसभा, माझे दुकान, कलादालन, अपना बँक, ॲबॅकस क्लास, शाळेला जोडूनच कॉन्व्हेंट, क्षेत्र भेट, परिसर भेट, पाहुण्यांची व्याख्याने या माध्यमातून परिसरातील कुशल कारागीर व व्यवसायिकांची ओळख करून देणे, बाल आनंद मेळावा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, क्रीडा सत्र, विविध सण व उत्सव, महापुरुषांची जयंती व पुण्यतिथी, माझा वाढदिवस उपक्रम, दिनांक निहाय पाढा उपक्रम, उपस्थिती ध्वज उपक्रम, माजी विद्यार्थी मंडळ, क्रीडा सत्र योगासने व ध्यानधारणा शिबिर, स्नेहसंमेलन, माझी परसबाग व माझा वर्ग माझी जबाबदारी यासारख्या अनेक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी विकास होण्यासाठी आम्ही प्रयत्न करू लागलो.

शालेय ज्ञान शाळेबाहेरील जगाशी जोडणे, घोकंपट्टीतून शिक्षणाची सोडवणूक करणे, शिक्षण पाठ्यपुस्तक केंद्रित न करता मुलांच्या सर्वांगीण वाढीसाठी त्याचा उपयोग करणे ही उद्दिष्टे साध्य होऊन विद्यार्थी अनुभव कथन व आत्मविश्वासपूर्वक सादरीकरण करू लागले. शिवाय मूलभूत गणितीय क्रियांचा व्यावहारिक जीवनात विद्यार्थी आत्मविश्वास व कौशल्यपूर्वक वापर करु लागले.

नृत्य, गायन, नाट्य सादरीकरण यांच्या माध्यमातून स्वसादरीकरण करू लागल्याने शाळेविषयी अनास्था असणारे व नकारात्मकपणे बघणारे ग्रामस्थ जिज्ञासेने शाळेकडे पाहू लागले. शाळेविषयी आटलेल्या आपुलकीच्या झऱ्यास पुन्हा पाझर फुटण्यास

प्रारंभ होऊन गावची शाळा, शिक्षक व विद्यार्थी हा समाजाचा विषय बनला. शाळेच्या कीर्तीचा सुगंध हळूहळू पंचक्रोशीत दरवळू लागला. खासगी शाळेकडे असलेल्या सर्व स्तरातील पालकांचा ओढा शहराकडून गावाकडे वाहण्यास प्रथमच प्रारंभ झाला आणि गतकाळात गलितगात्र व गतप्राण होण्याच्या स्थितीत पोहोचलेला शाळेचा ज्ञानवृक्ष पुन्हा नव्या जोमाने व उमेदीने बहरून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू लागला.

**शाळेतील प्रावीण्यपात्र विद्यार्थी**

विद्यार्थ्यांनाही त्यांच्या भाषेत बोललेली गाणी, गोष्टी, सांगितलेला अभ्यास दिलेले आवडायचे. आता विद्यार्थी अगदी मजेत खुश होऊन अभ्यास करू लागले. बरेच पालक शाळेत भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या अभ्यासात झालेल्या बदलाबद्दल आश्वासकपणे बोलू लागल्याने आमचाही उत्साह द्विगुणित झाला आहे. सुट्ट्या, शालेय वेळ असा कसलाही विचार न करता विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ या एकाच ध्येयाने प्रेरित होऊन आम्ही शिक्षक काम करू लागलो.

याचीच फलनिष्पत्ती म्हणजे सन २०२१ मध्ये एका विद्यार्थ्याची जवाहर नवोदय विद्यालयामध्ये झालेली निवड होय. तसेच एका विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यात प्रथम येत प्राविण्य मिळविले. महत्वाचे म्हणजे याचवर्षी २०२१-२२ मध्ये इ. ४ थी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याची ऑल इंडिया सैनिक स्कूल झारखंड येथे थेट इयत्ता ६ वी साठी निवड झालेली आहे. यापुढेही बरेच विद्यार्थी स्पर्धा परीक्षेसाठी सज्ज होत आहेत.

**समाजाचा सहभाग**

पालक व गावकऱ्यांच्या सहयोगाने शैक्षणिक गोष्टी सोबतच भौतिक सुविधांची समस्या सोडविण्यात यशस्वी ठरलो. पालक व गावकऱ्यांनी रोख रकमेसह सहशालेय उपक्रमासाठी लागणारे विविध साहित्य भेट स्वरूपात दिले. आज शाळेचा कायापालट झाल्याचे दिसून येते त्यात पालक, गावकरी, शिक्षणप्रेमी व माझे सर्व शिक्षक वृंद यांचे योगदान खूप मोठे आहे. शाळेत होत असलेल्या ह्या शैक्षणिक, भौतिक बदलाची नोंद तसेच शाळेत होणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची प्रसिद्धी तालुक्यात होऊ लागल्याने शाळेचा पट वाढण्यास मदत झाली. 'ही आवडते मज मनापासुनी शाळा, लाविते लळा ही जशी माऊली बाळा' या ओळी आमच्या शाळेबाबत सार्थ ठरल्या आहेत.

**पटसंख्येत वाढ**

**चिरा चिरा हा घडवावा, कळस कीर्तीचा चढवावा। अज्ञानी तो पढवावा, थेंब आम्ही तर सागर हे।।**

या काव्यपंक्ती प्रमाणे पुढे उत्तरोत्तर शाळेची पटसंख्या वाढत जाऊन सन २०१७-१८ मध्ये एकूण ३३ असणारा शाळेचा पट सन २०१८-१९ मध्ये ८०, सन २०१९-२० मध्ये १६१, सन २०२०-२१ मध्ये २१२ झाला. यावर्षी म्हणजे सन २०२१-२२ मध्ये शाळेचा पट २५६ झालेला आहे. आजमितीला शिक्षक, तलाठी, ग्रामसचिव, पोलीस विभाग, आरोग्य विभाग, वन विभाग, महसूल विभाग, शिक्षण विभाग, शहरातील व्यापारी, जिल्हा परिषद सदस्य, पत्रकार अशा विविध क्षेत्रातील पालकांची मुले शहरी भागातून तालुक्याच्या ठिकाणावरून भागी सारख्या लहान खेडेगावात येत आहेत. पालकांनी स्वतः पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांच्या नेण्या–आणण्यासाठी स्कूल बसची व्यवस्था केली आहे.

आज शाळा मुले आणि फुले यांनी बहरून गेली आहे. त्यामुळे आम्ही केलेल्या कष्टाचे, श्रमाचे चीज झाल्याची भावना मनात येत आहे. एकेकाळी ओसाड वाटणारी शाळा आता आकर्षक रंगरंगोटी, बोलक्या भिंती, परसबाग, फळा–फुलांच्या झाडांमुळे नटलेली आहे. शाळेच्या आवारात फुले तर सोडा पानही राहू देत नाहीत असे सांगणाऱ्या लोकांची मते आता मात्र बदलली आहेत. फुले किंवा पाने न तोडता आता मात्र विद्यार्थी स्वतः त्यांची निगा राखत असल्याचे चित्र नेहमी दिसते. शाळेत खेळाचे साहित्य भरपूर उपलब्ध करून दिल्यामुळे शाळेतील मुले नेहमी आनंदाने खेळताना बागडताना दिसतात. शाळा सुटल्यावर देखील विद्यार्थी शाळेतच रेंगाळत असतात.

संपूर्ण शाळा स्वच्छ व टापटीप असते. रोज सकाळी शाळा भरायच्या अर्धा तास आधी विद्यार्थी वर्ग तसेच शालेय परिसराची स्वच्छता करतात. सर्व परिसर निर्मल करतात. गणवेश स्वच्छ व नीट नेटका असतो. शालेय परिपाठ मूल्य शिक्षणावर आधारित असून मराठी, हिंदी, इंग्रजी या तीनही भाषेत सादरीकरण केले जाते. आजमितीला जि. प. प्रा. शाळा भागी, देवरी येथे वर्ग १ ते ५ च्या वर्गांमध्ये १८३ विद्यार्थी व प्री–प्रायमरी कॉन्व्हेंट मध्ये ७३ विद्यार्थी असे एकूण २५६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शेवटी असे म्हणावेसे वाटते...

**लावियेला दीप प्रेम तेवता ठेवू चला, बालकांच्या उन्नतीचा मार्ग हा चालू चला...**

मुख्याध्यापक : श्री. नरेंद्र कृष्णाजी अमृतकर, संपर्क : ८३९०१ ६५२१७

## २६. उपक्रमातून गुणवत्तेकडे, जि.प. शाळेचे पाऊल पडते पुढे!




**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तारासावंगा, ता. आष्टी, जि. वर्धा**

अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. या मूलभूत गरजांबरोबरच 'शिक्षण' ही देखील एक अत्यावश्यक गरज आहे.'जे तुम्ही ऐकता ते कालांतराने विसरता, जे पाहता ते आठवणीत राहते पण जी कृती तुम्ही करता त्याने तुमची समज पक्की होते' हे जॉन ड्युई यांचे शिक्षणविषयक विचार खूपच प्रेरणादायी आहेत. हाच धागा पकडत विद्यार्थ्यांना कृतीप्रवण ठेवण्यासाठी वर्धा जिल्ह्यातील आष्टी पंचायत समिती अंतर्गत येणारी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तारासावंगा ही विद्यार्थी हितासाठी सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत असते.

जंगलव्याप्त भागात दुर्गम समजली जाणारी नागपूर, अमरावती व वर्धा या तिन्ही जिल्ह्याच्या सीमेवर असणारी वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील ही प्रगत शाळा.

इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत वर्ग असणाऱ्या या शाळेची स्थापना सन १९३४ सालची असून १०६ येथे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांसाठी सतत नाविन्यपूर्ण उपक्रमांची योजना येथील पाच शिक्षक करत असतात. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून सातत्याने प्रयत्नशील असणारी ही शाळा जिल्ह्याच्या प्रगती पातळीवर नेहमीच पहावयास मिळते.

जिल्हाधिकारी वर्धा यांच्याद्वारे राबविण्यात आलेल्या 'अप्रगत विद्यार्थीविहीन गुणवत्ता पूर्ण शाळा' या स्पर्धेत तालुक्यातून अव्वल येत तीन लाख रुपयाचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस या शाळेने पटकावले आहे. सन २०२०-२१ मधील जिल्हास्तरीय उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने शाळेतील भाषा विषयाचे शिक्षक संजय सत्यनारायण रॉय यांना जिल्हा परिषद वर्धा यांच्या तर्फे सन्मानित केले आहे. कोरोनाच्या च्या गंभीर परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात पठारावस्था निर्माण झाल्याचे राज्यभर चित्र असताना या शाळेने मात्र अध्यापनाचे कार्य तितक्याच जोमाने चालू ठेवले होते.

**'गटनिहाय ऑनलाईन – ऑफलाईन स्वाध्याय'**

या आगळ्यावेगळ्या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांशी सतत संपर्कात राहून विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात टिकवून ठेवण्यात या शाळेने यश मिळविले आहे. या उपक्रमांतर्गत शाळेतील शिक्षकांनी स्वखर्चाने विद्यार्थ्यांना स्वाध्याय पुस्तिका उपलब्ध करून दिल्या. प्रत्यक्ष

भेटीद्वारे व ज्या ठिकाणी भेट देणे शक्य नाही अशा ठिकाणी वर्गनिहाय तसेच गटनिहाय Whats app ग्रुपच्या माध्यमातून पारंपरिक व आधुनिक पद्धतीचा मेळ घालत सतत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे उल्लेखनीय कार्य केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहात टिकून तर राहिलेच याशिवाय पालकही या जिल्हा परिषद शाळेकडे आकर्षिले गेले. एकीकडे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी भरमसाठ फीचा आग्रह धरणाऱ्या खाजगी शाळा तर दुसरीकडे कोरोनाच्या परिस्थितीची तमा न बाळगता ऊन, वारा, पाऊस अशा वातावरणात दारोदारी जाऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे जिल्हा परिषदेचे शिक्षक या चित्राने समाजात पुन्हा एकदा जिल्हा परिषद शाळा व शिक्षकांची प्रतिमा उंचावण्याचे काम केले. मानिकावाडा केंद्रातील व आष्टी तालुक्यातील अनेक शाळांनी या शाळेचे अनुकरण करत हे उपक्रम आपल्या शाळेत राबवून जिल्हा परिषदेच्या शाळा कुठेच मागे नाहीत हे दाखवून दिले आहे.

कोरोना कालावधीनंतर शाळा जरी पूर्ववत सुरु झाल्या तरी सदरच्या उपक्रमाच्या कार्यवाहीत कोणत्याही प्रकारचा खंड पडलेला नाही. सदर उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन सुधारले असून गटकार्यामुळे मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीत कमालीची सुधारणा झाली आहे. शिक्षक–विद्यार्थी व पालक यांच्यातील आंतरक्रिया वाढली जाऊन पालक शिक्षक यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध निर्माण झाले आहेत. कोरोना काळात राबविण्यात आलेला स्वाध्याय उपक्रम सर्वसामान्य परिस्थितीतही राबविण्यात आल्यामुळे विद्यार्थी सतत शाळेच्या संपर्कात राहिल्याने इंग्रजी शाळेचे आकर्षण असलेले पालकही जिल्हा परिषद शाळेकडे वळलेले आहे.



### ग्रामगीता जीवन विकास अभ्यास केंद्र

शाळेत 'ग्रामगीता जीवन विकास अभ्यास केंद्र' सुरु करण्यात आले आहे. ज्यामुळे आजच्या आधुनिक काळात ढासळलेली नीतीमूल्ये व वाममार्गाकडे जाण्याची वृत्ती या परिस्थितीवर मात करून राष्ट्रसंतांच्या विचाराने राष्ट्रसंतांना अपेक्षित असा सुसंस्कृत माणूस तयार करण्याचे कार्य शाळेद्वारे सुरू आहे.

### शालेय बचत बँक

जिल्ह्यातील अनेक अधिकाऱ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. शाळेतील या उपक्रमाने तर येथील शिक्षणाधिकारी व सर्व पर्यवेक्षीय यंत्रणेलाही भुरळ घातली आहे. हुबेहूब बँकेतील व्यवहाराप्रमाणे येथील शालेय बचत बँकेचे काम चालते. त्यामुळे बँकिंग क्षेत्रातील विविध संबोध व संकल्पना स्पष्ट होण्यास विद्यार्थ्यांना मदत झाली आहे. जिल्ह्याच्या सर्वच अधिकाऱ्यांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक करत आपल्या नवीन संकल्पनाही सूचवल्या आहेत. या वर्षीपासून शालेय बचत बँकमध्ये नव्याने फिक्स डिपॉझिट, लोन, इंटरेस्ट, प्रॉफीट व लॉस या संकल्पना विद्यार्थ्यांना समजण्यासाठी प्रत्यक्षात राबविण्यात येणार आहे त्यामुळे गणित विषयाचा कठीण समजला जाणारा भाग प्रत्यक्ष अनुभवातून सोपा करून विद्यार्थ्यांना शिकायला मदत होईल.

## प्लास्टिकमुक्त शाळा



प्लास्टिकमुक्त शाळा, घरे व गाव या संकल्पनेच्या उपक्रमाची वृत्तपत्र व स्थानिक माध्यमांनीही नोंद घेतली आहे. शाळा, घर व गावातील प्लास्टिक कचरा बाहेर न टाकता प्लास्टिकच्या बाटलीमध्ये बंदिस्त करून कचरा आटोक्यात आणण्याचा शाळेचा यशस्वी प्रयत्न वाखणण्याजोगा आहे. या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थी टाकाऊ प्लास्टिकपासून विविध प्रकारच्या शोभेच्या वस्तू बनवितात, विद्यार्थ्यांनी प्लास्टिक बॉटल पासून बनविलेले शोभिवंत कुंपण लोकांसाठी आणि शाळेला भेट देणाऱ्या अधिकारी वर्गासाठी आकर्षणाचा केंद्र ठरले आहे. भेट देणाऱ्या प्रत्येकाला या ठिकाणी आपली सेल्फी, फोटो घेण्याचा मोह आवरता येत नाही. फक्त शाळा आणि घरापर्यंत मर्यादित हा उपक्रम या वर्षी गावात घरोघरी राबविण्यासाठी जनजागृती करण्याचे नियोजन आहे.

## बालकलामंच

या उपक्रमाचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना झाला आहे. येथील अनेक विद्यार्थी आकाशवाणीवर झळकले आहेत. कोणत्याही पूर्वतयारीशिवाय येथील विद्यार्थी आपल्या कला सादरीकरणासाठी सदैव तत्पर असतात.

**'कन्या अस्मिता'** उपक्रमांतर्गत मुलींसाठी स्वच्छतागृहात स्वखर्चाने 'सॅनिटरी नॅपकीन' पुरविले जातात. यामुळे या शाळेतील शिक्षकवृंद जणू आपल्या कुटुंबातील एक सदस्य असल्याची भावना मुलींना मानसिक सुरक्षा व आधार देण्याचे काम करत आहे.

## बाला उपक्रम

'बाला' या संकल्पनेवर आधारित शालेय इमारत व परिसरात विविध उपक्रमांचे आरेखन, रेखांकन केले जाते. सदर उपक्रमात शाळेत भाषा, गणित विषयांच्या संकल्पना स्पष्ट करणारे आरेखन, तक्ते बनविण्यात आले आहेत. त्याद्वारे विद्यार्थी स्वतः गटात बसून कृती करतात व इतर विद्यार्थ्यांकडून करून घेतात. यामुळे स्वयंअध्ययन व संकल्पनांचे दृढीकरण होण्यास मदत होते. सापशिडीचे फ्लेक्स हे लहान मुलांसाठी आकर्षण असून आपसूकच ते संख्याज्ञान ग्रहण करतात. त्याचप्रमाणे परिसरातील कारागीर यांच्यापासून विविध प्रकारच्या कला शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त होत असल्यामुळे विद्यार्थी आत्मनिर्भर व आत्मविश्वासू होत आहेत.

## शालेय ग्रंथालय

शालेय ग्रंथालय स्वतः विद्यार्थ्यांद्वारे चालविले जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढू लागली आहे. परीक्षांच्या दृष्टीने सकारात्मक वातावरण यामुळे निर्माण झाले आहे. शालेय परसबाग ह्या उपक्रमात विद्यार्थी–पालक यांचा प्रत्यक्ष सहभाग असून परसबागेच्या लागवडीपासून तयार झालेला भाजीपाला व फळ–भाज्या शालेय पोषण आहारात वापरल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना सकस आहार मिळतो.

शासकीय शिष्यवृत्ती, शालेय प्रशासनाद्वारे शिष्यवृत्ती, थोर पुरुषांची जयंती, पुण्यतिथी, विद्यार्थ्यांचे वाढदिवस, शासनाद्वारे राबविण्यात आलेले विविध शासकीय उपक्रम जसे 'शिकू आनंदे', 'शाळेबाहेरची शाळा', 'गोष्टींचा शनिवार', 'साप्ताहिक ऑनलाईन स्वाध्याय उपक्रम', '१०० दिवस वाचन उपक्रम' अशा अनेक सातत्यपूर्ण चालणाऱ्या उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी आमच्या शाळेद्वारे विद्यार्थ्यांसाठी केली जात आहे. जंगल व्याप्त भागात एका टोकावर असूनही शाळेने उल्लेखनीय उपक्रम राबवून वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे.

शाळेच्या प्रगतीसाठी येथील शिक्षकांना शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षणप्रेमी ग्रामस्थ व गावातील स्थानिक प्रशासनाचे उत्तम सहकार्य लाभते आहे. तालुकास्तरीय सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांची सततची प्रेरणा व मार्गदर्शन मिळत असल्याने शिक्षकांना एक वेगळ्या प्रकारची ऊर्जा मिळत आहे. मुख्याध्यापक व सर्व सहकारी शिक्षक एकजूटीने उत्तम अध्यापन सेवा देत आहेत.

मुख्याध्यापक : श्री. प्रकाश परतेती, संपर्क : ९९७०४ १२४१२

# २७. आमची शाळा, आमचा अभिमान




**जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा महालगाव, ता. तुमसर, जि. भंडारा**

भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यापासून अवघ्या २८ किलोमीटर अंतरावर अतिशय दुर्गम भागात असलेली जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा महालगाव.शाळेची स्थापना १९५५ मधील असून आजमितीला इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत ८२ विद्यार्थी सेमीइंग्रजी माध्यमातून बालस्नेही व पर्यावरणस्नेही वातावरणात गुणवत्तापूर्ण शिक्षण घेत आहेत.जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा महालगाव येथे गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे हे उद्दिष्ट समोर ठेवूनच शाळेतील तीन शिक्षक उल्लेखनीय कार्य करत आहेत. विविध उपक्रम राबवून विद्यार्थी सर्वांगीण विकासासाठीचे प्रयत्न कौतुकास्पद आहेत. आपण सर्वच ज्ञान पंढरीचे वारकरी आहोत. पावलांना ओढ आहे ती विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण समर्पित करण्याची, आस आहे ती फक्त विद्यार्थी हिताची, विकासाची व सर्वांकष व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीची. शालेय परिसर अतिशय निसर्गरम्य असून शालेय आवारात विविध झाडे, फुलझाडे, फळझाडे व औषधी वनस्पती आहेत शाळेला कुंपण, असून आवारातील झाडांना मोठमोठे पार आहेत. या झाडांवर विविध सामाजिक संदेश देणारी बोधवाक्य लिहिलेले आहेत. खेळासाठी मोठे मैदान आहे. मैदानावर विद्यार्थी देशी–विदेशी विविध खेळ मोठ्या आवडीने खेळतात. हसत–खेळत शिक्षण मिळत असल्याने शालेय वातावरणात विद्यार्थी रममाण होतात. याचाच परिणाम म्हणून शाळेतील दैनिक उपस्थितीचे प्रमाण ९८ ते १०० टक्के आहे.

## लोकसहभाग

शाळेतील शिक्षक तसेच मुख्याध्यापकांनी घरोघरी जाऊन ग्रामस्थांकडून मोठा निधी गोळा केला आहे. या निधीच्या मदतीने शाळेच्या बाहेरील तसेच आतील भिंतींना रंग देऊन सजावट करण्यात आली आहे. प्रत्येक वर्गामध्ये त्या वर्गाच्या अभ्यासक्रमांविषयी संबंधित आशय त्या त्या वर्गाच्या भिंतीवर लिहिलेला आहे. त्यामुळे वर्गातील वातावरण पूर्णपणे शैक्षणिक व बहुरंगी झाले आहे.

## ई–लर्निंग

शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक उपक्रम सातत्याने राबविले जातात. आजच्या माहिती–तंत्रज्ञानाच्या युगात अतिशय महत्त्वपूर्ण ठरणारे ई–लर्निंग वर्ग या ठिकाणी सुरु आहेत. ई–लर्निंग साठी शाळेमध्ये एक स्वतंत्र संगणक कक्ष असून वर्गनिहाय नियोजन केलेले आहे. शाळेतील प्रत्येक वर्ग संगणक कक्षामध्ये येऊन आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने आपले शालेय शिक्षण पूर्ण करत आहेत. विद्यार्थी सदर संगणक स्वतः हाताळत आहेत. विविध शैक्षणिक खेळ, कविता, नवनवीन संकल्पना यांचा लाभ मुलांना या

संगणकाच्या माध्यमातून होत आहे.



### शाळा बंद पण शिक्षण सुरु

कोरोना महामारीच्या काळात शाळा एकही दिवस बंद नव्हती. जी मुले शाळेत येऊ शकत नव्हती त्यांच्यासाठी ऑनलाईन शिक्षण सुरु होते. इतकेच नव्हे तर सुट्टीच्या दिवशीही ऑनलाईन शिक्षण मुलांकरीता सुरू होते. त्यामुळे कोरोना प्रादुर्भावाच्या काळातही मुलांचे शैक्षणिक नुकसान झालेले नाही.

### उपस्थिती ध्वज

शाळेत 'उपस्थिती ध्वज' हा उपक्रम राबविला जातो. या उपक्रमामध्ये ज्या वर्गाची उपस्थिती सर्वांत जास्त असते त्या वर्गासमोर दिवसभर उपस्थिती ध्वज ठेवण्यात येतो. जर एखाद्या दिवशी दोन किंवा तीन वर्गाची उपस्थिती शंभर टक्के असेल तर त्या तीनही वर्गातून १०० टक्के विद्यार्थी कोणत्या वर्गात प्रथम उपस्थित झालेत त्यांना उपस्थिती ध्वज दिला जातो. त्यामुळे विद्यार्थी शाळेच्या वेळेपूर्वीच शाळेत हजर राहतात.




### संबंध जोडू या मातीशी

शनिवारचा दिवस म्हणजे विविध उपक्रमांसाठी. प्रत्येक शनिवारी सकाळी योगा, 'मास पीटी' व इतर शारिरिक व्यायाम झाले की एक तास शालेय परिसर स्वच्छता तसेच गावातील ठरवलेला एक भाग याची स्वच्छता केली जाते. या उपक्रमामध्ये गावातील नवयुवक हिरिरीने श्रमदान करतात. 'शाळेत फळा असावा, खडू असावा तसेच मातीत खेळण्याचा एक तास ही जरूर असावा'. शाळा मुलांना तुरुंग न वाटता आनंदवन वाटले पाहिजे यासाठी हा उपक्रम राबविला जातो. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कर्तव्य, स्वच्छतेचे महत्त्व व सेवाभावी वृत्ती अशा मूल्यांची जोपासना होण्यास मदत होत आहे.

### मी रिपोर्टर

हा उपक्रम म्हणजे विद्यार्थी घडवणारा उपक्रम. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये अभिव्यक्ती कौशल्य निर्माण करण्याकरिता खूप उपयोगी ठरला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेत व समाजात होणाऱ्या विविध कार्यक्रमात बोलण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. सुरुवातीला वर्गातील पटसंख्येनुसार प्रत्येकी चार विद्यार्थ्यांचा एक असे गट तयार करून प्रत्येक वेळेस वेगळया विद्यार्थ्याला एक रिपोर्टर व एक कॅमेरामॅन ठरवून दिले जाते. सुरुवातीला विद्यार्थ्यांना न्यूज रिपोर्ट कशी करायची याबाबतचे प्रात्यक्षिक दाखविले जाते. विद्यार्थी वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन माहिती मिळवून रिपोर्टिंग करू लागतात, वेळप्रसंगी शिक्षक विद्यार्थ्यांना मदत करतात. यामुळे नाविन्यपूर्ण खेळाचा आनंद विद्यार्थ्यांना मिळत असतो. या उपक्रमामुळे विद्यार्थी एक–दोन मिनिटे सहज रिपोर्टिंग करू लागतात. हा उपक्रम शाळे बाहेरही  ग्रामपंचायत, बँक, बाजार व दवाखाना या ठिकाणी राबविला जाऊ लागलेला आहे. न्यूज रिपोर्टर प्रमाणे मुले बोलू लागली आहेत. आपल्या शब्दात मते मांडू लागलीत. या उपक्रमामुळे मराठी भाषेचा विकास होण्याकरिता मदत झाली आहे.

### समजू या विज्ञान

दैनंदिन जीवनात विविध नैसर्गिक गोष्टी घडत असतात. या गोष्टी घडण्यामागचे कारण काय असते या दृष्टीने विचार करण्याला विद्यार्थ्यांना प्रवृत्त करण्याकरिता 'समजू या विज्ञान' हा उपक्रम सुद्धा शाळेत राबविला जातो. दररोज चार वाजता दर्शनी फळयावर आकाश निळे का दिसते ?, पाणी निळे का दिसते ?, सूर्यास्ताच्या वेळेस सूर्य तांबडा का दिसतो ?, वृक्षाची पाने हिरवी का

असतात ?, वटवाघूळ रात्री आपले मार्ग कसे शोधतात अशा प्रकारचे प्रश्न विद्यार्थ्यांना का ? व कसे ? या दृष्टीने विचार करण्याकरिता भाग पाडतात. दर्शनी फळयावर लिहिलेल्या या प्रश्नांची उत्तरे दुसऱ्या दिवशी परिपाठात सांगणे अपेक्षित असते. विद्यार्थी मोठ्या भावंडांना व वडीलधाऱ्या माणसांना विचारून किंवा इंटरनेटची मदत घेऊन या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक महिन्यात जो विद्यार्थी जास्तीत जास्त प्रश्नांची उत्तरे देतो त्याला शैक्षणिक साहित्यरूपी बक्षिस देऊन गौरविण्यात येते.

**बाल आनंद मेळावा**



विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध साहित्याचे प्रदर्शन भरविले जाते. Only One My Wish Getting Mastery In Spoken English या उपक्रमामुळे विद्यार्थी इंग्रजी संभाषण करु लागले. या शाळेचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे इयत्ता सहावी व सातवी तील मुले इंग्रजीतून संभाषण करतात तसेच इयत्ता पहिली ते सातवीतील मुले अस्खलितपणे इंग्रजी वाचन करतात. इंग्रजी विषयाबद्दलचे विविध उपक्रम या शाळेत राबविले जात असल्यामुळे गावातील इंग्रजी माध्यमामध्ये जाणारी मुले आता जिल्हा परिषद शाळेकडे वळली आहेत. गेल्या तीन वर्षापासून गावातील एकही मूल इंग्रजी माध्यमांच्या शाळेत गेलेले नाही. महत्वाचे म्हणजे जवळच्या गावातील विद्यार्थीही आता या शाळेत प्रवेश घेऊ लागले आहेत.

Read English

या नव्या उपक्रमाकरीता २०२०-२१ चा जिल्हास्तरीय द्वितीय पुरस्कार शाळेला प्राप्त झालेला आहे. Only one is my wish, getting mastery in spoken English या नवीन उपक्रमाकरीता २०२१-२२ ला जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे. आमच्या शाळेने 'ब्लॉग' तयार केले आहे. शाळेतील शिक्षकांनी इंग्रजी वाचन विकासाकरीता रिड इंग्लीश हे 'ॲप' तयार केले आहे. ॲप प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. शाळेमध्ये सर्व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना स्वतंत्र स्वच्छतागृह, अपंग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प व स्वतंत्र स्वच्छतागृह, कुंपण, पिण्याच्या पाण्याची टाकी, जल शुध्दीकरण यंत्र व क्रीडांगण आहे. स्वतंत्र किचन शेड, विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंच उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे शाळेत ड्रम, लेझीम, डंबेल्स आहेत. विविध कार्यक्रमांच्या वेळी सदर साहित्यांचा उपयोग केला जातो. शासनाच्या सर्व योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना दिला जातो.

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन**

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शाळेमध्ये काटेकोरपणे राबविले जाते. विद्यार्थ्यांच्या वर्तनविषयक नोंदी वेळेवर भरल्या जातात. सन २०२०-२१ मध्ये इयत्ता पाचवीतील एक मुलगा व एक मुलगी यांना स्कॉलरशिप मिळाली असून एका विद्यार्थिनीचा नवोदय परीक्षेच्या माध्यमातून JNV पांचगाव भंडारा या ठिकाणी प्रवेश झाला आहे. याचे श्रेय शाळेत वर्षभर घेतल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती मार्गदर्शकांना जाते. ज्यामध्ये गावातील शिक्षित युवकांचा ही सहयोग आहे. शाळेच्या सर्वांगीण विकासाच्या वाटचालीत गावातील विविध बचत गट, ग्रामपंचायत, सर्वात महत्त्वाचे म्हणजे शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षणप्रेमी ग्रामस्थ यांना जाते. या सर्वांचे मोलाचे सहकार्य शाळेला लाभले आहे. सर्वांच्या सहकार्यामुळे शाळेतील १०० टक्के विद्यार्थी मूलभूत वाचन क्षमता विकास व संख्याज्ञान यामध्ये प्रगत आहेत. ज्ञानरचनावादाचा वापर केल्यामुळे शाळा, वर्ग प्रगत झाले आहेत. जिल्ह्यातील अनेक शाळा जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा महालगाव येथील यशोगाथा प्रत्यक्ष पहायला भेटी देत आहेत.

अशी ही उत्तरोत्तर प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणारी सर्वांची आवडती अशी शाळा आहे. शाळेचा निसर्गरम्य व मनमोहक परिसर, शिक्षकांचे रंजक व प्रभावी पद्धतीने अध्यापन, शाळा व्यवस्थापन समिती, गावातील विविध बचत गट, शिक्षणप्रेमी ग्रामस्थ व त्यांचा शाळेविषयीचा सकारात्मक दृष्टिकोन या सर्व गोष्टींच्या समन्वयातून जे जे चांगले उपयुक्त व उत्तम ते ते सर्व या शाळेने उपलब्ध करून घेतलेले आहे. यापुढेही शाळेतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याकरीता व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याकरीता जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा महालगाव याच प्रकारचे नवनवीन उपक्रम शाळेत राबवत राहील.

मुख्याध्यापिका : सौ.मंजुषा सिद्धार्थ नंदेश्वर, संपर्क : ९९७५५ ११७५७

# २८. रात्र अभ्यासिका– एक अभिनव प्रयोग




**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माझेरी, ता. फलटण, जि. सातारा**

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातून निरा देवघर धरणामुळे २००२ साली विस्थापित झालेलं माझेरी हे गाव. अर्धा गाव तिथेच डोंगरकुशीत अन् अर्धा उजाड झालेलं भविष्य शोधण्यासाठी फलटण तालुक्यातल्या विडणी गावच्या भयाण माळावर. गावात घरं अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकी, दोन गावदेवाची मंदिरं, एक ग्रामपंचायतची खोली. २००२ साली स्थापन झालेली २ खोल्यांची छोटीशी द्विशिक्षकी शाळा पट जेमतेम १५ ते २० होता.

मोडून पडलेला यांचा संसार उभा करण्यातच गावकऱ्यांचं एक तप वाया गेलं. प्रत्येकानं सावरण्यासाठी हात दिलाय पण अजूनही इथे भ्रांत होती जगण्याची. प्रत्येक श्वासासाठी धडपडावे लागत होतं. सन २०१२ साली शिक्षकांच्या प्रशासकीय बदल्या झाल्या. कार्यरत शिक्षकांची एक टीम बदलली आणि दुसरी नव्याने गवसली. माळावरच्या शाळेत मिटींग झाली... शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे पटवून दिले. विषय रंगला... विचारांचा संघर्ष पेटला... परिवर्तनाची मशाल प्रज्वलित झाली. उजेडाचा हळूवार किरण अंधारात चाचपडत निघालेल्या गावाला एक प्रकाशवाट देऊन गेला. गाव हातात हात घालून चालू लागला. बदलायला हवं. आता आपल्याला बदलायलाच हवं. कार्यक्रम ठरला, नियोजन झालं. जो–तो आपापली जबाबदारी पार पाडण्यात गुंग झाला. संघर्ष सुरु राहिला आणि एक दिवस मागे वळून पाहताना कळलं की निश्चयाचा बराच पल्ला पादाक्रांत केलाय.

माझेरी शाळेत नव्यानेच कोरेगाव तालुक्यातून विद्युलत्ता देसाई आणि कर्णेवाडीहून भोलचंद सोमा बरकडे यांची बदली झाली. शाळेला दोन वर्गखोल्या आणि अन् काम करणारे दोन शिक्षक बस्स एवढंच. साधनांची वाणवा अन् पालकांची उदासिनता शिक्षणातला मुलांचा रस शोषून घेत होती.समाजनिर्मिती मधील शिक्षणाची भूमिका जोपर्यंत लोकांना समजणार नाही तो पर्यंत लोकांच्या जगण्यात अन् वागण्यात बदल होणार नाही. लोकांना बदलवायच असेल तर त्यांच्या मनात विश्वास निर्माण करावा लागेल.

आम्हाला तेच करायच होतं. साऱ्याच समस्या आ वासून पुढे उभ्या होत्या. मात्र निर्धार पक्का असला की समस्या अडचण न बनता संधी बनून जातात. ती संधी आम्हाला गवसत गेली. मुलांची शाळेत बैठक बोलावली, मुलांची बैठक म्हणजे त्यांच्यासाठी नवलाचीच गोष्ट! मोठ्यांच्या बैठकबाबत त्यांनी ऐकल होतं, पण आज संध्याकाळी आपली मिटींग कशी असेल याची मुलांना प्रचंड उत्सुकता, मुले जमली, बाईंनी मुलांचं स्वागत केलं आणि आपल्या शाळेत काय–काय छान करता येईल असा प्रश्न बाईंनी केला. काही काळ शांतता अन् त्यानंतर मुले बोलू लागली. रोज शाळेत यायचं, अभ्यास करायचा, स्वच्छ राहायचं, भांडायच नाही, शिस्त पाळायची, व्यायाम करायचा, शाळा स्वच्छ ठेवायची, झाडे लावायची, मैदान स्वच्छ करायचं असे कितीतरी उपाय आणि सुधारणा मुलांनी सुचविल्या. प्रश्नही त्यांचे अन् उपायही त्यांचेच मग घडायला अन् घडवायला आणखी काय लागतं. आम्ही आमचे नियोजन केले. १५१ कलमी कार्यक्रम तयार केला.

चमत्काराशिवाय नमस्कार कुठला? तेव्हा लोकांना काही दाखवायचं तर बदललेल्या मुलांच चित्र दाखवूया, हा संकल्प मानस आम्ही शिक्षकांनी सोडला. पहिलं वर्ष लोकांना काही मागण्यापेक्षा प्राप्त परिस्थितीमधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण गुणवत्ता विकास साधण्यावर भर दिला. विद्यार्थी स्वच्छ शाळेत येऊ लागला, छान बोलू लागला, लिहू–वाचू लागला, शिस्तीने व जबाबदारीने वागू लागला. तो शाळेतल्या गमती–जमती सांगू लागला की घरातल्या माणसांना त्याचं कौतुक वाटायला लागतं. आम्हालाही हेच हवं होतं. शाळेतले स्वच्छतेचे व शिस्तीचे धडे आता घराघरात पोहोचले होते. मुले शाळेला गावात पोहचवणारे दूत बनले होते. शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीस न येणारे सदस्य व पालक आता जयंती, पुण्यतिथी, मेळावे, राष्ट्रीय सण व समारंभाला शाळेत येऊ लागले. शाळेच्या बदलाची प्रशंसा करु लागले. शाळेत आणखी काय–काय असावे, करावे याच्या चर्चा झडू लागल्या. कल्पनांना वाटा फुटू लागल्या... आपली शाळा आदर्श करता येईल यावर सहमत झाले. तोपर्यंत एकीकडे गुणवत्ता आकार घेत होती. शाळा खेळात तालुका आणि जिल्हास्तरावर चमकली होती. हस्ताक्षर, वक्तृत्व, निबंध, चित्रकला, गायन, हस्तकला, मनोरे, कसरती, दांडपट्टा, लंगडी व कबड्डी अशा कला व क्रिडा प्रकारांमध्ये चमक दाखवित होती. बौद्धिक स्तरावर प्रज्ञाशोध परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा निकालात शाळेचा लौकिक वाढवित होती. प्रश्नमंजुषासारख्या स्पर्धेत शाळा जिल्हास्तरावर पोहोचली होती.

अन् आणखी एक स्वप्न मुठीत घेण्यास आम्ही आता अधीर होतो ते म्हणजे डिजिटल शाळा! नवीन व्यवस्थापन समिती स्थापन होऊन होतकरु अशा गणेश दिघे यांची शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली. परिसरातील डिजिटल शाळा पाहण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचा अभ्यासदौरा काढण्यात आला. तेथे शिक्षक, व्यवस्थापन समिती, पालक यांच्याशी झालेल्या संवादातून प्रेरित झालेला आमचा संघ गावी परतला तो प्रचंड आत्मविश्वास घेऊनच. परतताच ग्रामसभेचे आयोजन केले. आपल्याला काय करता येईल, कोणत्या गोष्टी प्राधान्याने कराव्यात, त्यासाठी आर्थिक खर्च किती लागेल, कोणती जबाबदारी कोणी पार पाडायची, याचे नियोजन झाले.



शाळेचा नावलौकिक वाढू लागल्याने परिसरातील पाच–दहा खेड्यातून पालक मुलांना शाळेत घालायला इच्छुक होते. त्यामुळे पट वाढू लागला. पालक, ग्रामस्थ यांनी दोन लाखांचे योगदान दिले. शाळेची रंगरंगोटी झाली, लाईटची सोय केली, २ संगणक आले, गळणारे छत बदलले, परिसरात पूर्वी केलेल्या वृक्षसंवर्धनासाठी पाणी दूरवरून आणले, पाण्याच्या टाक्या व शौचालये दुरुस्त झाली. शाळेभोवती कुंपण करावे हा विचार येताच सरपंच ज्ञानेश्वर दिघे यांनी अभिनव कल्पना मांडली. मावळात उरलेल्या माळरानात बांबूची बेटे आहेत. तिथून कळक आणले. कळकाचे सुंदर कुंपण तयार झाले. गुणवत्ता वाढू लागली तशी पटसंख्याही वाढली.

कधीकाळी १५-२० विद्यार्थ्यांची असणारी शाळा ८०-९० विद्यार्थ्यांची झाली. पालकांच्या आग्रहास्तव २०१६-१७ साली ५ वीचा वर्ग शाळेस जोडला. त्याच वर्षी शांतीलाल मुथ्था फाउन्डेशन, महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालय व विद्या प्राधिकरण पुणे यांच्या 'मूल्यवर्धन कार्यक्रम' करीता पायलट प्रोजेक्टसाठी जिल्ह्यातून आमच्या शाळेची निवड झाली. विद्यार्थी ८९, वर्ग १ ते ५, शिक्षक २, वर्गखोल्याही २. शाळा आयएसओ करण्यासाठीचा प्रस्ताव, खेळ, प्रकल्प, उपक्रम, प्रज्ञाशोध, नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षा अशा ओढाताणीतही स्थितप्रज्ञ राहात आम्ही सर्वजण काम करत होतो. दोन वर्ग मैदानावर वाढवलेल्या झाडाखाली बसत होते. एक वर्ग ग्रामपंचायतीच्या कार्यालयात, अशा धामधुमीत पालकांसमोर एक उपक्रम मांडला, ज्यादा तासांचा. शाळेची वेळ झाली सकाळी ८:०० ते रात्री ८:००, आठवड्याचे सात दिवस अखंडपणे शाळा.

शाळेला हव्या असणाऱ्या भौतिक सुविधा आल्या. दोनच शिक्षक असल्यामुळे पालकांनी जोडीला एक शिक्षकमित्र नेमला. काम वेग घेत होते. संध्याकाळी उशिरापर्यंत शाळा असल्यानं पालकांकडून रोज ६:०० वा पाळी लावून विद्यार्थ्यांना नाश्ता द्यायला सुरवात झाली. ज्या कुटुंबावर नाश्त्याचा दिवस असतो ते कुटुंब सदस्य शाळेत येऊन सर्व मुलांना आदरपूर्वक खाऊ घालतात. यातून सामाजिक सलोखा वाढत जाऊन आमची शाळा म्हणजे 'माझेरीयन्स परिवार' झालाय.

याचवर्षी शाळेला आयएसओ मानांकन प्राप्त झाले. क्रीडास्पर्धेत विविध प्रकारात मुला–मुलींनी तालुका, जिल्हा पातळीवर बाजी मारली. मूल्यवर्धन कार्यक्रमातून शाळेने राज्यात आपला वेगळा ठसा उमटवला. प्रज्ञाशोध परीक्षा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धांमध्ये शाळेने नेत्रदीपक यश संपादन केले. नवोदय परीक्षेत पहिल्याच वर्षी खाते खोलले. ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत यशाचा कळस गाठला. १६ पैकी १३ विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले. रात्र अभ्यासिकेचा प्रयोग फलद्रुप झाला. शब्दांवरचा विश्वास दृढ झाला. शाळेला बक्षिसांची खैरात झाली. मुलांचे वाढदिवस शाळेतच साजरे करायचे, त्यावर ज्यादाचा खर्च करण्याऐवजी शाळेला वस्तूरुपात ऐपतीप्रमाणे मदत करण्याची अनोखी प्रथाच इथे सुरु आहे.

शालेय वाचनालयास ग्रामपंचायतीने मदत केली. ग्रंथालय ताईंच्या मदतीने मुले दररोज एक तास वाचनकट्ट्यावर ग्रंथालयातील पुस्तके वाचू लागली. स्वतंत्रलेखन करू लागली. अनुभव कथन करत राहिली. वाढदिवसाला ग्रंथालय समृद्धीसाठी पुस्तके भेट आली. सातत्याने हा उपक्रम शाळेत सुरू आहे.

पुढील वर्षीही आणखी नवे उपक्रम सुरु केले. मुलींना धाडसाने समाजात वावरता यावे. म्हणून मुलींसाठी 'सेल्फ डिफेन्स' नावाचा कार्यक्रम सुरु केला. बैठक व्यवस्थेत मुला–मुलींसाठी एकत्रित बैठक व्यवस्था केली. नेतृत्वाच्या संधी मुलींनाही उपलब्ध करुन दिल्या. स्पर्धा परीक्षांसाठी सातत्याने प्रयत्न केले. जिल्हा परिषद सातारा यांनी आयोजित केलेल्या स्वच्छ, सुंदर, गुणवत्तापूर्ण व उपक्रमशील शाळा स्पर्धेत सहभाग घेतला. आपल्याकडील विविध क्षेत्रातील गुणवत्ता सिद्ध करीत तालुक्यात शाळेने प्रथम क्रमांक पटकाविला.

आता यशाचा चढता आलेख पाहून शाळा प्रवेशासाठी पालकांची गर्दी होते. २०-२० कि.मी.वरुन तसेच फलटण शहरातून विविध माध्यमाची मुले मराठी माध्यमाच्या, जिल्हा परिषदेच्या या शाळेत प्रवेशासाठी उत्सुक असतात. आता व्याप वाढला आहे. अपेक्षाचं ओझही वाढलं, शिक्षक मात्र दोनच होते. प्रत्येक वर्गात सरासरी ३० याप्रमाणे पटसंख्या १५० झाली. विविध कार्यक्रम घेण्यासाठी सर्व विद्यार्थी मावतील अशी जागा नव्हती. पालकांपुढे लोकवर्गणी, शैक्षणिक उठावाचा प्रस्ताव मांडला आणि रू. ८ लाखाची शैक्षणिक मदत वस्तूरुपाने मिळाली. त्यातून एक मोठी वर्गखोली व सभागृह बांधले.

शालेय परिसरातील गवंडी, सुतार, कुंभार, टेलर, वाहन मालक, शेतकरी, कामकरी,माजी सैनिक, रंगारी, बिगारी, व्यापारी व अधिकारी प्रत्येकाने शाळेला वेळ दिला. कुणी विणकाम, भरतकाम शिकवलं, कुणी चित्र रेखाटनं, कुणी गाणं शिकवलं, तर कुणी नाचणं, कुणी दांडपट्टा तर कुणी ढोल–लेझीम. क्षेत्रभेटी, परिसरभेटी, सहली, मेळावे, स्पर्धा व प्रदर्शने यांची रेलचेल झाली. शिक्षकांची भूमिका पार पाडणारा संघच तयार झाला. प्रत्येकानं कल्पना मांडावी आणि ती साकारण्यासाठी धडपडावं. रांगोळी, चित्रकला, कसरती, योगासनं, मनोरंजक खेळ, पारंपरिक खेळ स्पर्धा झाल्या. विज्ञान, वस्तूनिर्मिती व पुस्तक प्रदर्शने झाली. स्वच्छ–सुंदर गुणवत्तापूर्ण व उपक्रमशील शाळा स्पर्धेत सन २०१८-१९ मध्ये शाळा जिल्ह्यात प्रथम आली. क्रीडास्पर्धेत जिल्ह्याची चॅम्पियनशीप शाळेस मिळाली. सैनिक स्कूल, नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेने नवे उच्चांक गाठले. शाळा १५-२० पटापासून ३२२ पटापर्यंत पोहोचली आहे. आम्ही जागेअभावी अनेक प्रवेश नाकारले आहेत. आता शाळेत 5 शिक्षक झालेत. रिले स्पर्धेत सलग सहा वर्षे जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचे विजेतेपद मिळवले आहे. मागील पाच वर्षात सैनिक स्कूल या प्रवेश परीक्षेत १८ विद्यार्थी पात्र झाले आहेत. मागील पाच वर्षात जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत १९ विद्यार्थी पात्र झाले आहेत. मागील पाच वर्षात ५ वी. शिष्यवृत्ती परीक्षेत ७७ विद्यार्थ्यांची राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत निवड झाली आहे. याबरोबर विविध प्रज्ञाशोध परीक्षांमध्ये शेकडो विद्यार्थी राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत चमकले आहेत. या दैदीप्यमान यशाचे श्रेय शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या त्रिवेणी संगमाला जाते.

त्याचबरोबर ग्रामस्थ, अधिकारी व पदाधिकारी यांच्या पाठबळामुळे हे सर्व शक्य झाले. ग्रंथपाल, क्रीडा, नाट्य–नृत्य, कलाशिक्षण, कराटे व ॲबॅकस यासाठी शाळा व्यवस्थापनाने शिक्षकमित्रांची निवड केली आहे. मुलांना दिलेले संस्कार दृढ व्हावेत म्हणून शाळेने पालकांसाठीही संस्कार शिबिरे व व्याख्यानांचे आयोजन केले. आरोग्याधिष्टित जीवनशैली विकसनासाठी वैद्यकीय शिबिरे वारंवार आयोजित केली. आर्ट ऑफ लिव्हींगच्या माध्यमाने सर्व पालकांचे हॅपीनेस, वेलनेस व नवचेतना असे कोर्स पूर्ण केले. व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन व कुटीरोद्योग अशा प्रशिक्षणातून पालकांना मार्गदर्शन करण्याचा व सामाजिक सलोखा वाढविण्याचा शाळा प्रयत्न करत आहे. विविध शिबिरांचे शाळा आयोजन करते. शाळेने रक्तदान शिबिर आयोजन केले होते. त्यामध्ये १०२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. व्यवस्थापन समितीचे नेटके नियोजन, माझेरी ग्रामपंचायतचे पाठबळ यातून शाळा उत्कर्षाकडे वाटचाल करीत आहे. गाव मंदिरात जात होता, विसावत होता आता तो ज्ञानमंदिरात विसावतो आहे. तरुणपिढी थोरा–मोठ्यांच्या मार्गदर्शनाखाली पळते आहे. शाळा आणि आमचे विद्यार्थीही खूप मोठे व्हावेत असे स्वप्न पालकांसोबत आम्ही सुध्दा पाहतोय.

मुख्याध्यापक : श्री. गणेश हौसेराव पोमणे, संपर्क : ९५८८४ ७२६९६

## २९. गुणवत्तेचं खणखणीत नाणं




**जिल्हा परिषद प्राथमिक विद्यामंदिर कारभारवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर**

शैक्षणिक गुणवत्ता हा वर्तमानात कळीचा प्रश्न आहे. 'लेखनवाचन क्षमता म्हणजेच गुणवत्तापूर्ण शिक्षण' इतका मर्यादित दृष्टिकोन ठेवायचा, की त्या क्षमतांना गुणवत्तेची सुरुवात मानायचे, असे मुद्दे गुणवत्तेचा विचार करताना लक्षात घ्यावे लागतात. शिक्षणाची गुणवत्ता म्हणजे केवळ काही मुलांचा बौद्धिक विकास असे नसून सर्व मुलांना विशिष्ट संपादणुकीसह शिक्षण मिळणे, असा अर्थ आहे. शिक्षण व शिक्षणाची उद्दिष्ट्ये काळानुरूप बदलत असतात. समाज व सामाजिक व्यवस्था ज्या गतीने बदलत आहे त्याच गतीने विद्यार्थी, पालक व समाजाची शिक्षणासंदर्भातील अपेक्षा बदलत आहे. विद्यार्थ्यांमध्ये आयुष्यातील सर्व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी योग्य तयारी व आत्मविश्वास निर्माण करणे महत्वाचे आहे. यासाठी विद्यार्थी दशेतील मार्गदर्शन, प्रेरणा व योग्य सवयींची रुजवणूक महत्वाची ठरते. त्यामुळे तयार होणारे सकारात्मक वातावरण विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणारे ठरते. असे वातावरण शाळेत निर्माण करून दर्जेदार शिक्षण देण्यासाठी जिल्हा परिषद शाळा कारभारवाडीतील आम्ही तीनही शिक्षक प्रयत्नशील आहोत. आमच्या शाळेची स्थापना १९६२ सालची असून इयत्ता १ ली ते ५ वी चे ११८ विद्यार्थी सद्यस्थितीत ज्ञानार्जन करीत आहेत.

### गुणवत्तेचा पाया

कारभारवाडी ही करवीर तालुक्यातील एक लहानशी वाडी. काही वर्षापूर्वी शाळेचा पट अगदी २० ते ३० असायचा. या शाळेस नवसंजीवनी दिली ती श्री. नंदकुमार वड्ड सर व सौ. कुतपल्ली मॅडम या दांपत्याने. त्यांनी विविध स्पर्धा, उपक्रम व उत्कृष्ट अध्यापनाच्या जोरावर ही शाळा नावारूपाला आणली. या लौकिकामुळे आसपासच्या गावातूनही विद्यार्थी येथे शिकण्यासाठी येऊ लागले. पट ६० च्या आसपास गेला. पट वाढल्याने शिक्षकाचे तिसरे पद मंजूर झाले. शाळेची नाळ समाजाशी, पालकांशी, जोडण्याचे महत्त्वपूर्ण काम नव्याने आलेल्या श्री. दिपक पिंजरे सरांनी केले. पुढे बदल्यांमध्ये श्री. मुरलीधर पाटील सर व श्री. धनाजी केशव पाटील सर शाळेत रुजू झाले. दरम्यान शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ४ थी व ७ वी ऐवजी इयत्ता ५ वी व ८ वी ला घेण्याबाबत शासन निर्णय झाला. शिष्यवृत्ती परीक्षेस आपल्या शाळेतील मुलांना प्रविष्ट होता यावे म्हणून या तिघांनी जाणीवपूर्वक शाळेत पाचवीचा वर्ग मंजूर करून घेतला. शिष्यवृत्ती परीक्षेचा सूक्ष्म अभ्यास करून मुलांची तयारी करून घेतली व शिष्यवृत्तीचा एक आदर्श 'कारभारवाडी पॅटर्न' तयार केला. आज आम्ही तिन्ही शिक्षक त्रिमूर्ती शाळेची यशस्वी परंपरा पुढे जपत यशाची नवनवीन शिखरे पादाक्रांत करत आहोत.

### आगामी दोन वर्षाचे इयत्ता पहिलीचे प्रवेश निश्चित

कारभारवाडी सारख्या छोट्या वाडीतील ५ वी पर्यतच्या शाळेचा आजचा पट ११८ आहे. विशेष म्हणजे केवळ २२ विद्यार्थी कारभारवाडीचे असून ९६ विद्यार्थी इतर अकरा गावातून येतात. ह्या शाळेत प्रवेश मिळावा म्हणून परिसरातील गाव व वाडीतील पालक

प्रयत्नशील असतात. जागेच्या अभावी सर्वच विद्यार्थ्यांना प्रवेश देणे शक्य होत नाही. शैक्षणिक दर्जा उत्तम असल्यामुळे आमच्या शाळेतील पुढील दोन वर्षांचे इयत्ता पहिलीचे प्रवेश अगोदरच पूर्ण झालेले आहेत.

**स्पर्धा परीक्षा : ५ वी शिष्यवृत्ती व नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा**



पाचवीच्या वर्ग मंजुरीनंतर पहिल्याच वर्षी म्हणजे सन २०१७-१८ मध्ये ११ विद्यार्थी राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये आले. या वर्षी या शाळेचा कु. अद्वैत अरूण हळदकर हा विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत दुसरा आला. त्याच बरोबर कु. ज्ञानेश्वर पाटील याची जवाहर नवोदय विद्यालयमध्ये निवड झाली. सन २०१८-१९ मध्ये ७ विद्यार्थी राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत चमकले. सन २०१९-२० मध्ये शिष्यवृत्तीचा वर्ग मुख्याध्यापक श्री. धनाजी दगडू पाटील यांच्या कडे असताना ८ विद्यार्थी राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत आले व एक विद्यार्थीनी कु. रसिका मेटील हिची जवाहर नवोदय विद्यालय मध्ये निवड झाली. सन २०२०-२१ मध्ये ५ विद्यार्थी राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये चमकले. राज्य गुणवत्ता यादीमध्ये यावर्षी ६ वा व ७ वा गुणानुक्रम पटकावला. त्याचबरोबर कु. सिध्दी वरुटे व श्रेयस पाटील या दोन विद्यार्थ्यांची केंद्र शासनाच्या जवाहर नवोदय विद्यालयामध्ये निवड झाली. अशा प्रकारे ३ ते ४ वर्षांमध्ये शाळेचे ३१ विद्यार्थी राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत तसेच ४ विद्यार्थी नवोदय विद्यालयाच्या प्रवेशासाठी पात्र ठरून शाळेच्या गुणवत्तेचा वाढता आलेख कायम राहिला.

**प्रज्ञाशोध परीक्षा**

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या वतीने दरवर्षी जिल्ह्यातील चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी 'प्रज्ञाशोध परीक्षा' घेतली जाते. या परीक्षेमध्ये विद्या मंदिर कारभारवाडी ही शाळा नेहमीच अव्वल ठरली आहे. सन २०१७-१८ मध्ये कु. स्वरुप धनाजी पाटील, सन २०१८-१९ मध्ये कु. रसिका प्रकाश मेटील, सन २०१९-२० मध्ये कु. शंतनु संदीप गोसावी, सन २०२०-२१ मध्ये कु. रुद्र महेश वरुटे या सर्वांनी जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून शाळेच्या नावलौकिकात भर घातली. करवीर प्रज्ञाशोध परीक्षा हा तालुक्याचा एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम आहे. यामध्ये इ. १ ली व २ रीच्या मुलांची शिष्यवृत्तीच्या धर्तीवर बहुपर्यायी प्रश्नांची १०० गुणांची परीक्षा घेण्यात येते. यामध्ये आमच्या शाळेने दरवर्षी १०० पैकी १०० गुण मिळविणारे बहुतांश विद्यार्थी तयार केले आहेत. या कामी वर्गशिक्षक श्री. गणेश वासुदेव यांनी विशेष परिश्रम घेतले. त्याचबरोबर इ. ३ री च्या 'समृद्धी प्रज्ञाशोध' परीक्षेमध्ये बहुतांश मुलांनी राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर गुणानुक्रम मिळवून शाळेचा नावलौकिक वाढवला आहे.

**शाळेचे नावीन्यपूर्ण उपक्रम**

शाळेची गुणवत्ता वाढविण्यासाठी जादूची कांडी कुठेही उपलब्ध नाही. शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रिया, प्रेरणा, दिलेला वेळ व योग्य प्रतिसाद महत्त्वाचा असतो. अन्यथा स्पर्धा परीक्षा म्हणजे केवळ एक शर्यत बनते. निकोप स्पर्धात्मक वातावरण निर्माण होण्यासाठी इतर उपक्रमही महत्वाचे ठरतात. विद्या मंदिर कारभारवाडी शाळेचे इ. १ ली ते ५ वीचे सर्व वर्ग दरवर्षी १ जून पासून सुरू होतात व दररोज ९:३० ते ५:३० या वेळेत वर्गाध्यापन केले जाते. शिष्यवृत्ती, नवोदय, प्रज्ञाशोध व 'केटीएस' सारख्या स्पर्धा परीक्षेची

उत्कृष्ट तयारी करून घेतली जाते. यश मिळवणारे विद्यार्थी खालच्या इयत्तेतील मुलांसाठी प्रेरणास्त्रोत बनतात. केवळ पुस्तकी ज्ञान नाही तर अवांतर वाचनावर भर दिला जातो. गोष्टींची पुस्तके, वर्तमानपत्रे किशोर मासिक अशी पुस्तके मुले आवडीने वाचतात व सारांश कथन करतात. वक्तृत्वाची कला लहान वयातच आत्मसात केल्याने शाळेतील सर्व मुले वक्तृत्व स्पर्धेत भाग घेत असतात. विविध संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन पुस्तकी ज्ञानाची व्यावहारिक ज्ञानाशी सांगड घातली जाते. पालकांनी शाळेशी जोडून राहावे म्हणून नियमित पालक सभा घेतल्या जातात, त्या सोबतच माता पालकांसाठी मार्गदर्शन सत्र व विविध स्पर्धांचे देखील आयोजन केले जाते. प्रभावी मराठी वाचन व गणितातील मूलभूत गणन क्रियांमध्ये १००% विद्यार्थी प्रगत आहेत. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनात अ–१ श्रेणीत दरवर्षी ९०% पेक्षा जास्त विद्यार्थी तर इंग्रजी अक्षर सुधारण्यासाठी १ ली ते ५ वी सर्व विद्यार्थ्यांसाठी 'कर्सिव्ह रायटींग' उपक्रम घेतला जातो. आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण दिले जाते. महत्त्वाचे सण सोडल्यास सुट्टीच्या दिवशीही शाळा सुरु असते. शाळेसाठी शिक्षक जास्त वेळ देऊन शाळेची गुणवत्ता व प्रगती वाढवण्यासाठी अहोरात्र झटतात. इ. ५ वीचा वर्ग सकाळी ८:०० ते संध्याकाळी ५:३० पर्यंत कार्यरत असतो, तर इतर वर्गांचे कामकाज सकाळी ९:०० ते ५:३० असे असते.




### शाळा व्यवस्थापन समिती व पालक सहभाग

शाळा व्यवस्थापन समिती पूर्णपणे सक्रिय आहे शाळेच्या व शिक्षकांच्या सदैव पाठीशी ही समिती असते. जेथे गरज भासेल तेथे प्रत्यक्ष सहभाग घेऊन शाळेच्या विकासात हातभार लावला जातो. श्रमदान, अर्थदान, ज्ञानदान तसेच वेगवेगळे उपक्रम राबविण्यासाठी वेळेच्या स्वरूपातही योगदान पालक देत असतात. शाळा व्यवस्थापन समितीच्या सभा दर महिन्याला खेळीमेळीत संपन्न होते. शाळेच्या विकासासाठी व प्रगतीसाठी सखोल चर्चा घडवून आणली जाते तसेच अडचणींवर मात करण्यासाठी उपाययोजना आखली जाते. वेळोवेळी गुणवंत विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे यथोचित असे सत्कार समारंभही आयोजित केले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अधिक ऊर्जा व प्रेरणा मिळते.

### लोक सहभाग

गेल्या ३-४ वर्षात शाळेच्या प्रगतीसाठी ५ लाखांच्या आसपास शैक्षणिक मदत निधी विविध माध्यमातून जमा करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने छोटी खोली, एलईडी टीव्ही, आर्थिक स्थिती नाजूक असलेल्या मुलांसाठी गणवेश, वह्या–पुस्तके, शाळेसाठी उपयुक्त वस्तू, कपाटे, टेबल, खुर्ची, शाळेतील रंगरंगोटी व सजावट यांचा समावेश होतो. त्याचबरोबर गुणवत्ता यादीत आलेल्या मुलांसाठी चषक व रोख बक्षिसे दिले जातात. तसेच मार्गदर्शक शिक्षकांचा यथोचित सत्कारही केला जातो. कारभारवाडी शाळा म्हणजे गुणवत्ता हे एक समीकरण झाले आहे. समाज माध्यमे व प्रसिद्धी माध्यमांद्वारे शाळेच्या यशाची दखल घेतली आहे. लोकमत समूहाने **'शिष्यवृत्तीचा कारभारवाडी पॅटर्न'** तर सकाळ समूहाने **'गुणवत्तेचं खणखणीत नाणं'** म्हणून शाळेचा गौरव केला आहे.

मुख्याध्यापक : श्री. धनाजी दगडू पाटील, संपर्क : ९०९६४ १३५४१

# ३०. गुणवत्तेचा भविष्यवेध




**जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक आदर्श केंद्रिय शाळा लोटेमाळ ता. खेड, जि. रत्नागिरी**

लोटेमाळ हे रत्नागिरी जिल्ह्यातील खेड शहरापासून जवळ असलेले औद्योगिक वसाहत परिसरात आणि भगवान परशुराम भूमीमध्ये नटलेले एक गाव. या गावातील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक केंद्रशाळा, लोटेमाळ या शाळेची स्थापना १९५० ची आहे. या शाळेत पहिली ते आठवी पर्यंतचे सेमी वर्ग असलेली एकमेव शाळा आहे. या शाळेत एकूण २२४ विद्यार्थी शिक्षण घेत असून ७ शिक्षक अध्यापनाचे कार्य करत आहेत. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात खूप मोठे बदल झाले. 'ज्ञानरचनावाद', 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र', 'शिक्षणाची वारी', 'संबोध विकास प्रशिक्षण' आणि आता 'गुणवत्ता विकास कार्यक्रम' यासारख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून १००% विद्यार्थी प्रगत होण्यासाठी अनेक उपक्रम राबविण्यात आले. यातून अध्ययन–अध्यापन प्रकिया सुलभ झाली. बदल हा निसर्गाचा नियम आहे. बदललेल्या नियमात समायोजन करणे हा माणसाचा स्वभाव आहे. शिक्षण क्षेत्रही याला अपवाद नाही. शिक्षण क्षेत्रात नव–नवे असंख्य बदल होत असतात. या बदलाबरोबर शिक्षकांनी समायोजन करणे आवश्यक आहे.

आमच्या शाळेत आज दिसणारी विद्यार्थी गुणवत्ता व शाळेच्या विविध गरजांची पूर्तता पूर्णत्वाला नेण्यासाठी शाळेने अनेक बाबींवर विशेष भर देवून शाळेचा सर्वांगीण विकास साधला आहे.

### भौतिक सुविधा

शिक्षण हक्क कायद्यानुसार शालेय भौतिक सोयीसुविधांनी शाळा परिपूर्ण आहे. शालेय इमारत 'सर्व शिक्षा अभियान' तसेच परिसरातील औद्योगिक वसाहतींच्या अर्थ सहाय्याने परिपूर्ण व सुसज्ज आहे. शाळेतील मुला–मुलींना आवश्यक असणारी शौचालये, स्वच्छतागृहे पुरेशा प्रमाणात आहेत. शाळेला नळ योजनेद्वारे कायमस्वरूपी व मुबलक पाण्याची व्यवस्था आहे. सर्व विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात बाके आहेत. शाळेत संदर्भ ग्रंथ यासाठी 'डिजिटल लॅब' आहे. शाळेला नावीन्यपूर्ण विज्ञान प्रयोग शाळा आहे. शाळेला स्वतंत्र संगणक प्रयोगशाळा आहे.

### लोकसहभागातून शाळा विकास

शाळेने गेल्या काही वर्षांपासून शाळेच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतलेला आहे. स्थानिक पदाधिकारी, शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ, माता पालक शिक्षक संघ, सर्व शिक्षक, समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, शिक्षण प्रेमी यांच्या विशेष प्रयत्नातून व कल्पनेतून शाळेच्या गरजा पूर्ण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. त्यातून आज शाळेमध्ये संगणक, रंगीत प्रिंटर,

शालेय रंग रंगोटी, डिजिटल वर्गखोल्या, कार्यालयीन कपाटे, टेबल व खुर्च्या यांची पूर्तता करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाईन अभ्यास करता यावा साठी लोकसहभागातून शाळेला वायफाय सुविधा व विद्यार्थ्यांच्या मोबाईलसाठी लागणारा रिचार्ज लोकसहभागातून प्राप्त झालेला आहे.

**पालक सहभाग**

शाळेत संपन्न होणाऱ्या विविध कार्यक्रम व उपक्रमांना पालकांचे अतिशय उत्तम सहकार्य लाभते. शालेय परिसर स्वच्छता, शाळेसाठी वेळोवेळी लागणारे श्रमदान, पाल्याला लागणारे विविध शैक्षणिक साहित्य यासाठी पालक सदैव तत्पर असतात. पाल्याचा अभ्यास, गृहपाठ याकडे पालकांचे जातीने लक्ष असते.

**गुणवत्ता विकास**

भौतिक विकासासोबत गुणवत्ता विकासातही शाळेने भरारी घेतली आहे. अल्पावधीतच राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत सहा विद्यार्थी पात्र ठरले तर दोन विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले. महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत बसलेले सर्व सात विद्यार्थी पात्र ठरले. केंद्र, प्रभाग व तालुका स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात शाळा नियमितपणे सहभाग घेत असते. विज्ञान दिनाच्या कार्यक्रमात शाळेतील प्रेम बाळू पवार या विद्यार्थ्याला अमेरिकेत प्रयोग सादर करण्याची संधी मिळाली. त्याच्या सादरीकरणास एक टॅब बक्षिस म्हणून मिळाला. विविध स्तरावर होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेत शाळेतील विद्यार्थी सहभागी होत असतात. जिल्हास्तरावर आतापर्यंत अनेक पारितोषिके मिळवण्यात शाळेस यश आले आहे.

**विज्ञान विषयी जागरूकता**



विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून प्रत्येक वर्षी ४० पेक्षा जास्त प्रयोग विद्यार्थी तयार करतात आणि अभिव्यक्त होतात. विशेष अतिथी श्री. यावलकर सर यांना विज्ञान प्रेमी म्हणून मार्गदर्शन करण्यासाठी मुंबईतून शाळेत आमंत्रित केले जाते. त्यांच्या अनुभवाचा फायदा होऊन विद्यार्थी सर्जनशील बनत आहे.

**गणित, इंग्रजी विषय माझा आवडीचा**

गणित विषयाची आवड निर्माण होण्यासाठी वेगवेगळ्या कृतियुक्त पद्धतीने गणितीय मूलभूत संबोध विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यास खूप मदत झाली आहे. गणितीय मूलभूत संबोध स्पष्ट करण्यासाठी शासनाकडून अतिशय उपयुक्त गणितपेटी देण्यात आली आहे. परंतु, पट जास्त असल्यामुळे साहित्य अपुरे पडत होते. ग्रामस्थांच्या सहकार्याने आठ गणितपेट्या शाळेला प्राप्त झाल्या आहेत. याचा फायदा मुलांना गणितीय संबोध संकल्पना होताना दिसत आहेत.

मराठी वाचनाबरोबर इंग्रजी वाचन फोनिक्स पद्धतीने आमच्या शाळेतील विद्यार्थी स्पष्ट उच्चारात वाचन करत आहेत. इंग्रजी वाचनासाठी रोज शाळेत ठराविक वेळेत वाचनाच्या टिप्स समजावून दिल्या जातात. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या स्तरानुसार इंग्रजी

वाचनासाठी Leap For Word या प्रकाशनाचे पुस्तक लोकसहभागातून मोफत मिळण्यास मदत झाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली आहे.

**भाषिक समस्या**

शाळेतील विद्यार्थ्यांची महत्वाची समस्या म्हणजे भाषिक समस्या. त्याला कारणही तसेच आहे. लोटे या गावात खुप औद्योगिक कंपन्या आहेत. या कंपन्यामध्ये कामगार, नोकर, मजूर हे देशातील वेगवेगळ्या राज्यातून, प्रांतातून, जिल्ह्यातून येत असतात. त्यांच्या वेगवेगळ्या मातृभाषा असतात. या विद्यार्थ्यांना मराठी भाषा अध्ययन करतांना खूप अडचणी येत होत्या. या विद्यार्थ्यांची बोलीभाषा भिन्न असल्याने त्यांना मराठीतून शिक्षण ग्रहण करणे फारच कठीण जात होते. विद्यार्थ्यांना वाचन करताना येणारी अडचण ही खूप मोठी समस्या होती.

बऱ्याच विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शनाची खूप आवश्यकता होती. प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक मार्गदर्शन करणे शक्य नव्हते. त्यावर सर्वानुमते एक उपक्रम हाती घेण्याचे ठरवण्यात आले. इयत्ता पहिली ते पाचवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी श्री. सुधाकर प्रल्हाद राठोड यांनी आवाजाची जादू हा उपक्रम हाती घेतला. हा उपक्रम राबविताना येणाऱ्या समस्या तसेच त्याचे निवारण कसे करता येईल यासाठी श्री. बाबाजी जयराम शिर्के सरांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनानुसार या उपक्रमाबद्दल सहकारी शिक्षकांशी, मुलांशी चर्चा केली. उपपक्रमाच्या यशस्वितेसाठी मुलांच्या सहकार्याची कशी आवश्यकता आहे हे मुलांना पटवून दिले. मुलांनी मोठ्या उत्साहाने उपक्रमात सहभागी होण्यास होकार दर्शविला.

**आवाजाची जादू नवोपक्रम**

शाळेत अनेक राज्याची, प्रांताची, जिल्ह्याची, विविध भाषा बोलणारी मुले आनंदाने शिकत असतात. अनेक भागातून प्रवेशित मुले असल्याने प्रत्येकाची भाषा ही वेगवेगळी. या विविध भाषिक मुलांचा एकात्मिक संबोध दृढीकरण करणे म्हणजे मोठी कसरत. शाळेतील बहुभाषिक मुलांना आणि ज्या मुलांना वाचनात अडचण आहे अशा मुलांचा गट करण्यात आला. यासाठी एक पूर्व चाचणीचे नियोजन करण्यात आले त्यामध्ये अक्षर, शब्द, वाक्य, सोपा उतारा या निकषांचा समावेश करण्यात आला. सर्व मुलांची पूर्व चाचणी घेवून अक्षर, शब्द, वाक्य, सोपा उतारा या स्तरानुसार वर्गीकरण करण्यात आले आणि स्तरानुसार गट करण्यात आले. एकूण तीस विद्यार्थ्यांची पूर्व परीक्षा घेण्यात आली. या पैकी ९० टक्के विद्यार्थी अक्षर स्तरावर होते आणि शब्द स्तरावर १५ टक्के होते ५ टक्के वाक्य स्तरावर होते.

जास्तीत–जास्त मुले अक्षर स्तरावर होती. मुलांना समजपूर्वक वाचन कौशल्यांपर्यंत आणणे हे खूप मोठे आव्हान होते. यासाठी संदर्भ म्हणून इयत्ता पहिलीचे मराठी, इंग्रजी पाठ्यपुस्तक, मराठी आशय, अध्ययन अध्यापन पुस्तक, इत्यादी खूप बारकाईने अभ्यास केला. संदर्भ साहित्य आणि राठोड सरांची कल्पना, सृजनशील विचार, सकारात्मक दृष्टिकोन या सगळ्यांचे फलित म्हणजे या उपक्रमाची यशस्विता.

स्तरानुसार मुलांचा गट करून प्रत्यक्ष मूळ ध्वनीचा आवाज शिकवण्यास श्रीगणेशा करण्यात आला. सुरवातीला दोन दोन मूळ ध्वनीचा आवाज शिकला जसे की 'क' चा आवाज क, 'म' चा आवाज म अशाप्रकारे आवाज शिकवण्यात आला. पाच आवाज झाले की सराव म्हणून तोंडीकाम घेऊन जास्तीत जास्त सराव घेण्यात आला. मुलांचा प्रतिसाद अतिशय आनंदित आणि सकारात्मक येत होता अशाप्रकारे सर्व मूळध्वनीचा आवाज शिकवण्यात आले.

दुसऱ्या टप्प्यात स्वरांचा आवाज आणि स्वरांचे चिन्ह काय असते, त्याचे नाव काय यानुसार एक एक स्वरांचा आवाज, चिन्ह आणि नाव सांगितले. उदारणार्थ 'आ' चा आवाज आ आणि 'आ' चे चिन्ह (ा) हे असून या चिन्हाचा आवाज 'आ' असा होतो. हे चिन्ह व्यंजनाला जोडले की जोडलेल्या व्यंजनाचा आवाज बदलतो जसे की, 'क' या व्यंजनाला आकार (ा) हे चिन्ह जोडले की 'क' चा आवाज कसा बदलतो हे समजावून दिले. गंमत अशी झाली मुलांना एक स्वर आणि एक व्यंजनाचा आवाज सांगितला की मुले सर्व व्यंजनाचा आवाज स्वतः तयार करू लागली हा झालेला मोठा बदल. मुलांचा खूप चांगला सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

स्वर आणि व्यंजन यांचा सराव झाल्यानंतर मुलांना सोपे सोपे शब्द देऊन वाचनाचा खूप सराव घेण्यात आला. उदारणार्थ कप, काम, राम, मामा, काका इत्यादी. शब्द स्तर पूर्ण झाल्यानंतर सोपी सोपी वाक्ये घेवून वाचनाचा सराव करण्यात आला. मुले सोपी–सोपी वाक्ये समजपूर्वक वाचन करू लागली. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उत्तर चाचणी घेण्यात आली आणि या चाचणी मध्ये १०० टक्के विद्यार्थी सर्व स्तरावर वाचनात परिपूर्ण झाले. शाळेतर्फे सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

सर्व विद्यार्थ्यांनी केलेली मेहनत, मुख्याध्यापकांचे मार्गदर्शन, सहकारी शिक्षक यांचे सहकार्य, पर्यवेक्षीय अधिकारी यांची प्रेरणा व श्री. सुधाकर राठोड यांचे विचारमंथन यातून आवाजरूपी उपक्रमांच्या माध्यमातून मुलांमध्ये वाचनरूपी अमृतफळ साकार झाले.

मुख्याध्यापक : मारूती यशवंत सुर्वे, संपर्क : ९०२९० ५८०७६

## ३१. स्वच्छ, सुंदर माझी शाळा



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागेवाडी, ता. खानापूर, जि. सांगली**

फळाफुलांचा मळा पाहिजे, आनंदाचा सोहळा पाहिजे

गावात एक वेळ देऊळ नसले तरी चालेल, पण एक आदर्श शाळा पाहिजे.

सांगली जिल्ह्यातील नागेवाडी या शाळेला सुंदर निसर्ग सान्निध्य लाभले आहे आणि या सौंदर्याला शाळेच्या स्वच्छता व सुंदरतेचे कोंदण लाभलेले आहे. शाळेची स्थापना १९२६ सालाची आहे. तेथे इयत्ता १ ली ते ७ वी चे वर्ग भरतात. शाळेचा एकूण पट २५६ असून ९ शिक्षक कार्यरत आहेत. शाळेस २०१७-१८ चा 'स्वच्छ, सुंदर व आदर्श शाळा पुरस्कार' प्राप्त झाला आहे. नागेवाडी ही सांगली जिल्ह्यातील उत्कृष्ट डिजिटल शाळा असून 'आदर्श शाळा' म्हणून जिल्हापरिषदेकडून शाळेची निवड झाली आहे. नागेवाडी शाळा उपक्रमाची खाण आहे. शाळेत प्रवेशोत्सव साजरा केला जातो. शालेय मंत्रिमंडळ निवडणुकीसाठी 'ईव्हीएम' चा वापर, सप्तरंगी परिपाठ, थोर नेत्यांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त बालसभांचे आयोजन, मनोरंजक व नावीन्यपूर्ण खेळ, पालकांचा व्हॉट्सअॅप ग्रुप, शेतकरी व व्यावसायिकांच्या मुलाखती, मीना राजू मंचची स्थापना, क्षेत्रभेट (डाकघर, प्राथमिक आरोग्य केंद्र, दुधडेअरी), सेल्फी पॉईंट, मुलांचा वाढदिवस साजरा करणे, शाळेत बालाअंतर्गत रंगकाम, नावीन्यपूर्ण चित्र, खेळाचे साहित्य, लेझीम, डंबेल्स व निशाण कवायत यांचा पुरेपुर वापर, अभ्यासक्रमावर आधारित शैक्षणिक उपक्रम निर्मिती, संगणकाच्या व प्रयोगांच्या तासिकेचा वेळापत्रकात समावेश असे विविध उपक्रम शाळेच्या गुणवत्तेच्या विकासास हातभार लावत आहेत.

### लोकसहभागातून भौतिक विकास

शाळेचे सर्व वर्ग लोकसहभागातून डिजिटल करण्यात आले आहेत. शाळेसाठी उत्कृष्ट कमान उभारण्यात आली आहे. यामध्ये लोकवर्गणीचा सहभाग मोठा आहे. आजपर्यंत शाळेसाठी आर्थिक व वस्तुरूपाने सुमारे २६ लाख रुपये जमा झाले आहेत. यामधून शाळेची रंगरंगोटी, डिजिटल वर्ग, फरशी, हॅण्डवॉश स्टेशन, क्रीडांगण, पाण्याचे फिल्टर, किचन गार्डन, परसबाग, संरक्षक ग्रील, संरक्षक भिंत व इतर भौतिक सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत. तर पेव्हर ब्लॉक, रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टिम व नवीन फर्निचर इ. कामे नियोजित आहेत.

### आकर्षक परिपाठ

संगितमय व सुंदर परिपाठ हा आमच्या शाळेचा आरसा आहे. एकपात्री नाटक, इंग्रजी कथा, भिन्न वेशभूषा इत्यादींची मेजवानी

ही आमच्या दैनिक परिपाठाची ओळख आहे. सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नांची उकल व पूरक ज्ञान परिपाठातच दिले जाते. विद्यार्थी इंग्रजीमधून सुध्दा सुंदर असा परिपाठ सादर करतात. त्यातून मूल्यशिक्षण अंगी रूजविण्यास मदत होते. सर्व विद्यार्थी प्रात्यक्षिकातून शिक्षकांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने स्वतःची प्रगती साध्य करताना दिसतात. संगितमय परिपाठ होण्यासाठी ब्लूटूथ माईक उपयुक्त ठरत आहे. मुले स्वतः त्याचा वापर करतात. शाळेने परिपाठात व अध्यापनात तंत्रज्ञानाच्या मदतीने रंजकता आणली आहे.

### कोरोना काळातील ऑनलाईन शाळा

सन २०२०-२१ व २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात कोरोनामुळे शाळा बंद झाल्या होत्या. त्यामुळे मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी पालकांची मीटिंग घेऊन त्यांना स्मार्ट मोबाईल घेण्यास प्रोत्साहन दिले. Google Meet / Zoom Meeting / Google Classroom द्वारे इ. १ ली ते ७ वी च्या सर्व वर्गांचे वेळापत्रकाप्रमाणे ऑनलाइन तास सुरू केले. ९०% विद्यार्थ्यांचा सहभाग यात दिसून आला. 'Read to me app' व Whatsapp च्या माध्यमातून इ. १ ली ते ७ वी च्या सर्व विद्यार्थ्यांचे पालकांच्या मदतीने रजिस्ट्रेशन करून घेतले व इंग्रजी सारखा अवघड वाटणारा विषय वारंवार वाचन करून सुलभ झाला.त्यातील शब्दांचे उच्चारण, नविन शब्दांचे अर्थ, चित्राचा आधार घेऊन अर्थ समजून घेवून मुले पालकांच्या मदतीने इंग्रजी वाचू लागली. उच्चारणात सुधारणा झाली. मुलांबरोबर पालकांच्या मनातूनही आनंद व्यक्त होऊ लागला. 'Diksha App' च्या माध्यमातून विषयाला अनुसरून घटकनिहाय व्हिडिओ मुले स्वतः पाहू लागली. 'Diksha App' मुळे दर्जेदार व्हिडिओ मुलांना पहायला मिळू लागले. त्यामुळे मुलांना अध्ययनात आवड निर्माण झाली व मुले शिक्षणाच्या प्रवाहात राहण्यास मदत झाली. पालक व शिक्षक यांचे Whats App Group तयार केल्याने विद्यार्थ्यांची प्रगती, विद्यार्थ्यांचा घरचा अभ्यास, विद्यार्थ्यांच्या गैरहजेरी बाबत ग्रुपवर मार्गदर्शन केले जाते. शिवाय परीक्षा, नवीन बाबींची माहिती मुलांना देणे सोयीचे झाले.

### ऑनलाईन स्पर्धा

कोरोना काळात ऑनलाईन तालुकास्तरीय चित्रकला व पोस्टरनिर्मिती स्पर्धेत शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले. मोठ्या गटातून सातवीच्या विद्यार्थीनींचा प्रथम क्रमांक तर २ विद्यार्थ्यांचा द्वितीय क्रमांक आला. तसेच शाळा स्तरावर वक्तृत्व, निबंध, चित्रकला, रांगोळी, विज्ञान प्रदर्शन, हस्तकला स्पर्धा घेण्यात आल्या. दर शनिवारी 'दप्तराविना शाळा' हा उपक्रम घेण्यात येतो. गायन, कविता वाचन, क्षेत्रभेटी, वक्तृत्व, निबंध, रांगोळी, प्रश्नमंजुषा या स्पर्धा घेऊन क्रमांक काढण्यात येतात. शाळेसाठी एक दिवस, किशोरवयीन मुलींचे उद्बोधन, मनोरंजन खेळ, कवायत हे उपक्रम घेण्यात येतात.



### परसबाग व किचनगार्डन

ग्रामपंचायतीच्या मदतीने आम्ही शाळेसाठी काळी माती घेऊन शाळेची परसबाग व किचनगार्डन तयार करून घेतले. परसबागेत लोकसहभागातून फळांची विविध जातींची झाडे लावली. किचनगार्डनमध्ये पालेभाज्यांची लागवड केली. त्यासाठी सुनियोजित असे ठिबक

सिंचन केले. शालेय परिसराच्या सौंदर्यात वाढ झाली आहे. मुले स्वतःच झाडांची काळजी घेत असल्याने बाग नेहमीच स्वच्छ व तणविरहित दिसून येते.

**योगाभ्यास**

प्राथमिक आरोग्य केंद्र नागेवाडी येथील डॉक्टर दर शनिवारी दोन तास विद्यार्थ्यांना योगासने शिकवितात. यातून योगाभ्यास स्पर्धा घेण्यात येतात. योगासाठी लागणारे कपडे व चटई याची व्यवस्था शाळेने केली आहे. योगा करून झाल्यावर प्रत्येक शनिवारी मुलांची आरोग्य तपासणी होते.ज्यामध्ये केस, नखे व दात तपासले जातात. आहारासंदर्भात डॉक्टरांचे मार्गदर्शन घेतले जाते.

**वाचन–लेखन उपक्रम**

कोरोना काळात विद्यार्थ्यांच्या वाचनाचा सराव कमी झाला होता .यासाठी शाळेने वाचन लेखन उपक्रम सुरू केला. जादा तासिकेचे नियोजन करून दररोज १ तास सर्व विद्यार्थ्यांचा वाचन लेखनाचा सराव घेण्यात आला. वाचन लेखन उपक्रमात दररोज एका पाठ्यपुस्तकाबाहेरील किंवा पाठ्यपुस्तकातील उताऱ्याचे वाचन प्रत्येक विद्यार्थ्याकडून करून घेतले जाते. ज्यामध्ये मुलांचे गट करून त्यांच्या बौद्धिक पातळीनुसार उतारा वाचनासाठी दिला जातो. त्यानंतर त्या उताऱ्याचे श्रुतलेखन घेतले जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासास गती आली आहे.

**शाळा व्यवस्थापन समितीचे योगदान**

शाळा व्यवस्थापन समिती व माजी विद्यार्थी यांच्या माध्यमातून 'शाळा विकास समिती' स्थापन करण्यात आली आहे. यातून शाळेसाठी समाजाचा सहभाग मोठ्या प्रमाणात घेतला जातो. शैक्षणिक विकास करण्यासाठी तसेच शाळेच्या पायाभूत सुविधा पूर्ण करण्यासाठी खूप मोठे योगदान शाळा व्यवस्थापन समिती व शाळा विकास समिती यांचे आहे. चालू शैक्षणिक वर्षासाठी जवळपास 1 लाख 70 हजार रूपयांचा निधी वस्तू व रोख स्वरूपात शाळेला मिळाला आहे.

**नावीन्यपूर्ण विज्ञान कक्ष**

जिल्हा परिषद सांगली व सारथी पुणे संस्थेच्या माध्यमातून शाळेसाठी बालभवन व नाविन्यपूर्ण विज्ञान कक्ष मिळाले आहे. यातून सर्व वैज्ञानिक संकल्पना समजून घेण्यास मदत होते. ५२० प्रयोगांचे साहित्य उपलब्ध आहे. या साहित्याच्या आधारे विद्यार्थी स्वतः प्रयोग करतात. प्रयोगाची माहिती सांगतात. याचा फायदा मुलांना मोठ्या प्रमाणात झाला. विज्ञान प्रदर्शन २०१८-१९ मध्ये जिल्हा स्तरावर एका विद्यार्थ्याने चौथा क्रमांक पटकाविला होता. नावीन्यपूर्ण कक्षामुळे मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यास मोठी मदत झाली आहे.

शाळेतील तंत्रस्नेही शिक्षक श्री. एन.ए. जाधव यांच्याकडून शाळेत राबविलेल्या उपक्रमाची माहिती व्हीडीओ, युट्युब द्वारे चॅनेल, वर्तमानपत्र, फेसबुक/व्हॉट्सअप द्वारे शिक्षक व समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य केले जाते. त्यामुळे इतर शिक्षकही आवर्जून आपल्या शाळेत सदर उपक्रम राबविताना दिसून येतात. तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर कार्यशाळांमध्ये आमच्या शाळेतील उपक्रम तसेच तंत्रज्ञानाचा वापर कसा करायचा याबाबत तालुक्यातील शिक्षकांना मार्गदर्शन केले आहे.तंत्रज्ञानाच्या वापरामुळे समाजाचा जि.प. शाळा नागेवाडीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. यामध्ये प्रसारमाध्यमांचाही मोलाचा वाटा आहे.

**शाळेचे यश**

जिल्हापरिषदेचा स्वच्छ, सुंदर व आदर्श शाळा पुरस्कार २०१७-१८, शाळा सिध्दी 'अ' श्रेणी प्राप्त शाळा, जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्हास्तरावरील पारितोषक प्राप्त, केंद्र व तालुकास्तरावरील क्रीडा स्पर्धेत २७ पारितोषिके, सन २०१८-१९ व २०१९-२० मध्ये शिष्यवृत्ती जिल्हा गुणवत्ता यादीत ३ विद्यार्थ्यांची निवड, सांगली शिक्षण संस्थेकडून घेण्यात येणाऱ्या टीएसई व शताब्दी परीक्षेत प्रत्येक वर्षी ५-६ विद्यार्थी गुणवत्ता यादीत असे यश आम्हाला लाभले आहे. विविधरंगी उपक्रम या शाळेत राबवण्याबरोबरच शाळेतील पालकांचा विश्वास संपादन करण्यात शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व सहकारी शिक्षकांना मोठे यश मिळाले आहे.

आमच्या तालुकास्तरीय सर्व वरिष्ठ अधिकारी वर्गाच्या मार्गदर्शनामुळे शाळा आज गुणवत्तेत सरस आहे शाळेत विद्यार्थी उपस्थितीचे प्रमाण ९८ टक्के पर्यंत पोहोचले आहे. आज इंग्रजी शाळांचे प्रस्थ वाढते असले तरी नागेवाडी शाळा स्वतंत्र अस्तित्व टिकवून गुणवत्तेकडे यशस्वीपणे वाटचाल करत आहे.

मुख्याध्यापक : सौ. लता विलास रावताळे, संपर्क : ८००७१ १८८७९

# ३२. विद्यार्थ्यांच्या कृतिशिलतेला वाव देणारी शाळा



**जिल्हा परिषद केंद्रशाळा, बांदा नं. १, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग**

महाराष्ट्राच्या दक्षिण टोकावर असलेली, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळा म्हणजे जिल्हा परिषद केंद्रशाळा बांदा नं. १. शाळेत वर्षभर विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणाऱ्या ह्या शाळेस सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचा आदर्श शाळा पुरस्कार प्राप्त झाला आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दोन वर्षे शाळा बंद असतानाही शाळेने विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून आपली उपक्रमशीलता टिकवून ठेवली आहे. विद्यार्थ्यांना ज्ञानासोबत स्वावलंबनाचे धडे देणाऱ्या या शाळेत आपल्या पाल्याला प्रवेश मिळावा यासाठी पालक प्रयत्नशील असतात. आमच्या शाळेची स्थापना १८५३ साली झाली असून ७ वी पर्यंतचे ३०५ विद्यार्थी आज शाळेत प्रविष्ठ आहेत.

**शाळेची पटसंख्या झाली चौपट**

मागील सात वर्षात शाळेची पटसंख्या चारपटीने वाढली आहे. गावात इंग्रजी माध्यमाच्या दोन शाळा तसेच एक खाजगी शाळा असूनही बांदा शाळेची पटसंख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. सन २०२१-२२ या वर्षात पहिलीत ६१ मुले दाखल झाली, तर पाचवीच्या दोन तुकड्या कराव्या लागल्या आहेत. बांदा गावात परराज्यातून अनेक कुटुंबे येऊन स्थायिक होत असतात. या कुटुंबाचे सर्वेक्षण करून या कुटुंबातील विद्यार्थ्यांना समकक्ष वर्गात प्रवेश दिला जातो. समकक्ष वर्गात दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना जास्तीचे मार्गदर्शन केले जाते. शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणून टिकवल्याबद्दल शाळेचा राज्यस्तरावर विशेष गौरव करण्यात आला आहे. शाळेत सेमी इंग्रजी माध्यम असून १२ शिक्षक कार्यरत आहेत. विविध संस्थांनी शिक्षकांच्या कार्याचा पुरस्कार देऊन गौरव केला आहे.

**शैक्षणिक गुणवत्तेत आघाडीवर**

केंद्रशाळा बांदा नं. १ ही गुणवत्तेच्या बाबतीत नेहमीच आघाडीवर राहिली आहे शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत येण्याची एक परंपरा शाळेने निर्माण केली असून, आतापर्यंत शाळेचे ५६ विद्यार्थी शिष्यवृत्तीचे मानकरी ठरलेले आहेत. कोरोना काळातही सन २०२१ मध्ये शाळेचे ५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले व एका विद्यार्थीनीची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे. यावर्षी पाचवीमध्ये 28 विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेला बसलेले आहेत तसेच १७ विद्यार्थी नवोदय परीक्षेला प्रविष्ट झाले आहेत. यावर्षी जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या विविध शिष्यवृत्ती सराव परीक्षेत विद्यार्थी टॉप टेन मध्ये आघाडीवर राहिले आहेत. गणित संबोध परीक्षेत पाचवी व सहावी इयत्तेतून प्रविष्ट झालेले सर्व ५६ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन प्राविण्य परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांमधून २ विद्यार्थ्यांची प्रज्ञाशोध परीक्षेसाठी निवड झाली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना ब्रेन डेव्हलपमेंट व सिंधुरत्न टॅलेंट सर्च अशा विविध स्पर्धा परीक्षांना बसवले जाते. विविध संस्था, मंडळे यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक उपक्रमांमध्ये शाळेचे विद्यार्थी नेहमीच आघाडीवर आहेत. गेली दोन वर्षे

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शाळा बंद असतानाही शाळेमध्ये ऑनलाईन स्पर्धात्मक उपक्रम राबविण्यात आले होते. शाळेचे अनेक विद्यार्थी ऑनलाईन स्पर्धात्मक उपक्रमांमध्ये सहभागी झाले होते यात जिल्हा स्तरावर व राज्य स्तरावर विद्यार्थ्यांनी पारितोषिके प्राप्त केली आहेत.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी विविध प्रकारचे उपक्रम शाळेमध्ये राबवले जातात. कला–क्रीडा महोत्सव व ज्ञानी मी होणार या महोत्सवात शाळेतील विद्यार्थी केंद्र स्तरापासून ते जिल्हास्तरापर्यंत बक्षिसांची लयलूट करत असतात. विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी तालुका स्तरापासून राज्य स्तरापर्यंत झेप घेतलेली आहे सन २०२० मध्ये झालेल्या अहमदनगर कोपरगाव येथील राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये सिंधुदूर्ग जिल्ह्याचे शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांनी राज्यस्तरावर प्रतिनिधित्व केले होते. 'शाळाबाहेरची शाळा' या उपक्रमांतर्गत शाळेतील ३ विद्यार्थ्यांची नागपूर आकाशवाणीवर मुलाखत प्रसारीत झाली आहे. चित्रकला, निबंध , वक्तृत्व, ॲबॅकस ,श्लोक पाठांतर, कथाकथन अशा विविध स्पर्धेत विद्यार्थी जिल्हा व राज्यस्तरावर सुयश मिळवत असतात. सन २०२०-२१ व २०२१-२२ या शैक्षणिक वर्षांमध्ये सलग २ वर्षे शाळेतील शिक्षकांनी जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धेत सुयश मिळवून राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत सादरीकरण केले आहे.

### लोकसहभागातून भौतिक विकास

गेली दोन वर्ष कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शाळा बंद असतानाही शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून शाळेच्या भौतिक गरजा



पूर्ण करण्यासाठी आठ लाखाहून अधिकची रक्कम शाळेमध्ये जमा करण्यात आली आहे. लोकसहभागातून शालेय इमारत रंगरंगोटी करून आकर्षक बनवण्यात आली आहे. शाळेतील विद्युतीकरण, रंगमंच, बेंच, संगणक, प्रिंटर, मोटर पंप व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आदि गरजा शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून पूर्ण केल्या जात आहेत. लोकसहभागातून उभारलेल्या सावित्रीबाई दत्तक पालक योजनेअंतर्गत शाळेतील २७ विद्यार्थीनींना लाभ दिला जात आहे. विद्यार्थ्यांच्या वाढदिवसा निमित्ताने पालक विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करत असतात तसेच वर्गाला व शाळेला आवश्यक वस्तू भेट देत असतात. ग्रामस्थ व पालकांच्या योगदानातून विद्यार्थ्यांना पोषण आहारामध्ये पूरक आहाराचे वाटप केले जाते. जिल्हा परिषदेमार्फतही विविध सुविधा दिल्या जातात त्यातून शाळेचा भौतिक विकास होताना दिसत आहे.

### स्वावलंबन व सर्जनशीलतेचे धडे

शाळेमध्ये मान्यवरांच्या जयंती, पुण्यतिथी तसेच विशेष दिन प्रसंगी नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे दरवर्षी आगळ्या–वेगळ्या पद्धतीने स्वागत करण्यात येते विद्यार्थ्यांची कोल्हापुरी फेटे बांधून बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात येते. वृक्ष लागवडीसाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून झाडाचे रोप देऊन स्वागत करण्यात येते. या दिवशी विद्यार्थ्यांच्या पायाचे ठसे घेऊन पहिले पाऊल म्हणून स्वागत करण्यात येते. जुलैच्या पहिल्या आठवड्यात विद्यार्थ्यांना 'बांधावरची शाळा' म्हणून प्रत्यक्ष शेतावर नेऊन भात लागवडीचे प्रत्यक्षिक दाखवण्यात येते. पावसाळ्यामध्ये 'रानभाज्या पाककला स्पर्धा' घेण्यात येते. रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने पर्यावरणपूरक राख्या तयार करून त्या देश सेवेसाठी कार्यरत असणाऱ्या सैनिकांना पोस्टाने पाठवल्या जातात. नागपंचमी सणाला मातीपासून नागोबा तयार करणे, गणपती सणाच्या वेळी पर्यावरणपूरक गणेश मूर्ती तयार करणे, दिवाळी सणाच्या निमित्ताने आकाशकंदील तयार करणे व पतंग तयार करणे आदी कार्यानुभवाचे उपक्रम राबविण्यात येतात. दिवाळी तसेच नववर्ष प्रसंगी आपले

नातेवाईक तसेच अधिकारी पदाधिकारी यांना पोस्टाने शुभेच्छा पाठवण्यात येतात. सेल्फी विथ ट्री व पुस्तक गुढी असे उपक्रम राबविले जातात. स्काऊट गाईड अंतर्गत विविध प्रकारचे उपक्रम शाळेत यशस्वीपणे राबविले जातात.



गावची जत्रा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी मंदिर परिसराची साफसफाई करण्यात येते.खरी कमाई महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. त्यातून स्वावलंबनाचे धडे दिले जातात. शाळेच्या परिसरात परस बागेची लागवड करून त्याचा उपयोग पोषण आहारात केला जातो. चिमणी वाचवा व वृक्षारोपण यासारखे पर्यावरण पूरक उपक्रम शाळेत राबविण्यात येतात. शाळेत सीड बँक आहे त्यासोबतच सीडबॉल तयार करण्याचा उपक्रम देखील राबवला जातो. Water Bell सारखा आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचा उपक्रम राबवला जातो. तंबाखूमुक्त अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येते. तंबाखुमुक्त अभियानातील योगदानाबद्दल शिक्षकांना महाराष्ट्र रत्न व विद्यार्थ्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. महिलांसाठी महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. एप्रिल महिन्यात विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी छंद वर्गाचे आयोजन करण्यात येते तसेच विविध पारंपरिक खेळांचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांना भारतीय सण, उत्सव, परंपरा व संस्कृती यांची ओळख व्हावी यासाठी सण व उत्सव शाळेत साजरे करण्यात येतात. दप्तरमुक्त शनिवार उपक्रम साजरा केला जातो. शाळेत वर्षभर १०० टक्के उपस्थित राहिलेल्या विद्यार्थ्यांचा वर्षाच्या शेवटी सन्मान करण्यात येतो.

**विषयवार उपक्रम**



विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा व विषयाचे सखोल ज्ञान व्हावे यासाठी विषयवार विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. मराठी विषयांतर्गत विद्यार्थ्यांसाठी शुद्धलेखन स्पर्धा, पाठांतर स्पर्धा, वर्तमानपत्रातील बातम्या पासून कोलाज काम तयार करणे, पत्रलेखन, हस्तलिखित असे विविध उपक्रम राबवले जातात. इंग्रजी विषयासंदर्भात शब्द पाठांतर व शब्द शिडी, गणित विषयांतर्गत एका मिनिटांमध्ये एक अंकी संख्यांची बेरीज करणे व पाढे पाठांतर, विज्ञान विषयासाठी विज्ञान जत्रेचे आयोजन, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवणे, परिसरातील विविध ठिकाणी क्षेत्रभेटी देऊन माहिती मिळवणे, कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण या विषयांतर्गत विविध प्रकारचे उपक्रम शाळेमध्ये राबवले जातात यातून विद्यार्थ्यांना त्या विषयाचे सखोल ज्ञान करून दिले जाते. शाळेमध्ये संगणक कक्ष, व्हर्च्युअल क्लासरूम व नावीन्यपूर्ण विज्ञान प्रयोगशाळा आहे, यातून विद्यार्थ्यांना त्या त्या विषयाचे सखोल ज्ञान मिळवून दिले जाते. शाळेतील सर्व वर्ग डिजिटल असून प्रोजेक्टरवर विविध प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांना दाखवण्यात येतात. शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना जास्त मार्गदर्शन करण्यात येते.

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी विद्यार्थी विविध कलागुणांचे सादरीकरण करत असतात. शालेय परिपाठात सामान्य ज्ञानावर आधारित नियमित प्रश्न विचारले जातात. लेझीम पथक, कवायत प्रकार, योगासने यांचा नियमित सराव घेण्यात येतो. विद्यार्थ्यांसाठी सांघिक व वैयक्तिक खेळ तसेच मनोरंजनात्मक खेळ आयोजित केले जातात. शाळेतील विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांनाही सर्व उपक्रमांत समाविष्ट करून त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव दिला जातो.

शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक एक टीम म्हणून काम करतात. सर्व शिक्षक आपल्यातील उत्तम देण्याचा प्रयत्न करतात. शाळेचे हे यश नेतृत्व व टीमवर्क यामुळे शक्य झाले आहे.

शाळेच्या उपक्रमांना पालक, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, सर्व अधिकारी व पदाधिकारी यांचे सहकार्य मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देत ज्ञानार्जनाबरोबर स्वावलंबनाचे शिक्षण देणाऱ्या बांदा नं. १ केंद्रशाळेतून आदर्श नागरिक घडतील याची आम्हाला खात्री आहे.

मुख्याध्यापक : श्री. श्रीकांत विठ्ठल आजगांवकर, संपर्क : ९४०५९ २६१५३

## ३३. आटोळा शाळा, उपक्रमांचा मळा




**जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा आटोळा, ता. चाकूर, जि. लातूर**

उच्च शिक्षणाबरोबरच प्राथमिक व पूर्वप्राथमिक शिक्षणातही लातूर जिल्हा हा 'लातूर पॅटर्न' म्हणून ओळखला जातो. हॅपी होम, बाला (Building as learning aid), नंदादीप शाळा, ज्ञानरचनावादी अध्ययन अध्यापन इत्यादी अनेक उपक्रमात लातूर जिल्हा नेहमीच अग्रेसर राहिला आहे.

लातूर जिल्ह्याच्या चाकूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा आटोळा एक उपक्रमशील व पथदर्शी शाळा आहे. शाळेची स्थापना सन १९३९ ची असून इयत्ता १ ली ते ७ वी चे वर्ग भरतात. शाळेच्या दर्शनी भागावर लावलेला 'आमची शाळा–आमचा अभिमान' हा फलक खूप काही सांगणारा आहे. आटोळा गावातील पदाधिकारी, नागरीक, पालक, विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती, शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शाळेचे माजी विद्यार्थी या सर्वांच्या सहकार्यातून शाळेचे रूपडे अगदी बदलून गेले आहे. शाळेला गावाचा आधार असावा, गावाला शाळेचा अभिमान असावा. या न्यायाने प्रत्येकजण आपापले योगदान शाळेसाठी देत आहे.

### एकच ध्यास, गुणवत्ता विकास

या ध्येयाने प्रेरित होवून शाळेतील २४६ विद्यार्थ्यांना घडविण्याचे पवित्र कार्य आम्ही नऊ शिक्षक मुख्याध्यापकांसह तळमळीने करीत आहोत. शाळेने बाला उपक्रमात चाकूर तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. बाला उपक्रमांतर्गत येणाऱ्या सर्व बाबी शाळेने अगदी व्यवस्थितपणे पूर्ण केल्या आहेत. शाळेचा नकाशा, झाडांभोवती कठडे, पक्षांसाठी चारापाणी, सावली देणारी झाडे, गिलाव्यात कोरलेली अक्षरे, डॉट ग्रीड, आलेख तथा ग्राफ बोर्ड, रेलिंग फोन', रॅम्प, अपूर्णांक, खिडक्या व दरवाजे यांचा उपयोग, दरवाजातील कोनमापक, लपंडाव भिंत. सौर घड्याळ, रेन वॉटर हार्वेस्टिंग, व्हरांड्यातील जागेचा उपयोग, उंचीमापक, टॅन ग्राम. दोन खोल्यातील जागेचा उपयोग, पंख्यांचे रंगचक्र, अंतराचे दगड, अभ्यासासाठी ओटे, ॲम्पिथिअटर, सूर्यमाला, खिडक्यातील अक्षरे, मुलांच्या उंचीनुसार फलक इत्यादींमुळे विद्यार्थी आनंददायी पध्दतीने शिकू लागले आहेत.

कृतीयुक्त अध्ययन अध्यापनामुळे मुलांचे शिकणे सोपे तर झालेच त्याचबरोबर ते परिणामकारक ही झाले. अनेक उपक्रमातून भाषिक खेळ, गणिती खेळ व इतर मनोरंजनात्मक गोष्टीत मुले रममाण होवू लागली. शाळेविषयी आवड निर्माण झाली. शाळा सुटल्यानंतरही मुले एक तास शाळेतच खेळू लागली. शिकू लागली. अध्ययन निष्पत्ती विकसित होऊ लागली.

## भाषा व्याकरण कक्ष

शाळेत मराठी व हिंदी भाषेसाठी व्याकरण कक्षाची सुविधा निर्माण करण्यात आलेली आहे. व्याकरण विषयक पुस्तके, शैक्षणिक साहित्य या ठिकाणी ठेवण्यात आलेले आहे. मुले या सर्व साहित्याचा उपयोग करून घेतात व स्वयं अध्ययन करतात.

## बाल वाचनालय



विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची सवय लागावी यासाठी बाल वाचनालय उभे करण्यात आलेले आहे. ज्ञान, माहिती व मनोरंजन इत्यादी बाबी साध्य व्हाव्यात यासाठी विविध प्रकारच्या उपयुक्त पुस्तकांची सुविधा या ठिकाणी करण्यात आलेली आहे.

## वृक्षारोपण

'वृक्ष आपले मित्र, तयांना तोडू नका कोणी', या बोधानुसार शाळेने वृक्षारोपण व वृक्ष संवर्धनात मोलाची कामगिरी केलेली आहे. मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेसाठी विविध वस्तू दिल्या जातात. त्याचबरोबर शालेय परिसरात वृक्षारोपणही केले जाते. 'एक मूल, एक झाड' ही संकल्पना सत्यात उतरवण्याचे काम शाळेने केले आहे. शालेय परिसरात अंगणात तसेच शेतीमध्ये वृक्षारोपणासाठी शाळेने विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. विद्यार्थी पर्यावरण स्नेही झालेले आहेत.

## विज्ञान प्रयोगशाळा

विज्ञान आणि प्रयोग हे जवळचे नाते आहे. प्राथमिक शाळेतच विद्यार्थ्यांना विज्ञानातील प्रयोग स्वतः हाताळता यावेत, वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत व्हावा, प्रयोग करण्याची संधी मिळावी यासाठी सुसज्ज अशी विज्ञान प्रयोगशाळा उभारण्यात आलेली आहे. एकूण २०० प्रयोगांच्या साहित्याची कल्पकतेने मांडणी करण्यात आलेली आहे. मुले प्रयोगाचे सादरीकरण अनुभवतात तसेच प्रयोगाचे सादरीकरण करतात.

## शाळेत घर व घरात शाळा

हा विचार प्रत्यक्षात आल्याची अनुभूती विद्यार्थ्यांना येऊ लागली आहे. प्रत्येक शालेय विषय ते आवडीने शिकू लागले. मराठी, हिंदी, इंग्रजीच्या कविता ते साभिनय गातात. विज्ञान प्रयोगशाळेत मांडलेल्या दोनशे प्रयोगातून वैज्ञानिक दृष्टिकोन वाढला आहे. मराठी भाषा कक्षातून भाषिक विकास आणि व्याकरण विषयक ज्ञान वाढू लागले आहे. म्हणी, वाक्प्रचार, शब्दसमूह यांचा वापर मुलांच्या लिहिण्या बोलण्यात होवू लागला. मूले नाट्यीकरणात सहभागी होतात. भाषिक कौशल्ये विकसनात गती आल्यामुळे विद्यार्थ्यांचा भाषिक विकास होवू लागला आहे.

'हे हृदयीचे ते हृदयी' असा ज्ञानाचा प्रवास आनंददायी सहज व परिणामकारक होत आहे. इंग्रजी प्रयोगशाळा या उपक्रमातून इंग्रजीतील Listening, Speaking, Reading & Writing ही पायाभूत कौशल्ये विकसित होण्यासाठीचे शैक्षणिक साहित्य, स्वयंअध्ययन साहित्य मूले हाताळू लागली आहेत. आमच्या शाळेत मराठी, इंग्रजी भाषा पेटीतील साहित्याचा प्रभावी वापर केला जातो.

Linguistic Games च्या आधारे मुलांचं शिकणं सुरू आहे. शाळेतील गणित प्रयोगशाळेतून बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, संख्याज्ञान संख्यावरील क्रिया या पायाभूत गोष्टी मुले आत्मसात करतात. गणित विषय व स्पर्धा परीक्षा या संदर्भाने विद्यार्थी जिज्ञासूपणे प्रश्न विचारतात, स्वतः उत्तरे शोधतात. वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा. रंगभरण स्पर्धा, निबंध स्पर्धा, एकपात्री अभिनय, नाटिका, समूहगीत, इत्यादी स्पर्धात या शाळेतील विद्यार्थ्यांनी जिल्हा, तालुका व शाळा स्तरावर पारितोषिके मिळविली आहेत. या शाळेतील शिक्षकांनी ही राज्य, जिल्हा, तालुका स्तरावर विविध पुरस्कार, सन्मान व पारितोषिके मिळवली आहेत. शाळा ही आई आहे, इतक्या श्रध्देने प्रत्येक घटक याठिकाणी सेवा देत आहे.

शाळेत CCTV कॅमेरे बसवले आहेत. मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेला काही ना काही भेट दिली जाते. शाळेत भव्य दिव्य असा सांस्कृतिक मंच आहे याद्वारे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी मिळवून देण्यासाठी शाळा सदैव प्रयत्नशील आहे.

लावियेला दीप प्रेमे तेवता ठेवू चला। बालकांच्या उन्नतीचा मार्ग हा उजळू चला....।।

या ओळींप्रमाणे या शाळेचे कार्य चालू आहे. शाळेच्या परिसरात दोनशे झाडे लावली गेली आहेत. त्यांचे व्यवस्थित संगोपन केले जाते. शाळेच्या परसबागेत भाजीपाला, फुलांची झाडे, विविध फळांची झाडे लावली आहेत. शाळेत सर्व विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहाची सुविधा आहे. शाळेने स्वच्छ विद्यालय स्पर्धेत सहभाग नोंदवला आहे.

Clean is Beautiful हा विचार सोबत घेवून सर्व विद्यार्थ्यांच्या अंगी स्वच्छतेच्या सवयी रुजल्या आहेत. त्यामुळे शाळा स्वच्छ





सुंदर असते. इतिहास कक्ष, भूगोल कक्ष, स्पर्धा परीक्षा दालन व कला दालन या उपक्रमातून विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञान, नैतिक मूल्ये यांची माहिती मिळू लागली आहे. विद्यार्थी प्रश्न तयार करून एकमेकांना प्रश्नोत्तराच्या माध्यमातून संवाद साधतात. त्यामुळे त्यांच्या सृजनशीलतेस संधी मिळत आहे.

Action speaks louder than words या उक्तीप्रमाणे मुलांच्या कृतींना महत्व दिल्याने कृतीयुक्त अध्ययन घडू लागले. विद्यार्थ्यांना शिकण्याची संधी मिळू लागली आहे. 'माझे कार्यालय स्वच्छ सुंदर कार्यालय' या उपक्रमास साजेसे शाळेतील मुख्याध्यापकांचे कार्यालय आहे.

शाळेत E-Learning ची सुविधा आहे. पदाधिकारी व प्रशासनाच्या वतीने शाळेची वेळोवेळी देखभाल दुरुस्ती केली जाते. शाळेत पेव्हर ब्लॉक, किचन शेड इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. कोविड–१९ च्या काळात गृहभेटी, कोविड कॅप्टन, ऑनलाइन क्लास गटागटात अध्ययन अध्यापन इत्यादी उपक्रम राबवून सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्याचे महत्त्वपूर्ण काम शाळेने केले आहे. 'सुट्टीविना शाळा' या उपक्रमाअंर्तगत रविवार व सुट्टीच्या दिवशी देखील दोन तास विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययन, आवडीचे खेळ', दप्तराविना शाळा अशा उपक्रमात सहभागी केले जाते. शाळेतील विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे ही दिले जातात. 'आरोग्य हीच संपत्ती' हा विचार रुजविला जातो.

सर्व शिक्षक बांधवांच्या अथक प्रयत्नातून, पदाधिकारी, गावकरी, पालक, शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी या सर्वांच्या योगदानातून शाळा नावारूपाला आली आहे. साडे पाच लक्ष रुपयांचा लोकसहभाग शाळेने मिळवला आहे. प्रत्येक शिक्षकाने आपापला वर्ग डिजिटल केला तर मुख्याध्यापकांनी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने CC TV ही सुविधा स्वखर्चाने उपलब्ध करून दिली आहे. अध्ययन स्तर निश्चीतीमध्ये शाळा 'अ' श्रेणीत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सतत प्रयत्न करणारी शाळा म्हणजे जिल्हा परिषद केंद्र शाळा आटोळा होय. जवाहर नवोदय प्रवेश परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा इत्यादी स्पर्धा परीक्षांविषयीचे नियमित मार्गदर्शन केले जाते. आमची शाळा उपक्रमांचा मळा आहे. अशा एका समृद्ध व उपक्रमशील शाळेचा प्रवास विद्यार्थी विकासाच्या ध्येयाप्रत अव्याहतपणे सुरु आहे.

मुख्याध्यापक : श्री. विलास वैजनाथ कस्तुरे, संपर्क : ८७६६५ ९०२००

# ३४. माझी आनंददायी शाळा




## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, काटगाव, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

उस्मानाबाद जिल्ह्याच्या सीमेवर काटगाव आहे. काटगाव पासून अवघ्या २० किलोमीटरवर सोलापूर सारखे मोठे शहर आहे. गावाचा सर्व व्यवहार सोलापूर शहराची जोडलेला आहे. त्यामुळे येता जाता शहरातल्या शाळा पालक पाहतात. आपल्या गावातील शाळा ही शहरातील शाळांप्रमाणे असावी, असा सहज विचार काटगाव ग्रामस्थांचा असावा आणि ते आमच्या शाळेची तुलना शहरातील शाळेशी करत असावेत, त्यामुळे त्यांचा आमच्या शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन फारसा सकारात्मक नव्हता. शाळेबद्दलची अनास्था त्यांच्या मनामध्ये दिसून येत होती.

'शाळेला गावाचा आधार, गावाला शाळेचा अभिमान'

असे जर करायचे असेल व पालकांचे सहकार्य मिळवायचे आणि शाळेतील शिक्षकांविषयी विश्वास निर्माण करायचा असेल तर पालकांच्या सहकार्याने विविध उपक्रम शाळेत घेतले गेले पाहिजेत. असे शाळेतील सर्व शिक्षकांच्या, मुख्याध्यापकांच्या चर्चेतून आले. त्यासाठी विविध उपक्रमांचे नियोजन आम्ही केले.

### लोकसहभागातून समृद्ध ग्रंथालय

जो वाचतो तो बोलतो, जो बोलतो तो अभिव्यक्त होतो आणि जो अभिव्यक्त होतो तो तर नक्कीच लेखन करायला शिकतो. म्हणूनच प्रथम वाचन खूप महत्त्वाचे आहे. वाचनाने माणूस समृद्ध होतो. वाचन हे मनाचे अन्न आहे, वाचनाची सुरुवात ही प्राथमिक शाळेपासूनच होत असते. म्हणून जर विद्यार्थ्यांना प्राथमिक शाळेमध्ये पाठ्यपुस्तकांसोबतच अवांतर वाचनाची सवय लावली, आवड निर्माण केली तर तो विद्यार्थी नक्कीच प्रगल्भ झाल्याशिवाय राहणार नाही.

असे म्हणतात लहानपणी झालेले संस्कार हे कायमस्वरूपी टिकतात, म्हणूनच लहानपणापासूनच विद्यार्थ्यांवर वाचन संस्कार केले तर ती सवय कायम राहील. लहानपणापासूनच समजपूर्वक वाचनाची सवय लागावी यासाठी छोटी छोटी मनोरंजक अशी गोष्टीची पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यायचे ठरवले. हाच उद्देश ठेवून आम्ही लोकसहभागातून 'समृध्द ग्रंथालय' हा उपक्रम हाती घेतला. समृध्द ग्रंथालय उभारण्यासाठी पालकांची, ग्रामस्थांची व, शिक्षणप्रेमी यांची मदत घ्यावी लागणार होती. या उपक्रमाचा उद्देश पालक व सर्वांना सांगण्यात आला. जवळपास १ लाख रू. चा लोकसहभाग प्राप्त झाला. जशी जशी रक्कम मिळाली त्या त्याप्रमाणे १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना आकर्षक, सुंदर, वाचनीय अशी पुस्तके आणून वाचण्यास उपलब्ध करून दिली. चित्रमय रंगीबेरंगी मोठ्या अक्षरातील पुस्तके मुलांना आकर्षित करत होती. वर्गशिक्षकांकडून विद्यार्थ्यांना पुस्तके नियमित वाटप करण्यात येऊ लागली. आता विद्यार्थ्यांमध्ये निश्चितच वाचनाची आवड निर्माण झाली असल्याचे दिसून येत आहे. भाषण स्पर्धा, निबंध स्पर्धा, महापुरुषांच्या माहितीचे लेखन करण्यासाठी मुले पुस्तके घेऊ लागली. एवढेच नाही तर वाचलेल्या पुस्तकातील समजलेल्या गोष्टीविषयी आपापसात चर्चा करू लागली. परिपाठामध्ये या पुस्तकांबद्दल व्यक्त होऊ लागली. शासनाच्या १०० दिवस वाचन अभियान हा उपक्रम राबवण्यासाठी हे समृद्ध ग्रंथालय

विद्यार्थ्यांना खूप उपयोगी ठरले. पहिली ते चौथी च्या प्राथमिक शाळेत अशा पद्धतीने एक लाख रू. खर्च करून 'लोकसहभागातून समृद्ध ग्रंथालय तयार होणे' हा पहिलाच प्रयोग आमच्या शाळेने यशस्वी करून दाखवला याचा आम्हा सर्वांना निश्चितच आनंद आहे.

### ज्ञानगंगा घरोघरी

इयत्ता १ ली च्या वर्गात एकही दिवस शाळेत न आलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने व वाचन सहज साध्य होण्याच्या उद्देशाने 'ज्ञानगंगा घरोघरी' हा नवोपक्रम राबवला. यामुळे वर्गातील प्रत्येक विद्यार्थी आनंदाने शिकत आहे खडे, माती,



मणी, चिंचोके, बिया, काड्या, अंक कार्ड ,शब्द पट्ट्या, अशा नानाविध प्रकारचे अध्ययन साहित्य मुले स्वतः हाताळत आहेत. साहित्याच्या मदतीने कृतीतून स्वतः ज्ञानाची निर्मिती करून अध्ययन कौशल्य प्राप्त करत आहेत. खऱ्या अर्थाने आता वाचन, लेखन समृद्ध वाटत आहे. मुले अभिव्यक्त होत आहेत. एकमेकांना मदत करून पुढे जाण्यासाठी सज्ज झाली आहेत. वाचनाची गती वाढल्यामुळे शोधणे, वाचणे, ऐकणे यातून विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढली. घराघरात शाळा सुरू झाली, मुले बोलकी झाली. गाणी, गोष्टी यामुळे घरात शैक्षणिक वातावरण निर्माण झाले. लोकमत वर्तमानपत्रात या उपक्रमाची यशोगाथा प्रसिद्ध झाली व 'राज्य नवोपक्रम स्पर्धेत ज्ञानगंगा घरोघरी उपक्रम पात्र ठरला'. शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी वर्गातील शैक्षणिक वातावरण निर्मिती करून अध्ययन करण्यासाठी धुळपाटी, शब्द कार्ड उपलब्ध केले ते घरोघरी लावून घरातील भिंती बोलक्या केल्या. हसत खेळत शिक्षण देण्यासाठी विद्यार्थी गृहभेटींचे आयोजन केले. यामध्ये कृतीयुक्त बडबडगीते, गोष्टी, गाणी कृतीयुक्त चौदाखडी, परिसरात सहज उपलब्ध होणारे साहित्य, काड्या, चिंचोके व गोट्या याद्वारे गणन व बेरीज वजाबाकी यासारख्या गणिती क्रिया करून घेण्यात आल्या. पालकांच्या मदतीने सहज सोप्या कृती करून घेतल्या. विद्यार्थी अध्ययन निष्पत्तीच्याही पुढे जाऊन गोष्टींची पुस्तके, गावातील फलक, सूचना यांचे वाचन करत आहेत. अगदी लहान वयात कमी वेळेत गतीने उत्कृष्ट वाचन करता येणे हा उपक्रमाचा हेतू सफल झाला.

### एक तास मोबाईलचा

कोरोना काळात चालती बोलती सुरू असलेली शाळा बंद पडली आणि शिक्षण थांबल्यासारखे झाले. पण हळूहळू ऑनलाईन क्लास द्वारे शिक्षण चालू ठेवले .यातूनच विद्यार्थी मोबाईलशी जास्त जोडले गेले. शासनाने दिक्षा व इतर शैक्षणिक ॲपद्वारे ऑनलाईन अध्ययन करण्याच्या सूचना दिल्या. जेव्हा प्रत्यक्षात शाळा सुरू झाल्या तेव्हा मुलांना मोबाईल वापरण्याचे कौशल्य प्राप्त झाले होते. मुले सफाईदार पद्धतीने मोबाईल हाताळत होती. मोबाईलचा चांगला वापर केला तर तो दुसरा गुरु ठरू शकतो. शासनाने चालू केलेला ऑनलाईन स्वाध्याय उपक्रम, अभ्यासमाला पाहण्यासाठी दीक्षा ॲप, रीड टू मी ॲप, शिकू आनंदे अशा विविध गोष्टी शिकण्यासाठी मोबाईल विद्यार्थ्यांना आवश्यक होता. म्हणूनच शाळेत एक तास मोबाईलचा हा उपक्रम सुरू केला.

विद्यार्थ्यांना दर शनिवारी एका तासासाठी मोबाईल शाळेमध्ये आणावयास सांगितले. याच एका तासामध्ये महत्वाचे धडे, खेळ व उपक्रम मोबाईलवर घेण्यात येऊ लागले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनास नावीन्यतेची जोड मिळाली. विद्यार्थी आनंदाने, उत्साहाने यात सहभागी होऊ लागले.

### We Meet, by Google Meet

२२ मार्च २०२० पासून सर्व जग ठप्प झाले, शाळा बंद झाल्या पण शिक्षण मात्र चालू ठेवायचे होते.त्यासाठी नाना प्रयत्न सुरु

झाले. मुलांना संपर्कात ठेवण्यासाठी मार्ग शोधू लागले.शासनाच्या सूचनेनुसार online क्लास सुरु करायचे ठरवले. प्रत्येक विद्यार्थ्यास स्मार्टफोन उपलब्ध होणे कठीण वाटू लागले पण 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे' या उक्तीप्रमाणे प्रयत्न केले आणि सुमारे ८०% विद्यार्थ्यांकडे मोबाईल उपलब्ध झाला. नियमित We meet by Google meet होऊ लागले. मुलांना ही वेगळी शाळा पाहून आनंद वाटला. उत्साहाने दररोज संध्याकाळी ७ ते ८ या वेळेत online शाळा सुरु झाली. विद्यार्थ्यांना शाळा बंद आहे याची जाणीवही झाली नाही. अनोख्या पद्धतीने विद्यार्थी अध्ययन करू लागले. आमच्या शाळेच्या नियमित online क्लासची चर्चा तालुक्यात, जिल्ह्यात होऊ लागली. इतर शाळेच्या विद्यार्थ्यांनी देखील हा online क्लास जॉईन केला. यातच आमच्या शाळेतील नॉनस्टॉप online शाळेचे महत्व दिसून आले.

### आनंददायी शनिवार



बऱ्याच दिवसानंतर शाळा भरली. शाळेत किलबिलाट सुरू झाला. नियमित मुलांची हजेरी होऊ लागली. जवळपास दोन वर्षे शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत टिकवून ठेवणे हे एक आव्हानच होते. मुलांच्या मानसिकतेतही बदल झालेले होते. विद्यार्थ्यांची शाळेत बैठक वाढवण्यासाठी, शाळेत टिकवून ठेवण्यासाठी, त्यांना आनंद मिळवून देण्यासाठी अशा उपक्रमाची गरज होती. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आनंद तर मिळालाच पण त्यातून नकळत अध्ययनही झाले. प्रत्येक शनिवारी परिपाठाच्या वेळी कार्यानुभव, कला विषयाचे उपक्रम घेतले जाऊ लागले. विद्यार्थ्यांना गोष्टीच्या शनिवारमधील गोष्ट स्वतःच्या भाषेत कथन करण्याची संधी देण्यात येऊ लागली. बडबड गीते, कृतियुक्त गीते अशा विविध गोष्टी घेतल्या जाऊ लागल्या. यामुळे विद्यार्थ्यांना शाळा आनंददायी वाटू लागली. कार्यानुभवाच्या घेतलेल्या कृती विद्यार्थी घरी करू लागले. छान छान बडबड गीते, कृतियुक्त गीते गाऊ लागले. एकंदरीत शाळेत विद्यार्थी उत्साहाने रमू लागले आहेत. सन 1992 मध्ये स्थापन झालेल्या आमच्या शाळेत आज इयत्ता पहिली ते चौथीचे 254 विद्यार्थी प्रवेशित असून आम्ही 10 शिक्षक एकजुटीने शाळेच्या प्रगतीसाठी झटत आहोत.

### किशोर मासिक – एक प्रेरणा

आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना समृद्ध ग्रंथालयामुळे अवांतर वाचनाची आवड निर्माण झाली होती. त्यामुळे सतत नवीन काहीतरी वाचावे असे विद्यार्थ्यांना वाटू लागले. किशोर मासिकाच्या सुवर्णमहोत्सवा निमित्त किशोर मासिक अल्पदरात उपलब्ध होणार होते. मिळालेल्या या संधीचे सोने व्हावे म्हणून सर्व विद्यार्थ्यांसाठी किशोर मासिक मागविण्यात आले. किशोर मासिक म्हणजे विद्यार्थ्यांसाठी एक पर्वणीच आहे. त्यातील छान छान गोष्टी, कविता, सामान्यज्ञानावर आधारित प्रश्न असे बरेच सदर वाचू लागले. मासिकातील इतर विद्यार्थ्यांचे लेखन वाचून आमच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळू लागली यातूनच स्वतः विद्यार्थी ही अभिव्यक्त होऊ लागले. त्याचाच एक भाग म्हणून किशोर मासिकातील 'भावी आधारस्तंभ' या सदरात विद्यार्थी लेखन करू लागले. विद्यार्थ्यांनी केलेले चांगले काम शब्द रुपात मांडू लागले. कळत–नकळत विद्यार्थी सर्वांना मदत करू लागले. यातील काही विद्यार्थ्यांच्या लेखनास प्रसिध्दीही मिळाली आहे. त्यामुळे आमच्या विद्यार्थ्यांसाठी किशोर मासिक एक प्रेरणा आणि वरदानच ठरले आहे.

मुख्याध्यापक : श्री. भीमाशंकर रामकृष्ण सकपाळे, संपर्क : ९०४९२ ३११९२

# ३५. एकच ध्यास, ज्ञानमंदिराचा सर्वांगीण विकास




## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिबदरा, ता. हदगाव, जि. नांदेड

मराठवाड्याच्या नांदेड जिल्ह्यातील हदगांव तालुक्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिबदरा (म) ही सन १९४३ साली स्थापन झाली असून आज येथे ७ वी पर्यंतचे १५३ विद्यार्थी ज्ञानार्जन करत आहेत. जागतिक कोरोना महामारीच्या काळात विविध क्षेत्राला फार मोठे नुकसान झाले आहे. शिक्षणक्षेत्र हे त्यापासून वेगळे नाही. परंतु ग्रामीण भागात खेड्यापाड्यातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात अखंड ठेवण्याचे काम जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या शाळांनी उत्तम बजावले आहे. त्याचेच एक उत्तम उदाहरण म्हणजे जिल्हा परिषद शाळा शिबदरा.

### विज्ञानपेटी, भाषापेटी व गणितपेटी

विज्ञानविषयातील प्रकल्प, प्रयोग, संकल्पना स्पष्ट करण्यासाठी विज्ञानपेटीतील साहित्याचा वापर आम्ही नियमित करतो. इंग्रजी, गणित विकासासाठी सर्व विषयांचा अभ्यासक्रम सारांश रुपाने कागदावर लिहून त्यांच्या प्रिंट विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. विषयांचा संकल्पना निहाय सराव करुन घेण्यात आला त्यामुळे विद्यार्थ्यांच्या संकल्पना दृढीकरण होण्यास मदत झाली आहे.

### शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षा

शाळेत शिष्यवृत्ती व नवोदय यासारख्या स्पर्धापरीक्षांना नियमित दरवर्षी अधिकाधिक विद्यार्थ्यांना बसवले जाते. मुलांची तयारी इयत्ता ३ री ते ४ थी पासून करुन घेण्यासाठी शाळेने शाळेच्या कुंपण भिंतीवर व वर्गभिंतीवर शिष्यवृत्ती, नवोदय अभ्यासक्रम, नवीन संकल्पना रेखाटन केलेले आहे. नवीन संबोध व संकल्पना मुलांच्या नेहमी नजरेसमोर असल्याने दृढीकरण होण्यास खूप मदत होत आहे.

### विशेष प्रयत्न व नवोपक्रम

शिबदरा जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक उत्साही असून शिक्षणाबद्दल तळमळीने काम करतात. शाळेतील सर्व वर्गांतील पाठ्यक्रम सारांश रुपाने कागदावर मांडून त्यांच्या विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात प्रिंट विद्यार्थ्यांना पुरवून त्यांचा नियमित अभ्यास करुन घेतला जातो. शाळेत उपलब्ध असलेल्या डिजीटल प्रोजेक्टर वर आठवडानिहाय वर्गांच्या तासिकांचे नियोजन करुन सर्व वर्गांना डिजिटल शिक्षण दिले जाते. मागील वर्षी कोराना कालावधीत शाळेतील शिक्षकांच्या सहकार्याने शाळेने मुलांसाठी बीटस्तरीय ऑनलाईन स्पर्धांचे आयोजन केले होते. त्यात शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून यश मिळवले. विद्यार्थ्यांना व शिक्षकांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून शाळेतील तंत्रस्नेही शिक्षक श्री. सुपलकर यांनी बीटस्तरीय ज्ञानसंस्कार नावाचे ई–मासिक काही दिवस चालवले. ह्या

मासिकाने कोरोना कालावधीत शिक्षक व विद्यार्थ्यांना लेखनाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी खूले व्यासपीठ म्हणून उत्तम काम केले.

**वॉटर बेल**

शाळेत वॉटर बेल ही संकल्पना अंमलात आणली जाते. विद्यार्थ्यांना उन्हाळ्यात पुरेसे पाणी पिणे आपल्या शरीराला किती आवश्यक आहे हे समजावून सांगण्यासाठी हा उपक्रम घेण्यात येतो. विद्यार्थ्यांना नियमित पाणी पिण्याची सवय व सोबतच पाणी बचतीच्या सवयी अंगी रुजत आहेत. शाळा हे संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्याचे माध्यम आहे. तेव्हा विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकासासोबत कारक कौशल्याचा विकास होणे आवश्यक आहे. त्यासाठी SCERT ने चालू केलेल्या **'शिकू आनंदे'** या उपक्रमाचा विद्यार्थ्यांना लाभ करुन दिला. या उपक्रमातील प्रत्यक्ष व्हिडिओ पाहून मुलांना त्याच कृती व वस्तू तयार करण्याची प्रेरणा मिळाली व मुलांनी वस्तू बनविल्या.

**गुणवत्ता वाढीसाठी उपक्रम**




भाषा विषयाच्या गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांनी प्रत्येक इयत्ता निहाय पाठ्यपुस्तकातील सारांश रुपातील पाठ्यक्रम एका कागदावर बसवून त्यांच्या झेरॉक्स मुलांना पुरवल्या आहेत. पाठ्यक्रमातील आशयाचा सराव करुन घेतला जातो. सुरुवातीच्या काळात प्रत्यक्ष शाळा सुरु नसताना शाळेतील ऑनलाईन वर्गातून या कागदांचा सराव व मार्गदर्शन केले. शाळेतील डिजिटल प्रोजेक्टरवर बाराखडी युक्त शब्दांच्या वाचनाचा अधिकचा सराव घेतला जातो. वाचन क्षमता प्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांना उतारावाचन व उताऱ्यावर आधारित तोंडी प्रश्नोत्तरांचा सराव घेण्यात येतो. राज्य स्तरावरील १०० दिवस वाचन उपक्रमाची शाळेतील उपलब्ध पुस्तकपेढी व ग्रंथालयाच्या माध्यमातून प्रभावी अंमलबजवणी केली. मुलांना वाचनाची आवड निर्माण झाली. सामान्य ज्ञानावर आधारित (नांदेड जिल्हा, महाराष्ट्र) प्रश्नोत्तरांच्या सरावामुळे मुलांमध्ये जिज्ञासा निर्माण होऊन मुले अधिकचे वाचन करु लागली आहेत.

**भूगोल नकाशा वाचन**

नकाशा वाचन हा उपक्रम शिबदरा शाळेत नावीन्यपूर्ण पद्धतीने घेतला जातो. नांदेड जिल्हा, महाराष्ट्र, भारत, जग, यांचा कोऱ्या नकाशात अनुक्रमे – तालुका, जिल्हा, घटक राज्ये व देश यांच्या नावपट्ट्या ठेवण्याचा सराव इयत्ता ३ री ते ७ वी साठी घेतला जातो. विद्यार्थी अगदी सहजतेने नावाच्या पट्ट्या ठेवतात व शहर, जिल्हे ओळखतात. परिसर अभ्यासाचा पाठ्यक्रमावर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्ननिर्मिती करुन त्याचा सराव घेतला जातो.

**अभिनव उपक्रम आई बाबांची शाळा**

पालकांना नियमितपणे शाळेत बोलावले जाते, त्यामुळे पालकांमध्ये शाळेविषयी खूप आस्था व जवळीकता निर्माण झाली आहे. पालक स्वतः शिक्षकांशी संपर्क साधून कृती कार्यक्रम समजून घेतात व आपल्या पाल्याच्या विकासासाठी स्वतःहून लक्ष देऊ लागले आहेत. यामुळे शाळा व समाज यांचा सहसंबंध प्रस्थापित झाला. राज्यस्तरावरील इतर उपक्रम जसे अभ्यासमाला २.०, विज्ञानाचा

गुरुवार, गोष्टींचा शनिवार, whatsapp based स्वाध्याय या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अध्ययनासोबतच ऑनलाईन अध्ययन करता आले.

**भाषिक उपक्रम**

मराठी वाचन दृढीकरणासाठी कुंपणभिंत व वर्गभिंतीवर चौदाखडीवरील शब्द रेखाटन, उतारे रेखाटन केलेले असून त्याचे नियमित वाचन व लेखन करुन घेतले जाते. चौदाखडीवरील शब्द वाचनामुळे लहान वयोगटातील मुलांना वाचनाची आवड निर्माण झाली असून इतर वर्गातील मुलांना वाचनाची गती वाढण्यास मदत झालेली आहे. चित्र व शब्दांचा सहसंबंध लक्षात आला की मुले आपोआपच वाचनाकडे आकर्षित होतात, त्यातून चित्रशब्दवाचन हा उपक्रम प्रभावी ठरत आहे.

पेटीतील शब्दपट्ट्या, वाक्यपट्ट्या व जोड्या लावा यासारखे कृतियुक्त साहित्य, शालेय वाचनालयातील उपलब्ध गोष्टींची पुस्तके व गोष्टींचा शनिवार अंतर्गत दर आठवड्याला उपलब्ध होणाऱ्या पुस्तकांच्या pdf चा वापर केला जातो. मराठीच्या पाठ्यक्रमावर आधारित चार्ट व तक्ते शालेय परिसरात रेखाटन केलेले आहेत, त्याचा नियमित सराव करुन घेतला जातो. इयत्ता १ ली व २ री साठी 'अक्षरजीना' या मुळाक्षरे शिकण्याच्या प्रभावी तंत्राचा वापर केला जातो. यात मुले व्यंजनाच्या क्रमानुसार व्यंजन कार्ड क्रमवार लावतात. या उपक्रमामुळे मुलांना व्यंजनांचा क्रम कळतो. क्रमवार व्यंजने मांडता येतात. याचा उपयोग पुढे चालून शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अक्षरमाला या घटकासाठी होतो. शिष्यवृत्ती व नवोदय पाठ्यक्रमाचे अभ्यासकागद, इ. ५ ते ७ वी मराठी व्याकरणाचे कागद प्रत्येक मुलास देऊन त्यांची व्याकरणाची तयारी करुन घेतली जाते. अर्जलेखन, पत्रलेखन व निबंधलेखन, मुद्द्यावरुन गोष्ट तयार करणे इ. सर्व या कौशल्यपूर्ण लेखनाचा सराव मुलांना आतापासूनच व्हावा यासाठी इयत्ता १० वी पाठ्यक्रमावर आधारित पत्रलेखन, अर्जलेखन व निबंधलेखन यांचा सराव इयत्ता ३ री पासुन करून घेतला जातो.

**गणितीय उपक्रम**

वर्गभिंतीवर त्या त्या वर्गाचा गणिताचा पाठयक्रम रेखाटण्यात आला आहे आईस्क्रीम काड्या, काडीपेटी काड्या, सुट्टे एकक, दशक दांडे, शतक पाट्या, हजार ठोकळा, इ. गणित पेटीतील साहित्य वापरले जाते. 10 अंकी संख्या लेखन व वाचनाचा सराव इयत्ता 3 री पासून घेतला जातो. प्रत्येक वर्गाचा पूर्ण पाठ्यक्रम सारांश रूपाने इयत्ता १ ली ते ४ थी साठी १ कागद, इयत्ता ५ वी ते ७ वी साठी ३ कागद तयार करण्यात आले आहेत . त्याचा नियमित सराव घेतला जातो. पाचव्या वर्गात भिंतीवर नवोदय व शिष्यवृत्ती पूर्ण पाठ्यक्रम रेखाटण्यात आला आहे.

**विषय इंग्रजी**

पत्रलेखन, अर्जलेखन, निबंधलेखन यांचा १० वीच्या पाठ्यक्रमावर आधारित सराव इयत्ता ३ री पासून घेतला जातो. इयत्ता ५ वी ते ७ वी साठी इंग्रजी व्याकरणावर भर दिला जातो. इंग्रजी अक्षरजीना या उपक्रमाचा वापर केला जातो. मुलांना इंग्रजी अक्षरांचा वर्णानुक्रम कळतो. शिष्यवृत्ती इंग्रजीचा पाठ्यक्रम बॅनरवर तयार करुन वर्गात लावण्यात आला आहे व त्याचा नियमित सराव सुरु आहे.

**लोकसहभाग**

गावातील ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, गावातील रहिवाशी शासकीय कर्मचारी वर्ग व शिक्षणप्रेमी सर्व नागरिकांनी सहभाग घेऊन शाळा डिजिटल व सुशोभिकरण करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यातून शाळेच्या वर्गभिंतीवर तसेच कुंपणभिंतीवर अभ्यासक्रम रेखाटन केलेले आहे. शाळेचे माजी विद्यार्थी शैलेश काळे यांनी शाळेसाठी निऑन फाउंडेशनच्या माध्यमातून थंड पाण्याचे फिल्टर दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा स्वच्छ व शुदध पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न दूर झालेला आहे. तसेच त्यांचेकडून निऑन फाउंडेशनच्या माध्यमातून 2 LED TV संच व स्वखर्चातून संगणक संच नंदकुमार काळे यांचे कडून 1 LED TV संच देण्यात आला आहे. गावातील स्व. शिवाजीराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमित्ताने करावयाचा खर्च टाळून त्यांच्या कुटूंबियांनी तीस हजार रुपये किंमतीचा सीसीटीव्ही कॅमेरा सेटअप शाळेसाठी दान दिला आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत निश्चितच वाढ होत आहे. शाळेला पुरेश्या वर्गखोल्या, मैदान, संरक्षक भिंत, स्वच्छतागृह या सुविधा उपलब्ध आहेत. तसेच परिसर स्वच्छ व सुंदर ठेवला जातो.

शाळेच्या गुणवत्तावाढीसाठी जिल्हा, तालुका व स्थानिक प्रशासन या सर्वांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे. आमचे गटशिक्षण अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांचे देखील वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य व मुख्याध्यापकांसह आम्ही 7 शिक्षकांच्या एकत्रित प्रयत्नातून ही शाळा गुणवत्तेकडे वाटचाल करत आहे.

मुख्याध्यापक : श्री. गोविंद शिंदे, संपर्क : ९०११७ ४४३७०



**'पहिले पाऊल'** या उपक्रमांतर्गत शाळेच्या पहिल्याच दिवशी नवागतांचे स्वागत – इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वाटप करताना श्री. रनजित सिंह देओल, सचिव व श्री. कैलास पगारे, राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा, शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी, मातापालक, शिक्षक इ. जि. प. शाळा, हालोली, पडवळपाडा, ता. पालघर



शैक्षणिक साहित्य निर्मिती उपक्रमांतर्गत तंत्रज्ञानाचा इंग्रजी अध्यापनात प्रभावीपणे वापर करण्यासंदर्भात मान्यवरांसमोर सादरीकरण करताना तंत्रस्नेही शिक्षक जि. पालघर

भारत

"Technology will not
replace great teachers but
technology in the hands of great
teachers can be transformational"

– George Couros

सा.रे.ग
म.प.ध.नी

नाट्य

Samagra Shiksha
Maharashtra

सर्व शिक्षा अभियान

सब पढ़ें सब बढ़ें